
# स्वरयोगिनी

लेखक :
ए. पी. नारायणगावकर



3

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# स्वरयोगिनी

लेखक

श्री. ए. पी. नारायणगावकर

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई.

प्रथम आवृत्ती–२००१

प्रकाशक :

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
१७२, मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई ४०० ०१४.

© प्रकाशकाधीन :

मुद्रक :

व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार,
सिव्हील लाईन्स,
नागपूर ४४० ००१.

किंमत : ८५ रुपये

# अर्पण पत्रिका



श्रीमंत राजे भवानराव पंत

औंध संस्थानच्या राज्य घटनेत व प्रत्यक्ष व्यवहारांत ज्यांनी स्त्रियांच्या जीवन विकासासाठी शिक्षण क्षेत्रांत व कलाप्रांतात सदैव पुरोगामी आचारविचारांचा पुरस्कार केला त्या गुरुवर्य श्रीमंत राजर्षि भवानराव महाराज पंत प्रतिनिधी औंध नरेशांच्या " पवित्र चरणी " हा ग्रंथ सादर समर्पण.

आत्माराम नारायणगांवकर

२१-१-२०००

# प्रस्तावनिका

दि. १०-१२-९९

संगीतरत्न आत्माराम पांडुरंग तथा पं. ए. पी. नारायणगांवकर यांनी या शताब्दीतील समर्थ स्त्री गायक कलाकारांच्या गुण विशेषांचा परिचय शब्दबद्ध करून सांगीतिक जगाची एक आवश्यकता पूर्ण केलेली आहे. शताब्दी कालावधीतील संगीत जगाच्या प्रवासाची ज्यांना माहिती आहे त्यांना हे देखील ज्ञात असणार की, शास्त्रीय संगीत किंवा संगीताच्या कोणत्याही प्रकाराशी जवळीक साधणे महाकठिण होते. स्त्रियांच्या बाबतीत तर ही बाब कल्पनेत न बसणारी होती. परंतु, परिवर्तनाच्या ओघात अनेक अशक्यप्राय गोष्टी शक्य होऊ शकल्या. भारतीय संगीत जगताच्या जडणघडणीत स्त्री कलाकारांनी मोलाची कामगिरी केलेली आहे. परिवर्तनाच्या काळातील समस्यांना तोंड देत देत आपली कारकिर्द यशस्वी रितीने पार पाडणाऱ्या अशा कलाकारांचा विविध अंगांनी होणारा परिचय क्षेत्रातील सर्वांना वरदान ठरणारा आहे. एवढेच नव्हे तर सद्यःस्थितीत सर्वसामान्यांना देखील उपयोगी ठरणारा आहे. कलावंत आपल्या तरल भावशक्तिने स्वरांच्या माध्यमांतून स्वतंत्र विश्व निर्माण करतो. स्वर शक्तिचा समर्थ उपयोग करून निर्माण होणाऱ्या आगळ्या विश्वात श्रोत्याला समाविष्ट करून घेण्याची किमया तो करीत असतो. ही क्षमता प्राप्त करण्यासाठी मोठया दिव्यांतून पार पडावे लागते, प्रखर अशा विविध कसोटयांवर तावून सुलाखून ही निर्मितीक्षमता तो कमावत असतो. कल्पनेच्या जोडीस भावनिक आवाहन देत देत हा पसारा उभा होत असल्याने ईश्वरदत्त नैसर्गिक गुणविशेषांमुळे स्त्री कलावंतांच्या भावाविष्कारांना वेगळेपण असणे स्वाभाविक असते. जद्दन बाई, बाई सुंदराबाई, अख्तरी बाई पासून प्रभा अत्रे, परवीन सुलताना आणि वीणा सहस्त्रबुद्धे पर्यंतचे भले मोठे मनोहारी ' स्वरेन्द्रधनुष्य ' या पुस्तकाद्वारे समोर उभे करण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे.

श्री. नारायणगांवकर स्वतः संगीत शिक्षक, रचनाकार, विद्यालयाचे प्राचार्य, एच. एम. व्ही. चे संगीत नियोजक आणि कुशल संघटक असून या पुस्तक निर्मितीमुळे त्यांच्या विशेषांमध्ये मोलाची भर पडली आहे. कोणत्या ना कोणत्या कार्यासंदर्भात त्यांचा या सर्व कलावंतांशी परिचय झाला, ज्याचे पर्यावसान गुणविशेष, स्वभाव गुण, कर्तृत्व शक्ति, कार्यक्षमता आदि जाणकारी प्राप्त करण्यात झाली. परिणामी ही स्वरचित्रे शब्दबद्ध होवून रसिकांसमोर आली. प्रत्येकाच्या आविष्कारातले मर्म, तपस्येमागील विशेषत्व, भावविश्वांत रमणारे मन, आदींची उकल करताना लेखकाने आलेल्या संबंधांचा, झालेल्या बातचितीचा, घडलेल्या घटनांचा आधार घेतला आहे. यामुळे मोठ्या कालावधीतल्या, विविधागांनी भरपूर असा विचार ते मांडू शकले आहेत. प्रत्येक कलावंताच्या विशेषाचे चिकित्सक आणि जागरूक वृत्तीने त्यांनी आपल्या शैलीत मोजमाप केले आहे.

१९४४ ते ४९ या कालावधीतील जद्दनबाईंचा परिचय आणि पुढील प्रवासाची माहिती, " ज्यानं मनापासून विद्या दिली त्या गुरुशी काडीमोड घेऊन बाजारात आज ज्याची किंमत जास्त आहे अशा नामवंत गुरुकडे नाममात्र शिक्षण घेण्याकडे तरूण होतकरू गायकांची गर्दी झालेली दिसते ती त्या नावाचं तेजोवलय प्राप्त व्हावं म्हणून ". हे नेमकं पण परखड मत प्रदर्शन " वो जो हममे तुममे करार था, तुम्हे याद हो के न याद हो " या मेनकाबाईच्या आविष्काराची शब्दांकित आठवण, " बोला अमृत बोला " ही भैरवी म्हणजे मास्तरांची बुद्धिमत्ता आणि ज्योत्स्नाबाईंचा गळा याची चालती बोलती साक्ष आहे हे अवलोकन आणि अनेक शारिरीक दुखण्याशी सातत्याने झुंज घेत घेत प्रामाणिकपणे विद्यादानाचे पवित्र कार्य ज्या कमलाताई तांबे यांनी केलं त्यांच्या गुणविशेषांचा यातला अंतर्भाव बरेच काही वेगळं दर्शवून जातो. कमलाताईची उपासना, गुरुवरची प्रखर श्रद्धा, आविष्कारातले शुद्धत्व, निखळ, नियमबद्ध आणि चुस्त अशी मांडणी, आजाराशी त्यांनी घेतलेली झुंज, त्यांच्या ऋजुतेच्या, निर्मळपणाच्या, दातृत्वाच्या किंवा मानसिक समतोलाच्या आड येऊ शकली नाही हे सत्य बारा स्वरांच्या विश्वउभारणीत मग्न असणाऱ्यांना कोणतेही संकट अडवू शकत नाही हेच स्पष्ट करते.

असे अलौकिकत्व असणाऱ्या स्वर योगिनींचा परिचय करवून देण्याचे कार्य करून लेखकाने संगीत जगाची एक आवश्यकता पूर्ण केली आहे. काही तपशिलावावतीत वेगळी मते मांडली जावू शकतील मात्र पुस्तकामुळे अस्तायमान होणाऱ्या शतकांतील परिवर्तनांना सामोरं जावून, स्त्री कलावंतांनी संगीत क्षेत्रांत भरीव कामगिरी केल्याचे स्पष्ट होत असल्याने क्षेत्रांतील सर्वांना हे उपयोगी असून इतरांना निश्चितच याचा लाभ होणार आहे. विविध नृत्य प्रकार आणि विविध वाद्यांच्या माध्यमांतून झालेल्या कार्याची यात नोंद घेतली गेली असती तर हे अधिक पूर्णत्वास गेले असते.

पं. ए. पी. नारायणगांवकर यांचे अभिनंदन.

**पं. बलवंत जोशी ( अध्यक्ष )**

अ. भा. गांधर्व महाविद्यालय मंडळ ( मुंबई ).

# " स्वर योगिनी " साठी मनोगत

* महाराष्ट्र राज्य सरकारनं जाहीर केलेल्या महिला वर्षानिमित्त " महिला कलाकारांचं संगीत योगदान " या विषयावर रविवार नवशक्तिमध्ये जानेवारी १९९८ पासून माझ्या क्रमशः २५ लेखांची मालिका प्रसिद्ध झाली, ती सर्वत्र लोकप्रिय अन् यशस्वी ठरली हे समाधान.

* मला कलाकार भगिनींच्या सहवासाचं भाग्य लाभल्यामुळे माझं ते लेखन अकृत्रिम, प्रवाही आणि अभ्यासपूर्ण झालं आहे, या जाणकारांच्या अभिप्रायांमुळे विशेष आनंद होतो.

* कपोलकल्पित कथा रचून कथालेखन करण्यापेक्षा जे कुणी बरं वाईट सत्य अनुभविलं आहे, ध्येय पूर्तीसाठी निष्ठेनं, प्रामाणिकपणे आयुष्यभर कठोर तपस्या करून जे साध्य करून घेतलं आहे असं आदर्श अन् वास्तव दर्शन घडविण्यासाठीं तेजस्वी चरित्र कथन करणं हा माझा आवडता छंद आहे.

* लहानपणीं मी अशा आदर्श चरित्रांचं भरपूर वाचन केले आहे, अभ्यास केला आहे त्यामुळेच माझ्या गायन व कीर्तन सेवेचा उपयोग सतत मजकडून समाज-सेवेसाठी व राष्ट्र कार्यासाठी होत गेला ही त्या सुसंस्कारांची फलश्रुती होय, असंच मला वाटतं.

* कलागुण जोपासणारे थोर साहित्यिक व कीर्तन रचनाकार गुरुवर्य श्रीमंत राजर्षि भवानराव महाराज औंध नरेश यांच्या मार्गदर्शनाखाली माझा गायन व कीर्तनाभ्यास झाल्यामुळे संस्कृत-मराठी वाचन, लेखन हा माझा आवडीचा विषय झाला.

* त्यानंतर १९४५ पासून मुंबईत " हिज मास्टर्स व्हॉइस " या ग्रामोफोन कंपनीत संगीत नियोजकाचं काम करीत असताना अनेक विध संगीतकारांचा मला जवळून सहवास घडला त्या हृद्य आठवणींचा संग्रह, हा माझा खजिना होय.

**सांगीतिक वृत्तपत्रीय लेखन**

* १९८० पासून अनेक वृत्तपत्रांतून मी अनेकविध वैचारिक लेख लिहिले व " नवशक्ति " मध्ये मी " संगीत समीक्षक " या नात्यानं, सातत्यानं वर्षानुवर्षे सेवा केली ती अविस्मरणीय ठरली. त्यावेळी श्रीमान पु. रा. बेहरे संपादक होते.

* ऑगस्ट १९९७ मध्ये नवशक्ति संपादक श्री. भाऊसाहेब जोशी यांच्या सांगण्यावरून " स्वातंत्र्य संग्रामात औंध नरेशांचं योगदान " ही स्मृतिलेखमाला मी लिहिली तिचंही जनतेनं स्वागत केले.

* त्यानंतर नोव्हेंबर १९९७ मध्ये " लोकप्रिय गायिका आशा भोसलेंची पुरस्काराबद्दल खंत " जाहीर झाली. त्यावर मी लेख लिहिला तो १४ नोव्हेंबर १९९७ रोजी नवशक्तिमध्ये, त्यावर संपादक भाऊसाहेब जोशी यांनी " महिला कलाकारांचे योगदान " या विषयावर क्रमशः महिला वर्षानिमित्त मी लेखमाला लिहावी हे आग्रहानं सांगितलं. मी लेखन सुरु केले आणि १५ डिसेंबर १९९७ रोजी भाऊसाहेब अकस्मात् आम्हाला सोडून गेले. पण त्यांच्या आदेशाचे पालन करण्याचं ठरवून सहसंपादक श्रीमती सुलेखा गांधी आणि नवे संपादक श्रीमान ह. मो. मराठे यांनी ती माझी लेखमाला चालू ठेवली ती जुलै १९९८ पर्यंत आणि ती लेखमाला प्रकाशित करण्यास परवानगी दिली त्याबद्दल धन्यवाद.

* या मालिकेची यशस्विता अन् महत्त्व ध्यानी घेऊन नामदार श्रीमान प्रमोदजी नवलकर ( सांस्कृतिक कार्यमंत्री, महाराष्ट्र राज्य ) यांनी या लेखांचा संग्रह ग्रंथ रूपानं प्रकाशित व्हावा अशी व्यवस्था केली म्हणून " स्वर योगिनी " हे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांना हार्दिक धन्यवाद.

आजच्या हिप्पी संस्कृतीच्या जमान्यात अशा आदर्श चरित्रांची आवश्यकता आहे असे माझ्याप्रमाणेच अनेक संगीतज्ञांचं मत आहे, ते सफल होवो.

**– ए. पी. नारायणगांवकर**

# '' स्वरयोगिनी '' विषयी

संगीतरत्न पंडित आत्माराम पांडुरंग तथा अे. पी. नारायणगावकर यांचे '' स्वरयोगिनी '' हे पुस्तक मराठी वाचकांच्या हाती देताना मला विशेष आनंद होत आहे.

श्री. नारायणगावकर हे वयोवृद्ध असल्यामुळे आपल्या हयातीत हे पुस्तक प्रसिद्ध व्हावं अशी त्यांची तीव्र इच्छा होती. आपली ही इच्छा त्यांनी वेळोवेळी दूरध्वनीद्वारे माझ्याकडे बोलून दाखविली होती. त्यांचे हे पुस्तक अग्रक्रमाने छापावे असे मी शासकीय मुद्रणालयाला कळविले होते. शासकीय मुद्रणालयाने माझी ही इच्छा प्रमाण मानली व त्यानुसार पुस्तकाची छपाई पूर्ण केली. त्याबद्दल शासकीय मुद्रणालयाचा मी आभारी आहे.

श्री. अे. पी. नारायणगावकर यांनी या पुस्तकात संगीताच्या क्षेत्रातील पंचवीस नामवंत गायिकांचा परिचय करून दिलेला आहे. या गायिकांच्या वैयक्तिक जीवनाचा हा जसा परिचय त्यांनी करून दिला आहे त्याप्रमाणे त्यांच्या गायकीची वैशिष्ट्येही त्यांनी या पुस्तकात नमूद केली आहेत.

श्री. अे. पी. नारायणगावकर हे स्वतः आकाशवाणीचे विशेष श्रेणीचे गायक व संगीत नियोजक असल्यामुळे या स्वरयोगिनींशी त्यांचा जवळून परिचय आहे. त्यांच्या लेखनात सुबोधपणा व जिव्हाळा आहे. स्वरयोगिनीचे लेखन करुन त्यांनी मोठी ऐतिहासिक कामगिरी केली आहे, असे मला वाटते.

श्री. अे. पी. नारायणगावकर यांचे हे पुस्तक महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने प्रसिद्धीसाठी १९९९ साली स्वीकारले. या कालावधीत यातील काही गायिकांच्या व्यक्तिगत जीवनात तसेच त्यांच्या गायिकी जीवनात काही महत्त्वपूर्ण घटना घडल्या असण्याची शक्यता आहे. पण त्याचा निर्देश या पुस्तकात आलेला नसेल म्हणून त्या " स्वरयोगिनीं " चा हा परिचय १९९९ सालापर्यंतचाच आहे, हे वाचकांनी लक्षात घ्यावे.

या पुस्तकाचे मराठी वाचक - विशेषतः संगीताची आवड असणारे वाचक दिलखुलास स्वागत करतील, असा मला विश्वास आहे.

**रा. रं. बोराडे,**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि
संस्कृती मंडळ, मुंबई.

मुंबई :
दिनांक २४-५-२००१.

———

# स्वर योगिनी

## अनुक्रमणिका


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | मोगूबाई कुर्डीकर | १ |
| २ | केसरबाई केरकर | ७ |
| ३ | ताराबाई शिरोडकर | १३ |
| ४ | अंजनीबाई मालपेकर | १९ |
| ५ | हिराबाई बडोदेकर | २५ |
| ६ | गोहरजान | ३१ |
| ७ | जद्दनबाई | ३७ |
| ८ | बेगम अख्तर | ४३ |
| ९ | मेनका शिरोडकर | ४९ |
| १० | बाई सुंदराबाई | ५५ |
| ११ | सरस्वती राणे | ६१ |
| १२ | निर्मला अरूण | ६९ |
| १३ | गंगूबाई हनगल | ७३ |
| १४ | माणिक वर्मा | ७९ |
| १५ | कमल तांबे | ८५ |
| १६ | पद्मावती शाळिग्राम | ९१ |
| १७ | जोत्स्ना भोळे | ९७ |
| १८ | जयमाला शिलेदार | १०३ |
| १९ | किशोरी आमोणकर | १११ |
| २० | परवीन सुलताना | ११७ |
| २१ | प्रभा अत्रे | १२३ |
| २२ | वीणा सहस्त्रबुद्धे | १३१ |
| २३ | लता मंगेशकर | १३७ |
| २४ | आशा भोसले | १४५ |
| २५ | अनामिका | १५१ |

'' स्वरयोगिनी '' मधील कलाकारांची छायाचित्रे


मोगूबाई कुर्डीकर


हिराबाई बडोदेकर


जद्दनबाई


बेगम अख्तर


बाई सुंदराबाई


सरस्वती राणे


माणिक वर्मा


कमलाताई तांबे


पद्मावती शाळीग्राम


लता मंगेशकर


आशा भोसले

इतर कलाकारांची छायाचित्रे उपलब्ध झाली नाहीत.

# गानतपस्विनी मोगुबाई कुर्डीकर

**सुरेल आवाज, अविरत साधना, अखंड तपस्या याद्वारे संगीतक्षेत्राच्या समृद्धतेत गायिकांनीही आजपर्यंत मोलाची भर घातली आहे. गानतपस्विनी मोगुबाई कुर्डीकर या त्यांच्यापैकीच एक. महिला वर्षानिमित्त अशाच स्वरांची देणगी लाभलेल्या तपस्विनी गायिकांची ओळख घडविणारी मालिका आम्ही सादर करीत आहोत. पहिला मान अर्थातच १९९७ सालचा ' माणिकरत्न ' पुरस्कार लाभलेल्या मोगुबाईचा.**

पूज्य श्रीमती मोगुबाईंना आक्टोबर, ९७ मध्ये माणिक वर्मा प्रतिष्ठानतर्फे माणिकरत्न ' हा बहुमोल पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलं, हे योग्यच झालं पण त्या पुरस्काराचा स्वीकार करून एकप्रकारे मोगुबाईंनी माणिकताईंचाच प्रेमानं बहुमान केला आहे व हे त्या पुरस्कारालाच भूषणावह ठरलं आहे. मोगुबाईंचं वय आज ९४ वर्षाचं आहे, पण आजही रियाज केल्याशिवाय त्या जेवत नाहीत, अशी त्यांची अभिजात संगीतावरील जाज्वल्य निष्ठा आहे. हे एक व्रत आहे. ही नादब्रह्माची नित्य पूजा, श्रेष्ठ उपासना आहे. संगीत दुनियेतील हा एक श्रेष्ठ आदर्श आहे. पण तो आदर्श कोण मानतो ? आज संगीत हा राजरोस व्यापार धंदा झाला आहे. हा भोवतालचा अनुभव त्यांना मनस्ताप देतो व तो त्या जाहीर मैफिलीत उद्वेगाने व्यक्त करताना मी अनेकवेळा ऐकला आहे. अ. भा. गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या गोवा अधिवेशनात मडगांवी मोगुबाईंचा सत्कार केला त्यावेळी त्या ऐंशी वर्षांच्या होत्या. भक्कम स्थिर आवाजात, श्वसनक्रियेवर, तानेवर पूर्ण ताबा ठेवून त्यांनी आपली मैफिल मध्यरात्री रंगवून यशस्वी केली व गायकांच्या पुढे आदर्श ठेवला, तो प्रसंग अविस्मरणीय आहे. त्यानंतर मी दुसरे दिवशी त्यांची भेट घेऊन त्यांच्याकडून बालपणीची माहिती मिळविली ती इथे केवळ संक्षिप्तपणे नमूद करतो.

**मातोश्रींची इच्छा :**

कोणत्याही अपत्याची जडणघडण आईच्या सतत होणाऱ्या बऱ्यावाईट संस्कारावर होत असते हे पूर्वी व आताही आपण सर्वत्र पाहतो, अनुभवतो. आई महत्वाकांक्षी असेल तर तिचे अपत्य हेही कलेमध्ये, विद्वतेमध्ये श्रेष्ठ स्थान मिळवतं. ते स्वस्थ बसत नाही व आई त्याला स्वस्थ बसू देणार नाही. इतर नामवंत गायिकांप्रमाणे आपल्या अपत्यांनही आपल्या कुळाचं नाव गाजवावं असं प्रत्येक आईला वाटतं. मोगुबाईची मातोश्री जयश्रीबाई यांनाही अशा महत्वाकांक्षेनं पछाडलं होतं.

सात वर्षाच्या मोगुला घेऊन कुर्डीहून पायी चालत ही माऊली जांबावलीस आली व एका कीर्तनकाराकडे मुलीला गाणं शिकविण्याची तिने विनंती केली. त्याचा भटकण्याचा व्यवसाय. तरीपण जेवढे दिवस इथे रहाल तेवढे दिवस मुलीला गाणं शिकवा असा तिनं आग्रह धरला. त्यामुळे काही महिने शिक्षण मिळालं. मोगुला गाण्याबाबत बुद्धिमत्ता व आवाजही अनुकूल होता. नंतर मुलीला नाटक कंपनीतल्या गवय्याकडून शिक्षण मिळेल म्हणून ' चंद्रेश्वर भूतनाथ संगीत मंडळी ' मध्ये त्या जाऊन राहिल्या. त्या नाटक कंपनीबरोबर दैवही भ्रमंती करीत होतं. मुलीचा गोड आवाज पाहून कंपनीच्या मालकाने मोगूला ' प्रल्हाद ', ' ध्रुव ' अशा भूमिका नाटकातून दिल्या. तिच्या गाण्याला टाळ्या पडल्या की जयश्रीबाईंना अतिशय आनंद होई. कारण मोगु त्या भूमिकेत गाणी गाताना सुरात तालात धीटपणाने गात असे.

काही दिवसांनी जयश्रीबाई खूप आजारी झाल्या. उपचार चालू होते, पण त्याच कंपनीत आपल्या गावचा विश्वासाचा माणूस बाळकृष्ण पर्वतकर होता. त्याच्याकडे मुलीला सोपवून बाई निवर्तल्या पण अखेरच्या घटकेस मुलीचा हात आपल्या हाती घेऊन ती माऊली म्हणाली, " बाळ मोगु, तू मोठी गायिका होऊन नांव मिळवशील तेव्हाच माझ्या आत्म्याला शांती मिळेल. तोपर्यन्त माझा जीव तुझ्या भोवताली घोटाळत राहील हे विसरू नकोस. " मोगुने त्याक्षणी आईला वचन दिलं " आई अनंत हाल सोसीन, रात्रंदिवस रियाज करीन, मानापमानाची तमा बाळगार नाही, पण संगीत विद्या

मिळवीन अन् तुझी इच्छा पूर्ण करीन. " आईची प्रेमळ भाषा अंतरली आणि शिवाय नाटक कंपनीत फाटाफूट होऊन कंपनी बंद पडली. मोगु परत गावी आली, पर्वतकर काकाबरोबर.

एके दिवशी अचानक ' सातारकर स्त्री संगीत मंडळी ' मध्ये मोगुला बोलावणं आले आणि बाळकृष्ण पर्वतकरांसह मोगु दाखल झाली. ' सौभद्र ' मध्ये सुभद्रा, ' पुण्यप्रभाव ' मध्ये किंकिणी या भूमिकेमध्ये मोगुने आपल्या मेहनतीने सुयश मिळवलं, लोकप्रियता मिळू लागली. गाणं व अभिनय प्रगतिपथावर नेला. पण तेच यश नडलं. मत्सर, द्वेष, हेवे-दावे सुरू झाले व मालकिणीनं भांडण केले. मोगु परत गावी आली. मनःस्ताप, नैराश्य, कटु अनुभवाचं गाठोडं डोक्यावर. मोगु आजारी पडली. मोगुबाई आता तारूण्यात आली होती. औषधोपचार व हवापालट करण्यासाठी मोगुबाई सांगलीत आल्या. नामवंत सांबारे वैद्य हे संगीतातील जाणकार रसिक आणि कलाकाराबद्दल अभिमान, प्रेम बाळगणारे होते. त्यांचे उपचार व त्यांच्यामुळेच इनायत खांसाहेबांकडे मोगुचे गाणं शिकणं सुरू झाले. मोगुची मेहनत सुरू झाली एकाग्रतेने. पण खांसाहेब भारी लहरी, विचित्र स्वभावाचे. त्यामुळे शिक्षण बंद पडलं पण मोगूने रियाज चालूच ठेवला. त्यामुळे मोगुबाईचे भाग्य उदयाला आलं.

**खडतर तपस्या फळाला आली :**

एका सायंकाळी मोगूची एकाग्रचित्तानं मेहतन चालू होती. मारव्याचा तारसप्तकांतील कोमल रिषभ आर्ततेनं लावून आवाज षड्जावर स्थिर झाला तोच ' वाहवा ' चा आवाज कानी आला. गाणं थांबवून डोळे उघडले. पहाते तो पांढऱ्याशुभ्र गलमिशांचा, धोतर अंगरखा आणि गुलाबी फेटा परिधान केलेला कुणी योगिराज समोर उभा. " बेटा गाते रहो, रियाज थांबवू नकोस, ऐकू दे आम्हाला तुझं गाणं. इथून जाता-येता आम्ही रोज ऐकतो. तुला प्रत्यक्ष पहावं म्हणून आज आत आलो. "

वैद्यराज आबासाहेब सांबाऱ्यांकडे औषधोपचारासाठी आलेले ते अल्लादिया खांसाहेब होते. मोगुबाईची आग्रहाची विनंती मान्य करून त्यांनी त्याक्षणी मुलतानी ' रागाची तालीम सुरू केली हा संगीतसम्राट आहे याची मोगुबाईला काय कल्पना ?

एके रात्री वैद्यराजांचे घरी खाँसाहेबांची बैठक ऐकल्यावर तिला त्यांची योग्यता कळली. मन गहिवरलं. भाग्याची कल्पना आली सतत दीड वर्ष तालीम मिळाली. त्यात मुलतानी-तोडी, धनाश्री-पूर्वी, पूरिया धनाश्री, बसंत यासारखे समप्रकृतिक अनेक रागांचा सखोल अभ्यास विस्तार, तानपलट्यांसह तयारीत झाला. मोगुबाईच्या ग्रहणशक्तीवर गुरू खूष होते. प्रसन्न अंतकरणानं, मुक्तहस्तानं ते तिला विद्या देत होते, पण पुन्हा दुर्दैव आड आलं.

कायमच्या वास्तव्यासाठी खाँसाहेब आता मुंबईला निघाले. मोगुबाईला अतिशय दुःख झालं. खाँसाहेबांनाही वाईट वाटलं पण त्यांचा नाईलाज होता. त्यांनी तिला मुंबईला बोलावलं. पण ते सोपं नव्हतं. थोड्याच दिवसात धडपड करून निश्चयाच्या बळावर तिने शिक्षणासाठी मुंबई गाठली. खेतवाडीत लहानशी जागा मिळवून तेथे राहिली. अल्लादिया खाँसाहेबांनाही आनंद झाला. आता पुन्हा तिच्या शिक्षणाला सुरूवात झाली. पण थोड्याच दिवसात दुर्दैवानं पुन्हा दगा दिला.

अल्लादिया खाँसाहेबांच्या पोशिंद्यानी अट घातली, '' आमच्याशिवाय दुसऱ्या कुणालाही विद्या द्यावयाची नाही '' हे बंधन त्यांना नाईलाजाने पाळावं लागलं. पण त्यांनी आपले बंधू हैदर खाँसाहेब यांच्याकडे मोगुबाईच्या शिक्षणाची तात्पुरती व्यवस्था केली व शिक्षण चालू ठेवलं. हैदरखाननी मात्र मनापासून विद्या दिली. काही वर्षातच हैदरखान यांनाही मुंबई सोडून जाणं भाग पडलं. पण जिद्द न सोडता मोगुबाईनी आपला रियाज अखंड चालू ठेवला व तयारी वाढविली.

**गंडाबंधन विधी :**

श्रद्धा-निष्ठा सफल झाल्याशिवाय कशी राहील ? एक दिवस अचानक अल्लादिया खाँसाहेब मोगुबाईकडे आले आणि शिकवू लागले. मोगुबाईचा आनंद गगनात मावेना. रीतसर गंडाबंधन झालं आणि पुन्हा नियमितपणे शिक्षण सुरू झालं ते मात्र कायमचं.

## जयपूर गायकीची आदर्श गायिका :

लहानपणापासून अनेक संकटावर, प्रतिकूलतेवर जिद्दीनं संगीतावरील अढळ निष्ठेनं मात करून " गानतपस्विनी " ही रसिकदत्त पदवी सार्थ करणाऱ्या मोगुबाई कुर्डीकरांचं तरूणपणाचं गाणं ऐकायचं भाग्य मला लाभले नाही तरी १९६७ साली (म्हणजे त्यांच्या साठी नंतर) महाराष्ट्र राज्य संगीत महोत्सवात ऐकलेली अत्यंत श्रेष्ठ दर्जाची मैफिल ऐकून त्यांची श्रेष्ठता पटायला वेळ लागला नाही. या मैफिलीत भूपनट, बिहागडा, रायसाकानडा, वसंतबहार हे राग मी ऐकले. मोकळा आवाज, आकारयुक्त आलापी, अत्यंत मनोहर लयकारी, सहजगत्या गळ्यातून निघणारे दाणेदार तानपलटे, कठीण तान प्रकारांची एकेक वेगवेगळी सुंदर उपज, कारंजाची धार उडते की काय अशी तार पंचमापर्यंत आवाजाची ताकद, श्वसनक्रियेवर कमालीचा ताबा, समेनंतर एकदा छातीत श्वास भरून घेतला की तान मध्ये न तोडता विलंबित लयीमध्ये ही पुढच्या समेपर्यंत श्वास पुरविण्याची त्यांची जिद्द व शिस्त पाहून तरूण गायकही स्तिमित होतात. मोगुबाईंची सर्वच कामगत त्यांच्या तपस्वी जीवनाची सफलता आहे असंच म्हणावं लागतं.

असं सुरेल, दमदार, लयकारीचे शास्त्रशुद्ध गाणं ऐकायला मिळणे यापुढे दुर्मिळ झालं आहे. मोगुबाईच्या गायकीचे एक खास वैशिष्ट्य हे की ती निखालसपणे ख्यालातच रमणारी गायकी आहे. तिथे तत्वनिष्ठा सोडून लोकरंजनासाठी दुसरा गायनप्रकार आढळणार नाही. त्यांची ठुमरी आजपर्यंत कुणी ऐकली नाही.

अशा गानतपस्विनीचे कार्यक्रम भरपूर प्रमाणात संगीत रसिकांना वारंवार ऐकायला मिळाले नाहीत हे सत्य आहे, याची खंत अनेकांना वाटते आहे. त्याचं कारण त्यांची मैफील सर्वसामान्य श्रोत्यांना पेलण्यासारखी नव्हती, हेच होय. पण त्यामुळे त्यांच्या श्रेष्ठपणाला बाधा येत नाही. कोणीही गायिकेनं महत्वाकांक्षा बाळगावी. त्यांचा असा अत्युच्य सन्मान भारत सरकारच्या " संगीत नाटक

अकादमीने " पूर्वीच केलेला आहे, हे त्यांच्या जयपूर गायकीला व तपस्येला भूषणावह आहे यात काय संशय. शनिवारी १० फेब्रुवारी २००१ रोजी सायंकाळी अनपेक्षितपणे त्या देवाघरी गेल्या आणि संगीत सृष्टी उदास झाली.

प्रतिकूल परिस्थितीवर मात करणाऱ्या मोगूबाईंना माझे शतशः सादर प्रणिपात.

(रविवार, नवशक्ती ४ जानेवारी, १९९८.)

• • •

# गानतपस्विनी केसरबाई केरकर

तपस्या आणि जिद्द यांच मूर्तिमंत प्रतीक म्हणजे केसरबाई केरकर. संगीताच्या आराधनेकरिता वर्षानुवर्षे १२/१२ तास मेहेनत करणं आणि गुरुजींना प्रसन्न करून कष्टसाध्य विद्या प्राप्त करून घेणं म्हणजे काय, ते केसरबाईंचं जीवन ज्यांनी जवळून पाहिलं आहे आणि त्यांच्या श्रेष्ठ दर्जेदार गायनाच्या मैफिली ज्यांनी अभ्यासपूर्वक ऐकल्या आहेत, त्यांनाच कळेल.

१९४४-४५ मध्ये मुंबईत गिरगाव, दादरमध्ये खूप म्युझिक सर्कलस् होती त्यामुळे शनिवारी, रविवारी सुट्टीचे दिवशी गायन-वादनाचे कार्यक्रम सातत्यानं होत असत त्यात माझेही कार्यक्रम होत असत. म्युझिक सर्कल्स्‌शिवाय कौटुंबिक समारंभातही रसिक लोक आवर्जून कार्यक्रम ठेवीत आणि श्रोतेही भरपूर हजर राहून आनंद घेत. संगीताला अनुकूल असा तो संस्मरणीय काळ होता. त्यामुळे केसरबाईंचेही कार्यक्रम ऐकण्याचा सुयोग जाणकरांना, अभ्यासकांना लाभत असे. मी ही अशी सुसंधी कधी वाया घालविली नाही.

योगायोगानं याच काळात हिज मास्टर्स व्हॉइस कंपनीत केसरबाईंच रेकॉर्डिंग ठरविण्यात मी व जी. एन्. जोशी यशस्वी झालो. कारण रेडियोवर बंद खोलीत गाणं आणि रेकॉर्डिंग करणं याबाबतीत त्या फारशा उत्सुक नसत. केसरबाईंच्या वागण्या-बोलण्याबाबत रसिकवर्गात दबदबा होता. गैरसमज होते पण बाई एच. एम्. व्ही. कंपनीत येऊन रेकॉर्डिंग आटोपून परत जाईपर्यंत परस्पर सहकार्याचं, खेळीमेळीचं प्रसन्न वातावरण कायम होतं. हा आमचा अनुभव संस्मरणीय आहे.

मी प्रथम भेटीत केसरबाईंच्या घरी ठरविल्याप्रमाणे रागांची, चिजांची निवड कायम करून दुसरे दिवशी जौनपुरी, देशी, ललत, नंद, मारुबिहाग आणि मालकंस हे रेकॉर्डिंग विनासायास उत्तमरीतीने पार पडलं. मालकंस गातेवेळी तंबोरे जुळविताना मी पंचमाचे ऐवजी मध्यम जुळवू लागलो तर बाईंनी पंचमच कायम ठेवण्याचा आग्रह धरला ही आठवण मी कधीच विसरणार नाही. त्यांनी रेकॉर्डिंगमध्ये साथीस २ तंबोरे, सारंगी आणि तबला एवढंच ठेऊन ऑर्गनला नकार दिला. दुपारी भोजनानंतर मनमोकळ्या गप्पा मारताना बाईंनी मला जी जीवनकथा सांगितली ती याप्रमाणे. " मी वयाच्या आठव्या वर्षी गोव्यात गायनाचार्य पं. रामकृष्णबुवा वझे यांच्याकडे गायनाचा श्रीगणेशा केला. त्यानंतर केवळ खाँसाहेब बरकतुल्ला यांच्याकडे एक वर्षभर शिकायला मिळाले. ते पतियाळा संस्थानात गेल्यामुळे गायनाचार्य पं. भास्करबुवांकडे माझी तालीम सुरू झाली पण भारत गायन समाजाचे कार्यासाठी तेही पुण्याला गेले. ते फार छान, मनापासून शिकवित. मी प्रसन्न होते, पण माझं नशीब नाराज होतं. १९१७ मध्ये पं. वझेबुवा मुंबईत रहायला आले म्हणून त्यांच्याकडे शिकू लागले पण शिक्षण अनियमित फार त्यामुळे मी निराश झाले, वैतागले. "

महत्त्वाकांक्षा जागृत व्हायला माणसाच्या आयुष्यात काही कटु प्रसंगही यावे लागतात तसा एक प्रसंग गोरेगाव येथे मी अनुभविला. भास्करबुवांच्या शिष्या ताराबाई शिरोडकर यांचे गाणे ऐकण्यासाठी मी तिथे गेले. त्यांचे गाणे सुरू होण्यापूर्वी माझ्या काही मैत्रिणींचा आणि श्रोत्यांचा मी गावं असा आग्रह झाला म्हणून मी " मियामल्हार " गायले पण गाणं काही जमलं नाही. हे मलाही जाणवलं. पण एका संगीतकारानं सर्वांच्या समक्ष खोचक शब्दात माझा अपमान केला तो मला असह्य झाला. मी वेडी झाले. माझी झोप गेली आणि त्याच दिवशी मी निश्चय केला जगायचं तर गाण्यात नाव मिळवून, विद्वत्ता मिळवूनच. यावेळी अल्लादियाँ खाँसाहेबांचा मुक्काम मुंबईत होता. माझ्या इच्छेवरून कलकत्याचे लाला दुनिचंद यांनी त्याना गळ घातली पण २/३ महिने शिकवूनही मला ती गायकी जमत नाही या सबबीवरून खाँसाहेबांनी नकार दिला पण माझा निश्चय कायम होता. निराशेनं मन अतिशय दुःखी झालेलं. त्याचा प्रकृतीवर परिणाम होत होता शेवटी अल्लादियांचे खास मित्र शेठ विठ्ठलदास

द्वारकादास यांनी त्यांना दम दिला की, " केसरला शिकवलं नाहीतर तुमची माझी मैत्री तुटेल. " तेव्हा मात्र खाँसाहेबांनी काही अटीवर गाणं शिकविण्याचं कबूल केलं. त्या अटी अशा होत्या.

(१) काही मोठी रक्कम देऊन " गंडाबंधन " केलं पाहिजे.

(२) शिवाय पगार मी सांगेन तो दिला पाहिजे.

(३) ही तालीम सतत १० वर्षे चालली पाहिजे.

(४) माझ्या कामासाठी मी बाहेरगावी गेलो तरी पगार दिला पाहिजे.

(५) मी दीर्घकाळ मुंबईबाहेर राहिलो तर तिथे येऊन तालीम घेतली पाहिजे.

या सर्व अटी मान्य केल्यावर १ जानेवारी १९२१ रोजी गंडाबंधन विधी झाला (त्यावेळी माझं वय २८ वर्षे होतं) आणि गाण्याचं शिक्षण सुरू झालं. मला खूप खूप आनंद झाला. " तोडी " राग सुरू झाला. आलापविस्तार व तानपलटे शिकवून तासन्तास ते ऐकत रहात. दुसरा पलटा, तिसरा पलटा सावकाश लयीमध्ये व नंतर दुप्पटलयीत घोटून घेत. सायंकाळी मुलतानी रागाचे शिक्षण त्याच रीतीनं. सकाळी " देसकार " तर समप्रकृतिक राग भूप सायंकाळी. सकाळी ' बिभास ' तर सायंकाळी ' जयत ' मी थकायची. आवाज बसायचा पण रियाझ बंद नाही. सकाळी ८ वाजता तालीम सुरू झाली की ती दुपारी १ वाजेपर्यंत चाले. सायंकाळी ४ वाजता तालीम सुरू होई ती रात्री ८ पर्यंत चाले. शिवाय पहाटे माझी स्वरसाधना चाले ती वेगळीच. या पद्धतीनं सतत १४-१५ वर्षे माझं शिक्षण झालं.

शिक्षण देण्याचे बाबतीत खाँसाहेब अतिशय प्रामाणिक व सढळ हातानं विद्यादान करणारे होते. मीही त्याच तळमळीनं कसून मेहेनत करून शिक्षणाचं चीज करीत होते. त्यामुळे खाँसाहेबानाही सार्थक झाल्यासारखं वाटे. ते नेहमी प्रसन्न असत. आकारानं आवाज लावणं, रेकून न गाता सहजपणे स्वरांचा लगाव. धीम्यालयीन लयकारीचं गाणं, प्रत्येक रागातील पलट्याचं चक्कर संपेपर्यंत एका दमात आवर्तन पुरं करणं. ही त्यांची कठीण शिस्त पचवून मला मेहेनत करावी लागे.

याप्रमाणे केसरबाईंनी मनमोकळेपणी माझ्या सर्व प्रश्नांना जी समर्पक व वस्तुनिष्ठ उत्तरं दिली ती ऐकून माझ्याप्रमाणेच जी. एन्. जोशी, रमाकांत रुपजी शेठ (कंपनीचे प्रमुख) व एच. एम. व्ही. चे स्टाफ आर्टिस्टस् अत्यंत प्रभावित झाले आणि संगीतक्षेत्रात केसरबाईंचं स्थान कशामुळे उच्च ठरलं, असामान्य ठरलं त्याचा जणू आदर्शच त्यांनी आमच्या पुढे ठेवला. आम्ही थक्क झालो.

**केसरबाईंची गायकी व यश :**

आवाज धुमारदार, आकारानं मोठा असताना त्या खुल्या आवाजानं गात असत. स्वर ढाला पण कसदार होता. मंद्र पंचम ते तार पंचमापर्यंत त्या स्पष्ट व सहज स्वर लावीत असत.

बिहागडा, मारुबिहाग, नंद, कानड्याचे प्रकार आणि बसंती केदार हे त्यांचे विशेष आवडते राग होते. पण त्यांचा रागसंग्रह खूप मोठा होता. तान फार तयारीची नसली तरी मूळ लयीच्या तुलनेत ती खूप तयार वाटत असे वेगवेगळे तान प्रकारांचं मिश्रण करून त्यात विविधता निर्माण करीत आणि अचानक व अनपेक्षितपणे त्या समेवर येऊन चकीत करीत.

प्रत्येक मैफिलीत त्यामुळे हमखास ' वाहवा ' ची बरसात होत असे. कोणताही राग २५-३० मिनिटेच त्या गात असत. जास्त कीस न पाडता आकर्षक मोजक्या प्रमाणात राग मांडून श्रोत्यांना धुंद करीत असत. त्यांच्यावर श्रीसरस्वतीची कृपा होती त्याप्रमाणे श्रीलक्ष्मीही त्यांना प्रसन्न होती. दादर शिवाजी पार्क इथे स्वतःच्या तीन मजली वास्तूत वैभव संपन्नतेत त्या सुखासमाधानानं रियाज करून विद्यादानाचं कामही करीत असत. त्यात श्रीमती धोंडूताई कुलकर्णी आदी अनेक नामवंत गायिकांचा उल्लेख करता येईल त्यांच्या प्रथितयश शिष्या म्हणून.

१९३० नंतरच केसरबाई श्रेष्ठ गायिका म्हणून मानल्या गेल्या. हिंदुस्थानातील निरनिराळ्या संगीत परिषदांना त्यांना सन्मानपूर्वक निमंत्रण येऊ लागली. प्रत्येक कार्यक्रम त्यांनी अत्यंत यशस्वीपणे जिंकला आहे. याचं कारण पैशांपेक्षा त्या नेहमी कीर्तीला अधिक जपत असत. कार्यक्रम ठरला की, साथीदारांच्या बरोबर आठ-आठ दिवस त्या त्या रागांची मेहेनत करून तेच राग त्या कार्यक्रमात गात असत. प्रत्येक मैफिल इतकी हमखास रंगत असे की, श्रोते

त्या धुंदीतच घरी जात असत व मोठेमोठे कलाकार प्रवेशमूल्य भरून कार्यक्रम ऐकायला येत असत. हे मी प्रत्यक्ष पाहिलं आहे. अखिल भारतीय संगीत परिषद कलकत्ता इथे १९३८ मध्ये " सूरश्री " हा सन्माननीय किताब व चांदीची वीणा त्यांना मिळाली. अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळातर्फे १९५२ मध्ये डॉ. राजेंद्रप्रसाद यांचे हस्ते मानपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

भारत सरकारच्या संगीत नाटक अकादमीनं १९५३ मध्ये त्या वर्षीच्या " श्रेष्ठ गायिका " म्हणून ॲवॉर्ड प्रदान केले. शिवाय १९५९ मध्ये " पद्मभूषण " हा किताब भारत सरकारने देऊन त्यांचा गौरव केला. अन्यत्र अनेक छोटे मोठे सन्मान झाले ते वेगळेच. त्याची गणती कशी करणार ? सूरश्री केसरबाईंनी हजारो मैफिली केल्या नसल्या तरी ज्या केल्या त्या पूर्ण यशस्वी करून त्यांनी संगीत क्षेत्रात आपलं श्रेष्ठत्व सिद्ध केलं यात संशय नाही.

हिज मास्टर्स व्हॉइस कंपनीनं त्यांच्या ग्रामोफोन रेकॉर्डस् प्रसिद्ध केल्यावर संगीत समीक्षकांमध्ये दोन पक्ष निर्माण झाले. एका पक्षानं त्यांचे समर्थन केलं तर दुसऱ्या पक्षानं त्यातील दोष दाखविले पण बाई असामान्य गायिका आहेत हे दोन्ही पक्षांना मान्य होतं, ही गोष्ट सिद्ध झाली.

त्या " अहंमन्य " आहेत असा सर्वत्र गैरसमज होता पण एच. एम. व्ही. च्या रेकॉर्डिंगनंतर माझी भेट झाल्यावर मी त्याना " संगीत शिक्षकसंघा "चे सभासद होण्याची विनंती भीतभीत केली, पण ती त्यांनी तात्काळ मान्य केली व सभासद म्हणून एका संघकार्यक्रमास उपस्थित राहून सर्वसामान्य व्यक्तीप्रमाणे आमच्यामध्ये मिसळून सुसंवाद साधला. आमचे लोक चकित झाले व आनंदितही झाले. जनतेतले गैरसमज सौजन्यशील वागण्यानं आपोआप दूर होतात, हेच सत्य आहे.

वृद्धत्त्वामुळे आपल्याला पूर्वीच्या तयारीने आता गाता येणार नाही, याची जाणीव झाल्याबरोबर १९६४ पासून त्यांनी जाहीर कार्यक्रम करणं बंदच केले. पण रोजची गान तपस्या-मेहेनत मात्र कधी बंद केली नाही. १९७४ मध्ये मी त्यांना घरी जाऊन सहज भेटलो.

त्यावेळी त्या मला म्हणाल्या " आज मी ८२ वर्षांची झाले. बरं झालं तुम्ही आलात हे पेढे घ्या. माझ्या आयुष्यात मी मनमुराद गायले. पुष्कळ जग पाहिलं. लोकांनी प्रेमाने माझे सन्मान केले. " परमेश्वरानं आता मला सुखासमाधानानं केव्हाही घेऊन जावं. " अशी ही श्रेष्ठ गायिका, आदर्श तपस्विनी दि. ६ जून १९७७ या दिवशी देवाघरी गेली.

तिच्या चरणीं माझे सादर शतशः प्रणिपात.

(रविवार, नवशक्ती १५ फेब्रुवारी, १९९८.)

• • •

## गानशुक्रतारा–ताराबाई शिरोडकर

**सन १८६६ पासूनच्या गोमंतकीय संगीतकारांच्या इतिहासात श्रीमती ताराबाई शिरोडकर या श्रेष्ठ गायिकेचं नांव अग्रभागी राहील असा हा संगीत विश्वातील गानशुक्रतारा ' होता हे उद्‌गार सूरश्री केसरबाई केरकर यांचे आहेत.**

यावरून गायनाचार्य पं. भास्करबुवा बखले या गुरूनी मुक्तहस्ते दिलेली विद्या ताराबाई शिरोडकर यांनी आपल्या अविश्रांत मेहनतीनं किती सफल आणि तेजस्वी करून दाखविली असेल याची कल्पना करता येते.

१९४१ ते १९४३ या माझ्या पुण्यातील वास्तव्यामध्ये भारत गायन समाजात पं. भास्करबुवांच्या पत्नी श्रीमती वेणूताई (ज्यांना भास्करबुवांचे सारे मित्र वहिनीसाहेब संबोधित असत) यांना मी ताईसाहेब म्हणत असे व त्यांच्याशी मोकळ्या मनानं गप्पा मारून भास्करबुवांच्या आठवणी उत्सुकतेनं मिळवणं हा माझा आवडता छंद असे. ताराबाई शिरोडकर यांच्याबद्दल जी माहिती मिळत गेली ती त्यांच्या स्मरणशक्तीचा उत्कृष्ट नमुना म्हणता येईल. त्या खूप शिकल्या नसल्या तरी बोलणं, वागणं सुसंस्कृत होतं, प्रेमळ होतं. त्यांच्या मनातील भास्करबुवांबद्दल नितांत आदरभावामुळे त्यांच्या निवेदनामध्ये जिव्हाळा आपोआपच व्यक्त होत होता. वेळोवेळी मिळविलेली माहिती त्या दिवशीच नोंद करून ठेवीत असे म्हणूनच मी आजही ते सारे संदर्भ देऊ शकतो.

### थोर गायिका होण्याची महत्त्वाकांक्षा :

वेणूताई बखले सांगत होत्या, '' गोव्यातील शिरोडे हे ताराबाईंचं जन्मगांव. जन्म १८८९ सालचा. शास्त्रीय संगीताची आवड तिला बालपणापासून. काकोडकर भगिनींप्रमाणे आपणही शास्त्रीय संगीतात प्रगती करून थोर गायिका व्हावं ही तिची महत्त्वाकांक्षा.

मी विचारलं ' ताराबाईंना आदर्श वाटण्याइतक्या काकोडकर भगिनी कोण ? '

ताईसाहेब म्हणाल्या, ' मोनाबाई, श्यामाबाई आणि उमाबाई या तिघी भगि अतिशय उत्तम गायिका होत्या. त्या तिघी एकत्र गाऊन मैफिल रंगवीत असत. त्यांचा आवाज सरस्वतीबाई बाणावलीकरांसारखा अत्यंत मधूर आणि एकाच जातीचा. त्यांचे चेहरे न पाहता गाणं ऐकलं, तर एकच व्यक्ती गाते आहे असं वाटावं इतकं आश्चर्यकारक साम्य आवाजामध्ये होतं. आणि चेहरेही जुळ्या बहिणीप्रमाणे एकसारखे होते. परमेश्वरी लीला आगाध आहे, हेच खरं. त्यांची मातोश्री मोगाबाई काकोडकर यांनी मालवणचे विठोबा अण्णा हडप यांच्याकडे शास्त्रशुद्ध अभ्यास केला होता. अविश्रांत मेहनतीनं तयारी करून त्यांनी लौकिक संपादन केला होता. त्या श्रेष्ठ गायिका तर होत्याच पण संस्कृत भाषेचं ज्ञान, मराठी वाङ्मयाचा व्यासंग, ईश्वरभक्ती यामुळे त्यांनी हेच सारे संस्कार तिघी मुलींवर केले. कडक पण प्रेमळ शिस्तीत त्यांनी गाण्याचीही मेहेनत मुलींकडून करवून घेतल्यामुळे तिघींचीही गाण्यात उत्तम तयारी झाली होती.

भरपूर दमसास, एकीचा श्वास सुटेपर्यंत दुसरी बहीण त्यात स्वर मिळवी अन् आस चालू ठेवी. तिसरी बहीणही तेच स्वर लावी. त्यामुळे स्वरांचा लगाव विलंबितमध्ये दीर्घकाळ रहात असे आणि ते मधुर स्वर, श्रोते डोळे मिटून आपल्या कानात भरून घेत, ' अहाहा ', ' वाहवा ' करीत आनंद लुटीत. हाच आदर्श गुण ताराबाईनीही आत्मसात केला नसता तर नवल.

**पंडित वझे यांच्याकडे संगीताचे पाठ :**

ताराबाई आपल्या वयाच्या आठव्या वर्षी पं. रामकृष्णबुवा वझे यांच्याकडे संगीताचे पाठ घेण्यासाठी पणजी शहराजवळील कालापूर गावात येऊन राहिल्या होत्या. पण एक वर्षानंतर वझेबुवा निघून गेले. आणि पं. भास्करबुवा बखले गोव्यात आले. त्यांची किर्ती ऐकून त्यांच्याकडेच शिक्षण घ्यायला मिळावं हा तिला ध्यास लागला होता. योगायोगानं आणि तिच्या सुदैवानं भास्करबुवांनी एक वर्षपर्यंत गोव्यात राहून तिला खास तालीम दिली मनापासून. तिची बुद्धिमत्ता, ग्रहणशक्ती व मेहेनत हे विशेष गुण पाहून भास्करबुवांनाही वाटे की, हिला आपण तयार करावं. पण अपरिहार्यतेमुळे बुवासाहेब पुण्याला परत गेले. त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे ताराबाई खूप मेहनत करून गाणं वाढवीत होती. पण मिळालेली विद्या खूप कमी आहे याची तिला तीव्रतेनं जाणीव होती. ती अस्वस्थ

झाली. शेवटी १९१२ साली ताराबाई भास्करबुवांकडे गाणं शिकण्यासाठी पुण्यात येऊन स्वतंत्र बिऱ्हाड करून राहिली. त्यामुळे तिला आणखी दीड-दोन वर्षे सातत्यानं भरपूर तालीम मिळाली आणि तिनं अविश्रांत मेहेनतही केली.

नंतर मात्र भास्करबुवा दीर्घकाळ मुंबईत रहावयास गेल्यामुळे १९१६ मध्ये ताराबाई मुंबईत स्थायिक झाली. आणि तिच्या गायनाचे कार्यक्रम लागोपाठ सुरू झाले.

**अन्य गानप्रकारांचाही अभ्यास :**

संगीत व्यवसायात यशस्वी होण्यासाठी ख्यालगायनाबरोबर टप्पा, ठुमरी, गझल, भजनं इ. सर्वप्रकार आत्मसात करणे अवश्य असल्यानं तिनं जिज्ञासेपोटी तेही सुरेख आत्मसात करून आपली मैफिल बहुरंगी केली. त्यामुळे अल्पावधीत ती ' लोकप्रिय कलाकार ' म्हणून यशस्वी झाली.

**श्रेष्ठ कलाकार :**

मुंबईतील श्रेष्ठ कलाकारांच्या श्रेणीत ताराबाई शिरोडकरांचं नांव झळकू लागलं. त्यांचे लागोपाठ कार्यक्रम सर्वत्र होऊ लागले. भास्करबुवांना त्यामुळे अर्थातच खूप आनंद झाला. आपल्या परिश्रमाच्या अशा सफलतेमुळे बुवांनी त्यांना शुभाशीर्वाद दिले. ताराबाईचं गाणं आता परिपक्व झालं होतं. सर्वांग परिपूर्ण बनलं होतं. त्यांचा गळा कमालीचा गोड होता. रुप, सौंदर्य, आरोग्य वगैरे नैसर्गिक देणगीही भरपूर मिळाली होती. भास्करबुवा बखले यांच्या त्या पट्टशिष्या म्हणून ताराबाईचा लौकिक वाढला होता.

**इंदूर दरबारी गायिका :**

इंदूर संस्थानचे राजे श्रीमंत तुकोजीराव होळकर यांच्याकडे मुंबईत ताराबाईचा कार्यक्रम झाला. त्याचं यथार्थ वर्णन सूरश्री केसरबाई केरकर यांनी माझ्याजवळ केलं ते याप्रमाणे :

राजेसाहेब संगीतरसिक होते. त्यांनी अन्य राजेमहाराजे व मुंबईतील प्रतिष्ठित संगीतरसिकाना बोलावून आपल्या अलिशान बंगल्यावर ताराबाईंची मैफिल आयोजित केली होती. प्रारंभी त्यांनी ' पूर्वाकल्याण 'च्या विलंबित

एकतालातील ख्याल ' आज सोवना ' गाऊन नंतर ' मोरे घर आजा ' हा त्रितालातील द्रुतख्याल दाणेदार तानांसह सादर केला. आलाप, बोलआलाप, लयकारी सरगम इ. प्रकारांनी नटलेलं गायन ऐकून सर्व श्रोते खूष झाले. ' गोरी तोरे नैन काजर बिन काले ' ही रंगेल ठुमरी विविध भावप्रकारांनी नखऱ्यानं पेश केल्यानं श्रोत्यांनी ' वाहवा ' ची बरसात केली. ' तुमबिन मोरी कौन खबर ले ' हे पिलु रागांतील भजन भक्तिभावानं न्हाऊन निघालं. मध्यंतर झालं. दरबारी रीतरिवाजाप्रमाणे श्रोत्यांनी खाद्यपेयांचा भरपूर समाचार घेतल्यावर मध्य रात्री पुन्हा मैफिल रंगली.

' बिहागडा ' रागातील ' प्यारे पग होले ' हा आडाचौतालातील ख्याल व एकतालातील द्रुतचिज गाऊन झाल्यावर राजेसाहेबांच्या फर्माइशप्रमाणे ' बसंत ' रागातील ' पियासंग खेले होरी ' ही द्रुतचित व बनारसी ढंगाने एक भैरवी ठुमरी पेश करून रात्री २ वाजता टाळ्यांच्या गजरात ही रंगलेली मैफिल संपन्न झाली. श्रीमंत होळकर महाराजांनी चांदीच्या ताटासह भरगच्च रुपयांनी भरलेली बिदागी देऊन ताराबाईंचा सन्मान केला व तिला इंदूर दरबारची गायिका म्हणून नेमल्याची घोषणा करून सर्वांना चकित केलं.

शिष्येच्या या सन्मानामुळे बुवासाहेबांना अत्यानंद झाला. यावेळी पं. भास्करबुवाही मुंबईतच होते व ताराबाईची तालीम नियमितपणे चालूच होती. श्रीमंत तुकोजीराव महाराज कांही खास प्रसंगी इंदूर येथे दरबारसाठी जात असत. बाकी नेहमी ते मुंबईतच रहात असत.

**पं. बखलेंची गायकी फक्त ताराबाईच गाऊ शकतात हा लौकिक प्राप्त :**

पहिल्या महायुद्धाचे वेळी संरक्षण निधीसाठी कांही जलसे झाले, त्यात ताराबाई शिरोडकरना प्रमुख स्थान मिळालं. त्या कार्यक्रमांमध्ये ' उत्कृष्ट मैफिल कलाकार ' असं वर्णन ताराबाईंच्या गाण्याबाबत झळकू लागलं. ताराबाईंचं ऐन उमेदीत ज्यांनी गाणं ऐकलं होतं त्या कांही रसिकांनी मला सांगितलं देवगंधर्व भास्करबुवा बखले यांची सर्वांग परिपूर्ण गायकी फक्त ताराबाईच गाऊं शकत असत. बुवांच्या सर्व शिष्यांमध्ये ताराबाईंनाच प्रथमश्रेणीची गायिका मानीत असत.

**ताराबाईच्या ' गाणं ' सोडण्याने बखलेंना अतीव दुःख :**

पं. भास्करबुवांचे चरित्रकार नी. म. केळकर यांनी चेंबूर येथे श्रीराम संगीत विद्यालयाच्या भास्करबुवा बखले पुण्यतिथी संगीत समारोहात बोलताना ताराबाईंबद्दल त्यांनी असं वर्णन केलं ' गानपंडिता ताराबाई शिरोडकर यांनी भास्करबुवांकडे सात-आठ वर्षे अखंड शिक्षण घेतल्यामुळे व तळमळीनं योग्य मेहनेत केल्यामुळे बुवांच्या गाण्याची शोभा स्पष्ट दिसू लागली व प्रभावी गायकीमुळेच ताराबाई श्रेष्ठ गायिका ठरली व सर्वत्र यशस्वी झाली. चंदा कारवारकर, कुमठेकर, अंजनी कलगुटकर इ. बुवांच्या शिष्या उत्तम गात होत्या, पण बुवांची सर्वांग परिपूर्ण गायकी उचलण्याची कुवत एकट्या ताराबाईंमध्येच होती. बुद्धीला सरस्वतीची देन होती आणि गळ्यात बासरीची मंजुळ धून होती. म्हणून पैशांचा, वेळेचा हिशेब न करता भास्करबुवांनी तिला विद्या देण्यासाठी अपार कष्ट घेतले होते. तिला महाराष्ट्रातच नव्हे हिंदुस्थानात पहिल्याप्रतीची गायिका करण्याचा बुवांचा निश्चय होता पण. . . पण ही मंजुळ बासरी अवेळी मूक झाली, वृंदावन सोडून गेली. कांही कौटुंबिक आपत्तीनं दुःखित होऊन ताराबाईंने गाणंच सोडून दिलं. हे कळताच भास्करबुवाना कल्पनातील दुःख झालं. हा बाण बुवांच्या जिव्हारी लागला. त्यांना रियाज सुचेना की अध्यापन करायला मन लागेना. पाठीमागे हात बांधून भयंकर अस्वस्थपणे बैठकीच्या खोलीत ते भराभर येरझारा घालीत होते.

नेहमीप्रमाणे गणपत पुरोहित, मणेरीकर, ठाकूरदास इ. शिष्य शिकण्यासाठी आले पण गुरुंच्या त्या अस्वस्थतेमुळे आल्यापावली परत पाठविले गेले. वेणूताईंनी कारण विचारलं तर बुवा वैतागून बोलले, ' तारा शिरोडकरनं घरातल्या कारणाने गाणं कायमचं सोडलेलं कळतंय् म्हणून वाटतं या लोकांना कशासाठी शिकवायचं, कशासाठी रक्त आटवायचे. हे सारं सारं आळवावरचं पाणी ठरायचं. काय उपयोग या विद्यादानाचा ? '

वेणूताईंनाही वाईट वाटलं या बातमीमुळे पण बुवांना शांत करण्यासाठी त्या म्हणाल्या, '' असं नाही करायचं. कांही झालं तरी विद्यादान हे आपलं व्रत आहे ते सोडून कसं चालेल ? आणि आपण पांच पांडव तयार केले आहेत ते कृष्णा फुलंबीकर, नारायण राजहंस, बापू केतकर, गोविंदा टेंबे आणि दिलीपचंद वेदी हे आपण दिलेली विद्या जनतेपुढे उत्तम तऱ्हेनं मांडीत आहेत त्याचा आनंद नाही का ? ती सार्थकता नाही का ? '' ही समजावणी चालू असतानाच भास्करबुवांची

शिष्या रेहेमुबाई शेख गाणं शिकायला हजर झाली. बुवांना प्रणिपात करून आदबीनं उभी राहिली. वेणूताई पतिराजांना म्हणाल्या, ' ही पुण्याहून शिकायला आली आहे, आता तिला परत पाठवू नका बरं का ! '

बुवांनी उपरण्यानं अश्रू पुसले अन् पुटपुटले " माझा गानशुक्रतारा आज लोप पावला, निस्तेज झाला. " बुवासाहेबांची मनःस्थिती आज ठीक नाही हे समजूनही रेहेमुबाई शेखला काय करावं कळेना. बुवांनी तिला खुणेनेच सांगितलं तेव्हा तिने तंबोरा हाती घेतला. स्वरांत जुळवला आणि तिच्या चालू असलेल्या ' तोडी ' रागाचे आलाप सुरू केले. भास्करबुवांनी आज ख्याला ऐवजी चिज शिकवायला सुरवात केली ती तिला अगोदर संपूर्ण गाऊन दाखविली, ठेका धरून.

**( राग तोडी, तालत्रिताल )**

**बर सरसतीस मागत हूं। विद्या अदके सरस निरसन कीजे। सब जगतके गुनिजनको दीजे लाग डाट और रागसेहत है।**

**बकस दीजे देवी दया दयानी।**

**अपने कर सरसतीस मागत हूं ॥१॥**

समोरच्या श्रीसरस्वतीच्या तसबिरीपुढे हात जोडून डोळे मिटून आर्तस्वरांनी बुवासाहेबांनी ही प्रार्थना गायिली. डोळ्यांतून अश्रू ओघळतच होते. वेणूताईनी हात जोडून मनोमन ही प्रार्थना ऐकली. दोघींचंही मन शांत झालं आणि बावरलेल्या मनःस्थितीत रेहेमुबाईंनी स्वरांत स्वर मिळवून ती संपूर्ण चीज आत्मसात केली. ठेका चालूच होता. आलाप तानांसह शिकवणी चालू होती. दीड तासांनी बुवांनी प्रदीर्घ श्वास सोडून गाणे थांबवलं. काळ कुणासाठी थांबत नाही. भास्करबुवांचं अखंड विद्यादान चालूच होतं, ते ॥ कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ॥ या न्यायानं. पण तारा शिरोडकरचं मात्र पुन्हा कधी गाणं ऐकायला मिळालंच नाही.

६ जुलै १९४९ रोजी ' गानशुक्रतारा ' ताराबाई शिरोडकर या महान गायिकेचा कायमचा अस्त झाला. तिच्या पावन स्मृतीला माझं नम्र अभिवादन.

(रविवार, नवशक्ती २२ मार्च, १९९८.)

● ● ●

# गानदेवता अंजनीबाई मालपेकर

१९४४ मध्ये मी मुंबईत स्थानिक झालो तेव्हा मंगलवाडी (गिरगाव) मध्ये गिलमॅन्शनमध्ये माझे मित्र शांताराम बनसोड यांच्या ब्लॉकमध्ये मी रहात होतो. माझ्याकडे अनेक छोटेमोठे कलाकार येत असत त्यांत कुमार गंधर्व हे माझ्याकडे पी. ए. वागळे, केळेकर या मित्रांसह सकाळीच येत व आम्ही ऑपेराहाऊस नाक्यावरील ॲलाइस हॉटेलमध्ये चहा पिऊन सांगीतिक गप्पा चर्चा करून आपापल्या कामाला जात असू. तिथेच बाजूच्या ' नारायणाश्रम ' या बंगल्यात श्रीमती अंजनीबाई मालपेकर या सुविख्यात श्रेष्ठ गायिका रहात असत. त्या घरातून आपल्याला तंबोऱ्यावरील रियाझ किंवा कुणा शिष्येला गाणं शिकविताना ऐकायला मिळेल अशा अपेक्षेने मी घोटाळत असे पण तसं कधीच घडलं नाही याचे मला नेहमीच आश्चर्य वाटे. कुमार गंधर्वाशी याबाबत कुतूहलतेनं मी विचारणा केल्यावर कळलं की, ' बाईंनी हल्ली गाणं अजिबात सोडलं आहे '.

" मग त्या जिवंत कशा राहू शकतात स्वरांच्या संगती शिवाय ? " मी आश्चर्याने विचारले तेव्हा कुमारनं उत्तर दिले " मी कधीतरी त्यांच्याकडे सहज जातो आणि त्यांना आग्रह करून विनंती करून काही अनवट रागांची माहिती घेतो आणि चिजा शिकून घेतो त्यावेळी मी तुला बरोबर नेईन तूही जमल्यास शिकून घे व त्याचवेळी त्यांची माहिती मिळव '.

मला चैन पडेना उत्सुकता वाढत गेली. एके दिवशी रविवारी सकाळीच कुमारबरोबर मी त्यांच्याकडे गेलो. त्यांची पूजाअर्चा आटोपून त्या श्रीसंत नारायण महाराज केडगांवकर या आपल्या गुरु महाराजांचे प्रतिमेपुढे ध्यानस्थ बसल्या होत्या. आम्ही पावलांचा आवाज न करता दोघे बसून राहिलो. त्यांची

एकाग्रता संपून डोळे उघडल्यावर मी आत्यंतिक आदरानं न कळत मस्तक टेकून त्यांना अभिवादन केलं. मला आशीर्वाद देऊन प्रसन्नपणे त्यांनी माझी चौकशी केली, मीही एक संगीत उपासक आहे हे समजल्यावर फार आनंद व्यक्त केला त्यांनी. मी त्यांना केव्हातरी आपलं गाणं ऐकायला मिळावं ही नम्रपणे अपेक्षा व्यक्त केली.

अंजनीबाई एकदम गंभीर झाल्या. डोळे पाणावले अश्रू पुसत बाईंनी सांगितलं. 'मी संगीत व्यवसाय व कार्यक्रम करणं वगैरे सगळं बंद केलं आहे. फक्त काही ठराविक लोकांना अधूनमधून गाणं विनामूल्य सेवा म्हणून शिकवते व प्रेमानं कधीतरी देवापुढे स्वयंस्फूर्त भजन गाते ते ऐकून तुमचं समाधान नाही होणार उलट रियाज सुटल्यामुळे तुम्हाला वेदना होतील.'

पण इतक्यात नागेशकर तबलजी आले ते पाहून अंजनीबाईनी तंबोरा काढला व भावनावेगानं 'मेरे तो गिरिधर गोपाल' हे भजन झिंजोटी रागात मला ऐकवलं. ते ऐकतांना मी गहिवरलो.

गायनासाठी पूर्ण अनुकूल असा धारदार आवाज देवानं त्यांना बहाल केला होता. कुणाची दृष्ट लागेल असं रूप सौष्ठव त्यांना लाभलं होतं त्यांचा जन्मच संगीतासाठी होता हे कुणीही मान्य करील.

सन १८८१ च्या सुमारास जन्मलेल्या बाई. यावेळी वार्धक्यात पदार्पण केलेलं असतानाही, स्थिर सुरेल आवाजात गायल्या. मला व कुमारला भटियारचा ख्याल शिकवला व आम्ही दूध फळांचा प्रसाद घेऊन परतलो. माझ्यासाठी अंजनीबाई गायिल्या याची कुमारला आणि मला धन्यता वाटली.

४/५ दिवसांनी आम्ही दोघे पुन्हा गेलो. त्यावेळी चर्चा गप्पांच्या ओघात मला या थोर गायिकेची बरीच माहिती मिळाली. ती एकंदर परिस्थिती इथे नमूद करून बाईंच्या वेदनांची जाणीव करून देणंच योग्य होईल. गोव्याच्या कलाभूमीत अंजनीबाईंचा जन्म झाला. संगीतमय संस्कारात त्या लहानाच्या मोठ्या झाल्या. खाँसाहेब नजीर खाँ यांच्याकडे त्यांचं गायन शिक्षण झालं. त्यांनी कलाराधनेसाठी जिवापाड तपस्या केली. आणि संगीत सृष्टीत अतिशय श्रेष्ठ स्थान प्राप्त करून घेतलं. त्यावेळी संगीताबद्दल समाजात आस्था, प्रेम नव्हतं, कलाकाराला विशेषतः स्त्री कलाकाराला समाजात प्रतिष्ठा नव्हती. संगीताची विद्याकला यांची उपासना करणारे लोक कलावंतीणीच्या

शिकवण्या करण्याकडेच विद्येचा उपयोग करीत आणि त्यावेळचे राजे, श्रीमंत लोक केवळ रंजनासाठी, शृंगारासाठी कलावंतीणीच्या गाण्याचा उपयोग करीत त्यामुळे गायक, वादक कलाकारांचा असा वेगळा वर्ग निर्माण झाला होता. अर्थातच त्यामुळे सभ्य गृहस्थाश्रमी समाजाची दृष्टी संगीताबद्दल तिरस्काराची झाल्यास नवल नाही.

त्यामुळे गाणं शिकविणारा माणूस बिघडलेला, वाया गेलेला असा प्रतिष्ठित मंडळींचा पक्का समज होता आणि अशा या प्रतिकूल परिस्थितीत वासुदेव शास्त्री जोशी, बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर, विष्णु दिगंबर पलुस्कर, विष्णू नारायण भातखंडे, भास्करबुवा बखले या मंडळींनी पांढरपेशा प्रतिष्ठित समाजात शास्त्रीय संगीताचा प्रसार करून संगीतकाराबद्दलचा दूषित दृष्टिकोन बदलून टाकण्याचं मोठं कार्य केलं. म्हणूनच परिस्थितीत योग्य बदल झाला.

अंजनीबाई मालपेकर यांनी संगीत व्यवसायामध्ये पदार्पण केलं त्यावेळी संगीत व कलाकार यांच्या परिवर्तनाला नुकतीच सुरुवात झाली होती. तरीसुद्धा संगीत क्षेत्रातील स्त्रीकडे पाहण्याचा धनिक वर्गाचा दृष्टिकोन ख्यालीखुशालीचा, शृंगाराचाच होता. त्यामुळे गाणं ऐकणं यापेक्षा गाणाऱ्या बाईचं रुप आणि शृंगारिक गीतं गातांना अदा (हावभाव) पाहणं यातच आनंद घेणारे श्रीमंत लोक जास्त होते. ख्याल गायिला जाई तो केवळ आवाज तापविण्यासाठी फक्त. नंतर उभं राहून ठुमरी, गझल, इ. प्रकार, शृंगारिक गायन ती बाई हावभावासह, नृत्यासह कधी सुरू करते याकडेच श्रोत्यांचं (नव्हे प्रेक्षकांचं) लक्ष लागून राहिलेलं असे, आणि मग ' वाहवा ' ची आणि नोटांची बरसात होई.

शोभा गुर्टू या ठुमरी गायिकेच्या मातोश्री प्रसिद्ध रुपवती मेनकाबाई शिरोडकर यांचे रसीले कार्यक्रम ज्यांनी ऐकले नि पाहिले असतील त्यांना हे सारं पटेल.

अंजनीबाई ऐन उमेदीत असताना जवळजवळ दररोज त्यांच्या मैफिली होत असत. त्याही त्याच प्रकारच्या श्रोत्यांमध्ये आणि यातूनच जेव्हा त्यांच्यावर अतिप्रसंग होण्याचे प्रसंग वारंवार येऊ लागले त्यातूनच या गानदेवतेवर गाणं सोडून देण्याचा निश्चय करण्याचा दारुण प्रसंग ओढवला आणि त्यांच्या रागसंगीताची सारी तपश्चर्या वाया जाऊन सभ्य श्रोत्यांनाही त्यांच्या मधुर मैफीलींना मुकावं लागलं हा दैव दुर्विलासच नव्हे काय ? अंजनीबाईंनी दुःखित

अंतःकरणानं मला काही दुर्धर प्रसंग सांगितले ते असे– एकदा पणजीच्या गव्हर्नरचा मुलगा अंजनीबाईचं गाणं ऐकण्यासाठी (?) पणजीहून मुद्दाम इथे आला होता. मैफिलीमध्ये मदिरापान करीत तो गाणं ऐकत (आणि पहात) होता. नशा चढल्यावर बेभान होऊन तो लगट करू लागल्यावर बाई समोरच्या उघड्या दारातून त्या रात्री निसटल्या व अंधारात गडप झाल्या म्हणून वाचल्या.

**त्यानंतरचा एक प्रसंग.** बाई सांगत होत्या. वाळकेश्वरच्या एका बंगल्यात अंजनीबाईचं गाणं झालं. यजमान एक बडे संस्थानिक होते. त्यांनी खूष होऊन दहा हजार रुपये बिदागी दिली आणि ती देताना त्यांनी बाईचा हात पकडला पण बाईंनी हाताला हिसडा मारून जवळच्या खिडकीतून बाहेर उडी घेतली आणि धूम ठोकली.

एकदा माटुंग्याला एका श्रीमंत व्यापाऱ्याकडे पार्टी होती. आपल्या धनिक मित्रांना त्यानं मेजवानी दिली त्यावेळी अंजनीबाईचं गाणं चालू होतं. नंतर ती मंडळी हळूहळू जाऊ लागली.

साथीदारांसह बाईही जाऊ लागल्या. पण त्यानं बाईंना अडवलं. बाईनी बाणेदारपणानं स्पष्ट नकार दिल्यावर त्या नरराक्षसानं पिस्तूल रोखलं. प्रसंग जीवावरचा होता इतक्यात बाईंच्या साथीदारानं ' साप साप ' म्हणून गिल्ला केला तो ऐकून खाली उतरलेली पाहुणे मंडळी धावत वर आली. ह्या गोंधळाचा फायदा घेऊन अंजनीबाईंनी बिदागी तिथेच टाकून पळ काढला म्हणून सुटका झाली.

आपल्या संगीत व्यवसायाची अखेरची एक कर्मकहाणी अंजनीबाईंनी सांगितली. नामवंत उत्कृश्ट गायिका म्हणून अंजनीबाईंचा नांवलौकिक सर्वत्र झाला होता. एका मोठ्या संस्थानिक राजांच्या बंगल्यावर मुंबईत पार्टीच्या निमित्तानं बाईंचा गायन कार्यक्रम ठेवला होता. अनेक राजे महाराजे उपस्थित होते. बाईंच्या गाण्यावर-रूपावर सर्व खूष होते. आपापसात चर्चाही करीत होते. इतक्यात एका महाराजासाहेबांनी बाईचा हात पकडला.

बाई कडाडल्या ' महाराज, आता तुम्ही तुमच्या राज्यात नसून मुंबईत आहात हे लक्षात ठेवा. कमीजास्त काही कराल तर पस्तावण्याची पाळी येईल. एवढं सांगून अंजनीबाई तडक घरी आल्या ; त्या बिदागी न घेता. खूप रडल्या आणि

आपल्या घरच्या मंडळींना त्यांनी निक्षून सांगितलं. " आता हे फार झालं. असे अपमानाचे प्रसंग यापुढे मला सहन होणार नाहीत. गाण्यावर आजपर्यंत खूप धन-दौलत मिळविली पण आता यापुढे मी बैठकीमध्ये कधीच गाणार नाही. "

आपले पतिराज श्रीमान बसनजीशेठ यांच्या पायावर हात ठेवून त्यांनी शपथ घेतली, ती मैफिलीत न गाण्याची.

यापुढे देवाची सेवा करायची म्हणून मुंबईतल्या महत्वाच्या मंदिरा मंदिरातून एकेकदा त्यांनी गाणं केलं. उत्तर भारताचा दौर करून तिकडच्या देवस्थानातून देवासमोर गानसेवा रुजू केली आणि नंतर मात्र त्यानी संगीताच्या मैफिलींचा व्यवसाय अजिबात सोडून दिला.

अशाप्रकारे गानसंन्यास घेतल्यामुळे सारे कलाकार व सभ्य रसिकजन फार हळहळले. पण बाईंनी आपला निश्चय सोडला नाही.

**माझा भाग्य योग :**

१९४५ मध्ये मी ऑपेरा हाऊसला पाठारे बिल्डिंगमध्ये मित्र गोपाळराव मंत्री यांच्या ब्लॉकमध्ये रहायला गेलो, " नारायण आश्रमा " शेजारीच.

केडगांवचे श्रीमंत नारायण महाराज हे बाईंचे सद्‌गुरु मुक्कामास आले त्यामुळे त्यांच्यासमोर अंजनीबाई रोज गानसेवा रुजू करीत असत पण बाईनी एके रात्री त्यांच्यासमोर माझी हजेरी लावली. मला तर तो भाग्याचा योग वाटला. महाराजांनी मला आज्ञा केली. ' बागेश्रीचा ख्याल प्रथम गाऊन नंतर तुमच्या स्वररचनांची भक्तिगीते ऐकवा ' मी मनोभावे सेवा केली. माझ्या साथीला एच् एच्. व्ही. चे रामचंद्र मंगेशकर (तबला) व अप्पा बझे (हार्मोनियम) होते. महाराजांनी प्रसन्न होऊन शाल व श्रीफळ देऊन मस्तकावर हात ठेवून मला शुभाशिर्वाद दिले. मला व अंजनीबाईंनाही परमानंद लाभला. मी गायिलेली भक्तिगीतं बाईंना फार आवडली म्हणून त्यांना ती शिकविण्याचा सुयोगही मला लाभला. हे परम भाग्य माझं. '

श्रीमती अंजनीबाई ज्यांच्याकडे गानविद्या शिकल्या. त्या गुरुंनी खाँसाहेब नजीरखाँ यानी सांगितल्याप्रमाणे एक व्रत बाईंनी कटाक्षानं पाळलं ते म्हणजे कुणी शिकण्याची इच्छा व्यक्त केली तर त्याला अंजनीबाईनी कधी नकार दिला नाही.

गोहरजान, कुमार गंधर्व, विनायकराव हर्षे, कृष्णराव मुजुमदार, किशोरी आमोणकर इ. अनेक ख्यातनाम कलावंत बाईंकडे नेहमी शिकायला येत. त्यांना मुक्तहस्ते बाई विद्या देत असत.

शिवाय बाहेरून कुणीही कलाकार मुंबईत आला की, त्याची मैफिल देवापुढे करून त्या यथाशक्ति त्याचा गौरव करीत त्याचं हे व्रत कित्येक वर्षे चालू होतं हे मी नेहमी उपस्थित राहून पहात असे.

गाणं या विषयापासून त्या कधीच दूर गेल्या नाहीत. त्यामुळे संगीत क्षेत्रामध्ये लोकही बाईंना कधी विसरले नाहीत.

फैय्याज खाँ, विलायत हुसेन खाँ, बडे गुलाम अली खाँ इ. सर्व मंडळी अंजनीबाईंना खूप मानीत असत, ही गोष्ट विशेष उल्लेखनीय आहे. भारत सरकारच्या संगीत नाटक अकादमीनं त्यांचा बहुमान केला, हा बाईंच्या तपश्चर्येचा मोठा सन्मान होय.

वृध्दापकाळामध्ये घर, मुलगा, सून नातवंडं या सर्वांमध्ये व ऐश्वर्यामध्ये राहूनही अंजनीबाई वानप्रस्थाश्रमी माणसाप्रमाणे सर्वांपासून अलिप्त राहत. सारावेळ पूजा, जपजाप्य, ध्यानधारणा यात व्यतीत करीत. संगीत व वेदांत यावर सर्वांशी चर्चा करीत. वयाच्या ९२ व्या वर्षी (१९७३ मध्ये) नारायण आश्रमामध्येच बाईंचं निधन झालं. ' संगीत विश्वातील पवित्र गान देवता ' हा थोर आदर्श मागे ठेवून त्या निजधामास गेल्या. त्यांना माझे सादर शतशः प्रणाम.

(रविवार, नवशक्ती १८ जानेवारी, १९९८.)

• • •

# गानहिरा – हिराबाई बडोदेकर

एक तेजस्वी हिरकणी, नैसर्गिक मादकस्वरांची, सुरेल आवाजाची ईश्वरदत्त देणगी लाभलेली गायिका, श्रेष्ठ दर्जाची कीर्तिमान गायिका गानहिरा सौ. हिराबाई बडोदेकर होत्या. ' रागदारी गाणं म्हणजे हिराबाई, अप्रतिम मृदुमधूर गाणं म्हणजे हिराबाई, सौजन्याचा आदर्श म्हणजे हिराबाई. ' आकाशवाणी पाक्षिकांत गायकांची बोलकी चित्र द्यायची प्रथा सुरू झाली तेव्हा असि. स्टेशन डायरेक्टर श्री. मर्ढेकर यांना मी हे वर्णन सुचवलं अन् ते त्यांनी छापलं होतं. रागदारी संगीताचे धडे जर हिराबाईच्या गाण्यानं जनतेला दिले तर हिंदुस्थानी संगीताला कुणी नाकं मुरडणार नाही, असंही मी त्यांना सांगितलं. माझ्या लहानपणी नारायणगांवसारख्या एका खेड्यात हॉटेलमध्ये चहा पिताना लोक, कर्णा लावलेल्या ग्रामोफोनवर हिराबाईंचं दर्जेदार मधूर संगीत ऐकत असत. '' जारे भंवरा दूर '' (शुद्ध सारंग), '' अधिरमन बावरे '' (पटदीप), '' रूचि रूचि हा ल्याले '' (भीमपलास), '' जनमानस मंदिरात '' (यमन कल्याण) हे ऐकण्याचे उच्च संस्कार त्या काळी खेडेगावांत होते आणि शहरांतून लोक त्यांचे कार्यक्रम ऐकत होते. रसिक वर्ग हिराबाईंच्या कार्यक्रमासाठी उत्सुकतेनं गर्दी करीत आणि रात्रभर गाण्याचा आनंद घेत होते. आजच्यासारखे हजारो रुपये बिदागी घेऊन २ तासात गाशा गुंडाळून रसिकांना हे कलाकार लुबाडत नव्हते. कारण ते कलाकार धंदा करत नव्हते. बिदागीसाठी अडवणूक आणि फसवणूक करणं तर त्यांना माहितीही नव्हतं. त्याचं हे प्रामाणिक योगदान आठवून कृतज्ञता व्यक्त करणं, त्यांचा आदर्श कलाकारांपुढे ठेवणं यासाठीच हा लेखन प्रपंच. पण ती जाणीव आजच्या कलाकारांमध्ये कधीतरी निर्माण होईल कां ? होईल तो सुदिन ?

हिज मास्टर्स व्हाईस कंपनीत रेकॉर्डिंगसाठी हिराबाई यायच्या त्या आमच्या कोलंबिया ग्रामोफोन कंपनी विभागात. त्यामुळे उत्तम परिचय होऊनही त्यांनी " माझ्या चाली " गाऊन रेकॉर्डिंग करण्याची त्यांची इच्छा मी पूर्ण करू शकलो नाही याचा मलाही खेद वाटतो. पण " जादुगार नयन तुझे " व " जीवाला कां जिंकियले " या माझ्या चाली माझ्याकडून शिकून घेऊन त्यांनी मुंबईच्या अनेक कार्यक्रमांमध्ये आवर्जून गायिल्या व माझा उल्लेख जाहीरपणे केला, हे त्यांचं स्नेहशील सौजन्य होय.

ऑपेरा हाऊस नाक्यावरील पाठारे हाऊसमध्ये मी रहात असतांना हिराबाई, नारायणाश्रमामध्ये अंजनीबाई मालपेकरांकडे १/२ वेळा आंल्या असतांना माझ्याकडेही आवर्जून आल्या होत्या, आणि १९४६ मध्ये मी चेंबूरला रहायला गेल्यावर तिथेही त्या माझ्याकडे आल्या व मी स्थापन केलेल्या कलोपासक मंडळाच्या मासिक कार्यक्रमात गाण्यासाठी, माझ्यासाठी आल्या होत्या. आमचे कार्यक्रम नेहमी रात्री होत असत पण सकाळचे राग ऐकायला मिळावेत म्हणून एका रविवारी मी त्यांची मैफिल सकाळीच ८ वाजता ठेवली. ज्योती स्टुडियोचे मालक खान बहादूर इराणी यांच्या बादशाही बंगल्यातील ती मैफिल अतिअविस्मरणीय ठरली. आमचे सारे श्रोते जाणकार लाभले व बरीच कलाकार मंडळीही खास उपस्थित होती. हिराबाई अतिशय प्रसन्न होत्या त्यावेळी.

**सोज्वळ शालीन व्यक्तिमत्व :**

सडपातळ, सावळी, नाकीडोळी नीटस मूर्ती, पांढरं जरीकाठी पातळ, गळ्यात सोन्याचा चमकणारा चपलाहार व सोन्याच्या बांगड्या हातात. हाती तंबोरा घेऊन पदर सावरुन त्या गायला बसल्या. श्री सरस्वतीला व श्रोत्यांनाही त्यांनी नमस्कार केला आणि सोज्वळ, शालीनता जाणवली सर्वांना. सुरेल झणत्कार नादवलये लपेटीत तंबोऱ्यानं त्यांच्या स्वराला आवाहन केले आणि त्यांनी रागाचे भावपूर्ण आलाप सुरु केले.

कानसेन श्रोते सावधान, तन्मय झाले. हिराबाईंच्या गाण्यातली विलंबित लयीत रागाची मांडणी चित्ताकर्षक व कलात्मक होती. किराणा घराण्याची स्वरवलयें क्रमानं उलगडत होती. आपल्या शांत स्वभावानुसार संथ आलापी विस्तारत होती, तोडीचा गंधार वेगळाच आहे हे दर्शवीत होती तीव्र मध्यम पंचम धैवतापर्यंत बढत करत करत निषादापर्यंत आलापांचे आकर्षक स्वरूप

कलात्मकता दर्शवित त्यांनी तार षड्ज् अलगद लावला अन् त्या षड्जानं आमचे श्रोते भारावले. ' आहाहा ' ची लाट पसरली. चिजेच्या शब्दांगणिक दाणेदार तानांच्या मधुर लाटा सुरू झाल्या, जणू मोत्यांच्या सरीच. (आक्रमक साठमारी नव्हेच)

'' अब मोरे राम '' एकताल विलंबित ख्यालानंतर '' बर सरसतीस मागत हूं '' हा छोटा ख्यालही बेहद्द रंगला. पाऊण तासानंतर '' होरी खेलत मोरे नंदलाल '' ही हमखास रंगणारी ठुमरी श्रोत्यांची अपेक्षापूर्ती करणारी ठरली.

आपल्या नाजूक बोटांनी गाण्याला पोषकशी साथ करून हिराबाईचे गाणं रंगविण्याची जबाबदारी पार पाडणारे यशस्वी तबलजी उस्ताद शमशुद्दिन खाँसाहेबही तन्मय झाले होते.

तंबोरा गायन साथीस त्यांच्या भगिनी व शिष्या सौ. सरस्वती राणे ह्यांनी उत्कृष्ट स्वरसाथ करून रंग भरला. हार्मोनियम साथीस एच. एम. व्हीचे श्री. अप्पा वझे होते त्यांनी समजून संगत केली.

ठुमरीनंतर '' सुरसुखखनितूं विमला '' हे नाट्यपद सुरू झाल्याबरोबर श्रोत्यांनी स्वागत केले टाळ्यांनी. '' सगुणा कविबाला '' ही ओळ त्यांनी विविध स्वर प्रकारांनी सजविली.

मध्यंतरानंतर श्रोत्यांच्या आग्रहास्तव बिलासखानी तोडी '' गाऊन '' रघुराज मनी मदनी बसला '' जादुगार नयन तुझे '' व '' जीवाला का जिंकीयिले '' ही भैरवी गाऊन, '' या चाली पंडीत ए. पी. नारायणगांवकर यांच्या आहेत '' याचा त्यांनी अभिमानानं उल्लेख केला. त्यांनी ही गोष्ट त्यांच्या मोठ्या मनाची व सौजन्याची खास निदर्शक आहे, मला धन्यता वाटली. चेंबूरचे रसिक श्रोत्यांना त्यांचे गाणं कसं शांत, संथ चंद्र प्रकाशासारखे आल्हादकारक वाटलं.

हिराबाई या किराणा घराण्याच्या प्रातिनिधिक गायिका समजल्या जात होत्या. पण स्वरालापांचा कीस न पाडता प्रत्येक राग विलंबित व द्रुतख्याल ही त्यांनी आटोपशीरपणे सुसंबद्ध गाऊन सादर केला त्यामुळे कार्यक्रम आकर्षक व डौलदार वाटला.

मायक्रोफोन नांवाचा नागोबासारखा फणा वर केलेला पण न डोलणारा (संपूर्ण अरसिक असा) यंत्राचा ठोकळा हिराबाईच्या पुढे नव्हता, त्यामुळे बाईचा मूळचा नैसर्गिक धारदार गोड आवाज आमच्या श्रोत्यांना ऐकायला मिळाला. त्यामुळे गायिका व श्रोते यांचा उत्तम सुसंवादही साधला गेला.

सौ. हिराबाईना गाण्याची विद्या दिली त्यांचे नाव खाँसाहेब अब्दुल वहीद खाँ. उस्ताद अब्दुल करीम खाँसाहेबांचे भाचे व शिष्य. ते स्वतः अत्यंत सुरेल गवई होते. मोठा विद्यासंग्रह असलेले विद्वान होते. अशा व्यासंगी आणि विद्यादानाचे काम विशिष्ट ध्येयाने, तळमळीने निष्ठेने व्यवसाय (धंदा नव्हे) करणाऱ्या गुरूजीकडून हिराबाईना शिक्षण मिळालं.

संगीत कलेवरची निष्ठा हा त्यांचा वागण्यातला मानबिंदू होता. व्यवहारात आणि गाण्यातही हीच निष्ठा हिराबाईना जाणवत असे. त्यामुळे ते गुण, ते आदर्श संस्कार हिराबाईनीही श्रद्धेने स्वीकारले व आयुष्यभर जतन केले. त्यांनी कधी धंदा केलाच नाही. आयुष्यभर कार्यक्रमांतून आनंद घेतला, शिवाय सकाळपासून रात्रीपर्यंत पवित्र विद्यादानाचं कामही तळमळीने निष्ठेने केले. पण त्यांचे विद्यार्थी मात्र आज त्यांचे आदर्श न मानता कृतघ्नपणाने केवळ धंदाच करीत आहेत हे कटू सत्य आहे !

**प्रतिकूल परिस्थितीवर मात :**

ज्यां काळात स्त्रियांनी गाणं बजावणं करणे हे तर दूरच परंतु नुसतं मोकळेपणाने वावरणे हे सुद्धा अनिष्ट आणि धोक्याचे होतं. अशा परिस्थितीत कुलीन स्त्रिया आणि त्यांचे गाणं हे चार भिंतीच्या आतच, जात्यावरल्या ओव्या अंगाईगीत अशा स्वरूपातच प्रगट होत असे. इंग्रजी राजवटीत पुरूषांच्याबरोबर स्त्रिया पदवीधर होऊ लागल्या व पं. विष्णू दिगंबर पलुस्करांच्या प्रचारानंतर काही स्त्रिया संगीत क्षेत्रात पदार्पण करू लागल्या होत्या. परंतु प्रत्यक्ष संगीताच्या व्यासपीठावर व रंगभूमीवर मात्र एकाही स्त्रीने पदार्पण केले नव्हतं. अशा परिस्थितीत १९२२ च्या सुमारास सौ. हिराबाई बडोदेकर यांनी संगीत कलेच्या

व्यासपीठावर प्रतिष्ठितपणे आणि शालीनतेने पदार्पण केले, तसेच संगीत रंगभूमीवरही आपल्या सभ्य आचाराने व रसपूर्ण गायनशैलीने भूमिका यशस्वी करून कुलीन स्त्रियांपुढे एक आदर्श ठेवला. हे त्यांचं विशेष योगदान.

आपल्या मातोश्रींच्या प्रोत्साहनाने, सहकार्याने अभिजात संगीताचे शिक्षण आणि मेहनत करून जात्याच निर्मळ, गोड, मुलायम, निसर्गदत्त आवाजाच्या देगणीचा योग्य उपयोग केला. ख्याल गायकीचा संस्कार योग्यरीतीने झाल्यामुळे त्याला पीळ, वजन, भरीवपणा व मेहेनतीची गोलाई प्राप्त झाली. अत्यंत बंदिस्त असा रेखीव असा अस्ताई अंतरा हे त्यांचे महत्त्वाचे अंग आहे. संथ मुलायम आलापचारी, त्यातून दिसणाऱ्या विपुलस्वरांच्या विविध आकृति, बेताची लयकारी, गायकीतील बढतही क्रमाक्रमाने, सहज स्वच्छ अकृत्रिम तान हे त्यांचे गुणविशेष जाणवतात. रेकॉर्डस्‌मध्ये बालगंधर्वाच्या गीतांची छाप त्यांच्यावर दिसून येते. " नरवर कृष्णा समान ", " सत्यवदे " " उगिच कां कांता गांजिता " इत्यादी गीतांची फर्माइश झाल्याशिवाय त्यांची मैफिल पूर्ण होत नसे. त्यांच्या मैफिलीत ख्याल, ठुमरी, नाट्यसंगीत आणि भजने इत्यादी सर्वच प्रभावी दिसून येत असे. बनारसी, पंजाबी यांतील चांगले ते निवडून त्यात आपल्या भावदर्शक गायकीने आणि स्वतंत्र कल्पकतेने त्या ठुमरी नटवित असत.

**हिराबाईंचे कार्य :**

त्यांचे संगीतातले कार्य कलात्मक आणि सांस्कृतिक अशा दुहेरी स्वरूपाचे आहे, आपली गायकी स्त्रीसुलभ अशी विनम्र, शालीन, आर्जवी, करूण आणि मादक बनविण्याचे कार्य त्यांनी केले.

आपल्या गायकीने असंख्य रसिकांची मोठ्या प्रमाणात मान्यता मिळविली आणि संगीताच्या प्रांतातील स्वतःचे स्थान त्यांनी अढळ केले.

अभ्यासू आणि काही नामवंत गायिकाही हिराबाईंचं अनुकरण करताना पूर्वी दिसत ही गोष्ट विशेष आहे. त्यांचे हे कार्य संगीत कलेच्या दृष्टीने युग-प्रवर्तक ठरलंय. अत्यंतिक निष्ठा, चिकाटी, आराधनेतील सातत्य व समरसता इ. कलागुणांमुळे त्यानी असामान्य यश संपादन केले होतं. हे गुण आजही

अनुकरणीय आहेत हे अभ्यासकांनी लक्षात घेणे जरूर आहे. '' हिराबाईंच्या गाण्यामुळे आजारी माणसालासुद्धा आराम पडेल, बरं वाटेल '' असे उद्‌गार एका समारंभात पं. रामकृष्णबुवा वझे यांनी काढले होते. यावरून हिराबाईंच्या योग्यतेची कल्पना येते.

त्यांच्या ज्ञानसत्रातून अनेक नामवंत गायिका तयार झाल्या. त्यापैकी डॉ. प्रभा अत्रे त्यांचा गानशैली वारसा चालवीत आहेत. तर माणिक वर्मांनीही उत्तम तो चालविला होता.

(रविवार, नवशक्ती २२ फेब्रुवारी, १९९८.)

• • •

# ठुमरी गायिका गोहरजान

शास्त्रीय संगीताचे सुसंस्कार घरातूनच होणे ही परमभाग्याची गोष्ट आहे. त्यामुळे स्वर ज्ञान, ताल ज्ञान, राग ज्ञान होऊन गाण्यातली समज वाढते आणि मनापासून मेहेनत करून, पद्धतशीर शिक्षण घेऊन माणूस चांगला गायक होऊ शकतो. पण त्याबरोबर भरपूर ऐकायला मिळणे, हंसक्षीर न्यायाने मधूर व सौंदर्यसंपन्न, कलात्मकदृष्टीने गाणे आत्मसात करणे ही गोष्टही आवश्यक आहे असा माझा अनुभव आहे. पुण्याचे पं. द. ग. देव आमच्या घरी एक वर्षभर होते, नारायणगांवी.

माझ्या पिताश्रींना गाण्याचा नाद व ज्ञान फारच, त्यामुळे घरात तंबोरा-पेटी-तबला ही वाद्ये असून घरी माझं शिक्षणही चालू होते, द. ग. देव यांच्याजवळ. पण नारायणगांवसारख्या खेड्यात कार्यक्रम ऐकायला मिळत नसत म्हणून मराठे (ओव्हरसियर, लोकलबोर्ड) यांच्याकडे तीन चारशे रेकॉर्डसचा उत्तम संच होता मला त्यांच्याकडील रेकॉर्डस् रोज २-३ तास ऐकण्याची त्यांनी सोय उपलब्ध करून दिली. त्यात मोठमोठे नामवंत गवई व रंगभूमीवरील गायक नट यांच्या उत्तम रेकॉर्डस् होत्या. त्या ऐकून त्या चिजा व नाट्यपदे मी त्यातील गायकीसह आत्मसात करण्याचा प्रयत्न वयाच्या ११ व्या वर्षापासून करीत असे. त्यापैकी आज मी ' गोहरजान ' या त्या काळच्या लोकप्रिय गायिकेबद्दल विचार मांडणार आहे. सन १९२९-३० चे सुमारास गोहरजानची ग्रामोफोन रेकॉर्ड मी प्रथम ऐकली ती ' हा रे सैय्या परूं मै तोरे पैय्या ' यातील '' है '' या अक्षरावरील जलद सुरेल मोहकशा आलापानं अतिशय आनंद लाभला. तिचा तो मोहक, भरदार

गोड आवाज, गळ्याचा निर्मळपणा, गाण्यातली सहजता, बोलांचा लडिवाळपणा, दाणेदार स्पष्ट तान ऐकून मी हरखून गेलो. सुरेलपणा म्हणजे काय, माधूर्य कसं असावे याचा साक्षात्कार झाला मला.

" नाहक काहे गवनुवा " ही तिची गाजलेली " भैरवी ठुमरी " ऐकली आणि देहभान विसरून गेलो. त्यातील सपाट दाणेदार तान, " गवनुवा " या शब्दावरील मन हेलवणारा आलाप, मुरकी, खटकाच्या स्वर सौंदर्याने गोडव्याने बहरून गेला आहे. तिच्या प्रत्येक ठुमरीत दादऱ्यात व गझलमध्ये स्वरालापांच्या लोचदार जागा आहेत. ते गाणं आत्मसात करण्याच्या वेडाने आपोआपच लयीचे, तालाचे ज्ञान आणि भावनानुकूल गाण्याची दृष्टी येऊ लागली.

ज्या चाली गोविंदराव टेंबे यांनी नाटकामध्ये उपयोगात आणल्या त्या मूळच्या चाली गोहरजान यांनी रेकॉर्डसद्वारे लोकप्रिय केलेल्या आहेत " तुमसे वचन दे " (मला मदन भाझे हा) " सखिरी मैका पियाविना " (खरा तो प्रेमा) " पिहरवा ते हारी " (टकमक पाही सूर्य) " हमसे न बोले राजा " (नाही मी बोलत नाथा) या रेकॉर्डस् ऐकून त्यातले माधुर्य जाणवले. नटसम्राट बालगंधर्वांनी मात्र ही सर्व गाणी नाट्यप्रसंगानुरूप स्वतंत्र गायकीनं लोकप्रिय केली. तिचे त्यांनी अनुकरण किंवा नक्कल केली नाही.

ठुमरी दादरे गाण्यापूर्वी गोहरजाननं भूप, यमन, मालकंस या प्रचलित रागातून ख्यालगायनही केले आहे मैफीलीतून गायनही तिने यशस्वी केले आहे. म्हणून कोणत्याही गानप्रकाराला ख्याल गायनाची मूळ बैठक, अभ्यास असावाच लागतो ही गोष्ट आपोआप सिद्ध होते. तिच्या गाण्यांतील पिळदार स्वरांची सच्चाई आणि सौंदर्यदृष्टी यामुळे तिची आलापचारी अत्यंत श्रवणीय होत असे, असं त्याकाळचे रसिक जाणकार अभिमानाने सांगतात, " रेकॉर्डस् दर्जेदार आहेत. " काही गायिका आपलं श्रेष्ठत्व सिद्ध करण्याच्या प्रयत्नांना केवळ मुष्किलपणाच्या आणि गुंतागुंतीच्या चमत्कारामागे लागून स्वर सौंदर्याकडे, माधूर्याकडे ज्यांनी दुर्लक्ष केले त्यांनी आपलं गाणं वाया घालवलं आणि अपयश मात्र पदरी घेतले.

रंगभूमीवर बालगंधर्व जसे सहजपणे उभे राहून साभिनय गात असत, लांबलचक ताना घेतानाही त्यांनी कधी तोंड वेडं वाकडं केले नाही, तशीच गोहरजानही कधी कधी उभी राहून साभिनय गात असे असं रसिक जाणकार अभिमानानं सांगतात.

" पीकी बोली ना बोल " या पिलु रागातील ठुमरीमुळे सोळा मात्रांचा पंजाबी ठेका (वेगळया वजनाचा त्रिताल) थिरकावाखाँसाहेबांनी (१९२९ मध्ये) उपयोगात आणला. नंतर तो गोहरजानचा तबलिया कामताप्रसादनेही तिने गायिलेल्या रेकॉर्डमध्ये वाजविला आहे. त्यामुळे ठुमरी गाण्यात नाविन्याची भर पडली आहे आणि तिचा तो प्रयोग आजही सर्वमान्य झाला आहे.

मैफिलीमध्ये रागाच्या प्रारंभिक आलापांची फार प्रस्तावना न करता चटकन रंगत कशी साधावी आणि गाणं चिघळू न देता श्रोते खूष झाले की रंगतीचा परमोच्च बिंदू गाठल्यावर गाणं आवरत कसं घ्यावं याचे उदाहरण गोहरजाननं घालून दिले ते नंतर बाई सुंदराबाई व हिराबाई बडोदेकर यांनी सर्वांपुढे आदर्श म्हणून ठेवलं असं मानले जाते. अशा या अद्वितीय गणल्या गेलेल्या गायिकेचं प्रत्यक्ष गाणे ऐकण्याचा सुयोग मला कधीच लाभला नाही, पण हिज मास्टर्स व्हॉइस कंपनीत नोकरीसाठी आल्यावर आकाशवाणीवरही संगीत नियोजनासाठी मला प्रोड्युसर केशवराव भोळे बोलावीत त्यावेळी कलाकारांविषयी चर्चा होत असे त्यात आदर भाव व जिव्हाळा असे. अन् मला उत्सुकता असे.

' उषा स्वप्न ' या माझ्या एका संगीतिकेचं काम पूर्ण झाल्यानंतर मला त्यातील एका चालीवरून गोहरजानची आठवण झाली म्हणून मी भोळेसाहेबांना विचारल्यावर झालेल्या चर्चेत त्यांनी मला जी माहिती दिली ती इथे नमूद करीत आहे.

गोहरजानचा जन्म सन १८७० मधला. आईवडिलांच्या प्रेमाचे रूपांतर द्वेषात झालं अन् त्याचे प्रायश्चित या मुलीला–गोहरजानला भोगण्याची पाळी आली. लहानपणीच हे जग सोडून जाण्याची वेळ आली होती. पण ती ईश्वरी कृपेने वाचली.

भविष्य काळात तिचं मधूर भावपूर्ण गायन लोकांना ऐकायला मिळावं ही त्याचीच इच्छा होती असे वाटतं. गोहरजान फार देखणी गोंडस आणि बांधेसूद होती. वयात आल्यावर ती गाणे शिकली. रामपूरच्या भजीरखाँसारखा उत्तम उस्ताद तिला गाणं शिकवायला लाभला हे तिचे मोठंच भाग्य. ख्याल, होरी ठुमरी इ. उच्च दर्जाचे गायनाचा तिने उत्तम अभ्यास व मेहेनत केली. ठुमरी गाण्यात ती इतकी निपुण झाली की, तिच्याशी बरोबरी करायला कुणी नव्हते. आवाज गोड, सुरेल, भरदार होता. अभिनय कलेतही तिनं प्राविण्य मिळवलं. सर्वत्र लागोपाठ कार्यक्रम होत गेल्यामुळे ती लोकप्रिय गायिका ठरली. आणि दरभंगा दरबारची गायिका म्हणून सन्मान प्राप्त झाला व तिथे जाऊन येऊन राहू लागली पण जास्त मुक्काम तिचा कलकत्ता इथे असे. तिचे जाहीर जलसे खाजगी जलसे पुणे-मुंबई-मद्रास इत्यादी शहरांतून खूपच झाले. तिच्या गायनातील प्राविण्याची ओळख जाणकार रसिकांना पटली. पुण्यात तिचे कौतुक फारच झालं.

महाराष्ट्राची रसिकता तिलाही जाणवली. तिच्या दर्जेदार गायकीमुळे ग्रामोफोन रेकॉर्डस् खूपच लोकप्रिय झाल्या. लोक अक्षरशः वेडे झाले आणि त्या रेकॉर्डस्चा अभ्यास करून गाऊ लागले. ख्याल होरी वगैरे सर्व प्रकार ती तयारीने गात असे. पण ठुमरी गाणे तिचा खास विषय होता. हावभाव करून ती गाऊ लागली की, म्हणजे श्रोते चित्रासारखे तटस्थ होत असत.

पूर्वी ध्वनिक्षेपक नसत, तरीही थिएटरमध्ये किंवा भव्य सभागृहामध्येही जलसे झाले तरी तिचे गाणं लोकांना स्पष्ट ऐकू येत असे. त्यामुळे कुणी कधी नाराज नसत. तिचा आवाज उंच स्वरात असून मधूर होता. तिच्याजवळ अंतरावर बसून गाणं ऐकण्याचा योग ज्यांना लाभला ते स्वतःला भाग्यवान समजत असत. व्यवसायात गोहरजान फारच प्रामाणिक होती. श्रोते

संतुष्ट होईपर्यंत गाणं, यात तिचा आनंद होता. स्वभाव होता. समरस होऊन आपल्या कलेचे प्रदर्शन ती नेहमी करीत असे. तिनं अपार संपत्ती मिळवली. त्याकाळी तिच्या इतकी संपत्ती दुसऱ्या कोणत्याही गायिकेला मिळाली नाही, असं जाणकार आवर्जून सांगत असत. १९१२ साली ज्यांनी तिला पाहिली ते सांगत की अंगानं थोडीसी स्थूल, रंगाने गोरीपान, पोषाख भरजरी, अंगावर हिऱ्यां-पाचूचे बरेच मौल्यवान अलंकार लखलखत असत. केशसंभारामध्येही हिरे चमकत असत. तिच्या वैभवाने श्रीमंत लोकही दीपून जात व चकित होत. मैफिलीतील काही चिजा तर श्रोत्यांच्या फार आवडीच्या होत्या. " आन बान नैनोसे नैन मिला " व मालकंस मधील " कृष्ण माधोराम " मांड रागातील ' राधे कृष्ण बोल मुखसे ' हे भजन. तसेच " अनाडी सैय्या न जाने प्रीतकी रीत " हे शृंगारगीत आणि देस रागातलं " पियाकर धर देखो " ही गाणी विविध स्वरालंकारांनी खुलवून मैफिल बेहद रंगत असे. त्यामुळे श्रोते हमखास सूचना करीत अन् गोहरजान सर्वांना खूष करीत असे. मुंबईत त्या गांवदेवी भागात उतरत असत आणि खंडेरायाची मराठी भजनं उभं राहून त्या वाघ्या मुरळीप्रमाणे नाचून गात असत व साथीदारही वाद्यं गळ्यात अडकवून वाजवीत. त्यांनी त्यात कमीपणा कधी मानला नाही. त्या उत्सवात दुसऱ्याचे चांगले गाणं त्या मनापासून ऐकत आणि कौतुक करीत असे त्यांचे मन विशाल होतं.

हिंदुस्थानी संगीताला नाकं मुरडणारे युरोपीयन लोकसुद्धा गोहरजानच्या आवाजावर बेहद खूष असत म्हणून एकदा बाईनी " आनबान जियामे लागी " याचे इंग्रजी भाषांतरीत गीत जलशात गाऊन मुंबईत त्यांची " वाहवा " घेतली हा बाईचा धूर्तपणाचा नमुना. पण अशा या साहेब लोकांना आणि ताठर श्रीमंतांना बाईनी कधी किंमत दिली नाही.

ते भेटायला आले तर तासन् तास त्यांना ताटकळत बाहेर उभं करीत असे. तिचं जडजवाहीर किती किंमतीचं असेल याचा अंदाज करणंही कठीण, असे वैभव होत पण .... पण .... इतकी अमाप संपत्ती मिळवूनही अव्यवहारी

खर्चिकपणामुळे त्याना शेवटी मात्र विपन्नावस्था आली ही दुःखाची गोष्ट. शेवटी दृष्टीही गेली. अतिशय सुखांत सारे आयुष्य घालविलेल्या या कीर्तिमान गायिकेचा १९३० मध्ये म्हणजे वयाच्या साठावे वर्षी म्हैसूर येथे दुःखद अंत झाला.

(रविवार, नवशक्ती ५ एप्रिल, १९९८.)

• • •

# जिद्दी ठुमरी गायिका जद्दनबाई

संगीत रसिकजनहो, महिला वर्षानिमित्त महिला गान कलाकार लेखमालेच्या रविवार, ५ एप्रिलच्या नवशक्तिमध्ये मी आपल्याला '' ठुमरी '' गायिका '' गोहरजान '' या श्रेष्ठ कलाकाराचा परिचर करून दिला होता. त्याच गोहरजानची शिष्या जद्दनबाई हिच्या गान साधनेचा परिचय मी आज करून देणार आहे. १९४४ ते १९४९ या काळात हिजमास्टर्स व्हॉईस ग्रामोफोन कंपनीत जद्दनबाई या आपल्या रेकॉर्डिंगच्या इच्छेने रिहर्सल्स्साठी येत जात असत. पण यावेळी त्यांचे रेकॉर्डिंग करण्याचा आम्ही (जी. एन. जोशी व शेठ रमाकांत रूपजी) मनापासून प्रयत्न करूनही यशस्वी झालो नाही.

त्यांच्या ऐन उमेदीतल्या रगेल अन् रंगेल रेकॉर्डस् आम्हाला व गिऱ्हाइकांना खूपच आवडल्या होत्या. त्यांची फर्माइश मैफिलीत श्रोत्यांकडून हमखास होत असे. त्या रेकॉर्डस् आज दुर्मिळ झाल्या आहेत व त्या अविस्मरणीय आहेत.

(१) पानी भरेली कौन अलबेली नार (दादरा)
(२) तोड लायी राजा जमुनियाकेडार (दादरा)
(३) अरे हारे परदेशिरे जरा नैनोसे नैनामिला (देस)
(४) लगत करेजोवामे चोट (भैरवी)
(५) पीके हम तुम जो चले (गझल)

**अतुलनीय ठुमरी गायिका :**

या त्यांच्या अत्यंत लोकप्रिय रेकॉर्डस् ऐकण्यात व त्यांना ऐकविण्यात खूप मजा येत असे मला. त्या केवळ स्वतःचीच कला श्रेष्ठ असं मानीत नसत. दुसऱ्यांमधले गुणही त्या रसिक मनाने स्वीकारीत असत. ठुमरी गायिका पुष्कळ होतील पण

जद्दनबाईशी तुलना कधीच होणार नाही. त्या मनानं मोकळ्या व सात्विक होत्या त्यामुळे मी त्यांना सर्वासमक्ष त्यांची माहिती, अनुभव आणि गाण्याच्या अभ्यासाविषयी चर्चा करून नोंद करीत असे. त्याच अनुरोधाने मी आज त्यांच्याविषयी त्यांची जीवन कथा सांगण्याचा प्रयत्न करणार आहे.

ती कथा अशी अलाहाबादजवळच्या '' चिलबिला '' गावचे मुस्लिम जमीनदार '' मियाजान '' नावाचे होते. सुमारे १९०० साली मियाजान आणि दलिपा या पतिपत्नीना एक गोड गोजिरवाणी मुलगी झाली. तिचे नाव '' जद्दन '' ठेवले त्यांनी नंतर दोन-तीन वर्षांनी त्यांना एक मुलगाही झाला त्याचे नाव जुलई ठेवले.

या गावच्या पाण्याचा गुण असा की, गोड गळ्याची मुलं व्हायची. जद्दनचा गळा गोड होता त्याचं सार्थक करून ही मुलगी '' श्रेष्ठ ठुमरी गायिका '' म्हणून कीर्तिमान झाली.

ही मुलगी सात आठ वर्षाची झाली असतानाच मियाजान अल्लाच्या घरी गेले. मुले अनाथ झाली. पण दलिपा आपल्या दोन मुलांसह अलाहाबादला रहायला आली. मुलांचे शिक्षण चांगले व्हावे, ती कर्तबगार व्हावीत हा तिचा हेतू होता. ती महत्त्वाकांक्षी आदर्श माता होती.

दलिपाने आपल्या मुलीचा गोड आवाज आणि तल्लख बुद्धी लक्षात घेऊन तिला छान छान पारंपारिक गाणी शिकवली होती. ती ऐकून लोक खूष व्हायचे आणि तिला कौतुकाने खाऊसाठी पैसे द्यायचे.

**गोहरजानकडून शाबासकी :**

दलिपा नाराज होती म्हणून जद्दनला तिथं गाण्याचे शिक्षण देण्यासाठी योग्य व्यक्ती गोहरजान ही ठुमरी गायिका कीर्तिमान गायिका आहे हे कळताच ती मुलांसह कलकत्त्याला आली. गायनाबद्दल तिची जेवढी किर्ती होती तेवढीच मनाने उदार असल्याचेही दलिपाला कळलं होते. आपल्या चौदा वर्षाच्या जद्दनला घेऊन ती तिच्या घरी भेटायला गेली पण ती सायंकाळी स्वतःच्या घोडागाडीतून दररोज फिरायला जात असे. म्हणून ती बंगल्याच्या बाहेर वाट पहात थांबली. ती परत आल्यावर तिचा तो राजेशाही बंगला, अंगावर हिऱ्यामोत्यांचे दागिने ते वैभव पाहून मायलेकी स्तिमित झाल्या. पण धाडसाने

तिने नोकराकडून भेटण्याची इच्छा कळविली. गोहरजानने बाहेर येऊन त्या दोघींना दिवाणखान्यामध्ये नेले व मुलीला गाणे शिकविण्याची दलीपाने हात जोडून विनंती केल्यावर गोहरजानने '' एक छानसे गाणे ऐकव '' म्हणून जद्दनला सांगितले. तिने आपल्या धारदार गोड आवाजात एक गीत गाऊन दाखविल्यावर गोहरजान संतुष्ट झाली. स्वरतालाची उपजत समज, भावस्पर्शी शब्दोच्चार, गळ्यांतील हरकती, मुरक्यांची नैसर्गिक देणगी पाहून गोहरजानने विचार केला. '' हिला आपण व्यवस्थित शिक्षण दिलं आणि हिने मनापासून जर जिद्दीने मेहेनत केली तर ही एक उत्तम गायिका शिष्या तंयार होईल '' ही मनाशी पक्की खूणगाठ बांधून जद्दनची तिनं पाठ थोपटली.

'' सांगाल तसा रोज रियाज करीन '' हे मुलीने कबूल केल्यावर तिला दररोज शिकविण्याचे निश्चित आश्वासन दिले. दोघी मायलेकींना अपार आनंद झाला.

ठरल्याप्रमाणे रोज ठरल्यावेळी जद्दन गोहरजानकडे गाणे शिकायला जाऊ लागली.

प्रथम तंबोरा व्यवस्थित वाजवणं त्यावर स्वर लावणं, स्वर पक्के करणं या गोष्टीनंतर तिचे स्वरज्ञान वाढू लागलं. वेगवेगळ्या रागाचे यथातथ्य ज्ञान वाढू लागलं. रागविस्तार तान पलटे यामुळे पाया मजबूत झाल्यावर आणि वेगवेगळ्या ढंगदार चिजा आलाप तानांसह जद्दन व्यवस्थित गाऊ लागल्यावर तिचं ठुमरी गायकीचे शिक्षण सुरू झालं. विविध स्वर प्रकारांनी ठुमरीचे भाव, नजाकतीनं ती पेश करू लागली. तेव्हा गोहरजानची तिच्यावर मर्जी बसली आणि त्या दोघीमध्ये दाट मैत्री निर्माण झाली.

गोहरजानच्या प्रत्येक मैफिलीला तंबोऱ्यावर गायन साथीला जद्दन तिच्या बरोबर जाऊ लागल्याने मैफिलीची रंगत वाढू लागली व अनेक मोठमोठ्या कलाकारांबरोबर जद्दनचा जवळचा परिचय होऊ लागला. जद्दनच्या तारूण्याबरोबर तिचं गाणंही परिपक्व होऊ लागले. गाण्यात नजाकतीबरोबर तानेची तयारी, विविध स्वर प्रकारांनी ठुमरी नटवणं इत्यादी श्रेष्ठ गुण प्रगट होऊ लागले.

**मौजुद्दिन खाँकडे प्रगत शिक्षण :**

गोहरजानच्या पूर्ण संमतीनं, ठुमरीचे बादशहा मौजुद्दिनखाँ यांच्याकडेही जद्दनचं प्रगतशिक्षण सुरू होऊन ती त्यांची '' गंडाबंध शागीर्द '' झाली.

**जद्दनबाईचे स्वतंत्र कार्यक्रम :**

जद्दनबाईचे गाणं तेजस्वी झालं. त्यांचे स्वतंत्र कार्यक्रम करणारी म्हणून सर्वत्र कीर्ति पसरली तिची. पण ज्या गोहरजानच्या कृपेमुळे आपण या श्रेष्ठ अवस्थेला पोचलो त्या आद्य गुरूशी तिची निष्ठा, प्रेम व नितांत आदर कायम होता. तिच्या चरणी ती नेहमी विनम्र व कृतज्ञ होती.

कलाकार म्हणून नावलौकिक प्राप्त झाल्यावर बऱ्याच लोकांची मेहेनत बंद पडते. ते आळशी अन् सुस्त बनतात. पण जद्दनबाई सकाळी ९ वाजता सारंगीवाला व तबलियांसह मेहेनतीला बसत, एक वाजेपर्यंत. जेवण झाल्यावर थोड्या विश्रांतीनंतर एकट्याच तंबोऱ्यावर गाऊन ती रागालाप तानपलटेची तयारी करीत. सायंकाळी पुन्हा पाच ते आठपर्यंत कार्यक्रमांचे दृष्टीनं साथीदारासह गायला बसत. हार्मोनियम साथीला जमीरउद्दीन, सारंगी साथीला कल्लनखाँ, तबलासाथीस इर्शादमिया यासारखे निष्णात कलाकार असतं. यावेळी लहानमोठे कलाकार भेटीसाठी व गानश्रवणासाठी मुद्दाम येत असत त्यामुळे मैफिल रंगत असे. एक दिवस सैगलसारख्या थोर गायक नटानं " तोड लायी राजा " हा ढंगदार दादरा शिकण्याचा आग्रह धरला पण त्यातल्या हरकती मुरक्या त्याला जमणार नाहीत म्हणून बाईनी त्याला स्पष्ट नकार दिला. अशा अव्याहत मेहनतीमुळे जद्दनबाईची तयारी खूपच वाढली त्यामुळे कार्यक्रमांचं प्रमाणही खूप वाढले. तिचा नावलौकिक साऱ्या देशभर फार लवकर पसरला. मोठमोठे राजे महाराजे, सरदार मंडळी यांची निमंत्रणं एकसारखी येऊ लागली. शिवाय कानपूर, बनारस, दिल्ली, लखनौ, मुंबई या शहरातून तिचे जलसे यशस्वी झाले.

**मुखतार बेगम शरण :**

त्या काळात लाहोरची गझल गायिका " मुखतार बेगम " ही नावाजलेली होती, गर्विष्ठ होती. जद्दनबाईला ती जुमानत नव्हती पण जेव्हा प्रत्यक्ष तिची रंगेल मैफिल ऐकली तेव्हा ती नरमली व जद्दनला शरण आली.

**चित्रपटातून भूमिका :**

" राजा गोपीचंद " या चित्रपटात गोपीचंदच्या मातोश्रीची भूमिका करण्यासाठी लाहोरहून १९३२ मध्ये खास निमंत्रण आल्यावरून बाईंनी त्यात भूमिकाही यशस्वी केली त्यामुळे नावलौकिक वाढला जद्दनबाईचा.

जद्दनबाई लाहोरला बऱ्याच वर्षांनी गेल्यामुळे तिथल्या जाणकार रसिकांनी त्यांचा जाहीर कार्यक्रम आयोजित केला. त्यावेळी पंजाबचे गव्हर्नर सिकंदर हयात खान प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. ते जाणकार होते. पण गाणं न समजणाऱ्या शीख आणि पंजाबी श्रोत्यांनी तिथे गर्दी केली.

आयोजक रसिक मंडळींचा श्रोत्यांचा दर्जा लक्षात घेऊन बाईंनी सुंदर, भारदस्त पण भावमधूर ठुमरी सुरू केली. वेगवेगळ्या बोल अंगाने व प्रकारांनी, हरकती मुरक्यांसह ठुमरी बेहद रंगली. जाणकार श्रोते " वाहवा " ची बरसात करीत होते पण अडाणी श्रोत्यांनी गोंधळ सुरू केला. बाईनी एकदम गाणे थांबविले आणि म्हणाल्या " गाणे ऐकण्याची पात्रता या पंजाबमध्ये अजून निर्माण झाली नाही याचं मला दुःख होतंय, तुमची मला कींव येते, दया येते " बाई स्टेजवरून उतरल्या. श्रोते लाजले, माफी मागू लागले.

जद्दनबाई शांत झाल्या. सर शिकंदर यांच्या विनंतीवरून मीर साहेब गालीब साहेब यांच्या मस्त अर्थपूर्ण गझला पेश करुन बाईनी कार्यक्रम संपविला. पुन्हा या लाहोरमध्ये कधीही कार्यक्रम करणार नाही हा निश्चय त्यांनी जिथे जाहीर केला. त्यानंतर त्या कधीच लाहोरला गेल्या नाहीत.

**जीवनाला नवी कलाटणी सिनेतारका नर्गिसचा जन्म :**

यानंतर जद्दनबाईचा लखनौला जलसा झाला. तो बेहद रंगला. श्रोते रसिक जाणकार लाभले होते. त्यात उत्तमचंद मोहन नावाचे स्वरूपसुंदर व बलदंड तरूण सदगृहस्थ मित्र मंडळीसह समोर बसले होते. (हे मूळचे रावळपिंडीचे) उत्तमचंद बी. एस. सी. होऊन मेडिकल शिक्षणासाठी गेली दोन वर्षे लखनौला रहात होते. आणि विलायतेला जाऊन प्रगत अभ्यासक्रम पुरा करावा म्हणून पासपोर्टासह निघण्याची सारी सोय केली होती. जाण्यापूर्वी ते या जद्दनबाईच्या गाण्याला आले. बाईची मैफिल रंगतदार झाली. जद्दनचं दर्जेदार गाणे, मनमोहक व्यक्तिमत्व यामुळे ते बैचेन झाले. त्यांनी बाईचा परिचय करून घेतला. दोघांची मन बहरली प्रेम भावनेने, वास्तविक ते हिंदू होते. पण त्यांनी मुस्लिम धर्माचा स्वीकार करून " अब्दुल रसीद " हे नाव धारण केले आणि १९१८ साली त्यांनी जद्दनबाईशी विवाह केला. त्यांना तीन अपत्ये झाली. थोरला मुलगा अख्तर हुसेन व दुसरा मुलगा अन्वर हुसेन आणि तिसरी फातिमा. हीच मुलगी पुढे लोकप्रिय सिनेतारका " नर्गिस " नावानं प्रसिद्धीला आली. हिचा जन्म कलकत्त्यामध्ये झाला होता.

**जद्दनबाई मुंबईत दाखल :**

मुंबईत बाईचे अनेक कार्यक्रम यापूर्वी अत्यंत यशस्वी झाल्यामुळे त्यांना मुंबईचं विशेष आकर्षण होतं, त्यामुळे शेवटी १९३४ साली मुंबईत त्यांनी वास्तव्य केले. वाळकेश्वरच्या रम्यशा परिसरात त्या रहात होत्या. त्याच काळात त्यांनी " सेवासदन " " नाचवाली " आणि " इन्सान और सैतान " या बोलपटातून भूमिका केल्यानंतर स्वतःची फिल्म कंपनी काढली. तिचे नाव होते " संगीत मुव्हिटोन " पण " सबकुछ हम " या वृत्तीमुळे सगळ्याच गोष्टी स्वतःच सांभाळल्या, त्यामुळे त्याचा परिणाम व्हायचा तोच झाला.

बाई मुंबईत आल्यावर त्यांची एक मैफिल जाहीर जलसा ऑपेरा हाऊस थिएटरमध्ये झाला तो अत्यंत यशस्वी झाला. त्यावेळचे काश्मीरचे महाराज हरीसिंग यांना जद्दनबाईचे गाणे फार आवडत असे. ते मुंबईत आले की बाईची एक खास मैफिल करीत व भरपूर बिदागी देत असत. मुंबईतल्या मैफिलीना श्रीमंत रसिकजन आवर्जून हजर राहून उत्तम दाद देत असत.

जद्दनबाई लोकप्रिय कलाकार झाल्या तरी त्यांची विद्यार्थीवृत्ती त्यांनी जोपासली होती. मुंबईतले भेंडी बाजारवाले गवई अमानत अली खाँ यांच्याकडे त्यांनी ख्याल गायकीचे शिक्षण घेतले त्यामुळे त्यांच्या मैफिलीमध्ये प्रथम विलंबित ख्याल नंतर ठुमरी दादरा आणि शेवटी गझल हे सर्व प्रकार ऐकायला मिळू लागले. अन्य भाषांतल्या गीताप्रमाणेच त्या मराठी पदेही गाऊ लागल्या होत्या. त्या सर्व संतांची भजनंही उत्कृष्ट भावनेने सादर करीत. आणि त्या सर्व प्रकारांतून आनंद घेत आणि देत असत. पण का कोण जाणे अशी ही सर्वगुण संपन्न गायिका आयुष्याची पन्नास वर्षे जगू शकली नाही. १९४९ साली त्यांच्या वैभवसंपन्न जीवनाचा शेवट झाला. अन्य कलाकारांच्या गाण्यांचही त्यांनी आयुष्यभर कौतुक केले अन् विद्या मिळवत राहिल्या. " ठुमरी गायिका " म्हणजे जद्दनबाईच अशी लोकमान्यता त्यांना प्राप्त झाली होती त्या गुणवतीस विनम्र अभिवादन.

(रविवार, नवशक्ती २१ जून, १९९८.)

• • •

## गझल सम्राज्ञी पद्मश्री बेगम अख्तर

" गानकोकिळा ", " गझलसम्राज्ञी " आणि " पद्मश्री " अशा बहुविध पदव्यांनी जे श्रेष्ठ व्यक्तिमत्व सर्वत्र कीर्तिमान होतं ती ठुमरी, दादरा व गझल गाणारी " बेगम अख्तर ". हिचा जन्म उत्तर प्रदेशात फैजाबाद येथे झाला म्हणून ' अख्तरी फैजाबादी ' या नावानं ती विशेष विख्यात होती. तिनं संगीत विश्वात आपली स्वतंत्र दुनिया निर्माण केली होती.

तिचं शास्त्रीय संगीताचं पद्धतशीर शिक्षण पतियाळा घराण्याचे " अता महंमद " यांच्याकडे आणि नंतर किराणा घराण्याचे वहीद खाँ यांच्याकडे एक तप (बारा वर्षे) पूर्ण झालं.

७ ऑक्टोबर १९१४ रोजी जन्मलेली ही अख्तरी वयाच्या एकविसाव्या वर्षात कार्यक्रम करू लागली. आवाज मुळातच गोड होता. पण तो काबूत ठेवून योग्य तो सुरेलपणानं राग आलापांसाठी परिणामकारक व्हावा यासाठी " किराणा " गायकीकडे तिनं विशेष लक्ष दिले. आणि नजाकतदार गळ्याच्या तयारीसाठी तिला पतियाळा गायकीचा जास्त उपयोग झाला. अन् हे सर्व तिनं आपल्या कुशल बुद्धिमत्तेनं व मेहेनतीनं साध्य केले. शास्त्रीय संगीताचा पाया भक्कम झाल्यावर तिनं आपलं गाणं बुद्धिपुरःस्सर ठुमरी, दादरे, गझल या शैलीकडे वळवून त्यात श्रेष्ठ यश संपादन केले.

लहानपणापासूनच नियमित, योग्य वळणदार शिक्षण यामुळे तिच्या गायनात चौरसपणा व बहुढंगीपणा आला, गुरूंची नक्कल न करता चांगल्या गुणांचं अनुकरण करून स्वतंत्र ढंग तिनं निर्माण केला हे तिचं विशेष कर्तृत्व होय.

बेगम अख्तर एकदा कलकत्त्याला गेल्या. तिथे कीर्तिमान गायिका जद्दनबाई यांचा कार्यक्रम ऐकून त्या प्रभावित झाल्या. त्यांची आकर्षक शैली आपल्या गाण्यात यावी ही तळमळ निर्माण झाली आणि ती त्यांच्या उत्कर्षाला कारणीभूत

झाली. ठुमरीचा भावविवश रंगेल ढंग गळ्यात निर्माण करण्यासाठी ख्याल गायनासारखीच मेहनत करावी लागते. पण त्याबरोबर कल्पनाविलासानं, विविध स्वरालंकारांनी भावपूर्ण गाता येणं यासाठी स्वतःची " खासीयेत " समजावी लागते. म्हणजेच ठुमरी-गझल गायक हा भावनाप्रधान असावा लागतो. पाषाण हृदयी चालत नाही. ठुमरी-गझल गायकीसाठी पातळ व लवचिक आवाजाची आवश्यकता आहे.

**मधूर आवाजाबरोबर तल्लख बुद्धिमत्ता :**

हा गायकी गातांना त्या काव्यातील भावना व शब्दोच्चार लक्षात घेऊन रसपरिपोष करण्याकडे विशेष लक्ष द्यावं लागतं. शब्दांची मोडतोड न करता सुमधूर हरकती मुरक्यांचा कुशल प्रयोग करावा लागतो. बनारसी ठुमरीत हा प्रकार विशेष दिसतो. तानेला दुय्यम स्थान आहे. काव्यविषय शृंगार रसप्रधान असल्यानं हा गायन प्रकार विशेष लोकप्रिय झाला आहे. शृंगाररसाच्या विरह करुण आदि भावना व्यक्त करणारी सुंदर काव्ये आणि खमाज, मांड, जोगिया, तिलककामोद, काफी, पिलू आणि भैरवी यासारखे राग विशेष उपयुक्त ठरतात.

**संगीत नियोजक बेगम अख्तर :**

भावविवश मधूर आवाजाबरोबर परमेश्वराने त्यांना तल्लख बुद्धिमत्ताही दिली होती. कोणत्या भावनेची गझल कोणत्या रागामध्ये गुंफण करावी ही साहित्याची व संगीताची समज त्यांना होती. त्यामुळे योग्य ती चाल लावून ती गझल त्या खुलवीत असत. त्यांचा निर्मत्सरी मनमोकळा स्वभाव हा याकामी त्यांना उपयोगी पडत असे.

उत्तर हिंदुस्थानात व पाकिस्तानात उर्दूची जाण विशेष आहे. तिथे गझलला प्रतिष्ठा मिळवून देणं सोपं होतं. पण महाराष्ट्रात व मद्रास, कोचीनसारख्या दूरच्या प्रदेशातही त्यांनी गझलची लोकप्रियता वाढविली. शिवाय युरोप, रशिया, अरबस्तान, अफगाणिस्तान इत्यादी राष्ट्रात ह्या गझलांमुळे तिनं नाव कमावलं. ही कर्तबगारी प्रशंसनीय आहे.

**तिची रंगेल मैफिल :**

हैद्राबादचे जहागीरदार राजा धनराज गिरजी यांच्या बंगल्यावर मुंबईमध्ये बेगम अख्तरबाईचा कार्यक्रम (सन १९४६ साली मे मध्ये) राजे महाराजे व सरदार मंडळी अशा खास निमंत्रित लोकांसाठी काही विशेष समारंभानिमित्त ठेवला होता. त्यात आम्हाला, हिज मास्टर्स व्हॉइस ग्रामोफोन कंपनीच्या प्रमुखांना राजा धनराज यांनी स्वतः निमंत्रण दिलं होतं. म्हणून शेठ रमाकांत रुपजी, जी. एन. जोशी यांच्या बरोबर तिथे मीही गेलो होतो. यात, राजाजींचा हेतू हा की अख्तरीबाईच्या ग्रामोफोन रेकॉर्डिंसाठी आम्ही त्यांच्या गझला ऐकून गीतांची निवड करावी आणि त्यांचं रेकॉर्डिंग नक्की करावं.

राजाजींनी आमचं स्वागत करून खास कक्षामध्ये (बाईंच्या समोर) बसण्याची व्यवस्था केली व आमची ओळख करून दिली.

रात्री ठीक ९ वाजता थोडावेळ बागेश्री ख्याल गाऊन मिश्रकाफीमधली " आज कैसी ब्रिजमें धूम मचाई " ही ठुमरी अध्धात्रितालमध्ये विविध स्वरालंकारांनी नटवून उत्कृष्ट गायिली.

**संगीततज्ज्ञ राजा धनराज यांचे सुंदर विवेचन :**

निमंत्रित श्रोत्यांना गाण्यातील योग्य रसस्वाद घेता यावा यासाठी यजमान राजा साब यांनी भाषण केलं. " प्रसिद्ध गायिका बेगम अख्तर या ठुमरी, दादरा व गझल गोड गळ्यानं पेश करतात पण गझल गायनांत आता त्यांचे भावपूर्ण स्वरांनी हरकती मुरक्यासह नखरेल कौशल्य जाणवेल. जीव ओतून हा गायन प्रकार त्या गातात. त्यामुळे अपार कीर्तिचा लाभ झालाय. आज त्यांच्या उत्कृष्ट रसिल्या गानश्रवणाचा लाभ होतोय. त्यांचा आनंद लुटा. आताच आपण त्यांच्याकडून एक ख्याल, एक रसिली, भावमधूर ठुमरी ऐकलीत, त्याची आपण पसंतीची त्याना पावतीही दिली आहेत. आता त्यांनी फक्त गझलस् पेश कराव्यात अशी मी त्यांना विनंती केली आहे. म्हणून गझलबद्दल मी रसिक श्रोत्यांना माहिती सांगितली तर ते योग्य ठरेल. " गझल " गीतं केवळ उर्दू भाषेत, कविता असतात व " ठुमरी " गीतं ब्रिज भाषेतील कविता असतात. पुष्कळशा गझलातून प्रेमिकांचे शृंगाररसपूर्ण किंवा विरहानुकूल भाव

उत्कटपणे व्यक्त केलेले असतात. यामध्ये आलाप करताना त्यातल्या भावनेला पोषकच गावं लागतं. तालाशिवाय आलाप तानांचा मुक्तप्रयोग करण्यासाठी '' शेर '' या ओळी फार उपयोगी असतात.

'' गझल '' ह्या नेहमी केरवा, धुमाळी, दादरा, रूपक आणि द्रुत दीपचंदी या तालातून गातात. गझलांचे काव्य हे श्रोत्यांच्या मनाची पकड घेत असल्यानं सर्वसामान्यांना हा गीत प्रकार मोहित करतो असा सर्वत्र अनुभव येतो म्हणून सर्व लोक ही गीतं प्रेमानं गुणगुणतात. मराठीमध्ये हल्ली '' भावगीत गायन '' हा जो नवीन प्रकार लोकप्रिय झाला आहे. '' गझल '' ही त्याची जननी आहे. आज या मैफिलीमध्ये एच. एम. व्ही. चे आद्य भावगीत गायक जी. एन. जोशी व दुसरे संगीतरत्न ए. पी. नारायणगांवकर हे गायक इथे उपस्थित आहेत. ग्रामोफोन कंपनीचे प्रमुख श्रीमान रमाकांत रूपजीही आहेत. त्यांचं मी स्वागत करतो आणि अख्तरीबाईना विनंती करतो की, '' दिवाना बनाना है तो दिवाना बना दे '' ही त्यांची लोकप्रिय गझल त्यांनी प्रथम पेश करावी. टाळ्यांच्या गजरानं श्रोत्यांनी मन पसंत स्वागत केल्यावर बाईचा सुरेल तंबोरा आणि सारंगीचे मधूर गुंजन सुरू झालं आणि भावमधूर आलापानं बाईनी गझल सुरू केली. '' दिवाना बनाना है तो दिवाना बना दे '' चार अंतरे व शेर, अर्थामध्ये मश्गुल होऊन गायिले गेले. श्रोते धुंद मस्त झाले. '' वहजाद लखनवी '' या शायरची ही कविता प्रेम भावनेचा उद्रेक करणारी ठरली. श्रोते अक्षरशः भारावले. त्यानंतर एकाहून एक सरस गझला गायिल्या बाईनी. मैफिल रंगतच गेली. ' कोयलिया मत कर पुकार ' त्यानंतर ' जिया मोरा लहेराये है ' आणि '' नुकताची है गमे दिल । उसको सुनाये ना बने '' या पेश केल्या.

**बाईचे आवडते शायर :**

फैज महंमद, गालीब, जिगर मुरादाबादी हे सिद्धहस्त कवी अख्तरीबाईचे विशेष आवडते होते. यशदायी होते. त्यांच्या गझलानंतर मैफिलीची सांगता करताना माझ्या सूचनेचा बाईनी स्वीकार करून '' जमुना के तीर '' हे लोकप्रिय भैरवी ठुमरी '' दीपचंदी '' मध्ये तल्लीन होऊन शांतपणे गायिली ती अशी की, अब्दुल करीम खाँसाहेबांची सर्वांनाच '' याद '' आली.

राजा धनराज गिरजी यांनी हा सुयोग आणून दिल्याबद्दल आमच्या शेठ रमाकांत रूपजी यांनी त्यांना धन्यवाद दिले आणि रेकॉर्डींगसाठी बेगम अख्तरीबाईना हिज मास्टर्स व्हॉइस कंपनीत यायला सांगून आम्ही त्यांचा निरोप घेतला.

ठरल्याप्रमाणे अख्तरीबाईचे रेकॉर्डींगबद्दल करार करून दोन-तीन दिवस रिहर्सल केल्यावर वर नमूद केलेली निवडक चार गाणी (गझला) आम्ही रेकॉर्ड केली. त्यासाठी मी जी मेहेनत घेतली, योग्य दिग्दर्शन केलं त्याबद्दल बाईनी संतोष व्यक्त केला. लोकप्रियतेच्या शिखरावर असलेली ही थोर व्यक्ती मनानेही थोर होती. कुणाही व्यक्तीमध्ये विशेष गुण दिसला की मनमोकळेपणे तारीफ करण्याची त्यांची निगर्वी वृत्ती होती. त्यामुळे इतर कलावंतात त्या आवडत्या होत्या. लहान-थोर कलाकारांना त्या नेहमीच सन्मानाने वागवीत असत, हे त्यांचं थोरपण !

**सामाजिक कर्तव्यदृष्टी :**

आपल्या उत्कर्षासाठी, स्वार्थासाठी सगळेच लोक धडपडत असतात. पण त्याबरोबरच सामाजिक व राष्ट्रीय कर्तव्याची जाणीव नसेल तर ते गुण, ती कला कवडीमोल समजावी.

**बिहारच्या भूकंपग्रस्त निधीसाठी :**

बाईनी सेवावृत्तीने आपले जलशे करून तो सर्व निधी त्या समितीकडे दिला. तो १९३४ साली कलकत्त्यामध्ये ! हा दिलदारपणा त्यांनी आयुष्यभर जपला व आपली कला जनसेवेसाठी राबविली, हा विशेष गुण आम्हा सर्व कलावंतांनी जोपासला तर राष्ट्रकल्याण दूर नाही. पण तो गुण दिसतच नाही, ही खेदाची गोष्ट आहे.

बेगम अख्तर यांची ही सेवावृत्ती आणि या कलेतील त्यांची श्रेष्ठता ध्यानी घेऊन हिंदुस्थान सरकारने त्यांना " पद्मश्री " हा बहुमानाचा किताब देऊन त्यांचा यथार्थ गौरव केला.

**चित्रपट क्षेत्रात छोटीशी हजेरी :**

सुमारे १९५४-५५ चे सुमारास मेहेबूब प्रॉडक्शनच्या " रोटी " या गाजलेल्या चित्रपटामध्ये बेगम अख्तरीबाईनी भूमिका केली. त्यात त्यानी दोन गाणी गायिली होती. ती पुष्कळ रसिकांच्या मनात गुंजन करीत असतात आजही.

पूरब आणि पंजाबी या दोन्ही गान पद्धतीवर ज्यांचे प्रभुत्व होते, सुरीला दर्दभरी आवाज, उर्दूचे उत्कृष्ट उच्चार, गातांना हार्मोनियमवर फिरणारा सफाईदार हात, या सर्वांचा सुंदर संगम म्हणजे पद्मश्री बेगम अख्तर ! अहमदाबाद येथे ठरलेल्या मैफिलीस बाई अगत्याने हजर राहिल्या, गायल्या, निघतेवेळी अशक्तपणा वाटत असताना, केवळ श्रोत्यांची निराशा होऊ नये म्हणून त्याच अवस्थेत त्यांनी प्रामाणिकपणे गाऊन रसिकांना आनंद दिला. पण ती मैफिल शेवटची ठरली आणि दुसरे दिवशी म्हणजे ३० ऑक्टोबर १९७४ रोजी त्यांनी रसिकांचा कायमचा निरोप घेऊन त्या अल्लाच्या घरी गेल्या. सर्व संगीतसृष्टीवर दुःखाची अवकळा पसरली.

" जमुना के तीर " याच भैरवीने त्यांनी आपली जीवन भैरवी संपविली. या गानकोकिळेनं आपले गाणं अशारीतीने संपविले, वयाच्या साठावे वर्षी.

कोयलिया मत कर पुकार ।
कलेजोवामे लागी कटार ॥

हे त्यांचे गाणे आठवून त्यांच्या स्मृतीला माझे सादर प्रणाम.

(रविवार, नवशक्ती २८ जून, १९९८.)

• • •

# रूपगुणसंपन्न गझल गायिका मेनकाबाई शिरोडकर

श्रेष्ठ कीर्तिमान कलावती श्रीमती मेनकाबाई शिरोडकर यांचा अतिलोकप्रिय असा एक जमाना होऊन गेला, तो ज्यांनी प्रत्यक्ष पाहिला, ऐकला अन् अपरिमित सुखाचा अविस्मरणीय अनुभव घेतला असेल त्यांनाच यथार्थ कल्पना येईल. कारण त्यांचे वर्णन करायला शब्द अपुरे पडतात.

डोळे आणि कान यांना तृप्त करणारा सौंदर्यस्वर-लयीचा तो धुंदबेबंद असा जमाना होता. त्यांच्या गान वैशिष्ट्यांचे मूळ त्यांच्या बालपणापासूनच्या जाणीवपूर्वक केलेल्या शिक्षणामध्ये व संस्कारात आहे.

" पक्षाला उडायला कसं येतं ? " विचारले तर आपण काय उत्तर द्यावे ? " निसर्गतः " मग हेच उत्तर मेनकाबाईंच्या बाबतीत कुणीही देईल. पहिल्या श्वासापासून सुरेल गाण्याच्या, लयीच्या नादातच त्या वाढल्या, तंबोऱ्याचा आणि घुंगरांचा आवाज ऐकून त्यांचे रडणे थांबत असे, तहान-भूकही विसरून जात असत, असं नातेवाईक कौतुकाने वर्णन करीत. " गवयाचे पोर रडले तरी सुरातच रडतं " अशी म्हण आहे, ती मेनका सार्थ करीत असे.

मातेकडून मिळत गेलेले शास्त्रशुद्ध गायनाचे आणि नृत्यकलेचे शिक्षण यामुळे पाया मजबूत झालेला आणि वेगवेगळ्या संगीततज्ज्ञांकडून मिळत गेलेले ज्ञान अखंड मेहेनतीने आणि रंगील्या रसिल्यावृत्तीने ते वाढवले हा त्यांचा स्वभाव विशेष.

गोव्यातून बेळगावला रहायला आल्यावर त्यांना धम्मण खाँ सारख्या श्रेष्ठ गवैय्याकडून शास्त्रीय संगीताचे उत्तम शिक्षण मिळाले.

संगीताच्या विविध प्रकारांत नैपुण्य मिळवायचे असेल तर शास्त्रीय संगीतांची मूळ बैठक पक्की करावीच लागते, हे ओळखून ख्याल गायनात सरगम लयकारी, बोलअंग पक्कं झाल्यामुळे भावपूर्ण ठुमरी गायन, रसिले गझल गायन यात त्यांनी

आपल्या बुद्धिमत्तेमुळे सुयोग्य प्रगती केली अन् त्यामुळे संगीत व्यवसायामध्ये भरपूर यश मिळत गेले. अभिनयासह नृत्य गायनाचे कार्यक्रम करणं हा त्यांच्या शृंगाररसपूर्ण कृतीचा विशेष भाग होता. त्यामुळे धनवान रसिकवर्ग त्यांना भरपूर प्रमाणात लाभला. आणि यश, धन आणि किर्ती त्यांच्या पायाशी सतत लोळण घेत असल्यास नवल ते काय ? मैफलीचा प्रारंभ गुरूंच्या आदेशानुसार त्या गाण्याच्या मैफिलीत प्रारंभी ख्याल गायनही उत्तम करीत. मेनकाबाईचे गुरू धम्मण खाँ हे उत्तम गायक तसे उत्तम तबलजीही होते. गाणं शिकवितांना खाँ साहेब तबला वाजवून शिकवीत. त्यामुळेच ताल पक्का आणि लय अंगात मुरल्यासारखी झाली होती बाईंची.

मेनकाबाईनी धृपदधमार गायकीचाही रसिकपणे परामर्श घेतला, जीवनामध्ये सर्वप्रकारच्या संगीताला स्थान आहे असे त्यांचे मत होते.

" अमृतमंथन " हा हिंदी चित्रपट पाहून आल्यावर त्या त्यातील " रात आयी है नया रंग जमानेके लिए " ही गझल एक तासभर छेडीत होत्या. त्या म्हणत " गझल कव्वाली गायन म्हणजे आपले जसं भजन तसं गायन " अल्लाची स्तुतिआळवणी त्या काव्यात असते. मुसलमान कवि परमेश्वर व भक्त यांचे नाते आशूक माशूक (प्रियकर-प्रेयसी) मानून आपली कव्वाली रचतो. बडे महंमद खाँ, हैदर खाँ, नथ्थन खाँ यासारखे मोठे मोठे खानदानी गवईही कव्वाली, गझल गात होते. त्यात त्यांनी कधी कमीपणा मानला नाही. एखादा धमार तासभर छेडून झाल्यावर " पानी भरेली नार " हा लोकप्रिय दादरा किंवा " अब काली बदरिया आयी " यासारखे सावनगीत किंवा एखादी रंगेल गझलही ते तितकेच रंगवून पेश करीत असतात. पुण्याच्या संगीत परिषदेत " दरबारी " ख्याल गायल्यानंतर फैय्याझ खाँ साहेबांनी मस्त दादरा गाऊन श्रोत्यांना खूष केले होते. " श्रोत्यांच्या सूचनेची कदर करणे हे गायकाचे कामच आहे." हे मेनकाबाईचे विचार मननीयच आहेत, हे कुणीही मान्य करील, कारण पं. भास्कर बुवा वखले, उस्ताद मंजी खाँ साहेब यांना ठुमरी नाट्यपद गायला कधी कमीपणा वाटला नाही. मंजी खाँ हे तर भावगीतेही उत्तम गात असत.

मेनकाबाईना ख्याल गावा लागतो पण ठुमरी, दादरा, गझल हे प्रकार त्यांच्या गळ्यातून आपोआप येतात, त्यात त्या पूर्ण रमतात असे रसिक जाणकाराचे मत होते, ते मीही अनुभवाने सांगतो की, गातेवेळी स्वतःला उत्कट भावनेत झोकून देण्याची त्यांच्यापाशी शक्ती होती. मेनकाबाईची ठुमरी खानदानी ढौलाने, स्वाभाविक प्रसन्नतेमुळे इतरांच्यापेक्षा वेगळी दिसते. याचे कारण त्यांचा जवारदार बुलंद आवाज, सर्व सप्तकांत सारख्याच मोकळेपणाने सुरेलपणाने वावरणारा मधुर स्वर आणि शब्दांच्या पलिकडील भावदर्शी शब्दोच्चार, हरकती, खटके, मुरक्या इत्यादी लालित्यपूर्ण नखरेल गायन, यामुळे श्रोते देहभान विसरून धुंद होत असत. भावना व रंग यांचा उत्कर्ष साधण्यासाठी लयीच्या सहज अंदाजात बोलबनाव करणे, नृत्यानुकूल हावभाव करून तालाला किंवा लग्ग्यांना न भीता उलट लयीच्या उपजमध्ये त्यावर सौंदर्यपूर्णतेने स्वार होऊन आगळा आनंद निर्माण करणे हे त्यांचे अतुलनीय कौशल्य प्रगट होत असे त्यामुळे श्रोते स्तिमित होऊन " वाहवा " ची बरसात करीत. मेनकाबाईचे हिंदी व उर्दू उच्चार सहजपणे उत्तर हिंदुस्थानी असायचे. त्या भाषेची मूळची ऐट व गोडवा टिकविणारे असायचे. " पूरब " आणि " बनारसी " पद्धतीने त्या ठुमरी, कजरी अन् दादरा पेश करायच्या.

बाज तोच पण एकात " लास्य " तर दुसऱ्यामध्ये " तांडव " असे. " पूरब " अंगाच्या ठुमरीत क्वचित थोडा पंजाबी ढंग मिसळून और मजा करीत. त्यात बुद्धिमत्तेची व गळ्याचीही कसरत जाणवे. ठुमरी दादरे यांच्या पुराण्या बंदिशींचा भरपूर संग्रह त्यांच्याकडे होता. त्यामुळे मैफिलीत खूप विविधता अनुभवायला मिळत असे.

**बेळगावहून मुंबईत वास्तव्य :**

बेळगावहून मुंबईत यशस्वी घोडदौड १९२७ साली जन्मलेल्या शोभा या आपल्या गुणी कन्येसह दहा-बारा वर्षांनी मेनकाबाई मुंबईत दाखल झाल्या त्या आपली कलासाधनातपस्या परिपक्व करूनच. त्यांच्या कलासंपन्नेचे वर केलेले सारे वर्णन हे मुंबईतील वास्तव्यात रसिकांनी अनुभवलेले आहे.

हिज मास्टर्स व्हॉइस ग्रामोफोन कंपनीत मी जी. एन. जोशींबरोबर " संगीत नियोजक " म्हणून १९४४ पासून काम करू लागल्यावर कंपनीतर्फे अनेक कार्यक्रमांना आम्ही दोघे हजर राहून आनंद घेत होतो व लहानमोठ्या कलाकारांशी सतत संपर्क ठेवून होतो. एक रंगतदार अनोखी मेहफील मलबार हिलवरील एका अलीशान बंगल्यात जी. एन. जोशींसह कार्यक्रम ऐकायला (आणि पहायला) मी रात्री १० वाजता गेलो. त्या मोठ्याशा हॉलमध्ये काश्मिरी गालिचे, हंड्याझुंबरे, शोभिवंत वस्तू यांची रेलचेल होती. अत्तराचा सुगंध दरवळत होता. मोजकेच पण श्रीमंतीचा दिमाख दाखविणारे श्रोते गाद्यांवर तक्याला टेकून ऐटीत बसले होते. आपण आज वेगळ्याच मैफिलीसाठी आलो आहोत असं मला जाणवत होतं. आमचे जोशीसाहेब मात्र सराईताप्रमाणे हास्य-विनोद करीत त्यांच्यात सामील झाले होते. इतक्यात.... एका दारावरचा झिरझिरीत पडदा नाजूक हाताने बाजूला सरकला आणि एक लावण्यवती तिच्या सहेलीसह त्या झगमगाट दिवाणखान्यात हलके हलके पदन्यास करीत येऊन उभी राहिली. सर्वांना सस्मित वदनाने तिने " नमस्ते " केला. तिचा पोषाख विशिष्ट तऱ्हेचा होता. सळसळीत पायजमा, वेलबुट्यांचा खमीस, किरमिजी रंगाचा दुपट्टा, कानात हिऱ्यांचे डूल, नाकात मुरणी, गळ्यात हिऱ्या-मोत्यांचे दागिने असा एकूण आकर्षक पेहेराव तिचा व सहेलीचाही. तिच्या डाव्या-उजव्या बाजूला साथसंगत करणारे बसले. तंबोरा त्या सहेलीने षडज् पंचम जुळवून हाती घेतला. तबला सुरात जुळविलेला होता. त्यावर हलकीशी थाप मारली तबलियाने. पेटीवर मंदस्वर तरळू लागले आणि तार षड्जापर्यंत एक तान सर्रकन जाऊन एकदम गझल सुरू झाली.

**वो जो हममे तुममे करार किया था तुम्हे याद हो के, ना याद हो ॥**

गझलच्या या पालुपदावर पेटीवाला आणि तबलजी यांची मनोवेधक आतषबाजी सुरू झाली. माझा कान त्या गायिकेच्या सुरेल सुरांकडे आणि दृष्टी तिच्या बोलक्या डोळ्यांकडे होती. तिचे सौंदर्य मला तिच्या सुरातून दिसत होते. **" मुझे सब है याद जरा जरा "** असे म्हणतांना तिने सुंदर आदा केला.

तालाशिवाय ह्या ओळी भावविवशतेने तिने पेश केल्या आणि पुन्हा हसतमुखाने ती ओळ केरव्यामध्ये गायिली. त्याबरोबर एक मुखडा वाजवून तबलियाने मस्त ठेका धरला, तिचा आवाज मधुर होता. सुरांची समज जाणवत होती. गळ्यातून

मुरकी, हरकती, खटके सरसर निघत होते. लडिवाळपणे अन शब्दार्थांची चमक तिच्या डोळ्यात चमकत होती. तिथले इतर शौकीन हे गायिकेचे रूप, नखरा अन् तिचा आदा यातच गुंतून पडले होते व " वाहवा " देत होते. मला त्या गझलांपेक्षा तिच्या गाण्याची, रूपापेक्षा रसाची आणि लावण्यापेक्षा लयकारीची मातब्बरी जास्त महत्त्वाची वाटत होती. त्यामुळे मी " अहाहा " देत होतो. **" कोई बात ऐसी हुयी के तुम्हारे दिल को बुरा लगी, तो बयांसे पहले ही भूल जाना तुम्हे याद हो के, ना याद हो "** आमचे जोशीसाहेब गझलने भारावलेले दिसले. मी गाण्याने सुखावलो होतो. गायिकेने विचारले " आणखी काही फर्माईश आहे ? " मला गझल इतके याद नव्हते. पण एक ठुमरी मी सुचविली.

**" आख्खी रात गाये। कोई नही आये। "**

मास्तर कृष्णरावांच्या गळ्यातून मी ती ऐकली होती. मास्तर पिलू रागात गायचे आणि सारे श्रोते प्रफुल्लीत होऊन ऐकायचे. जोशी साहेब म्हणाले, " मेनकाबाई, आमच्या या दोस्ताला ठुमरीशिवाय काही कळत नाही.

वो बिघडना नस्ल की रात का।
वो न मानना किसी बात का॥
वो नही नही की हर अदा।
तुम्हे याद हो के, ना याद हो॥

तीच गझल तिने माझ्याकडे पहात लडिवाळपणे पुरी केली.

" ..... मीलनाच्या वेळी तुम्ही काय बिघडलात, काही म्हणता काही मानले नाहीत, नको नको म्हटले तर ऐकले नाहीत-तुम्हाला आठवते की नाही कोण जाणे ! ..... " मी मनापासून दाद दिली. गझल संपली, गाणे संपले नाही, शब्द संपले ; अर्थ संपला नाही. वाद्यं थांबली पण सूर थांबला नाही. तिला जो अर्थ सांगायचा होता तो मला समजला होता. ती गहिवरली होती. सारे स्तब्ध होते.

तिच्या आग्रहाखातर मी पान घेतले. तिने लवून नमस्ते केला. गाण्याला मनापासून दाद दिली की, गायक कलावंत प्रेमाने मुजरा करतात. गाण्यातली ती ओढ. " वो नही नही की हर अदा " ती पुन्हा पुन्हा गुणगुणून मला प्रेमभराने

ऐकवीत होती. मी नकळत '' वाहवा वाहवा '' केलं. तिला खूप बरे वाटलं. तिनं डोक्यावरला दुपट्टा खाली घेतला. बटा नाजूक बोटांनी सावरल्या. तिच्यागाण्याबद्दलची मी शाबासकी दिली. तिला मनापासून आनंद झाल्याचे दिसलं. जोशीसाहेब म्हणाले, '' मेनकाबाई, या आमच्या दोस्तांसाठी एक ठुमरीची झलक दाखवाना '' बाईनी आनंदाने साथीदारांना खूण करून मध्यम स्वर लावला आणि मिश्र पहाडीमध्ये '' होली खेलत नंदलाल '' ही ठुमरी सुरू केली. '' नंदलाल '' या शब्दावर विविध स्वरालंकारांनी आलापी गुंफली की, ऐकता ऐकता श्रीकृष्णाच्या रंगपंचमीस श्रोते गुलाल उधळू लागले आहेत असा भास निर्माण झाला. पंजाबी ढंगाच्या गायकीनं श्रोते मोहरून गेले, मादक चैतन्यमय गुंजनानं शृंगार रस ओथंबून वाहू लागला, अमर्याद कल्पनाशक्तीप्रमाणे तयार गळा फिरत होता. आम्ही त्या आगळ्या गायकीनं धुंदबेबंध झालो. दोन गंधार, दोन निषाद, दोन मध्यम यांचा कल्पक वापर करून ही ठुमरी बेहद्द रंगली. ते शब्दांनी यथातथ्य सांगणे कठीणच ! पण माझ्या जीवनातल्या संगीत मंजूषेत एक हिरा जतन करायला मिळाला हा आजचा दिन विशेष. '' मेनका '' या गायिका अप्सरेच्या सहवासात मला शृंगार गीतं श्रवण करण्याचा दुर्मिळ योग लाभला आणि आगळावेगळा शब्द स्वरांचा मनोहारी संगम परिचित झाला व मेनका शिरोडकरबाई या असामान्य, सर्वांग परिपूर्ण गायिकेचे गाणे प्रत्यक्ष ऐकून बरेच गैरसमज दूर झाले. त्यांचे श्रेष्ठत्व मनोमनी, पटलं. पण हे श्रेष्ठत्व पटवून देण्यासाठी त्यांच्या ग्रामोफोन रेकॉर्डस् आज उपलब्ध नाहीत याचा फार विषाद वाटतो. गोहरजान, मलकाजान, अख्तरीबाई, सिद्धेश्वरी देवी, रसूलनबाई यांच्या थोड्याफार रेकॉर्डस् केशवराव भोळे यांच्याकडे होत्या. त्याही आता गोव्यात गेल्या आहेत म्हणजे त्याही आता दुर्मिळच आहेत. आणि आकाशवाणीवर तर आनंदच आहे. त्यांना ही नावंही माहिती नाहीत हे दुर्दैव.

(रविवार, नवशक्ती १२ एप्रिल १९९८.)

• • •

# लावण्यगीत गायिका बाई सुंदराबाई

" वनवासी राम माझा सांगा कुणी पाहिला " करूण भावनेने गायिलेल्या या गीताची ग्रामोफोन रेकॉर्ड ऐकून ते गाणं मी खूप आवडीनं गात असे. तसंच प्रभातच्या माणूस चित्रपटामध्ये " मन पापी भूला कौन इसे समझाए " हे गीत तन्मयतेनं आईच्या भूमिकेत ज्यांनी गायलं होतं (तेही मला खूप आवडत असे म्हणून रेडियो कार्यक्रमात मी गायलेलं श्रोत्यांना खूप आवडलं होतं) त्या लोकप्रिय गायिका बाई सुंदराबाई ह्यांचा भविष्य काळात परिचय होईल, मनमोकळी चर्चा करण्याइतका परिचय होईल, अशी त्यावेळी कल्पनाही नव्हती मला.

अंदाजे १९४५ ते १९५३ या काळात सुंदराबाई व नटसम्राट बालगंधर्व यांना मुंबई आकाशवाणीवर " सन्माननीय मार्गदर्शक कलाकार " म्हणून नेमण्यात आलं होतं. त्यामुळे या दोघांचा मुक्काम दिवसा ५/६ तास आकाशवाणीवर नियमितपणे असायचा. आकाशवाणीच्या क्वीन्स रोड ऑफिसमध्ये त्यांच्यासारख्या असामान्य कलावंतांकडून मनमोकळेपणात जे शिकता येईल ते शिकावं असं वातावरण होतं. त्यांच्या सहवासात राहून सांगीतिक गप्पा चर्चा करणं हा एक अति सुखद अनुभव होता. त्या अनुभव कथा लिहिल्या तर सुंदर ग्रंथ होईल (पण हल्ली वाचणार कोण ?) यावेळी सुंदराबाई वृद्धावस्थेत असूनही आवाजात सुरेलपणा हरकती मुरक्यांची नजाकत कायम होती याचाच अर्थ त्यांचा रियाझ नियमितपणे चालू होता. आकाशवाणीच्या आर्टिस्ट रूममध्ये भूतकालिन चर्चा आणि गाणी ऐकण्यात खूप आनंद मिळत असे, कारण बाईंचा स्वभाव मनमोकळा आणि विनोदी होता. एवढ्या मोठ्या विख्यात कलावंताची जडणघडण कशी झाली ही माझी जिज्ञासा बाईंनी वेळोवेळी पूर्ण केली.

सुंदराबाई जाधव ह्या मूळच्या पुण्याच्याच. बाई सुंदराबाई पुणेकरीण या नावानं त्या लोकप्रिय होत्या. त्यांचं रागदारी गायन शिक्षण प्रथम ठाकूरदास बुवा नावाच्या कनोजी ब्राह्मण गवैय्याकडे पुण्यातच झालं. आणि लावणी गायनाचं खास शिक्षण साताऱ्याकडील एका तयार ढंगदार गायकाकडे–दाभाडे गोंधळ्याकडे– पुण्यांतच झालं. त्यानं बाईंच्याकडून उत्तम तयारी करून घेतली त्यामुळे सुंदराबाई या गायन प्रकारात लोकप्रिय झाल्या. बाईचं अंतःकरण फारच भावनाप्रधान रसिक व संस्कारक्षम होतं. शोधक व सूक्ष्म अभ्यास करणारी कुशाग्र बुद्धि होती. उस्ताद गुलाम रसूल खाँ यांचे एक बीनकार बंधू होते त्यांच्याजवळून ठुमरी, होरी, गझल, कव्वाली हे सर्व गानप्रकार त्यांनी आत्मसात केले पण आद्यगुरु ठाकूरदासबुवा यांनी बरेच वर्षे प्रचारातील रागांचं पद्धतशीर शिक्षण देऊन चिजा व भजनंही बाईंना शिकवली. त्यांच्या आवाजाला शोभेल, जुळेल अशी सुरेल ढंगदार गायकी देऊन त्यांचा संगीताचा पाया भक्कम करून घेतला ही गोष्ट डोळ्यात पाणी आणून कृतज्ञतेनं आम्हाला बाई सांगत.

## सर्वांग परिपूर्ण रसीलं गायन :

महाराष्ट्राचं आवडतं गीत म्हणजे लावणी. ती तयार गळ्यानं, भावनेनं अतिशय उत्कृष्टपणे गाणारी एकच बाई होती ती म्हणजे सुंदराबाईच. तरूणपणी आकाशवाणीवर सतत होणारे कार्यक्रम सर्वत्र होणाऱ्या यशस्वी मैफिली, ग्रामोफोन रेकॉर्डस् यामुळे सुंदराबाईंच्या ऐन उमेदित नांव सर्वत्र दुमदुमत होतं. एवढंच नव्हे मी त्यांना पाहिलं त्या उतार वयांतही त्यांना मोठ-मोठे कलाकार मान देत असत. महाराष्ट्र संगीताचा इतिहास लिहितांना सुंदराबाईंना मानाचं श्रेष्ठस्थान द्यावं लागेल, यात संशय नाही. कारण १९१७ ते १९३५ पर्यंत लावणीप्रमाणेच होरी, कजरी, भजन, गझल, कव्वाली इ. सर्व प्रकारचं गाणं ढंगदारपणे व समर्थपणे गाण्यात दुसरी कुणी गायिका चमकली नाही, असं वयोवृद्ध जाणकार सांगत असत. खुद्द हैद्राबादच्या निजामसाहेबांनी भर जलशांत '' मराठी होनेपर भी क्या साफ उर्दू जबान दिमाख से बोल रही है ! '' असे उद्‌गार काढून सुंदराबाईंचा गौरव केला होता.

बंगलोर-म्हैसूरकडील गायिका त्यांच्या सुरेल आवाजावर इतक्या खूष होत्या की, '' अम्मा आप यहीं रह जाइए '' असं बाईंना म्हणत व त्यांचे लागोपाठ कार्यक्रम घडवून आणीत आणि शक्य तेवढं शिकून घेत. महिना महिना तिथे बाईंचा मुक्काम वाढत असे.

एका दाक्षिण्यात गायिकेनं सुंदराबाईंचं वर्णन केलं आहे '' बाईंचा आवाज मूळचाच अतिंशय गोड असून त्याला एक नाजूकशी झार आहे. तो मादक तसाच विलक्षण लाघवी आहे. ''

बालगंधर्वासारख्या चोखंदळ गायकाला सुंदराबाईंचं गाणं फार आवडत असे. गप्पांच्या ओघात त्यांनी केलेलं वर्णन मननीय आहे. '' शृंगार, करूण व शांत रसावर सुंदराबाईंचं विशेष प्रभुत्व असे. शृंगारिक लावणी गाताना मुरकी खटका यांचा उपयोग त्या समजून करीत. तालाला लयीला अनुसरून त्या शब्दच्छेद करीत तेव्हा शब्दांची ठसकेदार फेक, त्यांना घातलेली मुरड, गिरकी तानांचा उपयोग शृंगाररसाचा परिपोष कुशल कारागीराप्रमाणे त्या करीत असत. या विधानाचा अनुभव त्यांच्या रंगेल रेकॉर्डस्‌मधूनही येतो '' सखे नयन रंग '' ऐकून दर्द आलं डोळ्यांना पाणी '' तुझं मुरकत चालणं '' '' नको नादी गं लावू '' ह्या लावण्या मी त्यांच्याकडून प्रत्यक्ष भेटीत गाऊन घेतल्या त्यावेळी मला त्याचा पुन्हा प्रत्यय आला. याशिवाय '' मोरा बन्सीवाला '' '' कान्हा मुखसे न बोलो '' '' न मानुंगी हरगीज '' ही हिंदी दर्दभरी गीतं ऐकून ह्रदयाच्या तारा हळुवारपणे छेडल्या जात आणि अंतःकरणाला पाझर फुटत असे व त्यात गीतांतल्या भावना त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत असत.

अख्तरी फैजाबादी, रसूलनबाई, सिद्धेश्वरी देवी, जोहराजान यांच्याशी सुंदराबाईंच्या गाण्याशी साम्य जाणवत असे.

सुंदराबाईंची मैफिल समजून उमजून साथ संगत करणारा त्यांचा एक उत्तम तबलजी घम्मणखाँ नांवाचा होता. त्याच्या रंगतदार साथीने सुंदराबाईंची मैफिल हमखास रंगत असे. बाईंच्या बऱ्याचशा ग्रामोफोन रेकॉर्डस्‌मध्ये या

घम्मणखाँची ढंगदार साथ ऐकायला मिळते. बाईंच्या ऐन उमेदीत ज्यांनी त्यांचे जलसे ऐकून मनमुराद आनंद लुटला असेल " ते पुरुष दैवाचे " असं म्हटल्या वाचून रहावत नाही.

नटसम्राट बालगंधर्व यांच्याशी गप्पांच्या ओघांत जे वर्णन मला ऐकायला मिळालं ते सांगतो. " बाईंचे डोळे बोलके आणि मिष्किल होते. लावणीतली दर्दभरी कहाणी डोळ्यांनी आणि सुरांनी त्या उकलून दाखवीत. लय अशी संथ की जणू ख्यालाची लय. " दर्द " या शब्दाचा उच्चार त्या अशा हळूवारपणे करीत जणू हृदयातली खोल जखम त्यांच्याच जिव्हारी गेली आहे.

एक सोज्वळ, साधी, पाचवारी एकरंगी पातळ नेसलेली चार चौघीसारखी असायची. बोलण्यात वावरण्यात विलक्षण मार्दव होतं.

गंधर्व कंपनीनं गडकऱ्यांचं ' एकच प्याला ' हे नाटक करायचं ठरवलं तेव्हा गुरूवर्य भास्करबुवा बखले यांच्या सूचनेवरून सुंदराबाईंनी आपल्या संग्रहातल्या उत्तमोत्तम चाली दिल्या होत्या त्यातील " दिल् बेकरार तूने " या चालीवर " कशी या त्यजू पदाला " हे पद, " कत्ल मुझे कर डाला " या चालीवर " सत्य वदे वचनाला " तसेच " पिया मनसे " या चालीवर " प्रभु मजवरि कोपला " ही सारी पदं अतिशय लोकप्रिय झाली. पं. भास्करबुवांना सुंदराबाईंचं भावपूर्ण गाणं फार आवडायचं. कारण गीताचा अर्थ, भावना व रस यांची जाणीव ठेवून त्या नेहमी गात. त्यात नजाकत आणि बुद्धिचातुर्य दिसत असे. गातांना त्या हातवारे करीत तेही गाण्यात रंगल्यामुळे अर्थानुकूल असत. "

एकच प्याला नाटकांतील सगळीच पदं प्रसंगानुकूल रस परिपोषक आहेत. बालगंधर्वांनी ती पदं तन्मयतेनं गाऊन विविध स्वरप्रकारांनी नटवून रंगभूमीवर रसोत्कर्षाची परिसीमा गाठली होती असं त्या वेळचे प्रेक्षक, जाणकार अभिमानानं सांगतातच, पण आम्ही त्यांच्या ग्रामोफोन रेकॉर्डस्वरून आणि बालगंधर्वांच्या वार्धक्यात आम्ही जे स्टेजवर जवळून ऐकलं आहे त्यावरून मी चांगलं जाणू शकतो.

**एक ह्रदयस्पर्शी अनुभव :**

एकच प्याला नाटकाच्या निमित्तानं बालगंधर्व आणि सुंदराबाई ह्या थोर कलाकारांमध्ये खूप जवळीक निर्माण झाली होती ती म्हणजे दादा आणि ताई या श्रेष्ठ, पवित्र नात्यानं.

क्वीन्स रोडवरील इन्कम टॅक्स इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर ऑफिस आणि चौथ्या मजल्यावर आकाशवाणी स्टुडिओ व स्टाफरूमस् होत्या. आमच्यासह सुंदराबाई स्टुडियोतून बाहेर आल्या सायंकाळी आणि लिफ्टमधून अगदीच साध्या वेषांत नटसम्राट बालगंधर्व अचानक तिथं बाहेर पडलेले बाईंनी पाहिले. एकमेकांना बरेच वर्षांनी पाहिल्यामुळे दृष्टीभेट होताच " दादा " " ताई " म्हणून झेप घेतली. ते कडकडून भेटले एकमेकांना. सुंदराबाई हुंदके देत आनंदाश्रू गाळीत होत्या. फार वर्षांनी ही अकल्पित भेट झालेली आणि एके काळच्या वैभवशाली नटसम्राटाचं अगदीच सामान्य वेषातलं रूप पाहून बाईंना आश्चर्ययुक्त दुःखही झालं. " दादा, कायरे ही तुझी अवस्था ? " वैभवाच्या शिखरावरून उतरलेल्या या बहिण-भावंडाची माया एकरूप झाली होती. हा सुखद भावस्पर्शी प्रसंग पहायला तिथे मी, कृ. द. दीक्षित (अधिकारी) व झेड्. ए. बुखारी (स्टेशन डायरेक्टर) योगायोगानं उभे होतो. सारे गहिवरले. थोर कलाकारांच्या थोर मनांचं ते मनोज्ञ दर्शन होतं. त्यांच्या व्यथा, स्मरण मोकळं झालं. कलाकारांमध्ये आपापसात कसं जिव्हाळ्याचं नातं असावं, याचा हा एक आदर्शच होता. आजच्या कलाकरांनी यावर जरूर विचार करावा व स्नेहसंबंध संघटित करावेत व सुशिक्षितांनी सुसंस्कृत होऊन सामाजिक जाणीव वाढवणं आज अवश्य आहे, हे यावरून सिद्ध होत आहे. आज आम्ही कलाकार एकमेकांचं गाणंही ऐकत नाही इतके अहंमन्य, आत्मकेंद्रीत विचित्र वागत आहोत म्हणून या पूर्वीच्या श्रेष्ठ कलाकारांचे आदर्श वर्तन, सुसंस्कृतपणा यांचं स्मरण करणं यासाठीच हा लेखन प्रपंच आहे.

या जगाचा सर्व प्रकारचा अनुभव घेतल्यामुळे बरे वाईट दिवसही बघितले होते. तरीही सुंदराबाई शांत व विनम्र होत्या. आयुष्याच्या संध्या प्रकाशात त्यांचं व्यक्तिमत्त्व सोज्वळ होत चाललं होतं. मावळत्या आयुष्यातही ईर्षा, जिद्द

होती व गाण्याची, अर्थाशी, भावनेशी, एकरूप होण्याची त्यांची ताकद विशेष होती, कायम होती. सुंदराबाईंनी हे जग सोडून ४०-४२ वर्षे लोटली असतील तरी पण प्रभातच्या " माणूस " चित्रपटामध्ये नायकाच्या प्रेमळ आईची भूमिका उत्तम वठवून " मन पापी भूला, कौन इसे समझाये " हे एकतारीवरील भजन अतिशय सुरेल व भावपूर्ण तन्मयतेनं गायिलेलं आजही माझ्या तोंडी घोळत आहे व ते प्रसन्न व्यक्तिमत्त्व, तो प्रेमळ सहवास माझ्या मनी वास करतो आहे. त्या स्वर देवतेस माझे सादर प्रणिपात.

(रविवार, नवशक्ती १ फेब्रुवारी १९९८.)

• • •

# गान सरस्वती

## सरस्वती राणे

निसर्गामध्ये वैचित्र्य आहे व साम्यही आहे. कोकिळेचा आवाज गोड आहे, बुलबुल पक्ष्याचाही आवाज गोड आहे. दोघींच्या गोडीत फरक आहे अन् साम्यही आहे, आनंद आहे. सुविख्यात गायिका श्रीमती हिराबाई बडोदेकर आणि श्रीमती सरस्वती राणे यांच्या सुमधुर आवाजाची हीच नैसर्गिक ईश्वरदत्त किमया आहे. (पूर्वाश्रमीच्या विख्यात गायिका सरस्वती माने त्या ह्याच होत.) पं. सुरेशबाबू माने यांच्या या दोन सख्ख्या बहिणी व शिष्या. पण त्यांनी आपल्या या लाडक्या धाकट्या बहिणीला परिश्रमपूर्वक विद्या देऊन तिला श्रेष्ठ गायिका केली. अन् सरस्वतीनंही भक्तिभावाने गुरूस्थानी पूजन करून हिराबाईकडूनही नंतर गानप्रसाद मिळविला.

**दोघींच्या आवाजाची जात एकच :**

हिराबाई आणि सरस्वती यांच्या सुमधूर आवाजाची जात एकच. आकाशवाणीवर गाणं ऐकताना दोघींपैकी कोण गात आहे याविषयी संभ्रम निर्माण व्हावा इतके साम्य, माधुर्य आणि लवचिकपणा तोच. हिराबाईच्या तालमीतच सरस्वतीबाई तयार झाल्यामुळे गायनशैली, आवाजाचा लगाव एकच असणे हे स्वाभाविक आहे. पण आवाजाचा गुणधर्म एकच असणे हा ईश्वरी चमत्कार आहे हे निश्चित. एकदा त्यांची जुगलबंदी ऐकताना तर हे साम्य रसिकांना आश्चर्यकारक जाणवलं होतं.

भक्त आणि परमेश्वर यामध्ये दुजाभाव न राहता ते एकरूप होतात तेच नाते या दोघींमध्ये गुरूशिष्यामध्ये मी पाह्यलं आहे. त्यांच्या वागण्यात आणि गाण्यातही.

' सौभद्र ' मधील सुभद्रेचे पहिलंच पद " प्रियकर माझे भ्राते " हे पद सरस्वतीबाईच्याही गळ्यातून ज्यांनी ऐकले असेल त्यांना त्या आर्त स्वरांमुळे सुभद्रेविषयी एकदम सहानुभूती निर्माण होई व करूण रसपूर्ण स्वरांची उपज होत असताना अंतःकरणाला पाझर फुटत असे. त्यांचीही आवाजाची उंची हिराबाईप्रमाणेच आहे. " पांडु नृपति जनक जया " हे पद गाताना तार सप्तकातील पंचमापर्यंत त्याही सहजपणे जाऊन येतात. हिराबाईकडून विद्या ग्रहण करताना त्यांच्या बुद्धीची ग्रहण शक्ती विशेष आहे हे जाणवते. अतिशय अवघड तान, हरकत किंवा चीज ऐकल्याबरोबर गळ्यातून सहज काढता येते, हे तालीम देतेवेळी मी ऐकलं आहे.

त्यांचे स्वरज्ञान चांगलेच पक्के आहे, जलद तानेची " सरगम " त्या चटकन करतात परंतु केवळ नक्कल करण्याची प्रवृत्ती त्यांच्यात दिसली नाही. शिकविलेले पचवून त्यावर नवीन निर्मिती करण्याची प्रतिभा सरस्वतीबाईमध्ये मी पाहिली आहे. संगीतामधील शास्त्रीय व ललित या दोन्ही अंगामध्ये त्या प्रवीण आहेत. ख्याल, ठुमरी, भजने व नाट्यपदे हे सर्व प्रकार त्या मैफिलीत सादर करतात. फक्त लावणी मात्र या दोघीही गात नाहीत. कारण हा अभिरूचीचा प्रश्न आहे.

**श्रोत्यांची वाहवा मिळतेच :**

त्यांचा स्वाभाविक कल भक्ति, शांत, वत्सल या रसांकडे विशेष आहे. त्यांची भजने किंवा प्रसंगनिष्ठ नाट्यपदे जशी चटकन रंगतात तशी शृंगार रसाची ठुमरी विशेष रंगलेली मी ऐकली नाही. कारण स्वभावात उच्छृंखलपणा नाही. विलंबित लयीत ख्याल गाताना सरस्वतीबाईचे स्वर इतके सुरेल लागतात व मींड इतक्या मुलायमपणे त्या खेचतात की श्रोत्यांच्या अंगावर रोमांच उभे राहतात. तंबोऱ्याच्या

तारांचा स्वर आणि गळ्याचा स्वर एकरूप होतो की, त्यातच त्यांची व श्रोत्यांची वृत्ती तल्लीन होते. " स्वरात सच्चा व तालात पक्का " तोच खरा गायक अशी एक सार्थ म्हण प्रचलित आहे.

प्रथम रागांच्या स्वरांनी–आलापांनी अस्ताई–अंतरा भरून, मैफिलीचे वातावरण भारून टाकल्यावर तानाचे सट्टे सुरू होतात. तानेतील प्रत्येक स्वर गमक युक्त, पीळदार, स्पष्ट व सुरेल लागतो. तान इतकी बांधेसूद अन् रेखीव असते की ती संपवून पुन्हा चीजेचे पालुपद म्हणून समेवर येताच श्रोत्यांची ' वाहवा ' मिळतेच हमखास.

अनपेक्षितपणे खुबीदारपणे समेवर येण्याची कला ही तालगत–लयीत पक्केपणा असल्याशिवाय कठीणच. त्यांच्या व हिराबाईच्या गाण्यात सहजता हा महत्त्वाचा गुण प्रकर्षाने जाणवतो व तो आनंद देतो. त्यामुळे गाणे प्रथमपासूनच रंगत जाते आणि श्रोत्यांना वेळेचा विसर पडतो. ते तल्लीन होतात. मैफिल कंटाळवाणी कधीच होत नाही. कोणत्याही नामवंत गायिकेने दोन बहिणींचा हा आदर्श आपल्यासमोर नेहमी ठेवावा व यश मिळवावं.

चिजांची बंदीश, गायकी अन् विस्तार त्यांच्या उस्तादांनी त्यांना पद्धतशीर बसवून दिला आहे. त्यामुळे त्या गायला बसल्या की सर्व जागा व प्रकार आपोआप शिस्तीत मांडले जातात.

किराणा घराण्याच्या चिजांचे मुखडे आकर्षक असतात. उदाहरणार्थ– मुलतानीमधील " कवन देस गई " शंकरामधील " माथे तिलक धारा " शुद्ध सारंगमधील " जारे भंवरा दूर " आणि बिहाग ख्यालाचे तोंड " कवन ढंग तोरा " व भूपरागातील " सूधे बोल " ही अस्ताई पहा.

बालगंधर्वांनी रंगभूमीवर व ग्रामोफोन रेकॉर्डस्वर लोकप्रिय केलेली " सत्य वदे वचनाला " व " दिलरूबा हा या जिवाचा " ही पदे आणि सौभद्र नाटकातील सुभद्रेची पदे हिराबाईनी वेगळ्या ढंगाने व भावनेने गाऊन रंगविली व सरस्वतीबाईनी ही ती रंगमंचावर लोकप्रिय केली असे जाणकार म्हणतात.

**अविस्मरणीय प्रयोग :**

१९४९ मार्च मधील मुंबईतील नाट्यमहोत्सवामध्ये सौभद्र नाटकाचा आगळावेगळा प्रयोग झाला. त्यात बालगंधर्व अर्जुनाच्या भूमिकेत, मा. कृष्णराव हे कृष्णाच्या भूमिकेत आणि सरस्वतीबाई सूभद्रेच्या भूमिकेत होत्या. त्या रंगतदार प्रयोगात सरस्वतीबाई " मीही काही कमी नाही " अशा थाटात मनापासून भूमिका रंगवून गायिल्या होत्या. तो प्रयोग अविस्मरणीय झाला. हुशार आणि आवाजदार कलावंतामध्ये सर्वसामान्यपणे मेहेनतीचा आळस हा दुर्गुण प्रकर्षाने दिसून येतो. पण सरस्वतीबाई मात्र याला अपवाद आहेत. गाण्याचा कार्यक्रम असो, नाटक असो किंवा तालीम असो पण रोज दोन तास कोपऱ्यात बसून तंबोऱ्यावर गाण्याचा रियाज केल्याशिवाय चिजांची व पदांची उजळणी केल्याशिवाय त्या रहात नाहीत. हा त्यांचाही हिराबाईप्रमाणेच नियम आहे.

**आनंदमयी जीवन :**

आपल्या आदरणीय गुरूचे सारे सद्‌गुण (हिराबाईचे) सरस्वतीबाईनी मनापासून अंगी बाणवले आहेत. धंदेवाईक गायक गायिकांप्रमाणे त्यांनी कधीच चुकारपणा केलेला नाही. अत्यंत कळकळीने त्या मन लावून गात असत. रात्री साडेनऊ ते पहाटे चार वाजेपर्यंत विश्रांती न घेता त्यांनी केलेले कार्यक्रम मी ऐकलेले आहेत. सर्व तऱ्हेच्या अभिरूची असलेल्या श्रोत्यांची त्यांनी कदर केलेली आहे. पूर्ण निगर्वी अन् विनयशील वागणे हा त्यांचा स्वभावधर्म आहे, स्थायीभाव आहे. कुणी स्तुती केली म्हणून त्या हुरळून जात नाहीत आणि कुणी निंदा केली म्हणून खचून जात नाहीत. आपल्या गानकलेशी पूर्ण प्रामाणिक राहून, कलेशी निष्ठा ठेवून जिव्हाळ्यांचे वर्तन ठेवून आपले आयुष्य त्यांनी आनंदमय केले आहे.

या छोटूताई माने होत्या तेव्हा आणि नंतर श्रीमान रसिक यजमान राणेसाहेब लाभल्यावर वैभवशाली दिवस अनुभवल्यावर सौ. सरस्वती राणे प्रथितयश गायिका म्हणून कीर्तिमान झाल्यावरही त्यांनी व्यवसायाला कधी बाजारी स्वरूप येऊ दिले नाही. याचे कारण घरातले आईचे-बनूताईचे व बहिण हिराबाईचे आदर्श संस्कार.

स्वरांवर मनापासून प्रेम त्यामुळे गोडवा, रंगत व संयम, ईश्वरनिष्ठा ही संगीतातील मूलभूत तत्त्वे सतत आचरणात आणत असल्यामुळे संगीतातलं मानाचं श्रेष्ठ स्थान हिराबाईप्रमाणे सरस्वतीबाईनी अढळ ठेवलं आहे. त्यांचे यजमान राणे हे शांत, सुस्वभावी, संगीतावर अढळ प्रेम करणारे निर्लोभी लाभल्यानेच त्यांची जीवनयात्रा आनंद यात्राच आहे.

**संस्मरणीय एक आठवण :**

१९४४ ते १९५५ या दशकात मुंबईत व उपनगरात संगीताचे कार्यक्रम सतत झडत असत. सर्वत्र म्युझिक सर्कल्सही कार्यरत होती. श्रोतेही उत्सुक असत. रात्र रात्र जागून रसिकजन, सामान्यजन संगीताचा आनंद मनसोक्त लुटत असत. कलाकारही त्या कालमानानुसार माफक मानधनामध्ये प्रामाणिक सहकार्य देऊन व्यवसाय करीत. रेडियोचे कार्यक्रमही जनता कान लावून सर्व संगीत प्रकारांचे व शास्त्रीय संगीताचे कार्यक्रमही तत्परतेने नेहमी ऐकत असत व पसंतीची पावती पत्राद्वारे देत असत व त्या त्या रेडिओ कलाकाराला प्रत्यक्ष ऐकण्यासाठी निमंत्रित करून आदर करीत व ऐकायला गर्दी करीत असत. हे सारे मी स्वतःच्या अनुभवावरून मुद्दाम नमूद करीत आहे. याचा योग्य अर्थ सर्वांनी ध्यानी घ्यावा व आताच्या प्रतिकूल परिस्थितीशी तुलना करावी.

याच काळात मुंबई रेडिओ स्टेशनवर व अन्य कार्यक्रम स्थळी सरस्वती राणे यांच्या सहज भेटीगाठी होत असत. एकमेकांचे कार्यक्रम ऐकून आम्ही स्वरानंद घेत होतो. स्नेहसंबंध कायम ठेवीत होतो. एका संगीत संस्थेतर्फे गिरगाव भटवाडीतील हॉलमध्ये सरस्वतीबाईचा खास कार्यक्रम होता. सर्व कलाकार श्रोते म्हणून उपस्थित असल्यामुळे खाँसाहेब अब्दुल करीम, सुरेशबाबू माने, हिराबाई बडोदेकर यांच्याबद्दल व गायकीबद्दल आदर बाळगणारेच सारे होते. स्वतः श्री. राणे हेही आवर्जून हजर होते. तबला नवाज खाँसाहेब शमशुद्दिन हे तबला साथीस होते. दोन तंबोरे एकरूप होऊन षड्ज पंचम संवाद झणत्कारित होते. तिसरा तंबोरा बाईच्या हाती नाजुकपणाने साथ करत

होता. त्या छोट्याशा सभागृहात माईकला खास सुट्टी दिली होती. मृदू मधुर आवाजात षड्ज अवतरला अन् सभागृहात " अ हा हा " आल्हाददायक नाद घुमला. प्रसन्नचित्ताने प्रसन्न मुद्रेने " मारू बिहाग " ची आलापी सुरु झाली. विलंबित एकताल ख्याल सुरू झाला. दोन मध्यमांची वेगळीच करामत यात मनोहारी संथ शांत आलापांनी नटविली गेली. आल्हाददायक चंद्रप्रकाशासारखी. सर्व कलाकारांच्या वतीने मी सरस्वतीबाईना माझ्या भाषणात विनंती केली की, आज अब्दुल करीम खाँसाहेबांच्या काही खास चिजा व पदं आणि हिराबाई बडोदकराच्या खास चिजा लोकप्रिय पदे ऐकण्याची आमची उत्कट इच्छा आहे. आपली गायकी त्यांचे प्रतिनिधित्व करणारी आहे. श्रेष्ठ आहेच. आम्ही एक यादी सादर केली आहे आपणाकडे. त्यापैकी आपल्या इच्छेप्रमाणे आपण ऐकवावे एवढीच विनंती आहे. या विनंतीचा प्रसन्नपणे आदर करून त्यांनी बरीच गीते त्यावेळी सादर केली. गायक-श्रोते मंत्रमुग्ध झाले. तार सप्तकात त्यांचे स्वर नाजुक व सुरेल लागले की अंगावर रोमांच उभे राहिले. " मूर्तिमंत भीति उभी " " उगिच का कांता " " नच सुंदरी करू कोपा " ही मराठी नाट्यपदं गाऊन त्यांनी खाँसाहेबांच्या गायकीची आठवण हुबेहुब उभी केली. किती करूण रसाने ही गीते गावीत याचा जणू पाठच यावेळी दिला. " पियाविन नही आवत चैन " ही ठुमरी सुरेल भावपूर्णतेचा उत्तम आदर्श म्हणून अभिमानानं सांगता येईल अशा रीतीने सादर केली. मध्यंतरानंतर " चंद्रकंस " चा ख्याल खास शैलीत गाऊन आमच्या सूचनांची कदर करून सरस्वतीबाईनी " उपवनी गात कोकिळा " हे लोकप्रिय पद व त्यानंतर " गोपाला मेरी करूणा " हे भक्तिगीत ऐकविलं. गाताना त्यांचे नेत्र अश्रूंनी भरून वाहू लागले. ते पाहून जाणकार श्रोत्यांना अब्दुल करीम खाँची आठवण झाली. तयारीकडे वा तानबाजीकडे त्यांचे फारसे लक्ष नसे. करूण, शांत रस निर्मितीकडे त्यांचे विशेष प्रभुत्त्व जाणवत असे. त्यांचं गाणं शास्त्रशुद्ध असूनही रस परिपोषक होतं. विलंबित लयप्रधान आणि आलाप गेय राग ते उत्तम रीतीनं

आवडीनं गात असत. त्यांच्याइतकी सरस ठुमरी गाणारा गवयांमध्ये तोडीचा कुणी नव्हता. मराठी नाट्यपदं मुसलमान गवयांमध्ये सरस आणि अर्थ समजून गाणारे अब्दुल करीम खाँ आणि मंजी खाँ हे दोघेच गवई होते.

**' भैरवी ' त्यांची सखीच होते :**

'' नाटकांत बालगंधर्वांबरोबर काम करताना त्यांनी शिकविलेली काही नाट्यगीते ऐकवावीत '' ही माझी सूचना मान्य करून सरस्वतीबाईनी आज '' नरवर कृष्णासमान '' आणि '' सत्यवदे वचनाला नाथा '' ही दोन गीतं समरसून गायिली व हिराबाईच्या खास शैलीत गाऊन त्यांची आठवण करून दिली. श्रोत्यांनी पसंतीच्या टाळ्या दिल्या. सरस्वतीबाईच्या गाण्यात सहजता हा महत्त्वाचा गुण आहे. त्यांचं कष्टरहित गाणे ऐकताना श्रोत्यांनाही कष्ट पडत नाहीत. मुरकी, खटका, गमक वगैरेंचा उपयोग, रागाची छाया पसरविण्याकडे त्या चतुराईनं करतात. त्यामुळे त्यांचे गाणे प्रथमपासूनच रंगतं आणि रसिक श्रोते त्या रंगात दंग होतात.

शमशुद्दिन खाँसाहेबांनी गाण्याला अनुरूप अशी साथ केली. विनाकारण फडफडाट नाही, गायकाला अडचणीत टाकणारे आडलयीचे तिढे बोल नाहीत, नाजूक बोटांनी वाजविलेले स्पष्ट अन् मृदू बोल गाण्याची रंगत वाढवित होते. ठुमरीला खुलविणाऱ्या मोहक लग्ग्या गुदगुदल्या करीत होत्या. मजा आली.

सरस्वतीबाईसारख्या स्वरदेवतेपुढे तर भैरवी त्यांची सखी म्हणूनच नांदायला येते. प्राचीन ग्रंथात भैरवी गौरवर्णा, चकितनयना अरूणारूण पदद्वया, प्रभायुक्ता आणि श्वेतवस्त्र परिधान केलेली सौंदर्यवती असा चित्रसंकेत आहे. ही अशी मधुर मोहक कविकल्पना आहे. माझ्या सूचनेचा आदर करून सरस्वतीबाईनी पहाटे चार वाजता '' जगी आभास हा दाविला '' या भैरवीतील नाट्यगीतानं. त्या रात्रीचा संस्मरणीय कार्यक्रम संपन्न केला व सर्व कलाकार श्रोत्यांना विनम्र भावानं, सुहास्य वदनानं प्रमाण केला. प्रदीर्घ टाळ्यांचा प्रतिसाद देऊन सर्वांनी त्याचा आदरपूर्वक स्वीकार केला.

श्रीमती सरस्वतीबाई आज पुण्यातील कलाप्रांतात सन्मानानं जीवन व्यतीत करीत आहेत. सुरांची संगत आजही कायम आहे. त्यांना प्रदीर्घ आयुरारोग्य संपन्नता लाभो, ही माझी परमेश्वरास प्रार्थना.

(रविवार, नवशक्ती १० मे, ९८.)

• • •

# भावप्रधान गायिका निर्मला अरूण

**गेल्या ३०-४० वर्षात हिंदुस्थानमध्ये ठुमरी आणि गझल गाणाऱ्या काही नामवंत गायिका प्रसिद्धीस आल्या. त्यात श्रीमती निर्मला अरुण यांना मानाचं स्थान द्यावं लागेल. त्यांच्या गायकीची वैशिष्ट्ये सांगणारा लेख**

दिलखुलासपणे गाणारी, स्वराला सच्ची, तालाला पक्की, गळ्याची करामत करीत भावनेकडेही विशेष लक्ष देणारी अशी ही गायिका १९६० ते १९७५ या काळात गाण्याच्या मैफिलीत रमलेली, मुंबईच्या रसिकांना संतुष्ट करणारी श्रेष्ठ गायिका होती. असं माझ्याप्रमाणे मान्यवर अनेक समीक्षकांचंही मत आहे. बनारसी ठुमरी व पतियाळा ठुमरी हा हिंदुस्थानी उपशास्त्रीय संगीतातला एक श्रुती मनोहर असा विशेष प्रकार आहे.

"काव्याच्या अर्थानुरुप असे भावमधुर स्वर निर्मलादेवींनी आपल्या दर्दभऱ्या आवाजातून काढले की, ते रसिकांच्या ह्रदयाचा ठाव घेतात, मनाला चटका लावतात" असे अनेक संगीत समीक्षकांनी नमूद केले आहे. ते अनुभवसिद्ध व सार्थ आहे. अशा या कलाकाराच्या घरातच लहानपणापासून स्वरताल खेळत असले पाहिजेत, असा मी अंदाज केला होता तो तंतोतंत खरा ठरला.

वाराणसीचे सुविख्यात तबलावादनकार श्री. वासुदेव प्रसादजी यांची ही सुकन्या. निर्मलादेवींना तीन भाऊ व एक बहिण असून ही सर्वच भावंडं घरातील संस्कारांमुळे व शिक्षणामुळे गायक-वादक होती. या दृष्टीने वासुदेव प्रसादजी हे एक भाग्यवान कलाकार आहेत. कारण 'पिकतं तिथं विकत नाही' या

म्हणीप्रमाणे काही कलाकारांची अपत्यें- नामांकित अपत्यें स्वरतालाची ईश्वरदत्त देणगी व घरातील संस्कार व शिक्षण मिळालेलं असतांही बाहेरच्या संगतीमुळे व पाश्चात्य संगीताच्या नादानं आपल्या घरातल्या परंपरागत कलेकडे दुर्लक्ष करतात, प्रगती करीत नाहीत नंतर पिताजींच्या पश्चात् पश्चाताप करीत बसतात. त्यांना शास्त्रीय संगीतात उच्च स्थान मिळविता न आल्यानं त्रिशंकूसारखी त्यांची अवस्था होऊन ते बदनाम होतात. दुर्दैवी ठरतात. हे एक आजचं सत्य आहे.

निर्मलादवींचा जन्मच मुळी अशा या संगीतमय वातावरणात व संस्कारात झाला. शिवाय ईश्वरानं कृपावंत होऊन सुरेल गोड आवाजाची, उंच स्वरातल्या आवाजाची दिलेली अमोल देणगी, त्याचा विचारपूर्वक सुयोग्य उपयोग करून त्यांनी मेहनत घेतली व आपलं जीवन सार्थकी लावलं.

वयाच्या सातव्या वर्षापासून सोळाव्या वर्षापर्यन्त त्यांना पतियाळा घराण्याच्या अताहा खाँसाहेब आणि अब्दुल रहेमान खाँसाहेब यांच्याकडून अव्याहत शिक्षण मिळालं होतं.

श्रीमान अरुण यांच्याशी विवाहबद्ध झाल्यावर ती दोघे मुंबईत आली आणि या दोघांनीही चित्रपटसृष्टीत प्रवेश केला.

करदार प्रॉडक्शन्स् आणि रणजीत स्टुडिओमध्ये निर्मलादेवींनी अभिनेत्री या नात्यानं संगीत नायिकेच्या भूमिका केल्या. घुंगट, अनमोल रतन, शारदा, कानून, जीवन इत्यादी अनेक चित्रपटातून त्यांनी यशस्वी कामे केली. ती जवळजवळ सतत दहा वर्षे, हे करीत असतांही त्यांनी उपशास्त्रीय संगीताचा रियाझ सोडला नाही हे विशेष, नंतर मात्र अरुण पिक्चर्स या चित्रपट कंपनीमध्ये केवळ संगीत दिग्दर्शक म्हणून त्या जबाबदारी पार पाडीत होत्या.

त्यात फारसं यश न मिळाल्यानं की काय नकळे पण त्या पुन्हा आपल्या मूळच्या शास्त्रीयसंगीत क्षेत्रात आल्या, त्यांनी नियमितपणे मेहनत सुरू केली. त्याचा सुपरिणाम म्हणजे, आकाशवाणीवरून, मैफिलीतून आणि ग्रामोफोन रेकॉर्डस्च्या माध्यमातून त्या एक प्रथितयश गायिका या नात्यानं रसिकमान्य झाल्या.

चेंबूर येथील मी स्थापन केलेल्या 'कलोपासक मंडळ' या म्युझिक सर्कलमध्ये मी त्यांचा कार्यक्रम खान बहादूर इराणी यांच्या बंगल्यात घडवून आणला तो बेहद्द रंगला. त्यावेळी मी एच.एम.व्ही. ग्रामोफोन कंपनीत संगीत नियोजक होतो. मी त्यांना रेकॉर्डिंग कंपनीत बोलावलं. त्या आल्यावर त्यांनी मला अट घातली की ''मला रेकॉर्डिंगसाठी तुमच्याच चालींची गाणी हवीत तर मी गाईन.''

मला ते आव्हान होतं. त्यांच्या गाण्याचा ढंग मी लक्षात घेऊन ''सुनले हमारी बिनती'' हा ''दादरा'' झिंजोटीमध्ये व ''जमुनामे कैसे जाऊं'' हे पहाडीमध्ये मीरा भजन तयार करून मी त्यांना शिकवलं. त्यांना त्या दोन्ही चाली खूप आवडल्या. त्यांनी मनापासून छान गायिल्या त्या रेकॉर्डस् खूप गाजल्या. निर्मलादेवी आणि मीही हिंदी संगीत प्रांतात लोकप्रिय झालो. कार्यक्रमांची रीघ लागली त्यांच्याकडे व माझ्याकडेही.

निर्मलादेवींचे कौतुक प्रथम महाराष्ट्रानं केलं आहे. महाराष्ट्रातील रसिक जनता प्रांतीय भेद न मानता कुणाही गुणीजनांचं खुल्या दिलानं स्वागत करते, बहुमान करते ही त्याची आजपर्यन्तची श्रेष्ठ परंपरा आहे. ही गोष्ट सर्व कलाकारांनी कृतज्ञतेने मान्य केली आहे. महाराष्ट्रात नावलौकिक मिळवल्यावर हिंदुस्थानात सर्वत्र यश प्राप्त होतं ही गोष्ट अनुभवानं सर्वमान्य झाली आहे. निर्मलादेवींनासुद्धा हाच अनुभव आला व तो त्यांनी मजजवळ कृतज्ञतापूर्वक बोलून दाखविला. मुंबई-पुण्यानंतर दिल्ली, अमृतसर, पाटणा, कलकत्ता, इंदूर, लखनौ, अलाहाबाद इ. ठिकाणी संगीतोत्सवातून परिषदांमधून त्यांचे गाण्याचे कार्यक्रम होऊन त्यांना अमाप यशकीर्तीचा लाभ मिळाला व त्यांच्या गानविद्येचा अभ्यास व मेहनत सफळ झाल्याचा श्रेष्ठ आनंद त्यांना लाभला.

निर्मलादेवींचा स्वभाव अत्यंत मनमोकळा निगर्वी व रसीला होता, भावनाप्रधान होता. देवाधर्मावर त्यांची निस्सीम श्रद्धा होती. सामाजिक कर्तव्याची जाणीव सुसंस्कारांमुळे त्यांच्या हृदयात होती. त्यामुळे आपल्या अंगच्या कलागुणांचा उपयोग समाजाला झाला पाहिजे या निष्ठेनं त्यांनी अभिजात संगीताच्या प्रसारासाठी मुंबई उपनगरात ''संगीत मंडळ'' आणि ''संगीत महाविद्यालयही'' सुरू केले होते. त्यांच्या या संस्थामार्फत संगीत परंपरा वाढविण्यात त्यांना बरेच

यशही लाभलं व अन्यत्र विखुरलेले अनेक कलाकार त्यांच्या कार्यात सहभागी झाले, एकत्र एकदिलानं सार्वजनिक कार्य करू लागले. संगीत दुनियेत या संस्कारांमुळे काही काळ परिवर्तन घडून आले होते हेही नसे थोडके हे कार्य सातत्यानं चालू होत, पण वाराणशीमध्ये ७ जून १९२७ रोजी जन्मलेल्या निर्मलादेवींनी १५ जून १९९६ रोजी वयाची ६९ वर्षे पूर्ण करून मुंबईत अचानक सर्वांचा निरोप घेतला. त्यांच्या स्मृतीला माझे सादर अभिवादन.

(रविवार, नवशक्ती ८ फेब्रुवारी ९८.)

• • •

## स्वरगंगा गंगूबाई हनगल

**किराणा घराण्याच्या श्रेष्ठ गायिका श्रीमती गंगूबाई हनगल यांना हिंदुस्थान सरकारच्या संगीत नाटक अकादमीनं जानेवारी १९९८ मध्ये डी.लिट. बहुमानाचा श्रेष्ठ पुरस्कार देवून सन्मानित केलं आहे. तो समारंभ मुंबईत पार पडला त्यावेळी गंगूबाईनी आपली गानकलाही सादर केली हे विशेष-५ मार्च १९१३ रोजी जन्मलेल्या गंगूबाईंना ८५ वर्ष चालू आहे.तरी त्यांचा स्वर स्थिर असून आवाज आणि तयारीही मजबूत आहे. कारण नित्य रियाज चालूच आहे. विद्यादानासाठी गाणंही चालूच आहे व त्यांचं ते निष्ठावंत व्रत आहे हीच गोष्ट सिद्ध होत आहे.**

म्हणूनच ''भारतीय विद्याभवन मुंबई'' या संस्थेनं नुकताच त्यांचा जाहीर सत्कार केला आणि ''कर्नाटक संघ मुंबई'' या संस्थेतर्फे त्यांना ''वरदराज आद्य'' हा पुरस्कार देण्यात आला. ही गोष्ट आम्हा सर्व संगीतकारांना अभिमानास्पद वाटते. यापूर्वीही गंगूबाईंना **त्यांच्या वयाच्या ६२ व्या वर्षी 'पद्मश्री' किताब भारत सरकारने देवून गौरव केल्याचं वृत्त मला एका संगीतज्ञाकडून समजलं आहे.** आयुष्यभर एकनिष्ठेनं संगीताची उपासना व अध्ययन केलेल्या गंगूबाईचं जीवन कृतार्थ झालं असंच कुणीही म्हणेल.

अखिल भारतीय कीर्तीच्या गंगूबाई हनगल ह्या सवाई गंधर्व तथा पंडित रामभाऊ कुंदगोळकर यांच्या शिष्या आहेत. त्यांची सुरेल गायकी आपली प्रतिभा वापरून वाघिणीप्रमाणे आपल्या मैफिली यशस्वी करतात. म्हणून प्रथितयश ज्येष्ठ गायिका म्हणून सर्व रसिक त्यांना मानतात.

हिज मास्टर्स व्हॉइस कंपनीतल्या एका प्रत्यक्ष भेटीत गप्पा मारताना मी उत्सुकतेनं त्यांची जीवनयात्रा समजून घेतली ती इथे नमूद करणं योग्यच ठरेल.

गंगूबाईना गाण्याची आवड आणि स्फूर्ती यांचा वारसा आपल्या मातोश्री अंबाबाईकडून मिळाला. त्या कर्नाटक संगीत उत्तम गात असत. तरी पण त्यांना मनापासून आवड होती ती हिंदुस्थानी संगीताची आणि म्हणून गंगूला वयाच्या तेराव्या वर्षापासून शास्त्रीय संगीत शिकविण्याची व्यवस्था त्यांनी काळजीपूर्वक केली. हुबळीचे हलगुरु कुष्ठाचारी यांच्याकडे संगीताचं प्राथमिक शिक्षण पद्धतशीर सुरू झालं. पण ते एक-दीड वर्षानंतर बंद पडलं. म्हणून बेचैन झालेल्या मातोश्रींनी सवाई गंधर्वांचे परमस्नेही श्री. दत्तोपंत देसाई यांच्याकडून शब्द टाकला व तो गंगूचं गाणं ऐकून सवाई गंधर्वांनी आनंदानं मान्य केला. **पण त्यावेळी सवाई गंधर्व मराठी नाटक कंपनीत गायक नट म्हणून भूमिका करीत होते,** ते वर्ष-सहा महिन्यानी कधीतरी हुबळीला येत त्यावेळी मात्र गंगूला मनापासून शिकवीत असत. जे शिक्षण दिलं जाई त्याची मेहनत करून घेण्याचं काम दत्तोपंत देसाई आणि गंगूचे मामा रामण्णा तळमळीनं करीत. त्यामुळे प्रगती चालू होती.

## गंगूचं भाग्य उदयाला आलं

१९३७ साली नाटक कंपनी सोडून सवाई गंधर्व कुंदगोळला स्थिर झाले आणि नंतर मात्र रोज नियमितपणे तीन-तीन तास त्यांच्या घरीच तिला शिक्षण मिळू लागलं. वाढत्या वयाबरोबर आणि शिक्षणाबरोबर गाण्याची दृष्टी, समज निर्माण झाली व नियमितपणे केलेली मेहनत सफल झाली.

सवाई गंधर्वांचे गुरु खाँसाहेब अब्दुल करीम यांचे गाण्याचे जलसे धारवाडला खूपच होत असत. किराणा घराण्याची सुरेल आलापप्रधान गायकी खाँसाहेबांकडून आणि सवाई गंधर्वांकडून तिला भरपूर ऐकायला मिळत असे. त्यामुळे ते संस्कार गंगूबाईच्या गाण्यावर स्पष्ट दिसू लागले आणि त्या गुरुच्या प्रोत्साहनामुळे हळूहळू मैफिली यशस्वी करू लागली. मातोश्री अंबाबाईना खूप आनंद होई. पण त्या अल्पसंतुष्ट नव्हत्या. आपल्या मुलीनं मिळत असलेली विद्या आपल्या बुद्धिमत्तेनं

आणि अविश्रांत मेहनतीनं वाढवून श्रेष्ठ गायिका व्हावं म्हणून तिला प्रोत्साहन देऊन पण कडक शिस्तीनं वागवीत. त्याचा उपयोग तिला-गंगूला प्रगतीसाठी व यशासाठी लवकर झाला.

**तपस्या फळाला आली**

योगायोगानं गंगूबाई एकदम प्रकाशझोतात आल्या त्या अशा. गोरेगांव इथे एच. एम. व्ही. ग्रामोफोन कंपनीचं गॅदरिंग होतं त्यात लोकप्रिय सौंदर्यशालिनी गायिका मेनकाबाई शिरोडकर यांचं गाणं ठेवलं होतं. रात्री १० ते २ वाजेपर्यंन्त त्यांचं रंगेल गाणं झालं. पण गाणं संपल्यावर गोरेगांवहून मुंबईला जायला पहाटेशिवाय रेल्वेगाड्या नव्हत्या. तेव्हा रसिक श्रोत्यांनी गंगूबाईना गाण्याविषयी खूप आग्रह केला. तो मान्य करून गंगूबाईनी मिया मल्हारचा ख्याल आणि जोगियातील मस्त ठुमरी जोशपूर्ण गाऊन मैफिल रंगविली. ते गाणं श्रोत्यांना अतिशय आवडलं आणि तेव्हापासून मुंबईतल्या वेगवेगळ्या म्युझिक सर्कल्समधून एकसारखी लागोपाठ कार्यक्रमाची बोलावणी येऊ लागली. **मुंबई रेडिओवर गाण्याची प्रथम संधी ही गंगूबाईना योगायोगानंच अचानक लाभली.**

हिराबाई बडोदेकर यांचा कार्यक्रम काही कारणानं मुंबई रेडिओवर ठरलेला असतानाही अपरिहार्य कारणामुळे ऐनवेळी रहित झाला. तो कार्यक्रम गंगूबाईना मिळाला अन् तो कमालीचा यशदायी ठरला व बाईचं नांव सर्वतोमुखी झालं आणि गंगूबाईना रेडिओवर वारंवार कार्यक्रम मिळू लागले. ते यशस्वी ठरल्यामुळे त्या लोकप्रिय गायिका झाल्या.

**यशस्वी घोडदौड**

**१९३८ साली म्हणजे वयाच्या अवघ्या २५ व्या वर्षी गंगूबाईना दिल्ली रेडिओवर गाण्याची संधी मिळाली.** त्यामुळे त्या प्रांतातही लागोपाठ कार्यक्रम मिळाले व त्यांच्या कीर्तीमध्ये भर पडली. बाईचे गाणं ते कार्यक्रम फलदायी ठरले, लोकप्रिय झाले. १९४३ साली गया येथील संगीत संमेलनात गाणारी स्त्री म्हणून फक्त गंगूबाई हनगलंच होत्या. त्या संमेलनात त्यांना फक्त पंधरा मिनिटंच गायला वेळ दिला. ती एक सामान्य गायिका समजून. पण तो कार्यक्रम रसिकमान्य ठरला. वसंत रागातील ''पिया संग खेले होरी'' ही ढंगदार चिज गंगूबाईनी दमदारपणे अन् तयारीनं गाऊन श्रोत्यांना चकित केले. तिथे

बिस्मिल्ला खाँसाहेबांनी तर गंगूबाईना आशीर्वाद देऊन तारीफ केली. "बेहेन, पंधरा मिनिटमें भी रंग जमा सकती हो, बहोत ही अच्छा गाया" या छोट्याश्या कार्यक्रमामुळे ही बाईची त्या प्रांतात कीर्ती पसरली.

एका रात्री गंगूबाईचा कार्यक्रम एका म्युझिक सर्कलतर्फे गिरगावांत वागळे हॉलमध्ये होता. तो ऐकण्यासाठी जी. एन. जोशींसह मी खास निमंत्रणामुळे उपस्थित होतो. सभागृह रात्री साडेआठ वाजताच गच्च भरलं होतं. रात्री नऊनंतर कार्यक्रम सुरू झाला. सुरेल तंबोऱ्याच्या मधुर नादानं सभागृह स्तब्ध झालेलं. तबल्यावर प्रसिद्ध तबलापटू कामूराव मंगेशकर यांनी नाजुक हातानं "तिरकिड धिं" मुखडा वाजवून "मोहेमनावन आये हो" या बागेश्री एकताल ख्यालाची सम पकडली अन् जाणकार श्रोत्यांची खास 'वाहवा' घेतली. तार षड्जावर ख्यालाचा प्रारंभ झाला आणि पूर्ण बंदिश पेश करून संथ आलापी सुरु झाली. आवाज निकोप जवारदार लागला होता. दमदार संथ आलापांनी बागेश्रीच्या उपवनात त्यांनी श्रोत्यांना फिरवून आणलं. लयकारीच्या बोल आलापांनी श्रोते लयीत डोलत होते. डौलदार आलापानी सवाई गंधर्वांची आठवण काही जाणकारांना जाणवत होती. अचानक पावसाची सर यावी त्याप्रमाणं जोरदार तानांचा वर्षाव सुरु झाला. श्रोते चिंब झाले, सुखावले. एकतालातील द्रुत चीज व एक तराणा गायिल्यावर बागेश्री आवडल्याची पावती श्रोत्यांनी टाळ्यांच्या प्रचंड गजरानं दिली. गंगूबाई नतमस्तक झाल्या, सुखावल्या. खाँसाहेब अब्दुल करीम यांच्या रेकॉर्डची व सवाई गंधर्वांच्या मैफिलींची आठवण आल्यामुळे फर्माइश केली गेली. "उगीच का कांता गांजिता" या कीर्वाणी रागातील मराठी नाट्यगीताची. बाईनी मान्य करून ते पद सुरु केले. अंतऱ्याचे बोल "व्यापुनिया सारी धरणी" या चरणातून वेगवेगळ्या स्वरपंक्तींनी शब्द फुलत होते. या मराठी पदात खाँसाहेबांनी 'सरगम' नं मधुर आलापी केली आहे. तोच प्रकार बाईनीही आज केला. पण अर्थ आणि स्वर एकजीव झाल्यानं तो प्रकार विसंगत वाटला नाही. वैगुण्यही वाटलं नाही. प्रत्येक आलापात सवाई गंधर्वांची आठवण येत होती. हीच ती गुरुनिष्ठा व गुरुकृपा. श्रोत्यांचीही कृपा. श्रोते संतुष्ट झाले की कलावंताला अत्यानंद होतो. आम्हीही हर्षोल्हासित झालो होतो.

सवाई गंधर्वानी लोकप्रिय केलेले गोविंदराव टेंबे यांचं पद ''रामरंगी रंगले मन'' श्रोत्यांनी सुचविलं आणि तेही गंगूबाईनी समर्थपणे रंगवून विविध प्रकारांनी फुलवलं. त्यात भक्तिभावही व्यक्त होत होता. श्रोतेही रंगले. एकामागून एक अमृताचे घट मिळाले तरी कुठेतरी थोडा वेळ थांबावसं वाटतंच. तीन तासानंतर मध्यंतर झाला.

गंगूबाईच्या जोरकस गायकीतून ऐकायला योग्य असा मर्दानी राग 'शंकरा' एकानं सुचविला म्हणून 'सो जानू रे जानू' हा विलंबित एकताल ख्याल आणि 'आई रे कर्करा' ही द्रुत चीज गायिली. तर त्यांनी रेखीव भिंगरीसारख्या ताना सादर करून आपल्या तयारीनं फिरणाऱ्या गळ्याची करामत दाखविली. शंकराच्या उत्तरांग प्रधान अंगाला उंच आणि स्वच्छ आवाज उत्तम साथ देत होता. ख्यालाला रंग भरला. श्रोते समजदार होते. त्यामुळे 'वाहवा' अस्थानी होत नव्हती. वेगवान प्रबळ तानांचा अविस्मरणीय असा हा जलसा म्हणावा लागेल. नंतर श्रोत्यांना समजणारे प्रचलित राग 'जयजयवंती' व 'मालकंस' गाऊन झाल्यावर 'किती किती सांगू तुला' हे सवाई गंधर्वाचं आवडतं नाट्यगीत विविधतेनं नटवून त्यांनी श्रोत्यांना बेहद्द खूष केले. शेवटी दीपचंदीमधील भैरवी ठुमरीनं त्यांनी रसिली मैफिल टाळ्यांच्या गजरात पहाटे साडेतीन वाजता संपविली. अशा अनेक रात्री गेल्या पण संगीताची धुंदी कायम रहाते. प्रतिभासंपन्न गायन कलेमुळे पुनःप्रत्ययाचा आनंद हा आपल्या हिंदुस्थानी संगीताचा खास विशेष गुण आहे ही गोष्ट श्रीमती गंगूबाईसारख्या अनेक श्रेष्ठ गायकांनी सिद्ध केली आहे.

एकामागून एक यशोमंदिराच्या पायऱ्या चढत चढत गंगूबाई प्रथितयश श्रेष्ठ व ज्येष्ठ गायिका म्हणून सुविख्यात आहेतच पण त्यांची कन्या कृष्णा हनगल ही मंजुळ आवाजाची बांसरी मातेचा वारसा चालविणारी उत्कृष्ट गायिका आहे ती जरी गुरु म्हणून आईच्या मागे तंबोऱ्यावर गायनाची साथसंगत करीत असली तरी ती स्वतंत्र कार्यक्रम यशस्वी करणारी गायिका आहे यात शंका नाही. तिची गानतपस्या आजही गुरुपाशी सतत चालूच आहे. ही संगीतावरील व गुरुवरील तिची निष्ठा सफल होण्यासाठी तिलाही यश कीर्ती भविष्यात लवकर लाभो ही माझी हार्दिक शुभकामना.

**गुरुशी एकनिष्ठपणा अवश्य :**

हिंदुस्थानी संगीताविषयी पद्मश्री गंगूबाई हनगल यांचे तळमळीचे विचार चिंतनीय आहेत. त्या म्हणतात, ''गुरु ही संगीत क्षेत्रातली फार मोठी शक्ती आहे. गुरुमुखाशिवाय गानविद्या येणार नाही. नुसत्या श्रवणानं आणि अंधानुकरणानं पोपट तयार होतील ती खरी संगीत शास्त्र वा विद्या नव्हेच. शिष्यानं गुरुंच्या परवानगीशिवाय बाहेर गाऊ नये. गुरुकृपेशिवाय विद्या सफल होणार नाही आणि गुरुंचा अनादर करण्यानं, कृतघ्न होण्यानं विनाश होणारच. अनेक गुरु करून बाजारी वृत्तीनं वागून बुद्धी आणि गळा दोन्ही भ्रष्ट होतात. म्हणून एकनिष्ठा असणं अवश्य आहेच. नव्या पिढीनं शास्त्रीय संगीताची भरपूर तपश्चर्या केली पाहिजे. '' मी सहा वर्षे शिकलो, मला रेडिओवर, टीव्हीवर आणि मैफिलीत गायला मिळालं पाहिजे '' ही उतावीळ वृत्ती योग्य नव्हे. खूप शिकून मेहनत केली पाहिजे. प्रत्येक रागाचं क्षेत्र इतकं व्यापक आहे, ते गाऊन अजूनही आमचं समाधान होत नाही, म्हणून अनावट राग, जोडराग यांच्यामागे लागावं अशी आमची इच्छाही होत नाही.'' हे विचार सर्वांना अंतर्मुख करणारे आहेत.

लोकांनी त्यांच्या गाण्यावर मनापासून प्रेम केलं आहे करीत आहेत त्यांची योग्यता व ज्येष्ठता लक्षात घेऊन पूर्वी भारत सरकारने व आता संगीत नाटक अकादमीनं त्यांना डी. लिट. पदवी देऊन श्रेष्ठ गौरव केला आहे ही गोष्ट हिंदुस्थानी संगीताला भूषणावह आहे यात संशय नाही. परमेश्वरानं त्यांना शतायु करावं ही हार्दिक शुभकामना.

(रविवार, नवशक्ती २५ मार्च ९८.)

• • •

## स्वर-माणिक : माणिक वर्मा

**१६ मे १९२६ रोजी जन्माला आलेलं माणिक नावाचं संगीतरत्न ९ नोव्हेंबर १९९६ रोजी पंचत्त्वात विलिन झालं. त्यांच्या प्रसन्न गायकीचा आणि निगर्वी, सौजन्यशील व्यक्तिमत्त्वाचा हा परिचय**

गायक कलाकारांचा स्वभाव त्याच्या गाण्यांतही आपोआप व्यक्त होत असतो " हा माझा अनुभवसिद्ध असा सिद्धांत आहे व तो सर्वमान्य आहे असं मला वाटतं. आक्रमक व आदळ आपट करून गाणारी माणसं ही ताठर व रागीट असतात या उलट संगीत दुनियेत अमाप लौकिक-यश मिळवूनही गर्व न करता, बेपर्वाईने, ताठ्यान न वागता दिलखुलास प्रामाणिकपणे संगीत व्यवसाय करणारी कलाकार माणसं आपली मैफिल प्रसन्नपणे गाऊन रसिकांना आनंद देतात व आनंद घेतात." या विधानासाठी नांवं डोळ्यासमोर चटकन येतात ती गुरुवर्य मास्तर कृष्णराव पुलंब्रीकर व सौ. माणिक वर्मा यांची.

लोकप्रिय सुविद्य गायिका सौ. माणिक वर्मा (पूर्वाश्रमीच्या माणिक दादरकर) यांचा स्वभाव निगर्वी, मनमोकळा, प्रसन्न असल्यामुळेच त्यांची मैफिल नेहमी प्रसन्न असायची. त्यांच्या मधुर आवाजातील दर्द श्रोत्यांची मनं भिजवून टाकत असे, किंचित रुंद गोल आवाजानं रंगीबेरंगी रांगोळी घालीत रागाची मांडणी कलात्मक सजलेली असे. मैफिलीशी त्या चटकन समरस होऊन जात व श्रोतेही तन्मय होत असत.

स्वर-ताल-लय यांची समज उपजतच असली तरच संगीतात प्राविण्य मिळवणं सुलभ होत. याचाच अर्थ घरातल्या परंपरागत संस्कारामुळेच ती समज हृदयांत रूजते याचा प्रत्यय बहुतेक कलाकारांच्या मुलांमध्ये साहजिकच दिसतो व व्यासंगानं ती समज फुलत राहते.

## मातोश्रींचे संस्कार

माणिक वर्मा यांच्या मातोश्री हिराबाई दादरकर ह्या गायिका असल्यामुळे लहान माणिकच्या अंगात लय, ताल, स्वर उपजत आला तर आश्चर्य ते काय?

श्रीमती हिराबाईचं संगीत शिक्षण गुलाम रसूल खाँ, हैद्राबादचे बशीर खाँ, बागल कोटकरबुवा यांच्याकडे व नंतर गायनाचार्य भास्करबुवांचे शिष्य पंडित बापूराव केतकर ह्यासारख्या श्रेष्ठ गवैय्याकडे झाल्यामुळे त्याही उत्तम गात असत, पण त्यावेळच्या कालमानामुळे त्यांना भव्य यश मिळालं नाही. पण आपल्या माणिकनं श्रेष्ठ गायिका व्हावं व सर्वांग परिपूर्ण यशस्वी गायिका म्हणून लौकिक मिळवावा अशी त्यांची तळमळ होती म्हणून तिला पंडित बापूराव केतकरांची तालीम सुरू करून त्या स्वतः तिच्याकडून रियाझ करवून घेत. मातोश्रीची महत्वाकांक्षा सफल करण्यासाठी माणिकनंही अपार कष्ट घेतले मनापासून. गाण्याबरोबर विश्वविद्यालयीन शिक्षणही चालूच होते. पद्धतशीर शिक्षण व मेहनत यामुळे माणिकबाईच्या मैफली यशस्वी होऊन अल्पवयातच कीर्ती मिळत गेली व त्यांचा जाहीर कार्यक्रम सुरतेला पं. ओंकारनाथ ठाकूर यांनी स्थापन केलेल्या म्युझिक सर्कलमध्ये झाला तो जाणकारांनी वाखाणला. ओंकारनाथांनी मुक्त कंठानं तिची स्तुति केली व सन्मान केला आणि त्यांनी कलकत्त्याच्या मैफिलीत माणिकबाईची वर्णी लावली. त्यावेळी माणिकबाईचं वय अवघं १९ वर्षाचं होत.

तिथे मोठमोठ्या गवय्यांसमोर ही मुलगी कशी गाईल याची चालकांना धास्ती वाटत होती पण पं. बापूराव केतकरांनी पक्का करून घेतलेला राग पूरिया ख्याल तिनं आत्मविश्वासानं सादर करून ठुमरी, दादराही ऐकविला. अशारीतीनं साऱ्यांना थक्क करून माणिकबाईंनी मैफिल जिंकली व पुढच्या यशाची मुहूर्तमेढ रोविली गेली. यश कीर्ती आपणहून मागे आली आणि मैफिली एकामागून एक सुरू झाल्या व साऱ्या लोकप्रिय होऊ लागल्या.

पं. ओंकारनाथ ठाकूरांनी बापूराव केतकरांना पुण्यात पत्र पाठवून त्यांचं हार्दिक अभिनंदन केल्यामुळे आपल्या शिष्येच्या थोर यशानं त्यांना अपरिमित आनंद झाला असल्यास नवल ते काय? पण यानंतर मात्र बापूराव केतकर यांना कराचीचे

श्रीमान शेठ लक्ष्मीचंद ईश्वरदास यांच्या खास आग्रही निमंत्रणावरून कराचीला रहायला जावं लागल्यामुळे माणिकबाईंचं शिक्षण हिराबाई बडोदेकरांचे बंधू सुरेशबाबू माने यांच्याकडे सुरू झालं. ते अनेक वर्षे सातत्यानं लाभलं त्यामुळे गाणे व यश अव्याहत प्रगत होत राहिलं, बहरत राहिलं.

महाराष्ट्रातल्या घराघरांत माणिक वर्मा हे नाव लोकप्रिय आहे ते सुगम संगीतामुळे त्यांनी अनेक भावगीतं, भजनें आणि नाट्यगीतं व गौळणी हे सर्व प्रकार सामान्य जनांसाठी ध्वनिमुद्रिकांद्वारे सादर केले.

त्या विश्वविद्यालयाच्या पदवीधर असल्यानं कोणत्या प्रकाराचं गीत चटकन् लोकप्रिय होईल हे त्यांना चांगलं समजायचं. त्या केवळ हलकी फुलकी गाणीच गात राहिल्या नाहीत तर शास्त्रीय संगीताचा सतत अभ्यास व रियाझ त्या अनेक वर्षे करीतच होत्या. नाट्यगीतं शिकतांना त्यातील प्रसंगाच्या, भावनेचाही त्या जाणीवपूर्वक अभ्यास करीत. केवळ तानबाजी करून भरपूर गायलं की नाट्यसंगीत आलं हा अन्य गायकांमधील दोष त्यांनी कधीच स्वीकारला नाही. वेगवेगळ्या गायकीचे ढंग त्यांनी अभ्यासले. स्वच्छ दाणेदार तानेचा लाभ बापूराव केतकरांच्या तानपलटे शिक्षणपद्धतीमुळे, स्वरांतली सौंदर्यदृष्टी पं. सुरेशबापू माने यांच्यामुळे आणि शब्दांतील अर्थ, भाव व्यक्त करून लयकारीनं गाणं हा गुण पं. जगन्नाथबुवा पुरोहित यांच्याकडे प्रौढपणी मिळालेल्या शिक्षणामुळे माणिकबाईंचं शास्त्रीय संगीत सर्वांग परिपूर्ण बनलं आणि बनारसचे पं. भोलानाथ भट्ट यांच्याकडे ठुमरी गायनाची खास तालीम घेऊन ठुमरी गायनांतही त्यांनी श्रेष्ठ स्थान मिळवलं हे विशेष. याबाबतीत एक आठवण सांगणं औचित्यपूर्ण ठरेल.

मी हिज् मास्टर्स व्हॉइस्मध्ये संगीत नियोजक असतांना (अंदाजे १९४८ मध्ये) एका बनारसी ठुमरी गायकाचं रेकॉर्डिंग करीत होतो. दुपारी मध्यंतरात माणिकबाई माझ्याकडे काही कामासाठी एच्. एम्. व्ही. मध्ये आल्या मी त्या गानपंडिताचा परिचय करून दिला व माणिकबाईंना मी म्हटले " यांचं ठुमरी गायन आता रेकॉर्डिंग करतांना ऐकायला मिळेलच तुम्हाला पण तुमची ठुमरीची झलक त्यांना ऐकवाल तर बरं होईल "

बाईंनी विनम्रपणे " मी त्यांच्यापुढे काय ठुमरी गाणार? " पण मी आग्रह केल्यावर " मोरे नैन लागे " ही पिलू ठुमरी अशा काही ' रसिले पणान ' पंजाबी ढंगात सहजपणे पेश केली की, तो ठुमरी बहादूर सर्दच झाला. त्या स्टुडिओतल्या सर्व कलाकारांनी टाळ्या वाजवून माणिकबाईंचं अभिनंदन केलं त्यांत तो ठुमरी गायकही सामील झाला आणि " वाहवा, बहोत अच्छा " म्हणाला, " आम्ही मराठी माणसं ठुमरी तुमच्यापेक्षांही सवाई गातो. त्यांत नुसती गळ्याची नजाकत नाही, बुद्धिमत्ताही असते " हेच जणू त्यावेळी माणिकबाईंनी सिद्ध केलं. मला फार अभिमान वाटतो त्या क्षणाचा.

## गुरुजनांविषयी कृतज्ञता

संगीत दुनियेत अमाप यश, धन, कीर्ति मिळवूनही प्रामाणिकपणे व्यवसाय करणाऱ्या माणिकबाई आपल्या गुरुजनांविषयी मनी 'कृतज्ञता' सतत बाळगणाऱ्या होत्या हा माझा अनुभव या ठिकाणी नमूद करतो.

ज्यांच्या प्रेरणेने मी चेंबूरला 'श्रीराम संगीत विद्यालय' स्थापन केलं त्या संस्थेतर्फे प्रतिवर्षी रसिकांना विनामूल्य प्रवेश देऊन संगीत महोत्सव साजरा केला जात असे. १९६७ साली गुरुवर्य पं. बापूराव केतकर या माझ्या (व माणिकबाईंच्याही) गुरूंच्या पुण्यतिथीनिमित्त संगीत महोत्सवात मी श्रीमती माणिकबाईंना गाण्यासाठी बोलावलं तो दिवस होता शनिवार, २ डिसेंबर १९६७.

रविवारी सकाळच्या गाडीने त्यांना बाहेरगांवी कार्यक्रमासाठी जायचं होतं. मला नकार देणं त्यांना पटेना म्हणून त्यांनी मला उपाय सांगितला " मला या कार्यक्रमांत मध्यंतरानंतर गायला न बसवता प्रारंभीच रात्री ९ वाजता वेळ द्या. दोन तास गाऊन मी लवकर घरी जाईन. म्हणजे विश्रांती घेऊन दुसरे दिवशी सकाळी गाडी पकडेन " मी ते मान्य केलं त्याप्रमाणे त्या रात्री वेळेपूर्वी हजर राहून त्यांनी गुरुवर्यांच्या प्रतिमेची पूजा केली आणि "पूरिया" ख्याल नंतर एक ठुमरी व बापूरावांचं आवडते नाट्यगीत " तारिणी नव वसन धारिणी " गाऊन आपली गानसेवा प्रसन्नपणे सादर केली. बालविकास संघाचे भव्य सभागृह रसिकांनी तुडुंब

भरलं होतं. पं. जगन्नाथबुवा पुरोहित हे समारंभाध्यक्ष होते. चॅरिटी कमिशनर चंद्रकांत गोडसे हे रसिकाग्रणी प्रमुख पाहुणे होते. माणिकबाईंचा हा कार्यक्रम चेंबूर रसिकजनांच्या अजून स्मरणात आहे, इतका तो मस्त रंगला.

## माणिकबाईंचा पुनर्जन्म

१९७३ मध्ये माणिकबाई भयंकर आजारी झाल्या. दादरच्या "शुश्रूषा" हॉस्पिटलमध्ये त्यांच्यावर काळजीपूर्वक उपचार चालू होते. त्या कित्येक दिवस बेशुद्धच होत्या. सर्व कलाकार मंडळी आम्ही तिथे जात येत होतो. पूर्ण आशा बाळगून परमेश्वराला सारे प्रार्थना करीत होतो. दयाळू परमेश्वरानं त्यांना वाचवलं आमची प्रार्थना व उपचार सफल झाले सर्वत्र आनंद पसरला. पूर्ववत् शक्ती यायला व गाता यायला कांही वर्षे लागली. पण रियाज करून बाईंनी आवाज आपल्या ताब्यात आणून केवळ जिद्दीनं व संगीतावरील निष्ठेच्या बळावर त्यांनी पुन्हा कार्यक्रम सुरू केले. व ते यशस्वी झाले.

त्या आनंदाप्रित्यर्थ १९७६ च्या आमच्या विद्यालयाच्या संगीत महोत्सवात माणिकबाईंचा शनिवारी २१ ऑगस्ट रात्री, सभापती श्रीमान वि. स. पागे यांच्या शुभहस्ते मी शाल श्रीफळ देऊन हार्दिक सत्कार केला. त्या सत्कारामागील माझ्या भावना लक्षात घेऊन माणिकताईंनी आपल्या भाषणांतून समाधान व्यक्त केलं. त्यावेळी त्यांना गहिवरून आलं, ते अजून जाणवतं.

त्यादिवशीचे गायक कलाकार होते सौ. आशा खाडीलकर (माणिक वर्माच्या शिष्या) व अविनाश आगाशे (पं. भार्गवराव आचरेकरांचे शिष्य) आणि पं. गोविंद पटवर्धन (हार्मोनियम सोलो).

## सौजन्यशील गान पंडिता माणिक वर्मा

आजच्या या सत्कारप्रसंगी मी माणिकबाईंचं गाणं ठेवलं नव्हतं. पण गुरु भगिनी माणिकताईंनी श्रोत्यांच्या भावना लक्षांत घेऊन आपल्या गोड गाण्याची हजेरी लावून सत्काराला उत्तर दिलं, हे त्यांचं सौजन्य.

१६ मे १९२६ रोजी हे '' माणिक रत्न '' जन्माला आलं आणि ९ नोव्हेंबर १९९६ रोजी ऐन दिवाळींचे प्रारंभी पहाटे संगीत दुनियेला अकल्पितपणे सोडून लुप्त झालं, सर्व कलाकार बंधू शोकमग्न झाले. तंबोरे नादबंद झाले.

माझी कृतज्ञतापूर्वक ही श्रद्धांजली.

(रविवार, नवशक्ती १२ जुलै ९८.)

• • •

# गानपंडिता कमलताई तांबे

आज दिनांक ३ मे १९९८ तीन वर्षापूर्वी म्हणजे ३ मे ९५ रोजी जयपूर घराण्याच्या बुजूर्ग गायिका गान पंडिता कमल तांबे ह्या स्वर्गवासी झाल्या. निगर्वी, शांत, विद्वान व विद्यादान करणाऱ्या थोर नायिकेला आपण मुकलो. त्यांच्या पवित्र स्मृतीला माझे सादर विनम्र प्रणाम. महाराष्ट्र सरकारने जाहीर केलेल्या या महिला वर्षानिमित्त जानेवारी ९८ पासून मी प्रत्येक थोर गायिकेला स्मृतिलेखाद्वारे विनम्र अभिवादन करीत आहे, हे रसिकजन जाणतात.

## आज कमलाताईंची पुण्यतिथी

ज्येष्ठ आणि श्रेष्ठ गायिका गानतपस्विनी मोगूबाई कुर्डीकर यांच्या शिष्यांपैकी पट्टशिष्या कमलताई तांबे विख्यात गायिका होत्या. प्रामाणिकपणे संगीत व्यवसाय करून त्यांनी आयुष्यभर विद्यादानाचं पवित्र कार्य सातत्यानं केलं. अनेक दुखण्यांशी झुंज देत त्यांची संगीतसाधना अखंड चालूच होती. मेंदूचं भयंकर दुखणं मागे लागलं तरी त्यांच्या मेंदूत घर करून राहिलेल्या गानविद्येनं त्यांना सोडलं नाही, याचा त्यांना केवढा अपरिमित आनंद होत होता. गानविद्येवर अपार प्रेम, अढळ निष्ठा हेच त्याचं मुख्य कारण होय.

खडतर तपश्चर्या करून, प्रचंड कष्ट मेहनत करून त्यांनी संगीतविद्या आपले पूज्य पिताश्री, श्रेष्ठ संगीतकार ना. द. तांबे यांच्याकडे आणि मोहनराव पालेकरांकडे त्यांनी प्राप्त करून घेतली आणि त्यांच्याच आदेशानुसार पूज्य

मोगूबाईकडे नंतर अनेक वर्षे अध्ययन केलं ते अढळ-श्रद्धेनं. त्यांच्याकडील अफाट विद्याधनाचा विचार केला तर त्यांना 'संगीत कलानिधी' म्हणावं लागेल आणि यासाठी 'गानपंडिता' हीच बिरुदावली योग्य ठरेल. रागमांडणीची जयपुरी शिस्त, तान पलट्यांचं मनोहारी नक्षीकाम, बंदिशीचं महत्त्व याबाबतीत त्यांचा विशेष कटाक्ष असे. त्यांतील कलात्मक सौंदर्य बिघडलेलं त्यांना खपत नसे.

## अखंड संगीत साधना

प्रकृति अस्वास्थ्य नेहमीच असायचं तरीही त्या मुंबईत असेपर्यंत विद्यादानाचं व्रत अखंड चालूच असायचं. सकाळी ७ पासून सायंकाळी ८ पर्यंत तंबोऱ्यांचा सुस्वर झणत्कार कधी बंद नसे. दुपारी १२ ते ३ पर्यंत तरी त्यांना विश्रांती मिळावी म्हणून सर्व विद्यार्थ्यांनीच जाणीवपूर्वक आपसात निर्णय घेतला तिथे न जाण्याचा. तरीपण त्यांची नादब्रह्मात समाधी लागलेली असायची त्यातच त्यांना आनंद आणि समाधान मिळत असे.

## उदार दातृत्व गुण

आपली विद्या आपल्याबरोबर गेली अन् वाया गेली असं होऊ नये म्हणून शिष्यांना त्या मुक्तहस्तानं विद्या देत होत्याच, पण सगळे राग आणि ख्याल त्यांनी स्वतःचे घरी साथीदारांसह गाऊन व्यवस्थित रेकॉर्डिंग केले आणि ते सर्व अ. भा. गांधर्व महाविद्यालयाच्या रेकॉर्डिंग लायब्रीला दान केले, सर्वांच्या उपयोगासाठी. हा दातृत्वाचा गुण पूर्वीच्या कोठीवाल्या गवयांजवळ असता तर त्या विद्येचा कित्येक गवयांना अभ्यासासाठी उपयोग झाला असता, पण विद्या चोरून ठेवायची वृत्ती जास्तच. त्यामुळे ते विद्या-भांडार त्यांच्याबरोबर गेलं अन् वाया गेलं. म्हणून आजच्या सुसंस्कृत गवयांनी कमल तांबेंचा आदर्शगुण स्वीकारावा यानच हिंदुस्थानी संगीताचं भवितव्य उज्ज्वल होईल.

## आकाशवाणीचा पक्षपात

कमल तांबे आकाशवाणीवर ३५–४० वर्षे गात होत्या. त्यांचा चाहतावर्ग खूप मोठा आहे. त्यांची श्रेष्ठता व ज्येष्ठता विचारार्ह आहे ह्याची जाणीव त्या तज्ज्ञ (?) अधिकाऱ्यांना नव्हती का? पण . . . भूपनट, नायकी कानडा,

तज्ज्ञ (?) अधिकाऱ्यांना नव्हती का? पण . . . भूपनट, नायकी कानडा, यमनी बिलावल असे कित्तीतरी अनवट राग कमलताईंनी रेडियोवर गायिलेले ध्वनिमुद्रण केलेले आहेत, पण आज त्यापैकी एकाही रागाचं ध्वनिमुद्रण आकाशवाणीनं जतन करून ठेवलेलं नाही. म्हणून आता पुन्हा कधीच ऐकायला मिळणार नाही, हे रसिकांचं दुर्दैवच होय.

## गानपंडितेचे पांडित्य दर्शन

गानकलेची निष्ठेनं सातत्यानं उपासना करणाऱ्या श्रीमती कमल तांबे यांची पांडित्यपूर्ण श्रवणीय मैफिल ऐकण्याचा सुयोग रविवार, दिनांक १२ एप्रिल १९८० सायंकाळी रुईया कॉलेजचे संगीतज्ज्ञ प्रिन्सिपॉल श्री. कृ. ना. वळसंगकर यांच्या संयोजनामुळे (कॉलेजच्याच कक्षेत) मला लाभला व तो संस्मरणीय ठरला.

तालस्वरांचे उपजत गुण अनुवंशिकतेनं व विशेषतः घरांतील संगीतमय वातावरणामुळे ते संस्कार उत्तमरीतीनं विकास पावतात, हाच अनुभव अनेक थोर कलाकारांच्या बाबतीत येतो. तोच सिद्धांत गानतपस्वी पुण्याचे तांबेशास्त्री यांची सुकन्या कमलताई यांच्याही बाबतीत लागू होतो, असं म्हटलं तर ते भूषणावह ठरेल यात संशय नाही. कारण लयीचा, तालाचा आणि स्वरांचा पक्केपणा आणि सूक्ष्मसमज त्यांच्या गायनांतून नेहमी व्यक्त होत असे. अन् त्यामुळे त्यांची गानतपस्या पूर्ण सफल झाली.

मंद्रपंचमापासून थेट तारपंचमापर्यन्त झोतदार स्वच्छ मोकळा आवाज, आकारयुक्त रागालाप, लयकारीनं नटलेलं बोल अंग, दमसास पूर्ण वजनदार तान, सहजपणे सम पकडण्याचा आत्मविश्वास हे सारे गुण त्यांच्या गायनात मला प्रकर्षानं जाणवले. आपल्या गानगुरूंच्या प्रतिमेला—मोगुबाई कुर्डीकर यांच्या प्रतिमेला आदरपूर्वक प्रणाम करून त्या स्थानापन्न झाल्या. जबारदार तंबोरे

सुरेलपणे बोलू लागले, हार्मोनियम साथीस श्री. प्रभाकर पेडणेकर व तबला साथीस श्री. सुधीर माईणकर हे कुशल साथीदार होते. श्रोत्यांमध्ये अनेक कलाकार, जाणकार आणि अग्रभागी संगीतज्ज्ञ वामनराव देशपांडे आवर्जून उपस्थित होते. ठरल्यावेळी ठीक पांच वाजता कमलाताईंनी आपल्या गाण्यास 'मधुवंती' रागातील झपतालमधील ख्यालानं प्रारंभ केला. ख्यालाचे बोल होते 'शिव आज मद दंभ बलदंड' लयीच्या डौलदार अंगानं आलाप, बोल आलाप सहजपणे समेवर येत होते व श्रोत्यांची 'दाद' घेत होते. अर्धा तास विलंबितख्याल गायिल्यावर 'जगतजननी भवानी' ही द्रुतचिज त्रितालात तानांनी नटवली गेली. आजच्या त्यांच्या मधुवंती रागात कोमलनिषाद का नव्हता, कळलं नाही. (जयपुरी प्रकार असावा हा) मधुवंती नंतर पूरियाधनाश्रीचा भास निर्माण करणारा 'गौरीचा एक प्रकार' विलंवित त्रितालात सादर करून जयपुरी गायकीचे मनोहारी दर्शन त्यांनी घडवलं. (त्या चिजेचे शब्द मात्र कळले नाहीत) द्रुतत्रितालात 'आवोजी नंदलाल' ही चीज मात्र ढंगदार आकर्षक मुखड्याची होती. ती छानच रंगली. ' आला राम मेघश्याम सुंदर भक्त मनोविश्राम ' हे 'यमन कल्याण' रागस्वरुपात धुमाळीतालामधील अर्थपूर्ण गीत भक्तिभावपूर्णतेनं गाऊन श्रोत्यांना त्यांनी अनपेक्षित गोड धक्का दिला. कारण त्यांच्याकडून हा गानप्रकार श्रोत्यांनी आज प्रथमच ऐकला होता. तीन चार अंतरे असलेलं हे सुंदर काव्य कृष्णभट वानकर या गोमंतकातील संत कवीचं प्रासादिक काव्य होतं. आणि त्याची चालही अर्थपूर्ण होती, सुरेख होती. ती ऐकून वामनराव देशपांडे मला म्हणाले, 'तुमच्या स्वररचना असलेली भक्तिगीतं कमलताईंना मुद्दाम शिकवा आणि त्यांची एखादी ग्रामोफोन रेकॉर्ड काढा. ती लोकप्रिय होईलच'. कमलताईंनी संमती दिली व मीही स्वीकार केला. त्यानंतर त्यांना चार गाणी मी शिकविली पण त्यांच्या प्रकृति अस्वास्थ्यामुळे रेकॉर्डिंग मात्र झाले नाही, याचा खेद वाटतो.

मध्यंतरानंतर ठीक ७ वाजता पुन्हा गाणे सुरू झालं. तेव्हा कमलताईंनी ' बिहागडा ' रागातील विलंबितत्रिताल मधील ख्याल ' प्यारी पग होले ' गाऊन त्याला जोडून मध्यलयीतील '' त्रिताल तराणा '' चिजेप्रमाणे गाऊन रंग

भरला. नंतर ' नायकी कानडा ' रागामध्ये ' रुपक ' तालातील सुपरिचित ख्याल 'मेरो पिया रसिया' संपूर्ण बंदिशीसह उत्कृष्टपणे सादर करून आपल्या गायकीवरील प्रेम आणि योग्यता त्यांनी सिद्ध केली. कारण अन्य गायक फक्त 'मेरो पी' एवढ्याच भांडवलावर (संपूर्ण बंदीश येत नसल्यामुळे) गाण्याची मैफिल पार पाडताना दिसतात. नंतर ' ओ रसिया बालमुवा ' ही ढंगदार चीज लवकर संपवून श्रोत्यांच्या खास आग्रहास्तव कमलताईंनी ' मालकंसा 'तला आडाचौतालातला ख्याल मध्यलयीमध्ये 'चलो हटो पिया' आणि त्यातील द्रुत ख्याल ' मोरे मंदरवा आये ' हा त्रितालात सादर करून त्यांनी जाणकार श्रोत्यांची प्रसन्न वाहवा घेतली. श्रीमान वामनराव देशपांडे हेही मोगूबाईंचे शिष्य असल्यामुळे पै. अल्लादिया खांसाहेबांनी प्रचारात आणलेला व मोगूबाईंनी शिकविलेला 'खोकर' राग तितक्याच दर्जेदार गायकीनं कमलताईंनी तो राग आळविला त्यांचेसाठी, हा राग मोगूबाईंच्या मैफिलीत नॅशनल सेंटर परफार्मिंग आर्टस्च्या अलिशान 'टाटा' हॉलमध्ये २७ आक्टोबर ८० रोजी मी ऐकला होता. त्यावेळी तंबोऱ्यावर गायन साथीस श्रीमती कौसल्या मंजेश्वर या त्यांच्या शिष्या होत्या. ती त्यांची बैठक आजही माझ्या स्मरणात आहे. त्या दिवशी कमलताई माझ्या शेजारी श्रोत्यांत बसून गाणं ऐकण्यात तल्लीन झाल्या होत्या, ती आठवण मी आज त्यांना दिल्यावर त्यांनी आज माझ्या सूचनेचा आदर करून त्या दिवशी ऐकलेली मिश्रभैरवी बेहद्द रंगवून आजच्या या मैफिलीची सांगता केली.

मैफिलीत त्यां कधी लाईट म्युझिक वा ठुमरीही गात नसत पण त्यांना येत नव्हती असं मात्र नव्हे. कुणी आग्रह केला तर मात्र टप्पाठुमरीही मस्त रंगवून गात असत. श्रोत्यांची कदर करीत. एवढी मोठी श्रेष्ठ गायिका पण स्वभाव व वागणंही सौजन्यशील. तो निर्मळ स्वभाव त्यांच्या गाण्यातही जाणवत असे. कशाचा हव्यास नाही, गर्व नाही.

यश, धन, किर्तीसाठी कधी धडपड नाही. सदा प्रसन्न वृत्ती. अशी ही मैफिलीची यशस्वी गायिका, मुक्त हस्ते विद्यादान करणारी शिक्षिका तीन वर्षापूर्वी ३ मे रोजी नादब्रह्मांत विलीन झाली. तिच्या पवित्र स्मृतीस माझं पुन्हा पुन्हा विनम्र अभिवादन.

(रविवार, नवशक्ती ३ मे ९८)

● ● ●

# जेष्ठ विद्यावती गायिका–
# पद्‌मावती गोखले (शाळिग्राम)

सन १८९५ मध्ये खाँसाहेब अल्लादिया यांची कोल्हापूर दरबारी 'दरबारी गायक' म्हणून नियुक्ती झाली आणि महाराष्ट्रातील जयपूर गायकीची ती नांदीच ठरली. कोल्हापुरातील त्यांच्या पहिल्या शिष्या तानीबाई कागलकर झाल्या. त्यांना शिकविण्याच्या निमित्तानं खाँसाहेब कोल्हापुरात रहायला आले. अंदाजे १९०३ मध्ये नथ्थन खाँसाहेब ह्या आपल्या पहिल्या गुरुंच्या सांगण्यावरून पं. भास्करबुवा बखले यांनी अल्लादिया खाँचं शिष्यत्व पत्करलं. त्यानंतर गोविंदबुवा शाळिग्राम, केशवबुवा शाळिग्राम, शंकरराव सरनाईक, निवृत्तीबुवा सरनाईक, गणपतराव देवासकर आणि पुत्र मंजीखाँ आणि भुर्जीखाँ, थोरले पुत्र नसरुद्दिन खाँ ह्यांना नियमितपणे तालीम मिळाली. त्यानंतर शेठ जसदनवाला गुलूभाई, मोगुबाई कुर्डीकर व केसरबाई केरकर यांना तालीम मिळू लागली पण त्यात अल्लादिया खाँचे बंधू हैदर खाँ हेही तालीम देत असत. मोगुबाई आणि लक्ष्मीबाई जाधव याना विशेष शिक्षण हैदरखाँसाहेबांकडूनच लाभलं.

## संगीताचे बाळकडू घरातच

या शिष्यवर्गापैकी कोल्हापूर निवासी गोविंदराव शाळिग्राम यांची पुतणी व शिष्या म्हणजेच पद्‌मा शाळिग्राम यांना बालपणापासूनच घरांमध्ये नियमितपणे संगीताचं बाळकडू मिळालं. मग पद्‌माताई मोठेपणी मोठ्या गायिका झाल्या यात नवल

ते काय? अर्थात् घरातल्या लाडामुळे त्यांनी काळजीपूर्वक मेहेनत केली नसती तर मात्र ते शिक्षण वाया गेलं असतं. पण केशवराव आणि गोविंदराव शाळिग्राम ह्यांनी तिची महत्त्वाकांक्षा वृद्धिंगत करून तळमळीने मेहेनत करवून घेतली. ईश्वरदत्त सुरेल धारदार मधुर आवाज आणि जयपुरी गायकी पेलण्याची बुद्धिमत्ता यामुळे तिची विलक्षण प्रगती होत गेली.

आकारयुक्त खुला आवाज, उत्तमोत्तम बंदिशी, लयीशी बांधलेली आलापी, बोल आणि तानक्रिया सपाट अन् कूटतानांचे प्रकार आणि जोड रागांचा विचारपूर्वक अभ्यास ही सगळी वैशिष्ट्ये आत्मसात करून पद्माताईंनी गुरुंना संतुष्ट केले.

या शास्त्रीय संगीताच्या अभ्यासाबरोबर त्यांनी आपल्या गळ्यातील निसर्गदत्त हरकतीमुरक्यांचा विशेष गुण लक्षात घेऊन आपल्या आवडीचे विषय म्हणून की काय, पण ठुमरी-दादरा या ढंगदार गायकीचा अभ्यास करून मेहेनत करून गाणं रसीलं बनवलेलं दिसतं. ही गोष्ट खास अभिनंदनीय वाटते. आणि त्यांची मैफिल श्रवणीय ठरते. श्रोत्यांना रंगतदार गाणं ऐकवून खूष करणं हे तर कलाकाराचं कर्तव्यच आहे.

पण कां कोण जाणे जयपूर गायकी गाणारे बहुतेक कलाकार, रसिक मंडळीशी आणि श्रोत्यांशी पुष्कळ वेळा चढेलपणानं, तऱ्हेवाईकपणानं वागतात आणि वादग्रस्त ठरतात, त्यामुळे कलागुण असूनही रसिकजन अनादर व्यक्त करताना आढळतात. निदान सुशिक्षित कलाकारांनी रसिकांशी सुसंस्कृतपणे वागून हा अपसमज आपल्या वागण्याने दूर करावा हे उत्तम. (पद्माताई शाळिग्राम यांला अपवाद आहेत) पद्माताई रेडियोवर गाताना कधी शाळिग्राम तर कधी (सौ.) गोखले या नावानं गातात, त्यामुळे जनतेत संभ्रम निर्माण होतो. हे मात्र निश्चित.

## पद्माताईंचा परिचय

७ जुलै १९५६ रोजी मुंबई रेडियोवर माझा कार्यक्रम होता. मी सकाळी भैरव, सायंकाळी पटदीप व नाट्यगीत आणि रात्री बागेश्री व भजन गायिलो शिवाय. ११ जुलैला रात्री 'उषास्वप्न' ही माझ्या संगीतनियोजनाची 'संगीतिका' होती

म्हणून ७ जुलै ते ११ जुलैपर्यंत दुपारी माझा मुक्काम रेडियोतच असायचा. ७ जुलै रोजी पद्मावती गोखलेंचा कार्यक्रम रेडियोवर होता. संगीत विभागप्रमुख केशवराव भोळे यांनी तो ऐकण्यासाठी मला निवेदकाच्या रुममध्ये नेले. तिथे बसून आम्ही त्यांचा भिमपलास ख्याल मस्त रंगलेला ऐकला. केशवराव भोळेना पद्माताईंच्या गाण्याविषयी रास्त अभिमान अन् कौतुक होतं. त्यांच्या आग्रहाखातर त्या दिवशी रेडियोवर पद्माताईंनी रात्रीच्या कार्यक्रमात एक रंगेल ठुमरी गायिली होती ती 'ननदिया म्हारे बोल' अजून स्मरते. ताईंनी त्या दिवशी रेडियोवर 'भीमपलास' चा 'ये बिरमाई' हा विलंबित त्रिताल ख्याल संपूर्ण अस्ताई अंतऱ्यासह गाऊन बोल आलापांनी व लयकारीच्या डौलदार अंगाने नीटनेटका भरला. आकारयुक्त दमसास पूर्ण आलाप चित्तवेधक होताच पण तयारीच्या सपाटताना व बोलताना, ऐकताना त्यांची श्रेष्ठता जाणवत होती. विलंबितनंतर 'जा जा रे अपने मंदिरवा' हा द्रुतख्याल गाताना कल्पकता व कलात्मकता वापरुन सौंदर्यदृष्टीनं जी तानांची बरसात केली त्यामध्ये त्यांनी बालगंधर्वांच्या गायकीची आठवण करून दिली. त्या स्टुडियोतून बाहेर येताच केशवराव भोळे यांनी त्यांना माझा परिचय करून दिल्यावर त्या मला म्हणाल्या 'तुमचा सकाळी भैरव मी रेडियोवर ऐकला. छान झाला. मी तुमचं अभिनंदन करते' भोळेंच्या ऑफिसमध्ये आम्ही चहा-फराळ करताना ज्या गप्पा मारल्या, त्यातूनच या लेखाच्या प्रारंभीचा मी त्यांचा परिचय मजकूर जो लिहिला आहे तो मला समजला. अन्य गायिकांमध्ये जो ताठरपणा दिसतो तो मात्र ह्या दिवशी पद्माताईंच्या वागण्या-बोलण्यात मला दिसला नाही.

## पद्माताईंची प्रत्यक्ष मैफिल ऐकली

या भेटीनंतर त्याच महिन्यात छबिलदास स्कूलच्या सभागृहात पद्मावती गोखले यांची मैफिल शनिवारी ऐकायला मिळाली. एका 'संगीत मंडळा' तर्फे ही संगीतसभा आयोजिली होती. पण पद्माताईंच्या निमंत्रणानुसार मी व

माणिक वर्मा, सुरेश हळदणकर आदी कलाकार आवर्जुन उपस्थित होतो. जाणकार श्रोत्यांनी सभागृह खच्चून भरलेलं होतं. आजच्या रात्रीची मैफिल हमखास रंगणार हा माझा अंदाज खरा ठरला. गायिका पद्‌माताईही प्रसन्न दिसत होत्या.

अप्रचलित राग आज ऐकायला मिळणार पण त्यांची नावं सांगितली गेली नाहीत तर श्रोते नाराज होणार म्हणून पद्‌माताईंना मी विनंती केली की, '' अनवट राग पेश करण्यापूर्वी त्याचं नाव सांगितलं जावं अन्यथा रागस्वरुप समजलं तरी श्रोते मंडळीत नावाबद्दल एकसारखी कुजबूज चालते. त्यामुळे व्यत्यय निर्माण होतो त्यापेक्षा समाजशिक्षणासाठी नांव सांगणं उत्तम.'' हा माझा विचार पद्‌माताईंना पटला व त्यांनी राग 'भूपनट' हे नाव सांगून विलंबित झपतालात 'मालनिया लाई' हा ख्याल सुरू केला. आवाजाचा आकारयुक्त लगाव हे खास वैशिष्ट्य, आलाप व तान प्रकार कितीही कठीण असला तरी तारसप्तकातही पाळलं जातं. त्याबरोबर आसयुक्त स्वरमाधुर्याकडे लक्ष पुरविलं जातं. त्यामुळे आनंद द्विगुणीत होतो. 'भूपनटाचा' ख्याल या सर्व गुणांनी नटला आणि श्रोत्यांना आवडला, असं जाणवलं. त्यानंतर जाणकार श्रोत्यांच्या सूचनेवरून राग 'बिहागडा' मधल्या 'प्यारे पग होले' विलंबित ख्याल आडाचौतालामध्ये सादर केला गेला. बालगंधर्वांचे लोकप्रिय नाट्यगीत (स्वयंवरमधलं) याच 'बिहागडा' रागात आहे व त्यामुळेच हा राग रसिकांना आवडू लागला. 'बिहाग' रागात 'खमाज' अंगानं कोमल निषादाचा प्रयोग केलेला हा मिठ्ठास राग आहे. आज हा रागही ताईंनी छान रंगविला. जयपूर गायकीचे कलाकार विशेषतः त्रितालातच ख्याल गाताना दिसतात, पण ताईंनी आज वेगवेगळ्या तालातून ख्याल गाऊन विविधरंग प्रकट केले. त्यांचा खास आवडीचा प्रकार 'ठुमरी' व नंतर एक नखरेल 'दादरा' पेश करून त्यांनी मध्यांतर केला. हार्मोनियमसाथीस तुळशीदास बोरकर आणि तबलासाथीस नारायणराव इंदूरकर हे सिद्धहस्त कलाकार तन्मय होऊन साथ करीत होते. त्यामुळे मध्यंतरानंतरही मैफिल चढत्या श्रेणीनं रंगली.

## सारे गुण चित्तवेधक

मध्यंतरानंतरही श्रोत्यांची गर्दी तशीच शेवटपर्यंत कायम होती हे यशाचं गमकच मानावं लागेल. जयपूर गायकीचे लोक मूळचे प्रचलित राग फारसे गात नाहीत म्हणून जाणकार श्रोत्यांनी पद्माताईंना तशी विनंती केली तेवढ्यात मुसळधार पाऊस सुरू झालेला पाहून एकानं 'गौडमल्हार' ची सूचना केली ती पद्माताईंनी मान्य करून राग 'गौडमल्हार' चा 'का हे हो' हा ख्याल सुरू केला आणि त्याला जोडून द्रुतचीज न गाता त्याच रागातलं नाट्यपद 'नभ मेघांनी आक्रमिले' हे गाऊन तानांचा वर्षाव केला. आणि 'गौडमल्हारची' सांगता श्रोत्यांनी टाळ्यांचा वर्षाव करून केली. आजकाल रेकॉर्डस्मधून निकोप सुरेल, अतिसुरेल स्पष्ट शब्दोच्चरांचं भावपूर्ण गायन ऐकून श्रोत्यांचे कान चोखंदळ झाले आहेत. अशा श्रोत्यांना शास्त्रीय संगीताकडे आकृष्ट करण्यासाठी माधुर्याची दृष्टी गायकानं बाळगून आपले कार्यक्रम यशस्वी करणं आवश्यक आहे, तसेच या मुख्य पक्वान्नाबरोबर नजाकतदार भावपूर्ण ठुमरी नाट्यगीतं हे चविष्ट चमचमीत प्रकारही आवश्यक आहेत. हे मास्तर कृष्णराव (मैफिलीचे बादशहा) यांचे रंगतदार कार्यक्रम ऐकून पद्माताईंनी पुरेपूर जाणलं होतं, हे आज मला जाणवलं. पद्माताईंचं गाणं शिस्तबद्ध तसेच बुद्धिनिष्ठ आणि दर्जेदार होतं. आलाप, तानांची तयारी, कल्पकता, सहजता दमसास कायम ठेवून प्रदीर्घ सपाट- दाणेदार ताना हे सारे गुण चित्तवेधक होते.

क्वचित् ऐकायला मिळणारा प्रचलित राग 'नंद' चे मधुर आलाप स्वरुप दाखवून पद्माताईंनी 'धुंडू बारे सैय्या' हा विलंबित त्रितालात ख्याल सुरू केला. आणि त्याला जोडून 'आज हूंन आये श्याम' हा द्रूत ख्याल ढंगदार आलापतानांनी सजवून मूळचा गोड राग अधिक गोड बनवला. 'बरसन लागी सावन बुंदिया' हा दादरा

लाडेलाडे गाऊन झाल्यावर श्रोत्यांच्या आग्रहाखातर भैरवीतील " नृपकन्या तवजाया " हे स्वयंवर नाटकातील पद गाऊन श्रोत्यांना बालगंधर्वांच्या भावमधुर गायिकीची आठवण करून दिली व मैफिल संपविली.

(रविवार, नवशक्ती १२ जुलै ९८.)

• • •

## भावस्वर गायिका ज्योत्स्ना भोळे

**शब्दप्रधान गायकी म्हणजेच भावप्रधान गायकी होय.** आकाशवाणीनं या प्रकाराला सुगमसंगीत हे नाव दिलंय. श्रेष्ठगायक बालगंधर्वांची भावमधुर नाट्यगीतंही आकाशवाणीवर सुगमसंगीत म्हणून सादर करतात. अनभिज्ञपणा आहे हा. ज्याला सुगमसंगीत म्हणतात ते "सुगम" कधीच नसतं. ते दुर्गमच असतं. गायक कलावंतानं ते सुगम करायचं असतं.

"आला खुशित समिंदर" "तू माझी अन् तुझा मीच" आणि "माझिया माहेरा जा" ही दर्जेदार भावगीतं ज्यांची अजून रसिकांच्या मनात घोळत रहातात त्या "भावस्वर गायिका श्रीमती जोत्स्ना भोळे आजही अविस्मरणीय आहेत." हरकती मुरक्यांसह भावमधुर गायन ऐकतो आहोत, त्यांच्या नावाप्रमाणे पौर्णिमेचं सुखद चांदणं मनाला आल्हाद देतं त्याप्रमाणं स्वरांची पखरण त्या गीतातील भावनेसह सतत होते आहे असा श्रोतृ रसिकाला भास व्हावा, मन मोहून स्तब्ध व्हावं, त्यांची एखादी प्रत्यक्ष ऐकलेली मैफिल मूर्तिमंत समोर उभी राहून त्यातील श्रुतिमनोहर ख्यालगायन, नाट्यगीत, एखादी ठुमरी अन् भावगीत कानात, मनात घुमत रहावं एक अशी विलक्षण जादू ज्या गायनात आहे त्या लोकप्रिय गायिका आणि आधुनिक रंगभूमीवरील अभिनेत्री जोत्स्ना भोळे यांची चिरतरुण मूर्ती आजही डोळ्यांसमोर उभी रहाते.

१९७५ मध्ये त्यांच्या एकसष्टीनिमित्त मुंबईमध्ये महिला समाजातर्फे भव्य सत्कार, गाणी आणि 'कुलवधू' नाटकाचे प्रयोग झाले ते पाहून आणि ऐकून बाईंना "साठ वर्षे पूर्ण झाली आहेत ते कुणीही खरं मानणार नाही इतका त्यांचा उत्साह

चपळपणा व अभिनयकौशल्य आणि पूर्वीचाच आवाजातला गोडवा, गाण्याची तयारी सारं सारं रसिकांनी मनसोक्त अनुभवलं, ते पूर्वीसारखंच सुखद होतं, त्यानंतरही बरीच वर्षे टिकून होतं'' असं माझ्याप्रमाणेच अनेक जाणकारांचं मत आहे. त्यांची मैफिल अजूनही कुठे ऐकायला मिळेल का? श्रोते यांची आतुरतेनं वाट पहात आहेत. आणि केवळ आकाशवाणीवरून ऐकायला मिळणाऱ्या ध्वनिमुद्रित कार्यक्रमांवर आणि ग्रामोफोन रेकॉर्डवर आपली तहान भागवीत आहेत.

विविध गान प्रकार सर्वांग परिपूर्णतनं आणि भावयुक्त स्वरांनी गाणारी लोकप्रिय गायिका जोत्स्ना भोळे म्हणजे पूर्वाश्रमाची दुर्गा केळेकर. गोव्यातल्या नागेशीची रहिवाशी बालकलाकार म्हणूनही लोकप्रियच होती.

गिरिजाबाई व केसरबाई केळेकर (बांदोडकर) मंगला रानडे या साऱ्या गायिका याच दुर्गा केळेकरच्या सख्ख्या बहिणी, अभिनय कुशल म्हणून विख्यात, सारं कुटुंबच संगीतमय झालेलं.

त्यापैकी गिरिजादेवींनी फक्त मैफिलींमध्ये नाव मिळवलं पण केसरबाई बांदोडकर यांनी मैफिलींमध्ये आणि काही काळ रंगभूमीवर ही नाव मिळवलं. मे १९४५ मध्ये ह. वि. देसाईच्या नाट्यसंगम कंपनीचं 'अर्ध्यावाटेवर' हे नाटक रंगभूमीवर आलं त्यात केसरबाई बांदोडकर यांच्याबरोबर मी, दत्तोपंत आंग्रे, सरोज बोरकर हे नामवंत कलाकार होते. हे नाटक मुंबई, पुणे, कोल्हापूर, बेळगाव इ. शहरातून खूप गाजले. विशेषतः गाण्यामुळे व व्यथित अभिनयामुळे केसरबाईचंही नाव गाजलं.

मंगला रानडे या ''नाट्य निकेतन'' मध्ये जोत्स्नाबाईबरोबर भूमिका करतच होत्या.

जोत्स्नाबाईंचा सूर ताल लय सारंच पक्कं होत विशेष म्हणजे त्यांनी बुद्धिकौशल्यानं व शैलीदार नजाकती गाण्यानं रसिकवर्गात विशेष आपुलकीची भावना निर्माण केली ती कायमचीच. वेगवेगळ्या तऱ्हेच्या आवडी असलेल्या

श्रोत्यांना एकाच मैफिलीत आपल्या आकर्षक गायनानं संतुष्ट करण्यात त्या फार चतुर. एवढंच काय रागदारीची आवड नसलेल्या श्रोत्यांनाही जोत्स्नाबाईंचं ख्यालगायन मनापासून आवडायचं. ज्या काळात बोलपटांच्या लोकप्रियतेमुळे रंगभूमीला पडता काळ आला होता त्या काळात (१९४२ मध्ये) कुशल नाटककार मो. ग. रांगणेकर यांनी नव्या नाट्यतंत्राचा अवलंब करून कौटुंबिक जिव्हाळ्याच्या प्रश्नावर, सहजसुलभ संवादयुक्त नाटके लिहून व एकाच सेटवर प्रसंग उभे करून रंगभूमीला वळण लावलं व ते यशस्वी करून दाखवलं, आणि चतुर अभिनेत्री जोत्स्नाबाई आणि यशस्वी संगीत नियोजक मास्तर कृष्णराव या त्रयींनी एकत्र येऊन मराठी रंगभूमीला जीवदान दिलं ते नाट्यनिकेतनद्वारा संगीत 'कुलवधु' निर्माण करून यात संशय नाही. गंधर्व कंपनीच्या संगीत परंपरेत संगीत नियोजक, म्हणून गाजलेल्या मास्तर कृष्णरावांनी काळाची पावलं ओळखून 'कुलवधु', 'एक होता म्हातारा' आाणि 'कोणे एकेकाळी' या नाटकांसाठी क्रांतिकारी आगळंवेगळं संगीत निर्माण केलं ते लोकप्रिय झालं. मास्तरांनी चाल गुणगुणावी आणि रांगणेकरांनी ती शब्द लिहून कायम करावी. साऱ्या चाली गोड आणि अर्थवाही अन् जोत्स्नाबाईंनी मास्तरी ढंगानं त्या समजून गाऊन नजाकतीनं पेश केल्या. त्यातील 'मन रमणा मधुसूदना' 'क्षण आला भाग्याचा' आणि 'बोला अमृत बोला' ही गाणी महाराष्ट्रात सर्वतोमुखी झाली. या कार्यात जोत्स्नाबाईंच्या यशाचा वाटा मोठा आहे. यात दुमत होण्याचं कारण नाही.

त्यांचं ललितसंगीत, अभिनय, सहजता, सौंदर्य, आकर्षकता, प्रसन्नता, नम्रता व सुशीलता या सर्व सदगुणांनी नटलेली ती ''कुलवधू'' चिरस्मरणीय ठरली. तयारीच गाणं येत असताही त्यांनी रंगभूमीवर कधी आक्रमण केलं नाही. भावनेशी, भूमिकेशी सुसंगत असं भावस्पर्शी हरकती मुरक्याचं गाणं, दाणेदार तानांचं गाणं त्या गात आणि मोजकं गात असत.

मो. ग. रांगणेकरांच्या नवीन नाट्यतंत्रात अस्थानी गीत योजना कधीच नसे. नाट्यप्रसंगाचा परिपोष करण्यासाठी गीताची योजना हवी. गाण्यासाठी गाणं कधीच नसावं हा नाट्यनिकेतनचा दंडक होता. नाट्यसंगीत गाताना तानांची भेंडोळी आणि टाळी घेण्यासाठी ''फिरकीची तान'' पाहिजेच असा अलिखित दंडक पूर्वी होता, पण ह्याकाळात जोत्स्नाबाईंनी आपल्या मधुर आवाजात रंगभूमीवर प्रसंगानुकूल गाताना (''आंधळ्याची शाळा'' मध्ये) एक साधं भावगीत गाऊनही प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केलं आहे. ही एक आश्चर्याची घटना म्हणून उल्लेख करावा लागेल.

**ह्या विधानाचा अनुभव** –'नाट्यमंदिर' च्या नंदादीप नाटकात मी नायकाची भूमिका करीत असताना पुण्यातील प्रयोगांसाठी १९४७ च्या मे-जूनमध्ये आमच्या कंपनीचा मुक्काम नाट्यनिकेतनच्याच बिऱ्हाडी असे आणि आम्ही एकमेकांच्या नाट्यप्रयोगांना नेहमीच जात असू त्यावेळी मी हा अनुभव घेतला आणि आमच्याही नाटकात आम्ही हेच सर्व नवीन तंत्र अवलंबून यशस्वी झालो होतो.

रांगणेकरांची नाट्यनिकेतन कंपनी व विमल घैसास यांची 'नाट्यमंदिर' यामधील वातावरण सदैव खेळकर, मनमोकळं असे. तोच खेळकरपणा व सहजपणा नाट्यप्रसंगातही जिवंत असे त्यामुळे नाटकात भूमिका यशस्वी करताना सहज अभिनय, गाणं मर्यादित अन् सहज होत असे. हा सारा प्रभाव त्या नव्या नाट्यतंत्राचा.

नाट्यनिकेतनचे नट रामचंद्र वर्दे हेच आमच्या नाट्यमंदिरचे अभिनय दिग्दर्शक गुरु होते. आणि ''कुलवधू'' मधील नायक श्री. अविनाश (गणपतराव मोहिते) आणि संगीत नियोजक मा. कृष्णराव हे मला ''नंदादीप'' मधील माझ्या गाण्यांसाठी योग्य सूचना देत असत. माझ्या नाट्य यशामागे ही थोर माणसं होती. दुसऱ्या कलाकाराच्या उत्कर्षासाठी एकमेकांशी प्रेमपूर्वक सहकार्यानं वागणं हा उदार दृष्टिकोन पूर्वीच्या कलाकारांमध्ये प्रकर्षाने जाणवत होता, पण हा सुसंस्कृतपणा आजच्या सुशिक्षित (?) कलाकारांमध्ये अभावानं तळपतो आहे ही परिस्थिती विचारपूर्वक बदलली पाहिजे हेच खरं.

त्याकाळी रंगमंचावर आजच्यासारखी ध्वनिक्षेपकांची सोय नव्हती, त्यामुळे नाटकांचा खरा आश्रयदाता, 'अन्नदाता' (बालगंधर्वांच्या भाषेत) जो पिटातला प्रेक्षक त्याच्यासाठी मोठ्यानं बोलावे लागे, गाण्याचा स्वर उंच ठेवावा लागे याची जाणीव प्रत्येक नट आणि जोत्स्नाबाईंही ठेवीत असत. जोत्स्नाबाईंचं गाणं आणि अभिनय सहज वाटला तरी तो त्यांना सहजपणे प्राप्त झालेला नाही. त्यासाठी त्यांनी खूप कष्ट, मेहेनत घेतली आहे. अभिनयाचे गुरू मो. ग. रांगणेकर आणि नटवर्य केशवराव दाते यांसारखे कडक आणि संगीत नियोजक केशवराव भोळे हे गायन गुरु म्हणून त्यापेक्षाही कडक व शिस्तप्रिय गृहस्थ. पण शिष्यत्व मान्य केल्यावर शिस्तीनं अनुकरण करीत साधना करीत रहायचं हा जोत्स्नाबाईंचा मूळस्वभाव हेच त्यांच्या श्रेष्ठयशाचं रहस्य आहे असं मला वाटतं.

जोत्स्नाबाईंना भावगीत गायिका न म्हणता "भावस्वर गायिका" असं म्हणतो मी, ते यासाठी, रागसंगीत गाताना त्या रागाच्या रसाचा, शब्द म्हणताना त्याच्या भावनेचा विचार हा महत्त्वाचा मानून विविध स्वरालापांनी ते गीत कलात्मकतेने सजवणं, नटवणं मग ते नाट्य गीत असो वा भावगीत असो ही गोष्ट महत्त्वाची. पण "शब्दप्रधान गायकी" या नावाखाली परवचा म्हटल्यासारखंच फक्त भावगीत गायलं जातं ते त्यांनाही मान्य नाही म्हणून त्या विविध स्वरालंकारांनी सजवून गीतातील भावना व्यक्त करतात हा त्यांचा विशेष गुण आहे. आणि हेच तत्त्व माझे पूज्य गुरु मा. कृष्णराव यांच्याही ललित गायनात स्पष्टपणे जाणवतं. "कुलवधू" नाटकाच्या चाली तयार करण्याचं काम मास्तर कृष्णरावांनी केले त्यावेळी मी त्यांच्याकडेच शिकत होतो व भारत गायन समाजात शिक्षक होतो. मास्तरांनी कठीण म्हणून जी जी जागा (व्हरायटी) तयार करावी ती ती जोत्स्नाबाईंनी सहजपणे गाऊन व विशेष खुलवून दाखवावी, मास्तरांनी खूष व्हावं, अन् असं होता होता ते गाणं फुलत रहावं असं नेहमीच चाले. आणि म्हणूनच "कुलवधू" मधील त्यांची सर्वच गाणी लोकप्रिय झाली. अमर झाली. जोत्स्नाबाईंकडून आजही ती गाणी (उतारवयात) सर्वांना ऐकायला आवडतात (रियाज बंद नाही) "बोला अमृत बोला" ही भैरवी म्हणजे मास्तरांची

बुद्धिमता आणि जोत्स्नाबाईंचा गळा यांची चालती बोलती साक्ष आहे. वयाची पंचाहत्तरी पार केलेल्या जोत्स्नाबाईंनी गात गातच शंभरी पूर्ण करावी ही हार्दिक शुभकामना व त्यांना सादर प्रणाम, आणि त्यांची सुकन्या वंदना खांडेकर ही त्यांची परंपरा यशस्वीपणे चालविते आहे, तिला शुभेच्छा.

(रविवार, नवशक्ती ८ मार्च ९८.)

• • •

## नाट्यगान निपुण कलावती जयमाला शिलेदार

**मराठी संगीत रंगभूमीवर १९४२ पासून गायिका आणि अभिनेत्री म्हणून आपली कारकीर्द गाजविणाऱ्या संगीतालंकार जयमाला शिलेदार यांना नुकतेच 'नटराज' पुरस्काराने गौरविण्यात आले. त्यांच्या प्रसन्न गायकीतील सुरेल संगीत प्रवासाचा हा मागोवा.**

संगीतालंकार श्रीमती जयमाला शिलेदार यांनी मराठी रंगभूमीवर १९४२ पासून आजपर्यंत, संगीत नाटकांमधून सातत्यानं प्रमुख भूमिका करून गायिका व अमिनेत्री म्हणून कारकीर्द यशस्वी केल्याबद्दल जुलैमध्ये महाराष्ट्र सरकारने त्यांना सन्माननीय पुरस्कार देऊन गौरव केला व नुकताच फेब्रुवारीमध्ये ''महिंद्र'' ने एक लाख रुपयांचा 'नटराज' पुरस्कार देऊन गौरव केला ही गोष्ट आम्हा कलाकारांना निश्चितच अभिमानास्पद वाटते कारण जयमालाबाईंनी निष्ठेनं व निरलसपणे मराठी संगीत रंगभूमीची जी सेवा केली आहे ती सफल झाली आहे. १४ एप्रिल १९९१ रोजी 'संगीत शिक्षक संघ, मुंबई' या संस्थेतर्फे गौरव समारंभात त्यांचा सत्कार करण्यात आला त्यावेळी त्यांच्या गायन कार्यक्रमानंतर अध्यक्ष या नात्यानं मी ही खंत व्यक्त करून संघातर्फे महाराष्ट्र सरकारकडे लेखी निवेदन पाठवून लक्ष वेधलं होतं. त्याचा योग्य तो उपयोग झाला याचा मला आनंद वाटतो.

श्रीमती जयमाला शिलेदार पूर्वाश्रमीच्या प्रमिला जाधव या नाट्य संगीताबरोबर, शास्त्रीय संगीताची मैफिलही तन्मयतेनं, तयारीनं उत्तम रंगवितात याचा अनुभव चेंबूरच्या 'कलोपासक मंडळ' या माझ्या म्युझिक सर्कलमध्ये त्यांचा कार्यक्रम घडवून आणला त्यावेळी चेंबूरच्या चोखंदळ जाणकार श्रोत्यांनी घेतला, १९४९ साली, तो अद्यापि स्मरणात ताजा आहे. प्रमिलाबाईंनी मला त्यावेळी

बिदागीची अट न घालता पुण्याहून येऊन रात्री १० ते पहाटे ५ वाजेपर्यंत प्रसन्नपणे गाऊन मैफिल संपन्न केली. हार्मोनियम साथीस धाकटी बहीण निर्मलाबाई आणि तबला साथीला धाकटा भाऊ व वडील नारायणराव जाधव अशी सगळी घरचीच साथ संगत आणि कार्यक्रमही घरगुती आपुलकीचा. व्यवहाराला नाममात्र महत्त्व देऊन संगीत सेवा प्रामाणिकपणे करणं हा प्रमिलाबाईचा आणि वडिलांचा पिंडच होता. सोज्वळपणा, सौजन्य, नम्रता हा तर बाईचा स्थायीभावच! आनंद देणं आणि घेणं यासाठीच संगीताचं व्रत स्वीकारलेलं.

त्यांचं बैठकीचं गाणं हे सामान्य नव्हे, अ. भा. गांधर्व महाविद्यालयाची 'अलंकार' पदवी प्रथम श्रेणीत प्रथम क्रमांकानं मिळविलेली. शिवाय मोगूबाई कुर्डीकर, मास्टर कृष्णराव, कृष्णराव चोणकर, मोहन पालेकर, भार्गवराम आचरेकर, छोटा गंधर्व या सारख्या थोर गायकांकडून शास्त्रीय संगीताची विद्या घेऊन स्वतःच्या मेहनतीनं आणि बुद्धिमत्तेनं विकसित केलेली अशी सर्वांग परिपूर्ण होती आणि वागणं अत्यंत निगर्वी, सालस, सदैव प्रसन्न असे.

चेंबूरच्या या मैफिलीनंतर आमच्या घरच्या मुक्कामात त्यांनी आमच्या घरच्या मंडळींना बाजूला सारुन स्वयंपाक केला आणि आपण एक उत्तम सुग्रण आहोत ह्याचा अनपेक्षित गोड अनुभव दिला.

याच मुक्कामात 'नाट्यमंदिर' नाट्यसंस्थेच्या, 'मदिरा' या लोकप्रिय नाटकातली माझ्या संगीत नियोजनाची दोन गाणी 'शांतता मानसा मिळत नाही' ( पटदीप झपताल ) व 'मधुवनि या ही राधा' (भैरवी केरवा) हिज मास्टर्स व्हॉइस ग्रामोफोन कंपनीत मी त्यांच्याकडून ध्वनिमुद्रित केली. त्यातही बाईंनी गाणी मनापासून गायिल्यामुळे अतिशय लोकप्रिय झाली.

आमच्या घरी आणि H.M.V. च्या स्टुडियोत प्रमिलाबाईशी मनमोकळ्या गप्पा मारुन मी त्यांची इत्त्यंभूत माहिती मिळवली. ती तुम्हाला आता सांगतो.

२१ ऑगस्ट १९२६ रोजी प्रमिलाचा जन्म इंदूर येथे झाला तोच नाटक कंपनीच्या बिऱ्हाडी, पिताजी नारायणराव जाधव हे भाटे बुवांच्या 'नाट्यकला प्रवर्तक' कंपनीत असताना. नंतर ते वेगवेगळ्या नाटक कंपनीत राहिले. त्यांच्याबरोबर प्रमिलाही फिरत राहिली म्हणजे नाटक आणि संगीत यांचं बाळकडूच मिळालं प्रमिलेला.

१९३१ साली नारायणराव बेळगांवी स्थायिक झाले आणि त्यांनी 'गोविंद संगीत विद्यालय' सुरू केलं. प्रमिलानं पाचव्या वर्षापासून सोळाव्या वर्षापर्यंत वडिलांच्या जवळच गायनाची तालीम घेतली. या विद्यालयाच्या वार्षिक संमेलनाचे अध्यक्ष म्हणून संगीतज्ज्ञ गोविंदराव टेंबे आले असताना त्यांनी प्रमिलाचं गाणं ऐकलं, (अभिनयासाठी) रूपसौष्ठव पाहिलं आणि त्यांनी आपल्या 'वेषांतर' नाटकासाठी नायिका म्हणून प्रमिलाची निवड पक्की केली.

१९४२ मध्ये कोल्हापूर येथील पॅलेस थिएटरमध्ये 'वेषांतर' नाटकात वयाच्या सोळाव्या वर्षी प्रमिलानं रंगभूमीवर पदार्पण केलं आणि भविष्यात तेच कायम ठरलं.

**परमभाग्यशाली योग :**

नाट्यसंगीत आणि अभिनय याबाबतीत पंडित गोविंदराव टेंब्यांसारखे संगीतज्ज्ञ आणि अभिनयकुशल श्रेष्ठ गुरू प्रथमच लाभले हे प्रमिलाचं परमभाग्यच म्हणावं लागेल. कोल्हापूर, सोलापूर, बेळगांव इ. शहरामधून या नाटकाचे बरेच प्रयोग झाले. त्यात प्रमिला चांगलीच चमकली.

नंतर नटवर्य लोंढे यांच्या 'राजाराम संगीत मंडळी' त प्रमिलेनं 'शारदा' या संगीत नाटकात मुख्य भूमिका केली तीही खूप गाजली, ७९ प्रयोग लागोपाठ झाले, नंतर मानापमान, भावबंधन या संगीत नाटकात तिला प्रमुख भूमिकांचं उत्तम शिक्षण दिले, आणि तेही प्रयोग यशस्वी झाल्यावर 'सौभद्र' मध्ये सुभद्रेची भूमिका करवून घेत होते, सौभद्रमधलं 'पुष्पपराग सुंगधित' हे पद प्रमिलेला शिकवीत असतानाच लोंढे एकदमच स्तब्ध झाले. प्रमिलेला काय झालं तेच कळेना. लोंढ्यांची ह्रदयक्रियाच बंद पडली, उंच, धिप्पाड, मजबूत शरीराचे व पहाडी मधुर आवाजाचे प्रथमयश नट लोंढे गेल्यामुळे ती कंपनी बंद पडली आणि प्रमिलेचं शिक्षण आणि सुयश तिथेच थांबलं.

**गंधर्व नाटक मंडळीत प्रवेश :**

याच सुमारास डॉ. भडकमकर यांनी 'गंधर्व नाटक मंडळीची' सूत्रं हाती घेतली होती. त्यांनी प्रमिलेला गंधर्व कंपनीत सन्मानानं बोलावलं. ही गोष्ट तिला अभिमानास्पद वाटल्यास नवल ते काय?

मानापमान, एकच प्याला, स्वयंवर व कान्होपात्रा या अत्यंत प्रभावी नाटकात प्रमिलेनं नायिकेच्या भूमिका बाल गंधर्वांच्या शिक्षणामुळे गाजविल्या. बालगंधर्वांची गायकी तिला प्रत्यक्ष शिकायला मिळाली. ती त्यांची परमभक्त झाली. तिनं ते दैवत मानलं, पण दैवयोग विचित्र, कंपनी बंद पडली. त्यानंतर नटवर्य दामुअण्णा मालवणकरांच्या 'प्रभाकर नाट्य मंदिरा'त प्रमिला दाखल झाली. त्या संस्थेत 'संशय कल्लोळ', 'उधार उसनवार' व 'भावबंधन' या गाजलेल्या नाटकातून तिनं प्रमुख भूमिकाच केल्या. एक वर्षभर या कंपनीत प्रमिला होती.

नंतर छोटा गंधर्व यांच्या 'कलाविकास'नाट्यसंस्थेत 'देव माणूस' व 'सौभाग्य लक्ष्मी' या नवीन नाटकातून तिनं प्रमुख भूमिका यशस्वी केल्या. छोटा गंधर्वाकडून नाटकातल्या गाण्याशिवाय रागदारी संगीताचं दर्जेदार शिक्षण प्रमिलेला मिळालं व तिचं नाटकातल्या यशस्वी भूमिकामुळं नाव खूप गाजलं व तिच्यामुळे 'देवमाणूस' व 'सौभाग्य लक्ष्मी' ही नाटकं अत्यंत लोकप्रिय झाली. ग्रामोफोन रेकॉर्डस्ही लोकप्रिय झाल्या, तिच्या व छोटा गंधर्वांच्याही.

**एक सुवर्ण संधी :**

याप्रमाणे अनेक नाटकातून यशस्वी भूमिका करून प्रमिलानं जी अमाप कीर्ति मिळविली, अखंड तपस्या केली त्यामुळे तिच्याकडे एक सुवर्ण संधी चालून आली ती म्हणजे मुंबई साहित्य संघातर्फे १९४५ साली मुंबईत जो नाट्यमहोत्सव होणार होता त्यात डॉ.भालेराव यानी 'संगीत शारदा' मध्ये शारदेची भूमिका करण्यासाठी प्रमिलेची खास योजना केली. केशवराव दाते, चिंतामणराव कोल्हटकर, गणपतराव बोडस अशा थोर कलाकारांबरोबर नाटकात काम करून 'शारदा' यथातथ्य उभी करण्याची अवघड कामगिरी प्रमिलेनं अत्यंत मेहनत घेऊन समर्थपणे केली. त्यामुळे संगीत नाट्य क्षेत्रात तिला विशिष्ट स्थान प्राप्त झालं आणि तिनं ते पुढेही टिकवून ठेवलं.

**दुर्मिळ सदगुणांचं प्रतीक म्हणजे प्रमिला तथा जयमाला :**

सतत हसतमुख चेहरा, सौजन्यशील मधुर नम्र व्यक्तिमत्व, सुहास्य आणि सुंदरता यांचं वरदान. थोर व्यक्तींचा आदर करून आशीर्वाद घेण्यात तिला कमीपणा वाटत नाही, धन्यताच वाटते तिला. मराठी संगीत नाट्य सृष्टीला

वाहून घेतलंय् याचा तिला आनंद व समाधान जाणवतं. पंचेचाळीस नाटकातून चार हजारावर नाट्य प्रयोगात भूमिका केल्या व चौदा नाटकांचे संगीत नियोजन केलं आहे तिनं. अशीही अष्टपैलू व्यक्तिमत्वाची गुणी कर्तृत्ववान अभिनेत्री. अनेक मैफिली यशस्वी करून चोखंदळ रसिकांना तिनं आनंद दिला. बिदागीची अट न घालता सेवावृत्तीनं मनसोक्त गाऊन व्यवसाय करणं, हे तिचं व्रत आहे. बालगंधर्वांची खास आठवण व्हावी इतकी गायकी व अभिनय ती सादर करते, त्यांच्यावरील अपार भक्तिमुळे, निष्ठेमुळे.

पद्य संपवून गद्यावर नादमधुर अलगद आवाजानं येण्यामुळे जिन्याच्या पायऱ्या संपून पायाखाली अलीशान गालीच्यावर केव्हा आलो याचा श्रोत्यांना पत्ता लागत नाही, हे नाट्यातलं तिचं खास वैशिष्ट्य जाणकारांना जाणवलं आहे.

**आदर्श राहणी :**

रंगभूमीवर पैठण्या, शालू, दागदागिने घालून गाणारी नायिका, प्रमिला एरवी अगदी साधी रहाते. साधी तलम शुभ्रसाडी, ठळक कुंकू कपाळावर, चेहेऱ्यावर रंगभूषा नसलेली सुंदर श्यामल मूर्ती, भव्य कपाळावर दाट काळ्या कुरळ्या केसांची महिरप, ओठावर सदैव मधुर हास्य हे सात्विक दर्शन तेहमीच सर्वांना प्रसन्न वाटतं आणि बोलण्यात सोज्वळ स्त्रीत्व अतिशय आकर्षकपणे प्रगट होत असतं.

**समसमा संयोग की जाहला :**

जीवनात क्रांती व्हायला सुद्धा काही निमित्त लागतंच. १९४८ च्या मुंबईच्या मराठी साहित्य संघ नाट्य महोत्सवामध्ये 'संगीत शारदा', 'मानापमान' आणि 'शाकुंतल' या तिन्ही नाटकात प्रमुख भूमिका प्रमिला जाधवनं यशस्वी केल्या आणि त्यातूनच जीवनाचं नवीन नाट्य निर्पाण झालं.

राजकमलच्या 'रामजोशी' चित्रपटामुळे सर्वतोमुखी झालेले गायक नट जयराम शिलेदार 'शाकुंतल' या संगीत नाटकामध्ये दुष्यंत म्हणून प्रमिलेपुढे उभे राहिले. दोघेही एकमेकांच्या प्रेमात पडले. या परस्पर प्रीतीची परिणती पुढे शब्दशः दुष्यंत शकुंतलेप्रमाणेच झाली व लताचा जन्म झाला.

### प्रमिला जाधवची जयमाला शिलेदार झाली :

या संसाराबरोबर 'मराठी रंगभूमी' या नव्या नाट्यसंस्थेचाही संसार या दोघांनी, नारायणराव जाधव यांच्या अनुभवी सहकार्यानं सुरू केला. बाळ कोल्हटकर लिखित 'मुंबईची माणसं', 'बाजीराव मस्तानी' इ. ५-६ नाटकं रंगमंचावर आणली. विदर्भामध्ये ही नाटक खूप लोकप्रिय झाली पण पुण्यामुंबईत विशेष चालली नाहीत.

कोणताही व्यवसाय म्हटला म्हणजे त्यात चढ-उतार हे नेहमी असतातच पण अनेक नटांना सांभाळून नाटक कंपनीचा व्यवसायकरणं फार धाडसाचं. कोणत्या क्षणी कसे चढउतार अनुभवायला मिळतील मालकाला, याचा नेम नाही. पण निष्ठेनं वाहून घेतलेल्या या व्यवसायात अंगावरचे दागिने काढून देताना जयमालाबाईंनी आपल्या मुखावरची प्रसन्नता कधी ढळू दिली नाही. हे पाहिलं की, खात्री पटते नाट्यावर व संगीतावर खरं प्रेम व निष्ठा असल्याशिवाय ही स्थितप्रज्ञ अवस्था येणार नाही. जयमालाबाईंनी लोकप्रियतेचं व मानाचं स्थान जे आता मिळवलं आहे त्यामागे कष्ट, जिद्द आणि महत्त्वाकांक्षा इ. दुर्मिळ गुणच कारणीभूत आहेत.

### चालता बोलता इतिहासच :

एका नाटक वेड्या अन् संगीत वेड्या स्त्रीच्या निष्ठेचा, प्रयत्नशीलतेचा आणि आशावादीचा हा चालता बोलता इतिहास आहे आणि त्यातून आताच्या तरूण पिढीला आदर्श म्हणून खूप काही शिकण्यासारखं आहे कारण त्यांच्यापुढे काही आदर्शच नाहीत त्यामुळे 'मजा' करण्यापलिकडे त्यांना काहीच माहिती नाही. त्यामुळे तल्लख बुद्धी असूनही ती वाया जाते आहे. नाट्याचा व संगीताचा प्रसार वर वर खूप झाला आहे पण त्याला 'खोलपणा' नाही, ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

### अन्य कलाकारांबद्दल आदर :

आपल्या बरोबरीच्या कलाकारांविषयी आदर न दाखविता आपल्याच तोऱ्यात व ताठ्यात राहून किंबहुना दुसऱ्या कलाकारांविषयी अनादर दाखवून आपलं श्रेष्ठत्व सिद्ध करण्याची हीन मनोवृत्ती बहुतेक गायक वादक कलाकारांमध्ये

आढळून येते. याउलट सदैव प्रसन्न वृत्तीनं दुसऱ्यांचा योग्य तो आदर करण्याची सहज प्रवृत्ती जयमालाबाईंमध्ये सर्वांना दिसते. याचा एक अनुभव या संदर्भात मी इथे नमूद केला तर तो योग्यच ठरेल कारण तोही एक आदर्श गुण आहे.

काही वर्षापूर्वीची घटना आहे, व्यास संगीत विद्यालयातर्फे दादरच्या म्युनिसिपल सभागृहात पं. पलुस्कर पुण्यतिथी निमित्त सायंकाळच्या बैठकीत जयमालाबाईंचा गायन कार्यक्रम, गोविंदराव पटवर्धन व दत्तोपंत ऐतवडेकरांच्या साथीनं ऐन रंगात आला होता, मला तिथे पोचायला वेळ झाल्यामुळे व सभागृह तुडुंब भरलेलं असल्यामुळे मी समोरच्या एका दारात उभा राहिलो. बाईचं लक्ष गेलं मात्र गातागाता तंबोरा खांद्याच्या आश्रयाला ठेवून दोनही हात जोडून, मस्तक विनम्र करून त्यांनी मला प्रणाम केला व पुढे येऊन बसण्याची मला खुणेनं विनंती केली. जयमालाबाईंनी नमस्कार केला अशी कोण व्यक्ती आली आहे म्हणून सर्वच श्रोत्यांच्या माना मागे वळल्या. प्रो. वसंतराव राजोपाध्ये यानी मला पुढे नेऊन बसवलं आणि जाणकार श्रोत्यांनी माझ्या संगीत नियोजनाची एकामागून एक गाणी बाईंना सुचविली व ती सर्व गाणी बाईंनी रंगवून सादर केली. एवढंच नव्हे 'मदिरा' नाटकातली माझ्या संगीत-नियोजनाची- त्यांचीच ध्वनिमुद्रिका असलेली भैरवी 'मधुवनि या ही राधा, आळवि श्याम मुकुंदा', ही त्यानी विविध प्रकारांनी नटवून, सजवून श्रोत्यांना ऐकविली. टाळ्याच्या गजरानं सारं सभागृह दुमदुमलं. बाईंनी तंबोरा खाली ठेवल्यावर त्यांनी मला पुन्हा वाकून नमस्कार केला. मी संकोचलो. मी प्रतिनमस्कार केला व जयमालाबाईंचं गान कौशल्याबद्दल मी हार्दिक अभिनंदन केलं.

कलाकारांनी एकमेकाशी कसं वागावं याचा सुसंस्कृत आदर्श म्हणजे जयमाला शिलेदार.

**संसारी स्त्री-जयमाला :**

रंगभूमीवर काम करणारी ही नटी संसार तो काय करणार? नोकराकडून किंवा नवऱ्याकडून ही बाई घरकाम करून घेत असणार असा प्रेक्षकांचा समज असतो, काही नट्यांच्या बाबतीत हा समज सत्य असेलही, पण जयमालाबाई आपल्या

कलावंत पतीचा श्रेष्ठमान राखून गृहिणीपद अतिशय उत्तमरीतीनं भूषवीत असत. ज्यांनी त्यांच्या हातचा रूचकर स्वयंपाक जेवला असेल त्यांनी त्यांची 'सुगरण' म्हणून मनापासून स्तुती केली आहे.

जयराम-जयमाला या दोन कलावंताच्या कलाव्यासंगानं संसार उजळून निघाला. आज लेख लिहितांना एक मोठी उणीव जाणवते ती माझे मित्र नटवर्य जयराम शिलेदार हा लेख वाचायला या जगात नाहीत. त्यानी व मी 'नाट्यसंगम' च्या '' संगीत 'नवे जग '' नाटकात प्रमुख भूमिका केल्या होत्या त्या स्मृती आजही ताज्या आहेत, अविस्मरणीय आहेत. त्यांच्या सुकन्या लता आणि कीर्ती त्यांची नाट्यगायनाची परंपरा निष्ठेनं चालवीत आहेत व जयमालाबाई आजही कार्यरत आहेत त्यांचं हार्दिक अभिनंदन व त्यांना अभिवादन.

(रविवार, नवशक्ती १ मार्च ९८.)

• • •

# भाग्यवती गायिका
# किशोरी आमोणकर

गायक कलाकाराला आपल्या भोवती मोठ्या नावाचं वलय जन्मताच लाभणं हे मोठंच भाग्याचं लक्षण आहे. आणि म्हणूनच आजही ज्यानं मनापासून विद्या दिली त्या गुरूंशी काडीमोड घेऊन बाजारात आज किंमत ज्याची जास्त आहे अशा नामवंत गुरूकडे नाममात्र शिक्षण घेण्याकडे तरुण होतकरु गायकांची गर्दी झालेली दिसते. ती त्या नावाचं तेजोवलय प्राप्त व्हावं म्हणूनच.

गानतपस्विनी श्रीमती मोगूताई कुर्डीकर ह्या जयपूर घराण्याचे अग्रणी गानसम्राट अल्लादिया खां साहेबांच्या शिष्या असून त्यांनी अत्यंत कष्ट सोसून प्रतिकूल परिस्थितीवर मात केली व गुरुकडून गानविद्या मिळविली आणि ती जिद्दीनं, मेहनतीनं वाढविली व श्रेष्ठत्व सिद्ध केलं, अन् यश कीर्ति मिळविली. (ही लेखमाला मी त्यांच्या गुणवर्णनानेच जानेवारी ९८ मध्ये सुरू केली आहे हे रसिकजन जाणतातच).

या अशा गुणश्रेष्ठ मातोश्रीकडून बालपणापासून पक्की तालीम व संस्कार किशोरीताई आमोणकरांना लाभले हे केवढं परमभाग्य.

स्वतःची मेहनत आणि कल्पकता यावर त्यांनी आपली गायकी आकर्षक व प्रभावी केली आहे हे त्यांचं स्वतःचं कर्तृत्व होय.

**एक आठवण :**

१९५५-५६ च्या सुमारास चेंबूर येथील माझे मित्र शशांक आजगांवकर (हे किशोरीताईंचे मेहुणे) ह्यांनी किशोरीताईंचा गायन कार्यक्रम चेंबूरच्या छोट्या म्युनिसिपल सभागृहात आयोजित केला होता, तो केवळ जाणकार

आमंत्रितांसाठी. त्यावेळी माझा नि ताईंचा घरगुती परिचय झाला व त्यांच्याशी सांगीतिक चर्चाही करता आली. त्या रात्री ९ वाजता कार्यक्रमाचे प्रारंभी माझे मित्र चकोर आजगांवकर यांनी त्यांचा यथोचित परिचय करून दिल्यावर माझ्या हातून त्यांचा शाल-श्रीफळ देऊन सत्कार केला गेला. एच. एम. व्ही. ग्रामोफोन कंपनीचा म्युझिक डायरेक्टर या माझ्या कर्तृत्वाबद्दल, गायनाबद्दल किशोरी ताईंनी माझी मुक्त कंठानं प्रशंसा केली हे चेंबूरच्या रसिकांच्या अजूनही लक्षात आहे व या कार्यक्रमांची वृत्तपत्रांनींही योग्य दखल घेतली होती.

**रंगतदार मैफील :**

आजच्या मैफिलीचा प्रारंभ 'यमन' रागाच्या विलंबित त्रितालातील ख्यालानं झाला. आवाजाचा स्वच्छ आकारयुक्त लगाव, (आलाप, ताना करतेवेळी) तीनही सप्तकांतून असणं हे खास वैशिष्ट्य दिसलंच. शिवाय अस्ताई पूर्ण गाऊन चिजेच्या अंगानं आसयुक्त आलाप-बोल आलाप लयकारीनं सहजपणे सजवणं हा विशेष गुण दिसला. तो कापसाच्या पेळूतून सुताचा लांबच लांब धागा काढावा तसा वाटला. हार्मोनियम साथीच्या आहारी जाऊन गाणाऱ्या तरुण गायकांसाठी हा विशेष गुण आदर्श वाटावा.

एका स्वराला जोडून दुसऱ्या स्वराची सुरवात करणं, रागांग कलात्मक दृष्टीनं समृद्ध करण्यासाठी त्या त्या रागनियमानुसार स्वरकणांनी सजवणं, आवश्यक तेव्हा मींड आणि गमक अंगानं रागांग प्रकाशित करणं, शोभिवंत करणं म्हणजेच अस्ताई भरणं. शास्त्रदृष्ट्या आणि सौंदर्यदृष्ट्या श्रेष्ठ कलाकृती निर्माण करणं ही हातोटी गुरुंकडूनच ताईंनी घेतली आहे.

ही मांडणी पूर्ण झाल्यावर लहान लहान आलापातून व तानांतून विलक्षण आत्मविश्वासानं अत्यंत वेगवान ताना सुरू केल्या की पेंचदार दाणेदार गमक ताना ऐकून जाणकार श्रोतेही थक्क झाले. मोत्यांच्या सुंदर माळांची उपमाच या तानांना योग्य ठरेल. लागोपाठ उत्तमोत्तम तानउपजा त्यांनी केल्या. त्यामुळे या घराण्यांतील गायकीचं लय आणि ताल यांचं एक स्वतंत्र खास तंत्र नजरेत भरतं. खेळकर लयकारीचं खास वैशिष्ट्य मोगूबाईंकडून ताईंनी आत्मसात

केल्यामुळे मैफिलीची रंगत वाढतच राहते. विलंबित ख्यालानंतर द्रुतचिजेऐवजी त्यांनी द्रुतएकतालातील 'तराणा' मध्यलयीत आलाप तानांसह गायला. त्याची बंदीश खूप आकर्षक होती.

पूर्वीचे ज्येष्ठ गवय्ये तराणा प्रकार आणि अति द्रुतलयीन गात व त्यांत 'दिर दिर तोंम्' दिरदिरदिर दिर' हे शब्द लयकरीनं पेश करून आपलं श्रेष्ठत्व सिद्धकरीत असत. पं. विनायक बुवा पटवर्धनांसारखे गायक तर 'तराणा स्पेशालिस्ट' मानले जात. आता ती पद्धत इतिहासजमा झाली आहे.

यमन रागानंतर किशोरी ताईंनी राग विहागडा (विहागमध्ये खमाज अंगानं कोमल निषादाचा कुशल प्रयोग केलेला राग) मध्ये 'प्यारे पग होले' हा विलंबित ख्याल आडा चौतालामध्ये गाऊन द्रुत चीज त्रितालात सादर केली. (उदाहरणार्थ 'मम आत्मा गमला' हे स्वयंवरमधील नाट्यगीत विहागड्यामध्येच बालगंधर्वांनी लोकप्रिय केलंय् पण बरेच गायक ते पद 'विहाग' समजून गातात. आणि उलट बालगंधर्वांनाच दोष देतात.)

मी यावेळी ताईंना श्रोत्यांतर्फे फर्माइश 'मम आत्मा गमला' या पदाची केली. ती त्यांनी मान्य करून ते पद गंधर्व शैलीदार आलाप तानांनी ऐकवलं. श्रोते खूष झाले.

मध्यंतरानंतर 'गौडमल्हार' रागांत मध्यलयीचा त्रिताल, सोहनी रागाचा झपताल आणि 'परज' रागांतील आकर्षक बंदीश पेश केली आणि 'नृत्यकन्या तव जाया' हे नाट्यगीत गाऊन मैफिल संपविली. अशी ही त्यांच्या ऐन तारुण्यातली तरुण मस्त मैफिल आठवून श्रोत्यांची रसिक मनं आजही तरुण होतात ते हिंदुस्थानी राग संगीतातलं सामर्थ्य आहे. कारण त्यात पाठीव, घोटीव पांच मिनिटात संपणारं तुटपुंजेपण नाही.

प्रतिभेचा स्वराविष्कार आहे, स्वर आणि लय यांचा अतूट संबंध आहे. त्यामागे निष्ठा, प्रेम आणि तपस्या आहे.

पण आज हे सारे सद्‌गुण लोप पावत आहेत. पाश्चात्य संगीताच्या भ्रष्ट अनुकरणाचं आक्रमण जबरदस्त होतं आहे. शास्त्रीय संगीताचा प्रसार केवळ नकली आहे, त्याला 'खोली' नाही व याकडे जनतेचं लक्ष नाही. स्वातंत्र्याचं

पन्नासावं वर्ष आपण साजरं करतो आहोत पण हिप्पी संस्कृतीनं पुरतं पछाडलेल्या तरुण पिढीचं अधःपतन होतं आहे. कुठेच निष्ठा नाही, प्रेम नाही, आदर नाही. भाषेचा, देशाचा अभिमान नाही. मग हिंदुस्थानी संगीताची दुर्दशा काय वर्णावी? माझ्या या व्यथेशी सारे संगीतकार सहमत आहेत, पण स्वार्थत्यागपूर्वक तळमळीनं उपाययोजना नाही. सामाजिक दृष्टीच नाही फक्त वैयक्तिक स्वार्थाचा विचार. यामुळे आमच्या संगीताचं आणि देशाचं भवितव्य काय? याचा संघटितपणे विचार आणि आचार होणं अवश्य आहे. पण तो होईल कां ?

**अभंग गायनाची पर्वणी :**

जयपूर परंपरेतील कलाकार ख्यालाशिवाय कोणताही गीत प्रकार गायला तयार नसतात, पण मंजीखां, नाट्यगीतं, भावगीतं, भक्तिगीत समजून उमजून प्रेमानं गात असत, हे विशेष. तसंच किशोरी ताईंनी अभंग गायनाकडे विशेष लक्ष देऊन, रसानुकूल रागातून स्वररचना करून त्याचे कार्यक्रम करायला सुरवात केली आहे, हे १९८० च्या सप्टेंबरमध्ये मी पुण्यास माझ्या कार्यक्रमासाठी गेलो असताना मला कळलं. शनिवारी ६ सप्टेंबरला रात्री माझा कार्यक्रम पुण्यात एका म्युझिक सर्कलमध्ये झाला. तो पहाटे ४ वाजता संपला. तिथंच मला निमंत्रण मिळालं आणि रविवार ७ सप्टेंबरला सकाळी नऊ वाजता मी टिळक स्मारक मंदिरामध्ये 'तोचि नादू सुस्वर झाला' या किशोरी आमोणकर यांच्या अभंग गायनाच्या कार्यक्रमास उत्सुकतेनं उपस्थित राहिलो.

या कार्यक्रमात निवडक रसिकांची उपस्थिती दिसली. ठीक साडेनऊ वाजता पडदा वर गेला. शिल्पा तेंडुलकर यांच्या भावपूर्ण प्रास्ताविकानंतर 'ज्ञानेश्वर माऊली, ज्ञानराज माऊली तुकाराम' या गजरात कार्यक्रमाचा प्रारंभ झाला.

भैरव रागाच्या सुरावटींनी या गजराला गांभीर्य प्राप्त झालं. पखवाज, तबला, टाळ यांच्याबरोबर बांसरीचा उपयोग केल्यामुळे वातावरण भक्तिमय झालं. या कार्यक्रमात वीस अभंग रचना सादर केल्या. प्रत्येक रचना भावनेस अनुसरून रागांमध्ये योग्य तऱ्हेने स्वरबद्ध केली होती व ती विचारपूर्वक केल्याचं जाणवत होतं. त्यामुळे त्या गायिका असून यशस्वी स्वररचनाकार-संगीतकार आहेत हे सिद्ध झालं.

'ताटी उघडा ज्ञानेश्वरा' यातील आर्तता व्यक्त करण्यासाठी 'दरबारी' रागस्वर योजले होते. तर 'कृष्णे वेधिली विरहिणी बोले' या विराणीला त्यांनी 'मिश्रचंद्रकंस' वापरला होता. 'जियेचा अंबुला रुसोनिया जाये' हा अभंग 'मिश्रजैजैवंती' मध्ये बंदिस्त केला. त्याचप्रमाणे 'बिलासखानी तोडी' भूप, मारवा इत्यादी रागांचा अर्थपूर्ण (स्वरांचा) उपयोग करून त्यातील भाव श्रोत्यांच्या पुढे उभे केले. शब्द स्वरांचं ते भावपूर्ण मिलन ऐकून सर्व श्रोते भारावून गेले. इतक्या प्रभावीपणे एकरुप होऊन त्या गात होत्या. रागांच्या वेगवेगळ्या रुपांबरोबरच कांही ठिकाणी मराठी लोकगीतांच्या चालींचा उपयोग भावपरिपोष साधण्यासाठी कौशल्यानं केल्यामुळे त्या अभंगांची, गीतांची रंजकता वाढली. किशोरी ताईबरोबर वृंदगायनासाठी सौ. माणिक भिडे, सौ. मीरा पणशीकर, रघुनंदन पणशीकर यांनी गायनाची पोषक गायन साथ केली, रंगत वाढवली. हार्मोनियम साथीस अप्पा जळगांवकर व नेने होते. पखवाज साथीला राम मेस्त्री, तबला साथीस शैलेश आणि बासुरी साथीला गजेंद्रगडकर होते. या सर्वांनी परिश्रमपूर्वक हा कार्यक्रम भावपूर्ण व यशस्वी होण्यासाठी हार्दिक सहकार्य केल्यामुळे किशोरीच्या संगीतनियोजनाला आणि अभंग गायनाला अपूर्वता लाभली होती. अथपासून इतिपर्यन्त हा कार्यक्रम सर्वांग परिपूर्ण यशस्वी ठरला यात संदेह नाही.

बुद्धी आणि भावना यांच्या आवाहनाला प्रतिसाद द्यायला सदासर्वकाळ तत्पर असणाऱ्या या सुशिक्षित गायिकेला यापूर्वी संत मीराबाईंच्या भावव्याकूळ भक्तिगीतांनी वेड लावलं होतं ती गीतं गाऊन यशस्वी केल्यानंतर आता त्या मराठी अभंग गायनाकडे वळल्या आहेत ही गोष्ट अभिमानास्पद वाटते.

अत्यंतिक तळमळीची भावना, बुद्धिमत्ता आणि भक्ति यांचा त्रिवेणी संगम संत ज्ञानेश्वरांच्या अनेक काव्यांतून व्यक्त झाल्याने त्याला स्वरसाज चढवून गायन करावं ही प्रेरणा झाल्यामुळेच हा एक आगळा वेगळा भक्तिसंगीताचा कार्यक्रम त्यांनी परिश्रमपूर्वक तयार करून जनता जनार्दनाला सादर केला आणि त्याला नाव दिलं होतं. 'तोचि नादू सुस्वर जाला' आणि त्यांनी ते नांव कृतींनं सार्थ करून दाखवलंय्.

ख्यालाशिवाय कोणताही प्रकार न गाण्याचा 'जयपूर' चा आग्रह सोडून शब्द आणि स्वर यांची भावनात्मक सांगड घालण्याचा या प्रथितयश गायिकेचा हा उपक्रम उत्तरोतर आजही यशस्वी होतो आहे म्हणून हार्दिक अभिनंदन. या भक्तिमार्गाच्या प्रवासामुळे त्यांच्या वृत्तीत जनता जनार्दनावरील श्रद्धा दृढ होऊन सदैव सौजन्याचा सु-वास निर्माण होवो, ही शुभ कामना.

(रविवार, नवशक्ती २४ मे ९८.)

● ● ●

# संगीतातील एक आश्चर्य
# स्वरतारका-परवीन सुलताना

**'परवीन' याचा अर्थ 'सप्तर्षीचा तारकापुंज' या नावाप्रमाणे ही गायिका आज प्रसिद्धीच्या आणि लोकप्रियतेच्या आकाशात तेजानं तळपते आहे, हे विधान यथार्थ ठरेल.**

परवीनला अजोड आवाजाप्रमाणेच आकर्षक रुपसौष्ठव लाभलं असल्यानं तिची मैफिल म्हणजे सुंदर दृश्य आणि मनोहर श्राव्य असतं. असे रसिक श्रोते म्हणतात व गर्दी करतात. आज पंचेचाळीसच्या आसपास तिचं वय असल्यानं चालू काळ आणि भविष्य काळही तिला अनुकूल आहे.

निसर्गरम्य आसाम प्रांतात २५ मे १९५० रोजी नागांव इथे बुद्ध पौर्णिमेस तिचा जन्म झाला.

**कलावंताचे घरात जन्म :**

खाँसाहेब महंमद इकामत हे परवीनचे पिताजी मजीमखाँ या नावानं ते गोहाटी आकाशवाणी केंद्राचे गायक कलाकार म्हणून विख्यात व लोकप्रिय आहेत. खाँसाहेब बडेगुलाम अली खाँ चे ते शागीर्द आणि व्यवहारानं सधन व्यापारी होत. घरात सदैव समृद्धी, शांती असून संगीतावर अपार प्रेम करणारे व्यासंगी कलाकार होत.

घरातल्या संगीतमय वातावरणामुळे परवीनच्या अंगी संगीताचं अनुकरण, बुद्धीची कुशाग्रता आणि उपजतच उंच स्वराच्या आवाजाची देगणी तिला लाभली आहे, हे वडिलांच्या लक्षात आलं आणि त्यांनी तिला वयाच्या सहाव्या वर्षापासून संगीताचं नियमितपणे शिक्षण द्यायला सुरुवात केली. शिवाय ग्रामोफोन रेकॉर्डस् ऐकवनं, रेडियो प्रोग्रॅम्स ऐकवणं व समजावून देणं अशा विविध

माध्यमांतून बडे गुलाम अलींचे गाणं भरपूर ऐकवलं. ते संस्कार बुद्धीवर व गळ्यावर चढले असल्यास नवल काय? १९६४ मध्ये बडेगुलाम अली खाँसाहेबांना तिचं गाणं कलकत्यामध्ये वडिलांनी मुद्दाम ऐकवलं ते खूष झाले. त्यांनी तिला मनापासून आशीर्वाद दिला व गाणं शिकण्याविषयी प्रोत्साहन दिलं. त्याचा योग्य तो परिणाम झाला. तिनं सारं लक्ष गाण्यावर केंद्रित केलं. तिची उत्कट इच्छा पाहून थोड्याच दिवसांत पंडित चिन्मयानंद लाहिरी यांच्याकडे परवीनचं उच्च संगीत शिक्षण सुरू झालं. १९६० ते १९७० ही दहा वर्षे परवीननं सातत्यानं संगीत साधनेत घालविली. एकाग्र चित्तानं, जिद्दीनं तिनं दररोज ४ ते ६ तास रियाझ केला. इतर कशातही तिनं लक्ष दिलं नाही. शिवाय संगीताचं शिक्षण घेण्याचे तास वेगळे. कॉलेजला रामराम ठोकून तिने सतत शास्त्रीय संगीताचंच चिंतन मनन केलं, ही गोष्ट तिच्या श्रेष्ठ दर्जाच्या प्रगतीला उपकारक ठरली. परवीनची वृत्ती सर्वसंग्राहक आहे, ख्याल, ठुमरी, गझल, फार काय धृपद-धमार यामध्ये तिनं खास लक्ष दिल्यामुळे स्वर, ताल, लय सर्व गोष्टी खूपच पक्क्या झाल्या. ख्यालामध्येही झूमरा तिलवाडा आडा चौताल यामध्येही ती विलंबित एकताला इतकीच समर्थपणे सर्व गानप्रकार हाताळते. त्यात एकांगीपणा नाही. तिचे वैशिष्ठ्य हे की, तीनही सप्तकांत तिचा मधुर आवाज उंच स्वरात (पांढरी सातमध्ये) सहज फिरतो. कष्ट पडत नाहीत. आससुक्त स्वर लावून ती भाव परिपोषक गाते. बेहेलावे,बोलताना, विलक्षण वेगवान सफाट तान, झमझम्याची तान, 'सरगम' इ. सर्व प्रकार जाणीवपूर्वक पेश करताना दिसते. तिच्या गाण्याची रेंज मोठी आहे, तिला लाभलेला उंच आवाज ही ईश्वरी देणगीच आहे. त्यात व्यासंगी बहुश्रुतपणाची भर पडल्यानं तिचं गाणं सर्वांग परिपूर्ण आहे ही गोष्ट जाणकारांना जाणवते. लयीला, तालाला ती पक्की आहे.

१९७२ ते ७५ या काळात पांचशेच्यावर मैफिली तिनं रसिकांना ऐकविल्या असून बंगाल, पंजाब, गुजराथ आणि महाराष्ट्र या प्रांतातून तिचा चाहता रसिकवर्ग विशेष आहे. त्यात महाराष्ट्र प्रांत हा जाणकार रसिकांचा असून संगीतकारांवर निःपक्षपाती अपार प्रेम करणारा आहे, असा तिचाही अनुभव ती अभिमानानं सांगत असते.

तिची एकही मैफिल 'फेल' गेली नाही ही एक ईश्वरीकृपाच आहे, असं तिचं प्रामाणिक मत आहे. ती म्हणते, 'किराणा घराणं', मला सच्चा सुरासाठी आवडतं तर 'पतियाळा' घराणं तानेसाठी, वैचित्र्यासाठी आवडतं. पण इतर सर्व घराण्यांची वेगवेगळी वैशिष्ट्यं आहेत त्याकडेही माझं बारीक लक्ष असतं. त्यापासून कांही नवीन-सुंदर गोष्टी शिकता आल्या तर पहावे, अशी माझी भावना असते. तिनं आणखी सांगितलं की, 'ज्येष्ठ गायकांत पं. भीमसेन जोशी व पं. वसंतराव देशपांडे यांचं गाणं मला मनोवेधक वाटतं. पण नवीन पिढीतील गायक बुद्धिमान असूनही पूर्वीच्या मानानं पाहिलं तर त्यांची मेहेनत फारच कमी पडते म्हणून ते फार काळ टिकू शकत नाहीत, याची मला नेहमीच खंत वाटते.

रसिकहो, ही परवीन सुलतानाची माहिती आणि विचारप्रणाली ऐकीव नसून नवी दिल्लीतील पं. पलुस्कर संगीत समारोहामध्ये मी गाण्यासाठी गेलो होतो तिथे तिच्याशी प्रत्यक्ष मनमोकळी चर्चागप्पा करूनच ही मुलाखत मी सादर केली आहे, हे सांगायला मला अभिमान वाटतो.

**दिल्लीतील पं. पलुस्कर संगीत समारोह सन १९८० मध्ये :**

मी पाहिला दिल्ली येथील पं. विष्णु दिगंबर पलुस्कर संगीत समारोह प्रतिवर्षी ऑगस्टमध्ये तेथील 'गांधर्व महाविद्यालय' आणि 'श्री सरस्वती समाज' या दोन संगीत संस्थांतर्फे संयुक्तरीत्त्या साजरा केला जातो. हिंदुस्थानातील अनेक लोकप्रिय कलाकारांचे गायन-वादन कार्यक्रम साजरे केले जातात. असा हा संगीत महोत्सव नव्या दिल्लीतील 'कमानी' या वातानुकूलित आलिशान सभागृहामध्ये पांच संगीत सभा होऊन अतिशय उत्साहान साजरा झाला. रोज सहा-सहा तास आपली जागा न सोडता तन्मयतेनं कार्यक्रम ऐकणारे दिल्लीतील रसिक श्रोते संगीत श्रवणात तहान-भूकही विसरतात हे दृश्य स्तिमित करणारं होतं. श्रोते, संयोजक आणि कलाकार यांचा सुंदर त्रिवेणी संगम तसा दुर्मिळच.

**समारोहाचा शुभारंभ :**

दिनांक २१ ऑगस्ट रोजी सायंकाळी सहा वाजता आकाशवाणी मंत्री व संगीत तज्ज्ञ श्री. वसंतराव साठे यांनी पं. विष्णु दिगंबर यांच्या भव्य प्रतिमेला पुष्पहार घालून व समयोचित भाषण करून शुभारंभ केला. नंतर लगेच माझ्या गायन

कार्यक्रमानं संगीत समारोहाचा प्रारंभ झाला. समयोचित राग पूरिया ख्याल 'कैसा मोह परे' व 'शामसुंदरवा' द्रुत चीज सादर करून 'तुम मत जावो मुरारी' ही खमाज ठुमरी पेश केली व माझा कार्यक्रम सव्वा तासानं संपविला.

माझ्यानंतर दीपक चौधरी यांचं सतार वादन, रत्नाकर गोखलेंचं व्हायोलिन वादन झाल्यावर श्रीमती परवीन सुलताना रंगमंचावर प्रगट झाल्या. हार्मोनियम साथीस महमूद घोलपुरी आणि तबला साथीस दिल्ली आकाशवाणीचे श्री. फैय्याज खाँ होते.

श्रोत्यांनी उत्स्फूर्तपणे या कलावतींचं स्वागत केलं. परवीनबाईंनी विनम्रपणे हात जोडून या स्वागताचा स्वीकार केला. अन् 'मारुबिहाग' चा थोडा आलाप विस्तार करून 'रसिया हो न जाय' हा विलंबित ख्याल एक तालामध्ये पूर्ण बंदिशीसह गाऊन विविध स्वर वलयांनी हरकती खटके मुरक्यांसह मारुविहाग सजविला. त्यांत लयकारीचे सरगम प्रकार, बोल आलाप, बोलताना, गमकताना, अतिजलदताना इ. सर्व प्रकार अतितार सप्तकाच्या षड्जापर्यन्त सहजतेने गाऊन बाईंनी या श्रोतृवृंदाला थक्क करून सोडलं. टाळ्यांचा दीर्घकाळ प्रतिसाद मिळाला.

" परवीन सुलताना हे संगीतातील एक आश्चर्यच " अशा शब्दांत दिल्लीकर रसिक आपसात चर्चा करताना दिसत होते. ख्यालांच्या शब्दांचे भावनेसह स्पष्ट उच्चार हिशेबी तिहाया घेऊन सहजपणे समेवर येणं हे त्यांच्या गायकीचं खास वैशिष्ट्य आहेच पण आत्मकेंद्रित वृत्तीने ताठयात न राहता कुशल साथीदारांचं, गाताना कौतुक करणं हे त्यांच्या दिलखुलास वृत्तीचं द्योतक जाणवत होतं. त्या दोघांनी पोषक साथसंगत करून गाणं रंगवलं. 'मारुविहाग' द्रुतख्याल उत्कृष्ट आलाप तानांनी नटला नंतर दीपचंदी तालातील खमाज ठुमरीत विविधरंगी भावाविष्कारांनी शृंगाररस व्यक्त झाला. ठुमरी संपविताना तबलजीनं दुगणीमध्ये लग्ग्यांचे अनेक प्रकार वाजवून श्रोत्यांची 'वाहवा' घेतली.

यावेळी मध्यंतर न घेताच तंबोऱ्यामध्ये पंचमाऐवजी मध्यम लावून 'मालकंस' रागाची आलापी सुरू केली आणि मध्यलयीच्या झपतालामध्ये 'सासुंदर बदनके' ही लोकप्रिय चिज वेगळ्याच ढंगानं गाऊन लयकारीनं आणि कठीण तानप्रकारांनी

पेश केली. 'मालकंस' च्या द्रुत त्रितालातील एक चिज गायिल्यावर श्रोत्यांच्या खास आग्रहास्तव एक ' मीरा भजन' भक्तिभावानं तन्मयतेनं गायलं ते 'मेरे तो गिरिधर गोपाल'. कोणताही गानप्रकार त्या त्या वैशिष्ट्यांसह खुलवून रंगविणं ही विशेषता त्यांच्या गायनात प्रकर्षाने जाणवते.

**अप्रतिम तानेची तयारी :**

आकाशवाणी मंत्री श्री. वसंत साठे यांनी खुणेनं मला आपल्या शेजारच्या खुर्चीवर बसायला बोलावलं. मी त्यांच्या शेजारी बसल्यावर ते म्हणाले 'बाईची तयारी अफाट आहे पण अति उंच स्वरापर्यन्त तान नेण्यामुळे त्या तानेत कर्कशपणा येतो, हा लोकापवाद त्यांच्या कानापर्यन्त पोचल्यामुळे की काय कोण जाणे पण आज मात्र अतितार सप्तकांतले स्वर लावताना त्यात मृदु मधुर गोडवा राहील याकडे त्यांनी विशेष लक्ष दिलेलं जाणवलं आहे खरं ना? माझ्याच मनातले विचार या संगीत तज्ज्ञ, व्यक्तीनं बोलून दाखविल्यानं मी हसून सहमती दर्शविली. यावेळी परवीन बाईंनी तंबोऱ्यातील मध्यमाऐवजी पंचम जुळविला आणि भैरवीतील एक ढंगदार गीत अध्यात्रितालामध्ये सादर करून त्यांनी आपला रंगतदार कार्यक्रम रात्री साडेबारा वाजता संपविला. प्रदीर्घ टाळयांच्या गजरानं श्रोत्यांनी व्यक्त केलेल्या पसंतीचा स्वीकार, श्रोत्यांना नम्रपणे वारंवार अभिवादन करून त्यांनी प्रसन्न वदनानं केला. श्रोत्यांच्या आनंदानेच कलाकाराला श्रेष्ठ आनंद मिळत असतो हेच खरं. हे खरं स्नेहसंमेलन.

या संगीत महोत्सवासाठी माझ्याप्रमाणेच परवीन सुलताना, कंकणा बॅनर्जी, पं. वसंतराव देशपांडे, पं. मणिरामजी व पं. जसराज ही सारी कलाकार मंडळी गांधर्व महाविद्यालयातील पं. विनयचंद्र मौदगलय यांच्या निवासस्थानी एकत्र होतो. त्यांत संगीतज्ञ पु. ल. देशपांडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. चहाफराळ, मिष्टान्नभोजन, गप्पा विनोद, चर्चा सारं काही चार पांच दिवस आमचं मजेत चालू होतं. एकमेकांच्या कार्यक्रमाला सभागृहात बरोबर जाणं येणं एकमेकांच्या कार्यक्रमांना समोर बसून प्रोत्साहन देणं हे सारे स्नेहपूर्ण वातावरणात आमचं चालू होतं. हे खरं स्नेहसंमेलन वाटलं आणि अनुभविलं. आजकाल वेगवेगळ्या कंपन्यांच्या आर्थिक मदतीनं गल्लाभरू बाजारी संगीत संमेलनं,

कुणातरी श्रेष्ठ दिवंगत कलाकाराच्या नामफलकानं साजरी केली जातात पण त्यात कलाकारांच्या प्रेमळ गांठीभेटी, सुख संवाद, एकत्र विचारविनिमय, विविध समस्यांवर चर्चा होतात काय? फार काय संचालकाच्या ध्यानीमनी तरी ही गोष्ट असते काय? मुळीच नाही. कार्यक्रमाच्या सभागृहात प्रत्येक कलाकार आपली हजेरी लावून आपली बिदागी घेण्यापुरता थांबतो. दुसऱ्या कलाकारांचा कार्यक्रम ऐकायला थांबण्या इतकंही सौजन्य त्याच्यापाशी नसतं. ही सत्यस्थिती असताना अशा कार्यक्रमांना 'संमेलन हे नांव देणं ही शुद्ध फसवणूक आहे' हे माझे प्रामाणिक विचार परवीन सुलताना यांच्यासमोर आकाशवाणी मंत्री संगीत तज्ज्ञ श्री. वसंत साठे यांना मी सांगितले ते त्यांना खूप आवडले, त्यांनी या प्रसंगाची आठवण म्हणून आम्हा सर्व कलाकारांसह एकत्र फोटो काढून घेतला. त्याची एकेक प्रत आम्हा सर्व कलाकारांना भेट म्हणून दिली. अन् श्रीमती परवीन सुलताना यांच्या यशस्वी (दिल्लीतील) कार्यक्रमाबद्दल गांधर्व महाविद्यांलयामध्ये सभा घेऊन त्यांचे आम्ही सर्वांनी हार्दिक अभिनंदन केलं. त्यांत प्राचार्य पं. विनयचंद्र मौद्गलयही सामील झाले आणि त्यांनी श्रीमती परवीन सुलताना यांना पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ प्रदान करून सत्कार केला.

(रविवार, नवशक्ती २९ मार्च ९८.)

• • •

# सुस्वरप्रभा : प्रभा अत्रे

किराणा घराण्याच्या गायिका श्रीमती प्रभा अत्रे या आजच्या संगीत विश्वातील मैफिलीच्या कलाकार-एक प्रथितयश कलाकार- म्हणून ओळखल्या जातात. अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या "संगीताचार्य" या गायन परीक्षेत उत्तमरीतीनं यशस्वी झाल्याचं वृत्त १९७५ मध्ये जेव्हा प्रसिद्ध झालं तेव्हा त्यांचं सर्वत्र अभिनंदन केले गेले. प्रभाताई ह्या मूळच्या पुण्याच्या. रास्तापेठ एज्यु. सोसायटी हायस्कूलचे प्रमुख प्राचार्य श्री. डी. पी. अत्रे ह्या शिस्तप्रिय सद्‌गृहस्थांच्या त्या सुकन्या.

**आठव्या वर्षीच संगीताचा अभ्यास :**

१३ सप्टेंबर १९३२ हा त्यांचा जन्मदिन. लहानशा प्रभाला निसर्गतः गोड आवाज आहे. आणि आवडही आहे हे पाहून आबासाहेब अत्रे यांनी तिला पद्धतशीर संगीताचे शिक्षण द्यायचं ठरवलं आणि त्यांनी दाजी तथा विजय करंदीकर या गायकाची शिकवणी तिला वयाच्या आठव्या वर्षीच नियमितपणे सुरू केली.

बुद्धिमान प्रभानं तीन वर्षांच्या अवधीत स्वरतालाची ओळख, रागांचा परिचय इत्यादी सर्वसामान्यज्ञानापेक्षाही छोट्या छोट्या बैठकी करण्याइतकी तयारी करून सर्वांना चकित केलं. फार काय मीही चकित झालो. तो सुयोग असा की, औंध दरबारची नोकरी सोडून श्रीमंत राजेसाहेबांच्या अनुज्ञेनं १९४१ मध्ये मी पुण्यात आलो ते ढंगदार गायकीचं प्रगत शिक्षण घेण्यासाठी श्रीमंत सरदार आबासाहेब मुजुमदार यांच्या आग्रहावरुन. मास्तर कृष्णराव व पं. बापूराव केतकर यांच्याकडे माझं शिक्षण चालू होतं. त्यावेळी चरितार्थासाठी मी पुणे

भारत गायन समाजात शिक्षकाचं काम आणि घरोघरी जाऊन गाण्यांच्या शिकवण्या करीत होतो. १९४२ मध्ये 'रास्तापेठ एज्युकेशन' संस्थेत संगीत शिक्षकाची जरुरी होती म्हणून प्रभा अत्रे या बाल गायिकेचे संगीत शिक्षक श्री. दाजी तथा विजय करंदीकर यांनी त्या संस्थेत, संचालक आबासाहेब अत्रे यांची मुलाखत घडवून आणली. मुंबई रेडिओवरून माझे कार्यक्रम ऐकणारे ते माझे चहाते होते हे जाणवलं. त्यांनी माझं सहर्ष स्वागत केलं आणि प्रभाचं गाणे ऐकविण्यासाठी त्यांनी मला घरी नेलं त्या बालगायिकेनं धीटपणानं राग दुर्गाची चीज मला आलाप तानांसह व्यवस्थित ऐकवली. मी थक्क झालो, मी तिला बक्षीस देऊन कौतुक केलं.

अत्रे यांच्या संस्थेत मी नियमितपणे संगीत शिक्षकाची नोकरी करू लागलो आणि अल्पावधीत ते मला '' आपला माणूस '' मानू लागले.

शाळेतल्या कामाचा माझा नियमितपणा, शिस्तबद्ध वागणं, विद्यार्थ्यांना विश्वासात घेऊन त्यांना कळकळीनं संगीत शिकवणं, प्रगती साधणं यामुळे ते माझ्यावर प्रसन्न असत अन् नवनवीन उपक्रम करवून घेत.

शाळेच्या प्रार्थनेला ते स्वतः रोज उपस्थित असत. संगीत हा तर त्यांचा आवडता विषय होता. नवनवीन स्वररचना करून मी विद्यार्थ्यांना वर्गावर शिकवीत असे. अशाच वर्गात प्रभा आणि उषा अत्रे यांनाही शिकविण्याचा योग मला लाभत असे. त्यात इतर हुषार विद्यार्थ्यांमध्ये त्याही आपले कौशल्य सिद्ध करून मला व आबासाहेबांनाही आनंद देत असत. याचा उल्लेख इथं आवश्यक आहे.

उषाताईंचा ओढा प्रगत सुगम संगीताकडे होता पण प्रभाताई मात्र लहानपणापासून ख्याल गायकीमध्येच आहेत.

**पडद्यामागील सूत्रधार आबासाहेब अत्रे :**

'प्रभा' या नावाप्रमाणे त्या कीर्तिमान आहेत पण ध्येयनिष्ठा, चिकाटीनं मेहनत हे गुण त्यांच्या शिस्तप्रिय व कष्टप्रिय पित्यानंच जागृत ठेवले हे मी जवळून पाहिलं आहे. पडद्यामागील सूत्रधार आबासाहेबच आहेत यात संशय नाही पण त्यांचा

तसा उल्लेख आतापर्यंत कुणीच केला नाही ही गोष्ट खेदकारक आहे एवढच नव्हे तर अन्यायकारक आहे. या दोघींनी संगीतात श्रेष्ठस्थान मिळवावं यासाठी ते जाणीवपूर्वक कष्ट घेत असत त्याचं एक उदाहरण सांगतो. १९४९ मध्ये नाट्यमंदिर या नाट्यसंस्थेचे ''मदिरा'' व ''नंदादीप'' या संगीत नाटकांचे प्रयोग पुण्यात भानू विलास थिएटरमध्ये जाहीर झाले होते. त्यात माझी प्रमुख भूमिका व संगीत नियोजनही माझंच होते. २४ जानेवारी १९४९ रोजी मदिरा नाटकाच्या प्रथम प्रयोगाला मा. कृष्णराव, गोविंदराव टेंबे, पं. बापूराव केतकर, नटवर्य दामू अण्णा मालवणकर व श्रीमंत सरदार आबासाहेब मुजुमदार या प्रसिद्ध व्यक्ती निमंत्रणानुसार उपस्थित होत्या. त्यात आबासाहेब अत्रे व प्रभा अत्रेही होतीच. प्रयोगानंतर माझे अभिनंदन करण्यासाठी ही सर्व मंडळी रंगपटात आली. त्यांच्याबरोबर सिनेदिग्दर्शक व नट राजा नेने आले होते. मास्तर कृष्णराव मला म्हणाले, '' तुमच्या भेटीसाठी हे राजा नेने आले आहेत. त्यांच्या 'संत रामदास' या चित्रपटासाठी त्यांना तुमचा प्लेबॅक हवा आहे. संगीतनियोजन माझंच आहे तेव्हा तुम्ही उद्या दुपारी माझ्याकडे रिहर्सलसाठी या, ही प्रभा अत्रेही त्यात आहेच ''. रिहर्सल होऊन प्रभातमध्ये रेकॉर्डिंगची तारीख ठरली त्याप्रमाणे रात्री १० ते १ पर्यंत शाहीर आफळे व प्रभा अत्रे यांचं एकत्र रेकॉर्डिंग झाल्यावर माझं रेकार्डिंग सुरू झालं. 'येथे उभा कां श्रीरामा' या श्रीसमर्थांच्या अभंगाचं माझं रेकॉर्डिंग संपायला पहाटे तीन वाजले, त्यानंतर पुन्हा प्रभाताईचे रेकॉर्डिंग होतं रात्रभर ताटकळत बसून आबासाहेब संगीताचा आनंद घेत होते. झोप नाही की आळस नाही. सकाळीच पुन्हा शाळेत वेळेवर हजर. उषाताईच्या अभ्यासाकडे व गायनाच्या प्रगतीकडे त्यांचे कळकळीचं लक्ष असे म्हणूनच ती भविष्यात नामवंत पार्श्वगायिका झाली शिवाय वैद्यकीय अभ्यास पूर्ण करून सौ. उषा वाघ ही प्रथितयश डॉक्टरही झाली. (आज ती हयात नाही. )

या प्रेमळ पित्याच्या कडक शिस्तीचा, महत्त्वाकांक्षेचा जाच प्रभाताईंना बरेच वेळा जाणवला असणार पण म्हणूनच त्या बी.एस.सी; एल.एल.बी. इत्यादी शैक्षणिक प्रगती आणि संगीतात डॉक्टरेट अन् पद्मश्री ही मिळवू शकल्या हे कधीच विसरता

येणार नाही. त्यांना प्रभाताईच्या या सुयशाचा फार अभिमान वाटत होता. पण प्रभाताईंनी आकाशवाणीवर प्रोड्युसरची नोकरी धरल्याबद्दल मात्र ते खूप नाराज होते. तिचा गाण्याचा रियाझ सुटेल, तिची प्रगती खुंटेल असं त्यांना तळमळीनं वाटे. माझ्यापाशी ते मोकळ्यामनाने बोलत.

प्रभाताईच्या आवाजाचा धर्म आणि बुद्धिमत्ता लक्षात घेऊन संगीततज्ज्ञ आबासाहेबांनी तिच्या गायन शिक्षणाची योग्य योजना केली होती.

**हिराबाई बडोदेकरांचा आदर्श :**

किराणा घराण्याचे अग्रेसर व हिराबाई बडोदेकर यांचे थोरले बंधू सुरेश बाबू माने ह्यांचे मार्गदर्शन १९४७ ते १९५३ पर्यंत सातत्यानं प्रभाताईंना लाभलं पण अचानकपणे सुरेशबाबूंच निधन झालं. प्रभाताई फार दुःखी झाल्या. दुसऱ्या कुणाकडे गाणे शिकण्याची कल्पनाही त्यांच्या मनाला सहन होईना. प्रभाताई बी.एस.सी. झाल्या. एल.एल.बी झाल्या याचवेळी गाण्यासाठी केंद्र सरकारची शिष्यवृत्ती त्यांना मिळाली.

त्यांनी हिराबाई बडोदेकरांचे नाव 'ट्यूटर' म्हणून दिलं. आणि हिराबाईंकडे त्या नियमितपणे शिकत होत्या. या शिक्षणामुळे हिराबाईंच्या सहवासात प्रभाताईंना मैफलीत गाण्याची योग्य समज आली. कारण मैफिल यशस्वी करण्याचा आदर्श म्हणजे हिराबाई बडोदेकर.

१९२२ पासून हिराबाईंनी संगीतकलेच्या व्यासपीठावर शालीनतेने आणि प्रतिष्ठीतपणे पदार्पण केले. तसंच संगीत नाट्यसृष्टीतही आपल्या शालीन आणि सभ्य आचारविचारानं रसपूर्ण गायनशैलीनं गायनांचे जाहीर जलसे करून कुलीन स्त्रियांपुढे एक श्रेष्ठ आदर्श ठेविला होता.

**आवाजाची निसर्गदत्त देणगी :**

निर्मळ, गोड मुलायम मादकता असलेला आवाज ही त्यांची निसर्गदत्त देणगी आणि त्यावर ख्याल गायकीचा संस्कार, खाँसाहेब अब्दुल वहिद खाँ यांच्याकडून झाल्यामुळे त्याला पीळ, वजन, भरीवपणा अन् मेहनतीची गोलाई प्राप्त झाली

होती. अत्यंत बंदिस्त असा अस्ताई अंतरा हे त्यांचे महत्त्वाचं अंग होते. संथ मुलायम आलापचारी, त्यातून प्रगट होणाऱ्या विपुल स्वरांच्या विविध आकर्षक आकृतिबंध मालिका, बेताची लयकारी असलेली सुरेल आलापप्रधान गायकी, त्यात शिस्तबद्ध क्रमशः बढत आणि मधुर सहज तान प्रकार इत्यादी विशेष गुणामुळे त्यांची मैफील नेहमीच रसिकमान्य होत असे.

त्यांच्या मैफिलीत ख्याल , ठुमरी, नाट्यगीत, भजनं या सर्व प्रकारांचा प्रभावी समावेश असायचा. बनारसी व पंजाबी यातील चांगलं निवडून आपल्या भावदर्शक गायकीनं आणि कल्पकतेने ठुमरी पेश करायच्या. प्रभाताईंना गाणे शिकविताना त्यांची ग्रहणशक्ती लक्षात घेऊन हिराबाईंनी आपल्या गाण्यातलं सारं कौशल्य त्यांनी पणाला लावलं होते, हे प्रभाताईंचे गाणं ऐकून सर्व रसिकांना जाणवलं आहे. त्यांच्या शिक्षणांचं प्रभाताईंनी योग्य ते चीज केलं आहे यात शंका नाही.

### विद्यादानाचं व्रत :

पहाटे पाचपासून रात्री नऊ वाजेपर्यंत शिष्यांना कळकळीनं व मुक्तहस्तानं विद्या देण्याचं बहुमोल कार्य हिराबाईंनी आयुष्यभर सातत्याने केले आहे या ज्ञानसत्रातून त्यांच्या स्वतःच्या घराण्याच्या गायकीचा वारसा त्यांच्या भगिनी व शिष्या सरस्वती राणे यांचा उल्लेख प्रामुख्याने करावा लागेल. आणि हिराबाईंच्या शिस्तबद्ध सुरेल गायकीची, आलापप्रधान गायकीची श्रवण मनोहर प्रतिकृती म्हणून डॉ. प्रभा अत्रे यांच्याकडे पहाता येईल. अत्यंतिक स्वरुपाची निष्टा, चिकाटी, आराधनेतील सातत्य अन् समरग्ता इत्यादी कलागुणांमुळे त्यांनी असामान्य यश संपादन केलं आहे.

### संगीत नाटकाशीही संबंध :

केंद्र सरकारची शिष्यवृत्ती मिळाली त्या काळात 'पूना सोशल क्लब' या संस्थेने प्रादेशिक नाट्यस्पर्धेसाठी 'शारदा' हे संगीतप्रधान नाटक केलं त्यात प्रभाताईंची शारदेची भूमिका खूप गाजली व त्यानंतर विद्याहरण, संशय कल्लोळ इत्यादी नाटकांतूनही त्यांनी प्रमुख भूमिका केल्या. त्यामुळे त्यांना नवीन दृष्टी लाभली असं जाणकारांचं मत आहे.

१९५९ साली आकाशवाणीवर त्यांची असिस्टंट प्रोड्युसर म्हणून क्लासिकल व लाईट म्युझिकसाठी नेमणूक झाली. नागपूर व मुंबई केंद्रावर मिळून त्यांनी दहा वर्षे ही सरकारी नोकरी केली.

नागपूरला असताना अमीर खाँच्या गाण्यानं त्यांना भारून टाकलं, त्या गायकीच्या अंतरंगाची ओळख त्यांनी करून घेतली. आपली मूळ किराणा गायनाची बैठक कायम ठेऊन त्याची खास वैशिष्ट्यं योग्य प्रमाणात स्वीकारून आपली गायकी समृद्ध केली. ठुमरी गायनात बडेगुलाम अली खाँ व रोशन आरा बेगम यांना त्या आदर्श मानतात, त्यामुळे प्रभाताईंचे हिंदी उर्दू उच्चार चांगले झाले. पण त्यांची ठुमरी मात्र स्वरप्रधान ख्याल अंगाचीच वाटते, असं समीक्षकांचं मत आहे.

हा सारा अभ्यास करताना त्यांच्यातला रचनाकार जागा झाला आणि वेगवेगळ्या मोहक सौंदर्यानं व लयीन नटलेल्या आकर्षक बंदिशी बनविण्याचं काम सुरू झालं. ते कायम चालूच असतं. बिहाग रागातील 'ऐसोमन मोहन' 'कलावती' मधील 'तनमनधन' अन् 'हंसध्वनी' तला डौलदार 'तराणा' 'बागेश्री' रागातील 'पियाबिन नींदीया आये न' अशा सुरेख चिजा लोकप्रिय झाल्या. कारण मैफिलीत त्या सादर करण्यात त्यांचे कौशल्य विशेष दिसतं.

**मैफिल एक आठवण :**

स्वर्गीय पंडित विष्णु दिगंबर पलुस्कर यांच्या स्मरणार्थ 'संगीत शिक्षक संघ मुंबई' या संस्थेतर्फे पलुस्कर भवनाची योजंना आखण्यात आली होती. त्याचे मदतीसाठी नामवंत गायिका डॉ. प्रभा अत्रे यांच्या श्रवणीय गायनाचा कार्यक्रम शनिवार दि. २९जून १९८० रोजी रात्री दादरच्या छबिलदास स्कूलच्या भव्य सभागृहात सादर करण्यात आला. भवन समितीच्या प्रमुखांनी यथोचित शब्दात प्रभाताईंचा व साथीदारांचा परिचय करून दिल्यावर रात्री साडेनऊ वाजता प्रभा अत्रे यांच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली. श्रोते भरपूर व जाणकार रसिक होते

त्यामुळे प्रथमपासून प्रभाताई प्रसन्न होत्या. हार्मोनियम साथीस अनंत राणे, तबला साथीस डी. आर. नेरुरकर हे उत्कृष्ट साथीदार होते. तंबोऱ्यावर गायनसाथीस विजया पत्की आणि अलका जोगळेकर या दोन्ही शिष्या होत्या. आजच्या मैफिलीचा प्रारंभ प्रभाताईंनी 'सरस्वती' रागातील विलंबित एकतालाचा ख्याल अतिशय संथ लयीत सुरू केला. त्यांच्या मधाळ आवाजात किराणा घराण्याच्या आलापविस्ताराचं खास वैशिष्ट्य प्रकर्षाने जाणवत होते. विलंबितमध्ये 'सरगम' अन् गमकेचे बरेच प्रकार करून 'माता सरस्वती देवी' ही द्रुत एकतालातील बंदिश विविध तान प्रकारांनी छानच रंगली. एक तासानं 'सरस्वती' राग पूर्ण झाला. त्यानंतर द्रुत त्रितालामध्ये 'शिव हर हर महादेव शंकर' ही शंकरा रागांतली नवीन बंदिश ऐकवली. या दोन्ही रागांमध्ये त्या रागांची नावे असलेल्या दैवतांची स्वरचित स्तवनगीतं ऐकविण्यात फार मोठे औचित्य प्रभाताईंनी साधल होतं. श्रोते खूष होते. 'शंकरा' नंतर मिश्र खमाज ठुमरी दीपबंदी तालामध्ये विविध भावपूर्ण बोल आलापांनी व दुगणीनं छानच रंगली. मध्यंतरानंतर साडेबारा वाजता 'कीर्वाणी' या लोकप्रिय रागामध्ये विलंबित झपतालातील 'नंदनंदन मनमोहन' या ख्यालामध्ये शांत धीमी आलापी करून कर्नाटकी शैलीतील आलापी मधून मधून केल्यामुळे नाविन्य म्हणून श्रोत्यांनी मनापासून दाद दिली. या रागात सफाईदार ताना भरपूर घेतल्यामुळे व त्याला जोडून एकतालातील तराणा गायिला गेल्यानं श्रोत्यांनी पसंतीचा प्रतिसाद मनापासून दिला.

मधुर आलापांतील सौंदर्यदृष्टी, कल्पनाचातुर्य हे गुण विशेष त्यांच्यामध्ये चित्ताकर्षक असल्यानं त्यांचा कार्यक्रम श्रुतीमनोहर होतो हे विशेष होय.

'ए जैयो सावरे' आणि 'जा मै तोसे नाही बोलू रे' ही दादऱ्यातील भैरवी भावपूर्ण गाऊन रात्री दीड वाजता त्यांनी हा कार्यक्रम टाळयांच्या गजरात संपन्न केला.

'कलाकाराला नोकरीचं बंधन मानवत नाही' अशी म्हण आहे. तद्नुसार गान पंडिता डॉ. प्रभा अत्रे यांनी आकाशवाणीची नोकरी सोडून स्वरसाधनेत त्या मुंबईत रमल्या आहेत. पासष्टी ओलांडूनही चिरतरुणीप्रमाणे अखंड गात आहेत. त्यांना मी सुयश चिंतितो.

(रविवार, नवशक्ती १९ एप्रिल ९८.)

• • •

## सुस्वर वीणा

### वीणा सहस्त्रबुद्धे

कानपूरमध्ये एकेकाळी संगीत कलासाधना करणारी उदयोन्मुख गायिका म्हणून लोकप्रिय असलेली कुमारी वीणा शंकर बोडस आज बुद्धिमत्तेनं, स्वतंत्र शैलीनं, ढंगदार गायनामुळे 'मान्यवर कलाकार' म्हणून मान्यता पावलेली श्रेष्ठ गायिका आहे, सौ. वीणा सहस्त्रबुद्धे. माणूस लहानपणापासून ज्या वातावरणात वाढतो, संस्कार ग्रहण करतो तसा तो घडतो. संगीतोद्धारासाठी ज्यांनी शेकडो मुलांचं पालन-पोषण करून ध्येयवादी शिष्यसंप्रदाय निर्माण केला व सर्वत्र विद्यालयं स्थापन करून आपल्या शिष्यांकरवी संपूर्ण हिंदुस्थानात शास्त्रीय संगीताचा प्रसार केला त्या गायनाचार्य पं. विष्णु दिगंबर पलुस्करांचे एक नामवंत गायक शिष्य पं. शंकरराव बोडस यांची सुकन्या म्हणजे वीणा ही शिष्या, गायिका होय. सेवाव्रती गवई शंकरराव बोडसांच्याकडे इतर विद्यार्थ्यांबरोबर व कधी स्वतंत्रपणे या मुलीनं बालपणापासून सातत्यानं संगीताचं शिक्षण घेऊन योग्य रीतीनं मेहेनत केली, हे तिचं परमभाग्य.

**पिता आणि गुरु शंकरराव :**

शंकररावांनी गुरुंच्या आज्ञेस अनुसरुन उत्तरप्रदेशात कानपूर येथे संगीत प्रचार कार्यासाठी 'गांधी संगीत विद्यालय' १९२८ पासून सुरू केलं व सेवावृत्तीनं गुरुंच्या कार्याला वाहून घेतलं. अर्थात त्यामुळे गुरुंचे शुभाशीर्वाद लाभले. त्यांनी मैफिलीचे श्रेष्ठ गायक म्हणून लौकिक संपादन केला. रसिकांना बिदागीसाठी

कधी अडवलं नाही, त्रास दिला नाही. जनसेवा ही ईशसेवा म्हणूनच हा व्यवसाय करावा हा आदर्श त्यांनी पुत्र काशिनाथ व कन्या वीणा यांच्यापुढे ठेवला. सुसंस्कार केले ते त्या दोघांनी मनोमन स्वीकारले. आपले आदरणीय पिता व गुरु शंकरराव यांच्या शैक्षणिक सेवाकार्यात त्यांना मनापासून सहकार्य दिलं आणि संगीत कलेचं निष्ठेनं शिक्षण घेऊन प्राविण्य मिळवलं. वीणाताईंची जडणघडण अशा संस्कारात झाली. त्यामुळे संगीताबरोबर सौजन्याचाही लाभ तिला नकळत झाला.

एखाद्या क्षेत्रात यश, धन, किर्ती मिळालेल्या कलाकार व्यक्ती सहसा मनमोकळेपणानं कुणाशी वागत, बोलत नाही; आत्मकेंद्रित होऊन म्हणजे स्वतःच स्वतःला मोठ्ठ समजून उगीचच ताठरपणाचं प्रदर्शन करतात. यामुळे रसिकाच्या मनात आदराऐवजी घृणा मात्र निर्माण होते. ते व्यक्तिमत्व वादग्रस्त ठरतं. रसिक श्रोत्यांना जनताजनार्दन-परमेश्वर मानून सेवा भावनेनं रात्र रात्र मनसोक्त गाऊन त्यांना संतुष्ट करणाऱ्या गवैयांचा आदर्श आमच्या पं. भास्करबुवा बखले, बालगंधर्व, मा. कृष्णराव, पं. बापूराव केतकर या श्रेष्ठ कलाकारांनी ठेवला आहे. त्यांनी बिदागीसाठी कधी कुणाची अडवणूक केली नाही. म्हणूनच ते जनार्दनाच्या कृपेला पात्र ठरले. लोकप्रिय झाले. याच संदर्भात आपल्या पिताश्रींप्रमाणे मनमोकळा स्वभाव, प्रसन्न व्यक्तिमत्व आणि संगीतसाधनेबद्दल त्यांचे प्रगत विचार ऐकून खूप समाधान वाटतं, वीणाताईंच्या सहवासात. पं. शंकरराव बोडस व पं. लक्ष्मणराव बोडस हे पलुस्करांचे शिष्य व सख्खे बंधू गुरुंच्या आदेशानुसार लक्ष्मणराव कराचीला आणि शंकरराव कानपूरला संगीत विद्यादानाचं कार्य निष्ठेनं आयुष्यभर करत होते.

लक्ष्मणरावांचे पुत्र नारायण बोडस हे उत्तम गवई आणि मराठी रंगभूमीवरील प्रथितयश गायक नट म्हणून प्रसिद्ध आहेत व त्यांचा सुपुत्र केदार बोडस हाही आपली गायन परंपरा पुढे चालविणारा समर्थ होत आहे. आणि शंकरराव बोडस

यांचा काशिनाथ बोडस हे व वीणाताई आपला वारसा पुढे नेत आहेत. ही गोष्ट आम्हा सर्वांना आनंदाची व अभिमानाची आहे ह्यात संशय नाही. कारण हल्ली निष्ठेची चेष्टा झालेली दृष्टीस पडते. कालाय तस्मै नमः।

**वीणाताईंची संगीत साधना :**

कानपूरचे गांधी संगीत विद्यालय हे उत्तर प्रदेशातलं महाराष्ट्रीय कलाकारांचं माहेरघर. गाण्याच्या कार्यक्रमांसाठी येणारे छोटेमोठे कलावंताचं हे प्रेमाचं आश्रयस्थान होतं. त्यामुळे वेगवेगळ्या घराण्याची गाणी वीणाताईंना मनसोक्त ऐकायला मिळाली. जिव्हाळ्याचे स्नेहसंबंध कसे ठेवावेत, त्यांतून श्रेष्ठ आनंद घेऊन आदरसत्कार कसे करावेत हेही संस्कार काशिनाथ व वीणाताईंना अनायासे लाभले. त्यामुळे केवळ आपल्या ग्वाल्हेर घराण्याचंच गाणं श्रेष्ठ आहे हा दुराभिमान गळून गेला व अन्य घराण्यांच्या गानशैलीतील विशेष गुणांकडे त्यांचं मन आकर्षित झालं आणि ते गुण त्यांनी सतत आत्मसात करून आपलं गाणं संपन्न बनवलं आणि पिताश्रींनाही ते मान्य झालं.

विद्यालयांच्या शैक्षणिक कार्यात आपल्या बंधूप्रमाणेच वीणाताईंनी आनंदाने पिताश्रींना सहकार्य दिलं. प्रगत शिक्षण देण्यामुळे आपलीही विचारशक्ति वाढते, कलात्मकता वाढते ही गोष्ट वीणाताईंनी मान्य केली व आपल्या बंधूप्रमाणेच तबला वाजवून त्या शिकवू लागल्या. त्यामुळे लय, ताल आपोआपच पक्के झाले. कॉलेजचा अभ्यास सांभाळून १९६९ मध्ये त्यांनी गायनात 'संगीत अलंकार' पदवी प्राप्त करून घेतल्यावर रेडिओ कार्यक्रम करणं, खाजगी कार्यक्रम यशस्वी करणं हे नियमितपणे त्यांनी सुरू केलं, ते १९७६ पासून.

त्यापूर्वी १९७२ मध्ये आकाशवाणीवर शास्त्रीय गायन स्पर्धेत त्या सर्वप्रथम आल्या. शास्त्रीय संगीताबरोबर सुगम संगीताचा शिस्तबद्ध अभ्यास त्यांनी मनापासून केला त्यात कमीपणा मानला नाही. त्यातील विविध प्रकारही त्यांनी आत्मसात केले. 'भजन' गायन प्रकार त्यांना जास्त मानवला असं

त्यांच्या मैफिली ऐकून रसिकांना जाणवलं. १९८३ पर्यंत त्यांनी आपलं प्रभुत्व सिद्ध करून दाखवलं. कुमार गंधर्वांचं येणं जाणं खूप कानपुरला. त्यामुळे त्यांच्या मैफिली खूप ऐकल्या. आपल्या घरी त्यांच्या मुक्कामात त्यांच्याकडे वीणाताईंना शिकायलाही खूप मिळालं, त्यांचं शैलीदार गाणं खूप आवडतं पण त्यांची नक्कल किंवा अन्य कुणाचीही नक्कल करायला त्यांना आवडत नाही.

**स्वतंत्र प्रतिभेचं गाणं :**

१९७६ मध्ये मी दिल्ली अधिवेशात गायल्यानंतर अ. भा. गांधर्व महाविद्यालयाच्या मंडळाच्या कार्यकारिणीची व प्रबंध परिषदेची मीटिंग होती. अहमदाबाद अधिवेशनात मी निवडून आल्यामुळे व संगीत शिक्षक परिषदेचा प्रमुख म्हणून शंकरराव बोडसांसह या सर्व मीटिंगचे काम आटोपून त्यांच्या आग्रहावरून मी कानपूरला त्यांच्याबरोबर गेलो होतो. त्यामुळे मी सांगतो आहे ते सर्व तिथे प्रत्यक्ष अनुभवलं आहे. ऐकीव माहिती नव्हे.

गांधी संगीत विद्यालयात वीणाताईंच गाणं ऐकून व त्यांच्याशी चर्चा करून मला समाधान वाटलं. विद्यालयातील कार्यही खूप वाखाणण्यासारखं आहे. ५०/६० शिष्या त्यांनी गाण्यात तयार केल्या आहेत.

आजही वीणाताईंचं गाणं म्हणजे कांहीतरी वेगळं स्वतंत्र प्रतिभेचं, साचेबंद नसलेलं ऐकायला मिळणार ही रसिक जाणकारांची खात्री असते. श्रोते गवई असतील तर त्यांना भारदस्त व कठीण राग त्या पेश करतात. प्रत्येक मैफिलीत तेच तेच राग त्याच चीजा यांची पुनरावृत्ती होऊ नये याकडे कटाक्षानं त्या लक्ष देतात, हे जाणवतं.

बंदिशीमधल्या शब्दांचा अर्थ व भावना स्वरांच्या सहाय्यानं व्यक्त करणं याकडेही त्या विशेष लक्ष देतात (गवई लोक नेमकं या गोष्टीकडे दुर्लक्ष करतात).

या आधुनिक विचाराबरोबर समंजसपणाबरोबर प्रत्येक राग त्यांच्या नेमलेल्या समयानुसारच गायिले पाहिजेत. त्यावर त्या रागाचा सुपरिणाम अवलंबून आहे, हे त्यांचं स्पष्ट मत आहे.

पं. गजाननबुवा जोशी (भूतपूर्व औंध दरबारचे गवई) यांच्याकडे शिकण्यासाठी वीणाताई डोंबिवलीस अधूनमधून जात असत. पण हल्ली त्या कुणाकडेच शिकत नाहीत 'यापूर्वी जे भरपूर शिक्षण घेतलंय् त्यावर चिंतन, मनन आणि मेहनत करून ती विद्या वाढवणं यावर आता मी लक्ष केंद्रीत केलंय्' असं त्या गुणीजनांना सांगताना दिसतात. स्वतःचे कार्यक्रम चालू ठेवून संगीताचं शिक्षण देण्याचंही काम एक व्रत म्हणून त्या आजही पुण्यामध्ये करीत आहेत.

नाथीबाई ठाकरसी महिला विद्यापीठात संगीत विभागात प्राध्यापिका म्हणून त्या कार्यरत आहेत. त्या त्यात आनंद घेतात.

**आदर्श गृहिणी :**

त्यांनी गायिलेल्या कॅसेट्स एकाग्रपणे ऐकल्या तर मी जे त्यांच्या गायकीचं वर्णन केलं आहे त्याचा प्रत्यय अवश्य येईल.

त्यांच्या सांगीतिक कार्यात पूर्वी पिताश्री व बंधुराज यांचं सहकार्य लाभलं तर विवाहानंतर त्यांचे पतिराज व कुटुंबीय मंडळी यांचं पूर्ण सहकार्य लाभत गेलं आहे. त्यामुळे समाधानानं आपली प्रगती करीत आहेत.

मैफिलीप्रमाणेच आकाशवाणी व दूरदर्शनचे कार्यक्रम त्या विशेष मेहेनत घेऊन करतातच पण अन्य प्रांतातून त्या आपले कार्यक्रम पार पाडू शकतात, यशस्वी करतात.

निष्ठा, जिद्द व व्यासंग हे पिताजींचे गुण - आदर्श गुण त्यांनी जाणीवपूर्वक अंगी बाणविले आहेत.

कलाकार स्त्री गृहकृत्यांत दक्ष नसते, त्यांत तिचं लक्ष नसतं, तिला त्यात कमीपणा वाटतो असा गैरसमज सर्वसामान्य जनतेमध्ये आहे, पण वीणाताईंचा संसार जवळून पाहिला आहे ते लोक त्या 'आदर्श गृहिणी' असल्याचं आवर्जून सांगतात. मैफिली, विद्यादान आणि संसार या सर्वांमध्ये सारखचं लक्ष देणाऱ्या वीणाताई सहस्त्रबुद्धेंना सदैव यश, धन, कीर्ती लाभत राहो व आयुरारोग्य, संपन्नता लाभत राहो ही माझी हार्दिक शुभकामना.

(रविवार, नवशक्ती १७ मे ९८.)

● ● ●

# सिने संगीतसृष्टीतला एक चमत्कार

## लता मंगेशकर

भगवान गोपालकृष्ण या भूमीवर आपली मधुर बासरी विसरून गेले तीच अव्याहतपणे जणू वाजते आहे, असं वाटतं.

गोव्याच्या गळ्यानं हिंदुस्थानी चित्रपटसृष्टी गाते आहे, असं सांगताना अभिमान वाटतो. सर्व भाषांमधून ती जे गाते ते गाणं अनंताचं भाषा, प्रांत, धर्म ह्या सीमा पार करून ते पुढे गेलं आहे. एवढंच नव्हे परदेशस्थानाही या मंजुळ बांसरीची जबरदस्त मोहिनी पडली अन् सर्वांनी तिचे स्वर झेलले.

देशी-परदेशी संगीतकारांनाही या आवाजानं भुरळ पाडली, हा एक चमत्कारच होय. दिनांक २८-९-२९ च्या सुमूहूर्तावर जन्मलेल्या या लताबाईंचं मोठेपण गाण्याच्या व्यापकपणामध्ये आहे. तिनं केलेल्या गानविद्याभ्यासात - तपस्येत आहे. तंबोऱ्यावर केलेल्या स्वरसाधनेतून निर्माण झालेल्या स्वयंभू गंधारांत आहे, हे फार थोड्या लोकांना माहिती आहे.

संगीत कलेवरच्या अव्यभिचारी निष्ठेतून ज्यांचे जीवन घडलं आहे त्यांना अशी जिद्दी, निष्ठावान माणसं दिसली की, ह्रदय भरून येतं. मीही विनम्र आहे.

"मेरे वतनके लोगो" हे गीत उंच स्वरात गाऊन तिनं आपला स्वर आभाळाच्या छताला नेऊन भिडवला तेव्हा स्वर्गस्थ सैनिकांना ती आपल्यासाठीच गाते आहे, असं वाटलं असेल. गिरीशिखरावर थंडीत कुडकुडणाऱ्या जवानांना लताबाईंचा प्रेमळ स्वर सदैव उबारा देतो.

चित्रपट सृष्टीसारख्या अविश्वसनीय जगात दीर्घकाळ वावरूनही आपल्या भाषेवर आणि देशावर मनापासून प्रेम करणारी भावस्वर गायिका म्हणजे अनेकांची लता दीदी आहे. मातृ-पितृभक्त, भा़वंडांचा सांभाळ करणारी मायाळू स्त्री कलाकार म्हणजे आदर्श लता दीदी. एखाद्या घरात एखादी दीदी असू शकते. पण अनेकांच्या घरातली दीदी होण्यासाठी मात्र लता मंगेशकरच व्हावं लागेल.

एखादा कलावंत किती वर्षे जगला यापेक्षा तो कसा जगला हे फार महत्त्वाचं. कारण थोड्याशा यशप्राप्तीनंही काही कलावंत माणुसकीला पारखे होतात. त्यामुळे वादग्रस्त ठरतात.

सतत ५०/६० वर्षे यश मिळवून लोकप्रियतेचे सिंहासन टिकवणे हे काम सोपे नाही. पण हे एकच सिंहासन त्या दीनदयाळू परमेश्वराने बनवलं आहे आणि ते या स्वरसम्राज्ञीसाठीच.

या अपूर्व सिद्धीमागे लताबाईंची अनेक वर्षांची खडतर तपश्चर्या आहे व त्याच्या जोडीला वडील मातोश्रींचे मंगल आशीर्वाद अन् ईश्वराचा वरदहस्त आहे, यात संदेह नाही.

कोणत्याही, कितीही उंच स्वरात त्या सहजपणे भावनोत्कटपणे गाऊ शकतात, शब्दांचे भावार्थ समजून घेऊन, प्रसंगनिष्ठ गाण्यांना योग्यरीतीनं न्याय देऊन, समरस होऊन गातात एकेक गाणं कंटाळा न करता समाधानकारकपणे रेकॉर्डिंग होईपर्यंत गात रहातात. हा प्रामाणिकपणाचा आनंददायी गुण त्यांच्याकडून अनुभवायला मिळतो हे एच. एम. व्ही. मधील फिल्मी रेकॉर्डिंगच्या वेळी मी अनेकवेळा पाहिले, ऐकले आहे.

१९४४ ते १९४९ पर्यन्त (अंदाजे) प्रत्येक पार्श्वगायक-गायिकांना व चित्रपटाचे संगीतकारांना वाद्यवृंदासह रेकॉर्डिंगसाठी बहुधा रोजच (आपापल्या कामाप्रमाणे) एच. एम. व्ही. ग्रामोफोन रेकॉर्डिंग कं. मध्ये यावं लागत असे. (त्यापुर्वी सिने

स्टुडिओत सिनेमासाठी रेकॉर्डिंग होत असे.) त्यामुळे महमद रफी, तलत महमुद, आशा भोसले, लता मंगेशकर यांचं दर्शन आम्हाला जवळजवळ रोजच तिथं होत असे. व इंजिनियर रुममधून आम्ही हे सर्व सवडीने ऐकत असूं. एच. एम. व्ही. मध्ये दोन स्टुडिओमध्ये रेकॉर्डिंगचे काम चालत असे. कधी कधी दुसऱ्या स्टुडियोत आमचं ग्रामोफोन कंपनीचं नॉन फिल्म रेकॉर्डिंग असे त्यावेळी संगीत नियोजक (मी, व्ही.जी.भाटकर व सुधीर फडके) आम्ही आमच्या कामात दंग असायचे वा रिहर्सल्स चालत असत. सिने रेकॉर्डिंगचे श्री. रेळे हे कंपनीतर्फे काम पहात असत. तिथे आमचा प्रत्यक्ष संबंध येत नसे.

पण १९५० पासून सिने स्टुडिओत केलेल्या रेकॉर्डिंगवरून आमच्या कलकत्ता फॅक्टरीतून रेकॉर्डस् निघू लागल्या व या सिने पार्श्वगायक व संगीतकार लोकांचं एच. एम.व्ही. मध्ये प्रत्यक्ष येणं आपोआप बंद झालं व त्यामुळे आमच्या गाठीभेटीही बंद झाल्या. पण लताबाईंनी एच. एम. व्ही. तील चर्चेत वेळोवेळी जे विचार व्यक्त केले ते अविस्मरणीय आहेत. त्या म्हणत, "कोणत्याही गुणी कलावंताची हेटाळणी करून त्याला दूर ठेवू नका. त्याचा योग्य तो परामर्ष घेऊन त्याचा मान ठेवा. त्याला प्रोत्साहन देऊन पुढे आणा". आपल्या पित्याच्या वाट्याला जी मानहानी आली तशी कुणाच्याही येऊ नये ही कळकळ त्यात दिसते. आणि संवेदनशील मनाचे दर्शन होते. पित्याच्या आठवणीने व्यथित झालेले निग्रही व कणखर अशा मुलीचे मन दिसते. मास्टर विनायकांच्या चित्रसंस्थेत त्यांचा प्रवेश १९४२ मध्ये झाल्यानंतर पार्श्वगायन क्षेत्रात १९४७ ते आतापर्यन्त ५२ वर्षे सातत्यानं गाणाऱ्या लताबाईंचा प्रवास सर्वांना माहिती आहेच. त्या कालावधीत त्यांनी संगीताचं सुवर्णयुग पाहिलं व अनुभविलं. त्यामध्ये त्यांची अनेक चित्रपट गीतं लोकप्रिय झाली. त्यात शांतरसाची, भक्तिरसाची आणि शोकरसाची गीते विशेष आहेत, ती हजारोंच्या संख्येने असल्याने स्थलाभावी यादी देणे कठीण आहे. पण त्यांच्या स्वतःच्या आवडीची अशी बारा गाणी त्यांनीच सांगितली व एका कार्यक्रमात

गायिली आहेत ती फक्त इथे नमूद करणं इष्ट ठरेल. (याचा अर्थ बाकीची गाणी नावडती आहेत असं मात्र मुळीच नव्हे.) ती गाणी याप्रमाणे :-

(१) तोड दिल तेरा, (२) आयेगा आनेवाला, (३) बरसातमे हम से मिले, (४) तुम्हारे बुलाने को, (५) ये जिंदगी उसीकी है, (६) जाये तो जाये कहाँ (७) आजा री निंदीया, (८) है कहीपर शादमानी, (९) एरी मै तो, (१०) घनःश्याम सुंदरा, (११) मोसे रुठ गये, (१२) तूं क्यो मुझको ह्या गाण्यांची निवड करण्यामागची वर्गवारी सांगताना त्यांनी तीन मुद्दे सांगितले ते म्हणजे (१) ज्या गीतांनी मला पार्श्वगायिका म्हणून प्रथम यशस्वी केले ती गीतं, (२) माझ्यातील गायक गुणांची कसोटी पाहणारी कठीण रागदर्शक गीते, (३) आणि ज्यामध्ये संगीतकाराने काही ना काही नवीन प्रयोग केले अशी गीते आहेत. गाणे जितके कठीण तितके मला आवडतं. त्यामुळे '' जे जिंदगी'' सारखे गाणे हे आकर्षण होते.

**प्रतिकूल परिस्थितीवर मात :**

१९४६ मध्ये छत्री फाटली असल्याने अचानक आलेल्या पावसात पायी चालत येणारी लता भिजलेल्या अवस्थेत ती संगीतकार नौशाद यांच्या समोर उभी राहिली व अंग पुसून गाणं गायिली त्यावेळी त्या गाण्याचे फक्त ६० रुपये तिला मानधन दिले गेले होते, ''चांदनी रात'' हा लताचा पहिला हिंदी चित्रपट आणि ''दुलारी'' या चित्रपटाने तिला भक्कम पायावर उभे केले. खेमचंद प्रकाश यांच्या कंपनीत ती गाऊ लागली तेव्हा चांगले दिवस लाभले. १९४६ मध्ये नाना चौकातील शंकर शेट यांच्या मंदिरात मंगेशकर कुटुंब रहात होते. या कुटुंबासाठी ही मुलगी बापाच्या सावलीसारखी दिसणारी कुटुंबप्रमुख झाली होती.

त्यावेळच्या ईश्वरदत्त व रियाझने हुकमी बनविलेल्या धारदार मधूर आवाजामुळे आजही तिच्यात तेच गुणविशेष प्रकर्षाने दिसतात, हे विशेष गाणे असावे अनंताचे, गाणारे असावेत अमृतकुंभ वाहणारे, अन् सूर असावेत गरिबाला दारिद्र्याचा विसर

पाडणारे, स्वार्थत्याग करणाऱ्याला जीवनाचा आनंद घेण्याची, जनसेवा करण्याची प्रेरणा मिळावी हे सारे गुण व सामर्थ्ये आमच्या लता दीदींच्या गाण्यात आहेत म्हणूनच आम्ही तिला "स्वरसम्राज्ञी" म्हणतो.

चित्रपटसंगीताशिवाय लताबाईंच जे काम आहे त्यात ती व्यक्तीरेखांच्या चौकटी पार ओलांडून पलिकडे गेलेले आहे. त्यांची प्रदीर्घ यादी देणे, वर्णन करणे, लेखणीच्या सामर्थ्याबाहेरचे आहे. काय नि किती वर्णन करावे? श्रीसमर्थांची व वीर सावरकरांची तेजस्वी गीतं, मुलांसाठी प्रार्थनागीते, सारीच अविस्मरणीय आहेत. पण त्यांना एक नम्र विनंती आहे की, त्यांनी आता बाबांची मा. दीनानाथांची पदं नाट्यगीते गाऊन, बालपणी त्यांनी हाती दिलेला तंबोरा पुन्हा हाती घ्यावा. त्यांच्या वहीतील शास्त्रीय संगीताचे अनमोल भांडार रसिकजनांपुढे मुक्तकंठानं सादर करावे. त्यांच्या अतृप्त आत्म्याला व जनता जनार्दनालाही संतुष्ट करावे. लतादीदींनी जे जे द्यावे ते ते आम्ही सुखाने आनंदाने स्वीकारावे, असेच घडत आले आहे आजपर्यन्त. हेही त्यांनी ध्यानी घ्यावे हे चांगले.

**दीनानाथांची आठवण :**

रविवार २ जुलै १९३९ रोजी पुण्यातील प्रतिष्ठीत नागरिकांच्या "विश्राम मंडळ" या संस्थेत माझा कार्यक्रम झाला. लागोपाठ सखाराम हरी कार्यालय व "सर परशुरामभाऊ कॉलेज" मध्ये कार्यक्रम माझे झाले. औंधहून मी मुद्दाम साथीदारांसह पुण्यात आलो होतो. सर्व वृत्तपत्रांमधून त्याचे उत्तम वृत्तांत प्रसिद्ध झाले. या कार्यक्रमांना बलवंत संगीत मंडळीचे लोकप्रिय गायक नट गणपतराव मोहिते हे माझे मित्र उपस्थित होते. त्यांनी आम्हाला विजयानंद थिएटरमध्ये ५ जुलैला "मानापमान" नाटकाच्या प्रयोगाला येण्याचं आग्रहाचं निमंत्रण दिलं. दुपारी ३ वाजता आम्ही "विजयानंद" मध्ये हजर राहून रंगपटांत गणपतराव मोहिते यांना भेटलो. ते भामिनीच्या वेषात नटून तयार होते व मा. दीनानाथ मंगेशकर हे धैर्यधराच्या भूमिकेत स्टेजच्या विंगपाशी सज्ज होते. तिथे मोहिते यांनी माझ्या मैफलींच्या वृत्तपत्रीय वृत्तांताची आठवण देऊन

त्यांना माझी ''गायक'' म्हणून ओळख करून दिली, मी त्या वीरपुरुषाला लवून नमस्कार केल्यावर माझी पाठ थोपटून त्यांनी सहर्ष अभिनंदन केले. आणि नखशीखांत मला न्याहाळून त्यांनी विचारले ''आपण औंधच्या राजवाड्यात राजपुत्रासारखे रहाता ना? मी ''हो'' म्हटले.

मोहित्यांनी पदर सावरीत त्यांना विचारले, ''आपण हे कसे ओळखलंत?'' त्यांनी उत्तर दिले, ''त्यांच्या चेहऱ्यावरून'' मला ते काही कळले नाही. मोहिते मला म्हणाले, ''ते त्यांचे ज्योतिषशास्त्र आहे.''

इतक्यात ''घण घण'' घंटा स्टेजवर वाजली आणि मा. दीनानाथांनी रंगमंचावर रूबाबात प्रवेश केला.

मी पहिल्या रांगेत नाटक पहायला (साथीदारांसह) बसलो. ''मानापमान'' हे त्यांचे हुकमी एक्का नाटक होते. गाण्यांसह नाटक बेहद्द रंगले. मा. दीनानाथ, गणपतराव मोहिते व नटश्रेष्ठ चिंतामणराव कोल्हटकर यासारखे प्रथितयश नट आपले सारे अभिनयकौशल्य पणाला लावून भूमिका करतात हे पहाण्याचे भाग्य आम्हाला लाभले. आम्ही थक्क झालो. सारे प्रेक्षक बेहद्द खूष होऊन टाळ्यांचा प्रतिसाद देत होते. त्या दिवशी सौ. माई मंगेशकरही प्रयोगाला आल्या होत्या. त्यांचाही परिचय झाला.

नाटक संपल्यावर सगळी नटमंडळी स्टेजवर जमली. सर्वांसाठी हॉटेलमधून खाद्यपदार्थ आणि चहा घेऊन एक पोरगा आला. त्याच्या विचित्रशा पावलांकडे मा. दीनानाथांचे लक्ष गेले आणि ते काही तरी विचार करताहेत. हे मला खूप जाणवले. तो चहावाला पोरगा गेल्यावर दीनानाथराव म्हणाले, ''हा पोरगा चारच दिवसांनी देवाघरी जाणार आहे. मर्जी देवाची'' मा. दीनानाथांच्या प्रेमळ आग्रहाखातर त्यांच्या बरोबर आम्ही त्यांच्या घरी गेलो. बालगोपाळ मंडळी आई-बाबांची वाट पहात होती. घरात आनंदी आनंद पसरला. मुलींना माझा परिचय करून दिल्यावर बालिका लता मला म्हणाली, '' पेपरमध्ये तुमच्या कार्यक्रमाची बातमी आणि फोटो पाहिला बरे का आम्ही सर्वांनी. हा पहा तो

पेपर''. जेमतेम दहा वर्षांच्या लताचं मनमोकळे बोलणे, देखणे रूप पाहून मला समाधान वाटले. तेवढ्यात लता व आशा यांनी मला वाकून नमस्कार केला. ते संस्कार, ते वळण हेच भविष्य सांगत असते.

**अविस्मरणीय योग :**

इतक्यात गणपतराव मोहित्यांनी तंबोरा, पेटी-तबला काढला. सुरात जुळवला आणि पिताश्रींच्या आज्ञे प्रमाणे ''पावना वामना या मना'' हे नाट्यगीत लताच्या धारदार उंचस्वरात उत्कृष्ट आलाप तानांसह भक्तिरसात न्हाऊन निघाले. वयाच्या मानाने तिची तयारी अन् आत्मविश्वास अजब होता. ती स्वरतालाची समज, सहजपणाने गाणे, भावपूर्ण शब्दोच्चार हे सारे श्रेष्ठ गुण व्यक्त झाले. माझे डोळे आनंदातिशयाने पाणावले. मी मनापासून कौतुक केले तिचे.

पाठोपाठ आशाताईला पिताजींनी खूण केली. प्रारंभी एक तान मारून तिने ''झाले युवतिमना'' हे नाट्यगीत वडिलांच्याच जोशात, थाटात तयारीने गाऊन चकित केले मला.

मी म्हटले, या दोघींचे गान कौशल्य तयारी श्रेष्ठ आणि आश्चर्यकारक आहे यांचा भविष्यकाल ''माझे पुढील वाक्य 'दीनानाथरावांनी पूर्ण केले. ते म्हणाले, ''या मुली विश्वविख्यात गायिका, कलाकार म्हणून यशस्वी होतील. त्या नाटकात भूमिका करणार नाहीत. पण माझी नाट्यगीते त्या माझ्यापेक्षाही उत्तम गातील, ही माझी भविष्यवाणी आहे. तुम्ही लिहून ठेवा आज. मुंबई रेडिओवर लताचा नाट्यगीतांचा कार्यक्रम आता लवकरच होणार आहे. तो अवश्य ऐका आणि पत्र लिहा ''अवश्य ऐकेन'' मी सांगितले. भारावलेल्या मनाने, धुंद स्वरांची सोबत घेऊन आम्ही त्या भाग्यवान मातापित्यांना आदरपूर्वक प्रणाम केला अन् निरोप घेतला. त्यानंतर दोन महिन्यांनी लताबाईंचा कार्यक्रम आकाशवाणीवर आम्ही ऐकला. त्यात ''पावना वामना'' हे पदही होते. मी अभिनंदनाचे पत्र पुण्याला पाठविले. मा. दीनानाथांनीही तो कार्यक्रम ऐकला घरी रेडिओवर, तेव्हा ते म्हणाले, ''आज माझा स्वर मी ऐकला. आता मला मरायला हरकत नाही''. हे मला गणपतराव मोहिते यांनी पत्राने कळवले त्यानंतर २४-४-४२

रोजी दीनानाथ स्वर्गवासी झाले. या संदर्भात मी विनंती करीन लता दीदींना की, ''यंदा तुम्हाला महाराष्ट्र शासनाचा ''महाराष्ट्र भूषण'' हा महान् गौरवशाली पुरस्कार लाभला आहे. तेव्हा पिताजींचे इच्छेसाठी आता महाराष्ट्रात त्यांच्या नाट्यगीतांचे कार्यक्रम अवश्य कराच. सर्व श्रोते उत्सुक आहेत हे विसरू नका हं. बाबांना खूप आनंद होईल व त्यांना शांती लाभेल. आणि कर्तव्यपूर्तीचा श्रेष्ठ आनंद लाभेल. शतायुषी व्हा, आरोग्यसंपन्न व्हा. तुमचे गाणे साऱ्या विश्वात गेले आहे. त्या विश्वंभराचे आशीर्वाद तुमच्या पाठीशी आहेतच.

त्यांच्यामुळेच ''भारत रत्न '' हा सर्वश्रेष्ठ पुरस्कार यंदा प्राप्त झाला आहे तुम्हाला.

आपलं मनःपुर्वक अभिनंदन !

दिनांक ४-३-२००१.

(रविवार, नवशक्ती ७ जून १९९८.)

• • •

## लोकप्रिय पार्श्वगायिका संगीत सौदामिनी आशा भोसले

स्वर सम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या इतकंच अलोट प्रेम महाराष्ट्रानं, संगीत सौदामिनी आशा भोसले यांच्यावर अविरत केलं आहे, महाराष्ट्राच्या या लाडक्या कन्येला नुकताच "लता मंगेशकर पुरस्कार" जाहीर करून महाराष्ट्र सरकारनं त्यांचा गौरव केला आहे. १९९७ साली आशाताईंनी याबाबत खंत व्यक्त केली होती त्यावेळी मी नवशक्ती च्या लेखमालेत त्यांच्या विषयी स्वतंत्र लेख लिहून "रसिक महाराष्ट्र सरकार भविष्यात लवकरच आशाताईंचा गौरव करील" हे भविष्य मी वर्तविलं होतं, ते आज खरं ठरलं याचा माझ्या प्रमाणेच सर्वांनाच आनंद झाला आहे. मी त्यांचं हार्दिक अभिनंदन करतो.

सिने क्षेत्रांत त्यांच्या बरोबर काम करणाऱ्या प्रत्येक कलाकाराला ही गोष्ट ज्ञात आहे की मराठी चित्रपटामध्ये गाण्याचं सहकार्य, पैशांचा विचार गौण मानून, मराठी चित्रपटावरील प्रेमामुळेच आशाताईंनी आतापर्यंत सर्वांना सहकार्य दिलेलं आहे. कधीही कुणाला अडवलं नाही. हा त्यांच्या मनाचा मोठेपणा आहे.

**माझा अनुभव :**

श्रीसाईबाबा चित्रपटांत गातेवेळी तर रेकॉर्डिंग झाल्यावर जे अल्पसं मानधन दिलं गेलं ते माझ्या प्रमाणेच त्यांनीही राजकमल मधील ऑफीस मध्ये श्रीसाईबाबांच्या प्रतिमेपुढे अर्पण केलं. आणि भक्तिभावानं प्रणाम करून त्या निघून गेल्या. आणि पुन्हा बोलावलं तेव्हाही त्याच श्रद्धेनं माझ्या बरोबर मस्तपणे गाऊन निर्मात्यांना त्यांनी हार्दिक सहकार्य दिलं. ही त्यांच्या सौजन्याची अविस्मरणीय आठवण आहे.

हिंदी चित्रपटाच्या मानानं मराठी चित्रपट निर्माते देतात ते मानधन हे मामुली असतं म्हणून हिंदी चित्रपटात पार्श्वगायन करणारे कलाकार मराठी चित्रपटासाठी वेळ द्यायला व सहकार्य द्यायला नाखूष असतात असा प्रवाद आहे. या पार्श्वभूमीवर आशाताईंचं सर्वांना मिळत रहाणारं सहकार्य नक्कीच कौतुकास्पद आहे. म्हणून त्यांच्या या मराठी वरील प्रेमाचं कौतुक आणि सन्मान होणं निःसंशय अगत्याचं आहे. आणि उशीरा कां होईना ''पुरस्कार'' जाहीर झाला आहे तो समारंभ पूर्वक दिला जाईलच.

## कुशल व मेहनती :

आशाताई या कुशल, बुद्धिमान असूनही खूप मेहनती आहेत. अपार कष्ट घेऊन त्यांनी आवाज कमावला आहे. गळ्यात चांगली फिरत आहे. पार्श्वगायनामध्ये त्यांनी स्वतःचा असा वेगळा ठसा उमटविला आहे.

शास्त्रीय संगीतापासून लावणी पर्यंतचे सारे प्रकार त्यांनी लोकप्रिय केले आहेत.

बालगीतं गाताना त्या लहान मुलीच्या आवाजात बेमालूम गातात. लावणी सारखे रंगेल प्रकार, विनोदी गाण्यातील खवचटपणा, खट्याळपणा आणि वीररस प्रधान गीतातील शौर्य यासाठी त्या वेगवेगळ्या आवाजात भावना कौशल्यानं व्यक्त करतात. आणि विशेष म्हणजे हातात गाण्याचा कागद न घेतां ते गीत व्यवस्थित काळजीपूर्वक गाण्याकडे त्यांचा कटाक्ष नेहमीच जाणवतो.

## मा. दीनानाथांची गायकी त्यांनीच पचवली :

विशेष म्हणजे आपल्या पिताजींची तेजस्वी पल्लेदार नाट्यसंगीताची वैशिष्ठ्यपूर्ण वेगळी गायकी त्यांनी श्रद्धेनं अन् अभ्यासानं जोपासली आहे; व ती गायकी तितक्याच तयारीनं, जोमानं त्या जेव्हा नाट्यगीतं गाताना प्रगट करतात तेव्हा गवईसुद्धा चकित होतो. दररोज रियाझ करणाऱ्या गायकाच्या गळ्यातूनही त्या ताना इतक्या सफाइदारपणे निघणं व सहजपणे निघणं फारच मुष्कील आहे. आशाताईंचं संगीतक्षेत्रातलं कर्तृत्व फार विशाल आहे.

**योगायोग उत्तम :**

मा. दीनानाथांच्या जन्म शताब्दी सोहळ्याच्या शुभारंभ समयी त्यांना ''लता मंगेशकर पुरस्कार'' जाहीर झाला हा त्यांच्या कर्तृत्वाचा गौरव आहे.

८ सप्टेंबरला त्यांचा वाढदिवस साजरा झाला (१९३३ सालच्या त्यांचा जन्म) पण वार्धक्य अजून त्यांच्या जवळपासही फिरकलं नाही. त्यांचा उत्साह दांडगा आहेच पण त्यांचा गळा अजूनही तरुण आहे, वयाची सहासष्ट वर्षे पूर्ण केली तरी, सतत गात रहाणाऱ्या या चतुरस्त्र गायिकेचा गौरव योग्यवेळी होणार आहे, असंच मला वाटतं. विवाहानंतर मास्टर नवरंगांकडे, गवैय्याकडे स्वतंत्र शिकवणी घेऊन त्यांनी रागदारीचा जाणीवपूर्वक अभ्यास केला आहे. रागज्ञान, स्वरज्ञान, स्वरलेखन या आवश्यक गोष्टी त्यांनी मनापासून ग्रहण केल्या. मास्टर नवरंग नागपूरकर या माझ्या मित्रानं त्यांना मनापासून शिक्षण दिलं, हे मी प्रत्यक्ष पहात होतो, त्यांनी मेहनत करतांना कुणाचीही नक्कल केली नाही हा त्यांचा विशेषगुण.

१९४७ सालापासून आशाताईंनी हंसराज बहेल यांच्याकडे पार्श्वगायनाला प्रारंभ केला. तेव्हापासून सतत ५२ वर्षे त्या गात आहेत. खंड पडलेला नाही.

सुधीर फडक्यांच्या संगीतानं सजलेलं गाणं, ''सांग तू माझा होशिल कां? '' हे त्यांचं ''लाखाची गोष्ट'' या चित्रपटातलं गीत खूप लोकप्रिय झालं. पण ते त्यांच्या पसंतीला उतरेपर्यंत गाण्याची रिहर्सल करणं ही जिद्द फडके साहेब आजही कौतुकानं वर्णन करून सांगतात. ''कंटाळा'' हा शब्द आशाताईंच्या कोशातच नाही. हा केवढा आदर्शगुण. सुधीर फडके यांच्याकडील भावपूर्ण गाण्याचं मर्म आत्मसात करून त्यांनी मेहनतीनं जाणीवपूर्वक आपलं गाणं वाढवलं असं मी विधान केलं तर अस्थानी ठरू नये.

**स्वभावाचा विशेषगुण :**

मोकळया मनानं स्पष्ट बोलणं, पटेल तसंच वागणं, आतबाहेर वेगळा विचार नसणं, साऱ्या कुटुंबावर मनापासून प्रेम करणं, असा परखड स्वभाव, निर्मल स्वभाव आहे त्यांचा.

**जाहीर आश्वासन :**

नटश्रेष्ठ दीनानाथांच्या नाट्यगीतांवर यापुढे विशेष मेहनत घेऊन (रसिकांना हार्दिक निमंत्रण देऊन) ती कठीण गायकीची नाट्यगीते लवकरच ऐकविण्याचं जाहीर आश्वासन त्यांनी (१९९७ मध्ये) दिलं आहे व आमची उत्सुकता वाढविली आहे. त्या नाट्यगीतांच्या सतेज मैफिली आता लवकरच ऐकायला मिळाव्यात ही रसिकांची आणि कलाकार मंडळींचीही उत्कट इच्छा आहे. तूर्त सारे लोक रेकार्डस ऐकूनच आपली तहान भूक भागवीत आहेत.

**आत्म चरित्र लेखन :**

त्या सांगतात "मी सध्या आत्मचरित्र लेखन करीत असून प्रकाशनाच्या पूर्वतयारीत आहे, मराठी व हिंदी मधून ते आत्मचरित्र प्रसिद्ध व्हायचं आहे. मागे वळून पहात राहून खंत करीत बसू नये आणि आला क्षण आनंद पूर्ण करीत जिद्दीनं सार्थकी लावावं", अशी त्यांची मनोधारणा आहे.

**अमाप लोकप्रियता :**

"पद्मश्री" "पद्भूषण" हे सन्मान त्यांच्या वाट्याला अजून आले नाहीत तरी "अमाप लोकप्रियता" हा पुरस्कार त्यांचा आनंद घनु ठरला आहे.

**राग रागिण्यांचा खजिना :**

"रसिया तू बडा बेदर्दी" (दिल दिया दर्द लिया) "इन् आंखो की मस्तीके" (उमराव जान) "तोरा मन बडा पापी", व "नजर लागी राजा तोरे बंगले पर", "अभी ना जावो छोडकर की दिल् अभी भरा नही", इ. इ. अशी एक एक करीत अठ्ठावीस निवडक गीतं आशाताईंच्या मधुर आवाजानं रसिकांना नजर केलेली आठवली तरी विविध राग रागिण्यांचा अनमोल खजिनाच त्यांनी अनेक संगीतकारासाठी सादर केला आहे.

**लहानपणापासून बंडखोर :**

" आपण लहान पणापासूनच बंडखोर आहोत " असं गंमतीनं सांगणाऱ्या आशाताईंच्या शब्दांत सांगायचं तर " लता दीदी सारखी लता दीदीच. त्या महान् गायिकेला मागे टाकणं कधीच कुणाला शक्य होणार नाही", वडिलांच्या निधनानंतर ओढवलेल्या बिकट परिस्थीतीत आमचं बालपण अकालीच संपले. माझ्या बंडखोरपणामुळे एक गोष्ट बरी झाली की दीदीनं कमवायचं आणि मी आळशी बनून राहयचे, असं झालं नाही. सुरवातीच्या काळांमध्ये दीदी बरोबर गातांना माझ्यावर दडपण असायचं. पण दीदीबरोबर गाताना प्रेरणादायी स्फुरणही जाणवायचं, ते प्रेम देणारं असायचं, हे कबूल करायलाच हवं."

त्यांनी १९४७ साली पुरस्कार प्राप्तीविषयी जी खंत व्यक्त केली होती ती विषादापोटी नव्हती, मत्सरापोटी नव्हती तर आपल्या कलेविषयीच्या स्वाभिमानापोटी होती हे एक सत्य त्यावेळी मी घेतलेल्या मुलाखती मुळे मला स्पष्ट जाणवलं व त्यावेळी १६ नोव्हेंबर १९९७ रविवार नवशक्ती मध्ये मी एक लेख (संपादक भाऊ जोशीच्या सांगण्यावरून) लिहिला होता. त्यांच्याशी झालेल्या चर्चेमुळे सत्य समजलं व त्यामुळे रसिकांचा गैरसमज त्या लेखामुळे दूर करणं मला शक्य झालं, आनंद मिळाला.

**दूरदर्शन बद्दल निषेध :**

दूरदर्शनवर अत्यंत घाणेरडी नृत्यं व विचित्र संगीताची गाणी लागतात, वाईटात वाईट कार्यक्रम पेश करून खून मारामाऱ्याचं शिक्षणच ते तरुणांना देतात, त्यांची संगीताची आणि सुसंस्कृतपणाची अभिरूचि बिघडवितात ही गोष्ट त्यांनी अतिशय संतापानं व्यक्त करून निषेध केला. जनतेनं त्याबद्दल संघटितपणे तीव्र निषेध वारंवार व्यक्त करून ते सारे त्वरित बंद करणं अवश्य आहे असं त्या म्हणाल्या. मी त्यांना विनंति केली की, "तुम्ही पुढाकार घ्यावा आम्ही सर्व कलाकार तुमच्या बरोबर आहोतच".

श्रीमती आशा भोसले यांच्या सांगीतिक प्रवासाचं आदर्श आत्मचरित्र लवकर वाचायला मिळावं, अशी मी इच्छा व्यक्त करून महाराष्ट्र सरकारनं त्यांचा गौरव समारंभ लवकरच घडवून आणावा ही सर्व कलाकारांच्या वतीनं अपेक्षा व्यक्त करतो. संगीत सौदामिनी श्रीमती आशाताईंना परमेश्वरानं आरोग्य संपन्न प्रदीर्घ आयुष्य द्यावं ही शुभकामना.

(रविवार, नवशक्ती १४ जून ९८.)

● ● ●

# मधुर स्वरसाधक योगिनी ''अनामिका''

ईश्वराची उपासना करणारे बहुतेक साधक मनात काही तरी फळाची आशा धरूनच उपासना करतात त्याचप्रमाणे स्वरांची उपासना करणारे साधक ही यश-धन-कीर्तीची महत्वाकांक्षा मनांत बाळगूनच मेहनत करतात. शिक्षण घेतात ही वस्तुस्थिती आहे ती कुणीच नाकारीत नाही. पण याला अपवाद म्हणून थोडे का होईना परब्रह्माची उपासना निष्ठेनं व निष्काम भावनेनं करणारे योगी, ब्रह्मानंदाचा लाभ घेताना दिसतात त्यांत फळाची अशा मुळीच नसते तसेच नादब्रह्माची साधना केवळ आत्मानंदासाठीच करताना पाहिले की, ''तेथे कर माझे जुळती''.

असे स्वरसाधक स्वतःची प्राप्त विद्या निःस्वार्थपणानं आणि मुक्त हस्तानं विद्यार्थ्यांना विनामूल्य दान करून श्रेष्ठ परमानंद मिळवितात. तिथे माझं मस्तक विनम्र होतं. कारण तिथेच दिव्यत्वाची मला प्रचीती येते.

मुंबई आकाशवाणीचा मी प्रथमश्रेणी गायक असल्याने अन्य कोणत्याही केंद्रावर मला गाण्यासाठी बोलावितात. पुणे आकाशवाणी केंद्रावर १९५६ मार्चमध्ये माझ्या कार्यक्रमासाठी मी गेलो असताना तेथील केंद्राधिकारी व संगीततज्ञ कृ. द. दीक्षित साहेब यांच्या घरी माझा मुक्काम होता. त्यांच्या आग्रहास्तव मी आठ दिवस तिथे राहिलो. पुण्याची पहाटेची थंडी विलक्षण सुखदायी असते. अन् मला रोज पहाटे व्यायाम म्हणून फिरायला जाण्याची सवय होतीच. पूर्वी मी प्रगत शिक्षणासाठी पुण्यात असतांना पंडित विनायकबुवा पटवर्धनांबरोबर पर्वतीवर नियमितपणे जात असे. (त्यावेळी मी विद्यार्थी असतांना बुवासाहेबांच हे मनमोकळं प्रेमळ वागणं हा त्यांचाच मोठेपणा होता.) भिकार दास मारुती मंदिराजवळ एका घरातून व्याकूळ करणारे तोडी रागाचे आर्त आलाप ऐकून आमचे पाय थबकायचे खूप वेळ.

**अनामिकेचा मधूर स्वरालाप :**

आज माझ्याबरोबर फिरायला आलेले दीक्षितसाहेब म्हणले, या घरातून येणारे आलाप मी अनेक वर्षे ऐकत आलो आहे. पण कोण आहे ते कळत नाही. "मंद मंद वाऱ्याबरोबर निशिगंधाची सुखद लहर यावी तसे या रागाचे स्वर अंतर्मनातून झंकारून नंतर कुठेतरी विलीन व्हायचे." आजही त्या घरासमोरच्या पायऱ्यावर बसून ती मेहनत दोघांनी ऐकली. खूप सुरेल मंद्रसाधना स्वरविस्तार, तानपलटे हे प्रकार गाऊन झाल्यावर त्या गायिकेला विलंबित ख्यालाची तबला साथीसह कुणीतरी उस्तादजी, लयकारीचे आलाप, बोल आलाप, ताना बोलताना इत्यादी आकर्षक मांडणीसह शिकवीत आहे हे (पर्वतीवरून आम्ही परत येताना) पुन्हा ऐकायला मिळालं. त्यावरून ती गायिका कुणी होतकरू गायिका नसून उत्तम कलाकार आहे हेही जाणवत होतं. म्हणून मी दीक्षित साहेबांना विचारलं, "तुम्ही या गायिकेला आकाशवाणीवर का बोलावित नाही? तिनं आपणहून ऑडिशन टेस्ट देण्यासाठी गावं अशी अपेक्षा का करावी?"

यावर साहेब म्हणले, "या गायिकेचं नावच कुणाला माहिती नाही, ती कोण? कुठची? कुणाकडे शिकते? हेही कुणाला माहिती नाही. ती या तिनमजली घरात राहते पण नेमकी कोणती बाई गाते, हे तर कळलं पाहिजे ना?"

"अब मोरे राम" हा तोडीरागाचा ख्याल विलंबित संपताना एक दिवस सकाळी आम्ही ऐकला. त्या संगीताच्या नादानं भारावलेल्या मला, या साऱ्याच गोष्टी वेदांती महापुरुषाला जग जसं स्वप्नवत वाटतं तशा वाटू लागल्या. आमच्या कानावर ते अति मधूर स्वरालाप येत एवढंच खरं वाटे.

दीक्षित साहेब म्हणले, "या जागेत एका असामान्य गायिकेची स्वरसाधना चालू आहे असा गाजावाजा मी रसिकांकडून ऐकला नाही कधी. मग तिच्याशी संपर्क कसा साधणार? व कसं बोलावणार? कोणत्या नावानं? आणि हल्ली रोज तुम्ही बरोबर अहांत म्हणून मीही इथे रस्त्यावर गाणं ऐकायला थांबतो, नाहीतर मी कसा थांबू शकणार?

**वेड लावणारी स्वरमाधुरी :**

दुसरे दिवशी पहाटे त्या दारावरून जाताना कान टवकारले आमचे. पण आज आलाप ऐकू आले नाहीत. चिंता वाटू लागली. नंतर थोड्या सारंगीच्या तरफा लावल्या जात असल्याचा आवाज ऐकू येऊ लागला. सारंगीनं मंद्र

सप्तकांत एक छोटासा आलाप घेऊन षड्जावर स्थिरावल्यावर त्या गायिकेचा कंठमधुरसा स्वरनिनाद ऐकू आला. गाणं शिकविणाऱ्या त्या उस्तादाच्या ढाल्या आवाजानंतर सारंगीच्या स्वराबरोबर तिचा स्वर मिळाला की, केवळ तंबोरा आणि सारंगी या वाद्यातूनच स्वरपुंज निघतो आहे असं वाटावं इतका तिचा आवाज मुलायम होता. तिच्या आवाजाची माधुरी अवर्णनीय होती. वेड लावणारी होती.

त्या गुरुजीची गायकी किराणा घराण्याशी नातं सांगणारी होती. तोडीच्या चिजेचे चरणाबरोबर रागाची तालबद्ध आलापचारी ऐकत होतो. षड्जावर न्यास करून मंद्रसप्तकातल्या धैवत निषादापासून मध्य सप्तकांतल्या ऋषभ गंधारापर्यन्त वेगवेगळे आलाप कौशल्याने करून ती गायिका गुरुचं अनुकरण करुन तोडीचा गंधार लावीत होती व मुखडा गाऊन ताल सहजपणे पकडीत होती. प्रियकराला परत आणण्यासाठी ही महाश्वेतेसारखी विरहिणी तर नाही ना? असं वाटे. त्या मिणमिणत्या दिव्याच्या अंधाऱ्या खोलीऐवजी गर्द वनश्री, निरभ्र आकाशातील पौर्णिमेचा चंद्रप्रकाश आणि नितळ अंगकांती असलेली म्लानवदन गायिका माझ्या मनःचक्षूसमोर दिसू लागली.

केवळ स्वरांच्या सामर्थ्यांवर मनाला हेलकावे देऊन मनासमोर एक वेगळीच सृष्टी निर्माण करणारे हे रागसंगीत किती अपार सामर्थ्याचं आहे याची जाणीव तिच्या गाण्यामुळे होई. त्या गायिकेच्या मेहनतीनं आणि गोडव्यानं आम्ही अगदी भारावून गेलो होतो. पण सभ्यतेच्या मर्यादा ओलांडून तिची चौकशी करून नाव गाव विचारण्यासाठी तिच्या घरी अनाहूतपणे जाण्याचं धाडस मात्र आम्ही करू शकलो नाही. पण त्या दिवशी पर्वतीवर फिरायला जाण्याचं सोडून तोडीचा बिलंबित ख्याल एकतालामध्ये "अब मोरे राम" आणि "लंगर का करिए जिनमारो" हा द्रुत ख्याल संपूर्ण ऐकून त्या धुंदीत आम्ही दोघे घरी परत आलो. तोडीचे स्वर मनात झंकारत होते. त्याबरोबरच ते स्वर आशंकाना त्रस्त करून सोडत होते.

**शेवटी त्यांच्या घरी गेलोच :**

तिसरे दिवशी दीक्षित साहेबांबरोबर पर्वतीला जातांना व येतांनाही त्या घरातून स्वरालाप ऐकू आलेच नाहीत. तेव्हा आश्चर्य व चिंता यामुळे आम्ही दोघेही बेचैन झालो व सायंकाळी पुन्हा त्या घराकडे आम्ही मुद्दामच गेलो. शक्य तो आज भेट घ्यायचीच असं काहीसं मनाशी ठरवूनच. पण मनात मात्र चिंता होती की, आज सकाळी त्या बाईंचा रियाज का नाही ऐकू आला? काय कारण असेल?

संध्याकाळची वेळ झाली आहे. मुलं दिव्यापुढे उभं राहून प्रार्थना म्हणताहेत. बाहेरचं धूसर वातावरण हलके हलके गूढ होतं आहे आणि तुळशी वृन्दावनाभोवती नीरांजनाची वात तेवते आहे, अशा संमिश्र, शांतिपूर्व संध्या वंदनाचा राग यमन आहे आणि त्या गायिकेच्या घरापाशी आम्ही पोहोचलो तेव्हा त्याच रागाचा ख्याल संपून द्रुतचिज "येरी आली पियाबिन" रंगात आलेली ऐकू आली. समोरचं दुकान बंद होतं. त्याच्या पायरीवर जरावेळ आम्ही विसावलो. पण मन वर ओढ घेत होतं. यमन म्हणजे सप्तस्वरांचा राजा. संपूर्णत्वानं वावरणारा. त्याला वर्ज्यावर्ज्य नाही. त्याचा आवाकाच मोठा. यमन म्हणजे अत्यंत भरदार बाळसेदार,मैफिलीचा राजा. बिनीचा घोडेस्वारच जणू. ती यमनची चिज रंगात आली असतांनाच मनाचा हिय्या करून धाडसानं आम्ही त्या तिसऱ्या मजल्यावर गेलो. जमलेल्या श्रोत्यांमध्ये हळूच घुसून जागा मिळवून बसलो. बाई रंगानं उजळ, सुस्वरूप-बांधेसूद व गाण्याप्रमाणेच मनोहर, प्रसन्न होत्या. तेथील एकंदर वातावरण प्रसन्न व सुसंस्कृत लोकांचं जाणवत होतं.

### श्रोते यमनमध्ये रंगून गेले :

चिजेच्या बंदीषीच्या अंगानं बाई आत्मविश्वासानं यमनचा अनुनय करीत होत्या. तीव्र मध्यमावर ठरतांना तिनं अशा विश्वासानं स्वर स्थिर केला की, तंबोऱ्यातील षडज्-पंचमभाव, तंबोऱ्यातील स्पष्ट निषाद अशा साऱ्या सुरांचं विस्मयकारक वलय निर्माण झालं. तिची गायकी बहुढंगी वाटली. आलापी हे तर मूळचं वैशिष्ट्य, तानांच्या वैचित्र्यातही वाढ होत चालली, आलाप, बोलताना, उपज आणि द्रुतगती ताना अशा साऱ्या अलंकारांनी यमन नटत होता. मधूनच तिच्या गळयातून एक भिंगरीसारखी तान निघून जाई आणि "वाहवा" ची बरसात होई. गायिका व श्रोते यमनमध्ये पूर्ण रंगून गेले होते. गाण्याची जादूच अशी आहे की, गाणं ऐकताना आपण आपले रहात नाही. समोरून येणारे स्वर आपल्याला दुसऱ्या विश्वात नेऊन ठेवतात. आम्हीही दोघे त्या स्वरात त्या यमन रागात पूर्णपणे तन्मय झालो होतो. इतक्यात प्रथम पंक्तीची तिहाई करून बाई समेवर आल्या. तबलजीनं समेवर थाप मारली आणि श्रोत्यांनी पसंतीची पावती टाळ्यांनी दिल्यावर बाईनी यमन संपविला. श्रोत्यांच्या आग्रहाखातर बाईंनी "ननदिया म्हारे बोल" ही पिलू ठुमरी थोडावेळ पण छान पेश केली आणि त्यांनी

तंबोरा खाली ठेवला. त्या छोट्याशा खोलीतले परिचित श्रोते निघून गेल्यावर सारंगीवाल्यांनी आम्ही अपरिचित श्रोते म्हणून आमची चौकशी केली. ''पुणे आकाशवाणी केंद्राचे प्रमुख अधिकारी श्री. के. डी दीक्षित साहेबांना घेऊन आलो आहे मी. त्यांना बाईंच गाणं खूप आवडलं आहे. तेव्हा मला वाटतं बाईंनी आकाशवाणीवर गायला सुरवात करावी म्हणजे केलेल्या तपस्येचा उपयोग होईल.''

मी गायिकेकडे पहात सारंगीवाल्या वयोवृद्धाशी बोलत होतो, त्यांनी माझाही परिचय करून घेतला. गायिकेनं आम्हा दोघांना विनम्र प्रणाम केला. मी बाईना नाव विचारलं.

**आनंद परमानंद रागसंगीताचा :**

मला वाटलं आकाशवाणीवर गाण्याची सुसंधी अनायासे प्राप्त झाली म्हणून त्या हुरळून जातील पण तशी उत्सुकता कुणीही दाखविली नाही व गायिकेनंही दाखविली नाही. सारंच आश्चर्य, बाईंनी हात जोडून सांगितलं की, ''साहेब, हे सारंगी वाजविणारे माझे वडील व माझे परमपूज्य गुरूजी आहेत. तेच मला गाणं सतत शिकवितात व मी मेहेनत करते. थोडंबहुत जे काही गाते ते नादब्रह्माची उपासना म्हणून केवळ आणि निरपेक्ष आत्मानंद म्हणूनच. मला यश, धन, कीर्ती यापैकी कशाचीही हाव नाही. तेव्हा आकाशवाणीवर किंवा लोकांपुढे गाण्याचे कार्यक्रम करून मला पैसे मिळवायचे नाहीत. माझं नाव मी कुणालाही सांगत नाही म्हणून मला लोक ''अनामिका'' म्हणतात. या इमारतीचे भाडेकरू हे आमचे खरे अन्नदाते आहेत. आम्हाला श्रीमंतीची हाव नाही. माझा सारा आनंद आणि परमानंद. या राग संगीताच्या उपासंनेतच साठलेला आहे. यापेक्षा जास्त काय सांगू? हे माझे वडील अब्दुल करीम खाँ साहेबांचे शिष्य आहेत. विद्येचा सागर आहेत.''

यावर मी म्हणलो, ''मग या गाण्यांचा लोकांना काय उपयोग? हे सारं व्यर्थ आहे असं नाही का वाटत?'' त्यावर बाईंनी खुलासा दिला. ''साहेब, माझी आई आणि माझे यजमान हेही संगीताचे उपासक होते ते आम्हाला अचानक सोडून गेले. पण जातेवेळी त्यांनी मला आज्ञा केली आहे की, तुझी संगीत तपस्या सतत चालू ठेव. ती वाया जाऊ देऊ नकोस. जे कुणी मनोभावे गाणं शिकायला

येतील त्या सर्वांना मुक्त हस्तानं विनामूल्य शिक्षण देण्याचं व्रत सातत्यानं चालू ठेवून निष्ठेनं श्रीसरस्वतीची सेवा कर. जे रसिक श्रोते, सज्जन इथे घरी तुझं गाणं ऐकायला येतील त्यांचीही निरपेक्ष सेवा कर. अपंग, दुबळे, गरीब यांच्यासाठीही तू गाण्याची सेवा कर, त्यांना आनंद दे, शिवाय अशा संस्थांच्या आर्थिक मदतीसाठी तुझ्या कलेचा उपयोग होईल तर ती बहुमोल सेवा घडेल परमेश्वराची. तो जनार्दन विश्वंभर तुझ्यावर सदैव कृपा करील. तुला मोक्ष मिळेल." ती गायिका अनामिकाबाई हे अनमोल विचार मोकळ्या मना हे सारं सांगत असतांना गहिवरली. तिच्या डोळ्यातून एकसारखे आनंदाश्रू वहात होते.

**सारं काही आश्चर्यकारक घडलं:**

हे पाहून आणि ऐकून आम्ही दोघे अवाक् झालो, स्तिमीत झालो आणि त्या वयोवृद्ध सदगुरुंना आदरपूर्वक प्रणाम करून बाईंच हार्दिक अभिनंदन करून भारविलेल्या अंतःकरणानं आम्ही त्यांचा निरोप घेतला. सारं काही आश्चर्यकारक घडलं व अनुभवलं ते अनपेक्षित होतं, श्रेष्ठ होतं.

**मी मुंबईला परतल्यावर :**


पंधरा-वीस दिवसांनी श्री. कृ. द. दीक्षितसाहेब यांचं मला पत्र आलं की, "धोंडोपंत कर्वे यांच्या संस्थेसाठी व अपंगांच्या संस्थेसाठी मदतीचे कार्यक्रम अनामिकाबाईनी विनामूल्य दिले आहेत ते ऐकायला मी जाणार आहे. तुम्हीही अवश्य याच."

संगीत कलेची साधना व निस्वार्थ सेवा करणाऱ्या नादब्रह्माच्या या श्रेष्ठ स्वर योगिनीला माझे सादर शतशः प्रणाम.

(रविवार, नवशक्ती ५ जुलै ९८.)

• • •

शासकीय मुद्रणालय, नागपूर.



## ए. पी. नारायणगावकर

पं.संगीतरत्न ए. पी. नारायणगावकर हे आकाशवाणीचे विशेष श्रेणीचे गायक कलाकार असून, संगीत नियोजकही आहेत. "हिज् मास्टर्स व्हॉइस" या सुप्रसिध्द ग्रामोफोन कंपनीत त्यांनी १० वर्षे संगीत दिग्दर्शक या नात्याने काम केले आहे. नंदादीप व मदिरा या संगीत नाटकातून रंगभूमीवर त्यांनी नायकाच्या भूमिका केल्या आहेत व त्या नाटकांना त्यांनी संगीतही दिले आहे. त्याचप्रमाणे ते राष्ट्रीय कीर्तनकारही आहेत. समाजकार्याची आवड असल्याने अनेक संस्थांचे पदाधिकारी म्हणून काम करतात. चेंबूर येथे त्यांची 'श्रीराम संगीत विद्यालय' ही संस्था ४७ वर्षे कार्यरत आहे. संगीतावर व संगीत कलाकारांवर त्यांनी केलेले लेखन अनेक वृत्तपत्रे व मासिकांतून प्रसिध्द झाले आहे. एच्. एम्. व्ही कंपनीने काढलेल्या व त्यांनी गायिलेल्या व त्यांच्या संगीत नियोजनाच्या अनेक ध्वनिमुद्रिका लोकप्रिय झाल्या आहेत. तरुण पिढीच्या कलाकारांसाठी त्यापैकी काही गाजलेल्या ध्वनिमुद्रिकांचे स्वरांकन 'माझ्या चाली' हे पुस्तक व निवडक लेखांचा संग्रह 'स्मृति नंदादीप' हे पुस्तक प्रसिध्द झालेले आहे.